CMYK

सोलापूर

तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | मंगळवार, २७ ऑगस्ट २०२४ । युगाब्द ५१२५ । वर्ष ३९ वे अंक २९७ । पाने १२ । किंमत रु. ६/- | RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

छत्रपती शिवरायांचा पुतळा पडला; संतापाची लाट

मालवणच्या समुद्र किनारी आठ महिन्यांपूर्वीच उभारला होता पुतळा; कामाचा दर्जा चव्हाट्यावर

तभा वृत्तसेवा । जमीर काझी
मुंबई, दि.२६ ऑगस्ट:

महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांचा सिंधुदुर्गातील राजकोट किल्ल्यावरील पुतळा वेगवान वाऱ्यामुळे तुटून पडला. अवघ्या आठ महिन्यांपूर्वी उभारण्यात आलेल्या या ३५ फूट उंचीच्या पुर्णाकृती पुतळ्याच्या कामाचा दर्जा त्यामुळे चव्हाट्यावर आला आहे. विशेष म्हणजे पुतळ्याच्या निकृष्ट उभारणीबाबत इतिहास संशोधकांनी पुतळा अनावरण प्रसंगीच राज्य सरकारला इशारा दिला होता. मात्र त्याकडे दुर्लक्ष करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मोठ्या भव्य दिव्य प्रमाणात पुतळ्याच्या अनावरण सोहळा करण्यात आला होता.

जेष्ठ इतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांनी गेल्या डिसेंबरमध्ये सोशल मीडियावर पोस्ट लिहून त्यांच्या दर्जा व सुरक्षिततेबाबत साशंकता व्यक्त केली होती.ती आजच्या दुर्घटनेमुळे खरी ठरली आहे. कोट्यावधी रुपये खर्चून बनवण्यात आलेल्या

पुतळ्याचे निकृष्ट काम व सरकारच्या त्याकडील दुर्लक्षाबाबत शिवप्रेमीतून संतापाची लाट उसळली आहे. सोशल मीडियावरून त्याबाबत सरकारवर टीकेची झोड उठली आहे. इतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांच्या मुळ पोस्टसह ती व्हायरल होत असून याप्रकरणी संबंधित शिल्पकार व ठेकेदारावर कठोर कारवाईची मागणी होत आहे.

राजकोट जलदुर्गावर भारतीय नौदलामार्फत बसविण्यात आलेल्या या पुतळ्याचे अनावरण ४ डिसेंबर २०२३ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले होते. त्यावेळी केंद्रीय गृहमंत्री राजनाथ सिंह, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित होते. या पुतळ्याचे काम जयदिप आपटे यांनी अवघ्या २ महिन्यात पुर्ण केले होते.त्यामुळे त्यांच्या दर्जाबाबत तेव्हाच प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले होते.

एकीकडे गडपती शिवरायांनी खळाळत्या समुद्रामध्ये बांधलेले जलदुर्ग साडेतीनशे वर्षानंतरही आपले अस्तित्व टिकून आहेत. त्यांचा चिराचिरा शिवाजी महाराजांच्या आणि हे गड किल्ले बांधणाऱ्यांच्या प्रामाणिकपणाची साक्ष देत आहेत. पण आज सिंधुदुर्ग शेजारी असणाऱ्या राजकोट या जलदुर्गावर बांधलेला पुतळा अवघ्या ८ महिन्यात कोसळल्याने इंद्रजित सावंत यांनी सरकारला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले आहे.त्यांची संतप्त प्रतिक्रिया सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. त्यांनी म्हटले आहे की,हा पुतळा बसवला त्याचवेळी त्यांच्या सौष्ठवाबद्दल आणि मजबुतीबद्दल आक्षेप घेतला होता. हा पुतळा शिवाजी महाराजांची प्रतिमा साकारत नाही. याबद्दल त्यावेळेला आम्ही पोस्ट लिहून लोकांसमोर मांडली होतो. पण याकडे सबंधितानी दुर्लक्ष केले . त्यानंतर ३ व ४ फेब्रुवारीला मी या पुतळ्याला भेटी दिली, त्यावेळीही हा पुतळा जास्त काळ टिकणार नाही. हे शिल्प बदलावे ,असे निरीक्षण नोंदवले होते. खरेतर नौदलासारख्या प्राख्यात आस्थापनेने केलेले काम हे चिरंतन व्हायला पाहिजे होते.

कारवाई व्हायला हवी

शिवाजी महाराजांची प्रेरणा म्हणून घाईगडबडीत बनविलेले असे उंच पुतळे अल्पावधीतच पडणार असतील तर ती आपण का उभी करावीत? याचाही शिवप्रेमीनी विचार करावा. हा पुतळा तयार करण्यासाठी आणि मंजूर केला त्या एजन्सी आणि पुतळा बसवणारे यांच्या हेतूविषयी शंका निर्माण झाली आहे. ज्यांनी हा अपराध केला त्यांच्यावर कारवाई व्हायला हवी

- इंद्रजित सावंत, ज्येष्ठ इतिहास संशोधक

पुतळ्याचे काम तातडीने सुरू करणार

झालेली घटना ही दुर्दैवी आहे. हा पुतळा नौदलाने उभारला होता. त्याचं कम्पलिट डिझाईन नेवीने तयार केलं होतं. मी कलेक्टरशी बोलल्यानंतर त्यांनी मला सांगितलं की, ताशी ४५ किमी वेगाचा वारा होता. सोसाट्याच्या वाऱ्यामुळे पुतळ्याचं नुकसान झाले .आहे. उद्या नेवीचे अधिकारी येणार आहेत. ते आणि आणि आमचे अधिकारी हे छत्रपती शिवरायांचा पुतळा उभारण्याचं पुन्हा काम करतील'',

- एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री

महत्त्वाचे...

छत्रपती शिवाजी महाराज चौकात आज शिवभक्तांचा निषेध

सोलापूर : सिंधुदुर्ग येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक कोसळले. अत्यंत निकृष्ट दर्जाचे काम या स्मारकाचे झाले. त्यामुळे ही घटना घडली. या घटनेचा निषेध करण्यासाठी उद्या मंगळवारी (दि. २७) सकाळी अकरा वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे निषेध व्यक्त करण्यासाठी सर्व शिवभक्तांनी उपस्थित राहावे, असे आवाहन सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.

संदीप घोषची दुसऱ्यांदा पॉलिग्राफी चाचणी

कोलकाता : प्रशिक्षणार्थी डॉक्टरवरील बलात्कार आणि हत्या प्रकरणात सीबीआयने आरजी कार वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाचा माजी प्राचार्य संदीप घोष आणि इतर पाच जणांची दुसऱ्यांदा पॉलिग्राफी चाचणी केली. मागील दहा दिवसांपासून संदीप घोष विचारलेल्या प्रश्नांना उडवाउडवीची ÷उत्तरे देत आहे. त्यामुळे त्याची दुसऱ्यांदा पॉलिग्राफी चाचणी घेण्याचा निर्णय घेण्यात आला, असे अधिकाऱ्याने सांगितले. सीबीआयने सुरुवातीला घोष आणि इतर पाच जणांची 'लाय डिटेक्शन' चाचणी घेतली. आरजी कार संस्थेतील आर्थिक अनियमिततेच्या प्रकरणात सीबीआयने घोष आणि माजी वैद्यकीय अधीक्षक तसेच उपप्राचार्य संजय वशिष्ठ याची चौकशी केली आहे. सीबीआयने रविवारी घोषच्या आणि वशिष्ठच्या घरावर छापेमारी केली. त्यानंतर घोषने सोमवारी सकाळी साल्ट लेक येथील तपास यंत्रणेच्या कार्यालयात फायली आणि दस्तावेज सादर केले.

बांगलादेशसारख्या चुका येथे नको

आग्रा : राष्ट्रापेक्षा मोठे काहीही असू शकत नाही. आपण एकजूट आणि उदात्त राहू तेव्हाच राष्ट्र राहील. तुम्ही विभागले गेले, तर तुमचे विभाजन होईल. बांगलादेशच्या चुका येथे करू नयेत. आपण एकसंध राहिलो, तर आपण सुरक्षित राहू, असे प्रतिपादन उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी केले. उत्तरप्रदेशातील आग्रा येथे शूर दुर्गादास राठोड यांच्या पुतळ्याचे अनावरण मुख्यमंत्री योगी यांच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी ते बोलत होते. मुघल सम्राट औरंगजेब दुष्ट होते. या आग्र्यामध्येच छत्रपती शिवाजी महाराजांनी औरंगजेबाला आव्हान दिले होते. तू उंदरासारखा तडफडत राहशील, पण तुला भारत काबीज करू देणार नाही, असे शिवाजी महाराजांनी औरंगजेबांना म्हटले होते.

युक्रेनचा रशियावर ९/११ सारखा हल्ला

३८ मजली इमारतीला ड्रोनची धडक

वृत्तसंस्था
मॉस्को, २६ ऑगस्ट

रशियातील सेराटोव्ह येथे युक्रेनने अमेरिकेतील वर्ल्ड ट्रेंड सेंटरवर ११ सप्टेंबर २००१ रोजी झालेल्या हल्ल्यासारखाच हल्ला केला. सेराटोव्हमधील ३८ मजली निवासी इमारतीला सोमवारी सकाळी ड्रोन धडकले. या हल्ल्यात दोन जण जखमी झाल्याची माहिती आहे. दरम्यान, हे ड्रोन हल्ले युक्रेनने केल्याचा दावा मॉस्कोच्या गव्हर्नरने केला. यावर युक्रेनने अद्याप प्रतिक्रिया दिलेली नाही.

युक्रेनच्या लष्कराने रशियातील सेराटोव्ह येथील सर्वांत उंच इमारतीला लक्ष्य केले. एंगेल्समध्ये रशियाचा लष्करी तळ आहे. रशिया-युक्रेन युद्ध सुरू झाल्यापासून युक्रेनने अनेकवेळा त्यावर हल्ले केले आहेत. या हल्ल्यात इमारतीच्या मोठ्या भागाचे तसेच इमारतीखाली उभ्या असलेल्या २० पेक्षा जास्त वाहनांचे नुकसान झाले. रशियन संरक्षण मंत्रालयाने म्हटले की, साराटोव्हमध्ये युक्रेनचे नऊ ड्रोन्स पाडण्यात आले. युक्रेन सीमेपासून सेराटोव्हचे अंतर ९०० किमी आहे. या हल्ल्यानंतर सर्व प्रकारच्या हवाई हालचालींवर बंदी घालण्यात आली. साराटोव्ह प्रदेशात नऊ ड्रोन्स नष्ट करण्यात आली आहेत.

युक्रेनला सडेतोड प्रत्युत्तर

रशियन सैन्याने सोमवारी पहाटेपासून युक्रेनच्या ड्रोन हल्ल्यांना सडेतोड प्रत्युत्तर देण्यास प्रारंभ केला. पहाटेपासून युक्रेनवर जोरदार क्षेपणास्त्र हल्ला करीत देशातील पायाभूत सुविधांना लक्ष्य केले. या हल्ल्यात तीन जण ठार, तर अनेक जखमी झाले. रशियाचा युक्रेनवर काही आठवड्यांतील हा सर्वांत मोठा हल्ला ठरला आहे. युक्रेनच्या हवाई दलाने दिलेल्या माहितीनुसार, युक्रेनमधील पूर्व, उत्तर, दक्षिण आणि मध्य प्रांतात रशियाकडून क्षेपणास्त्र हल्ले होत आहेत. युक्रेनची राजधानी कीव्हवरही हल्ले होत असून, शहरातील काही भागातील वीज आणि पाणीपुरवठा खंडित झाला आहे.

भाजपाच्या पहिल्या यादीवरून कार्यकर्ते नाराज

जाहीर करावी लागली १५ उमेदवारांची नवीन यादी

जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणूक

वृत्तसंस्था,
नवी दिल्ली, २६ ऑगस्ट

जम्मू-काश्मीर विधानसभेच्या पहिल्या टप्प्यात १८ सप्टेंबरला होणाऱ्या निवडणुकीसाठी भाजपाने आज १५ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली.

भाजपाने आज दुपारी ४४ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली होती. मात्र, या यादीवरून गदारोळ झाला. यादीतील काही उमेदवारांच्या नावांवरून जम्मूतील भाजपा कार्यालयात कार्यकर्त्यांनी गोंधळ घातला आणि आपल्या तीव्र भावनांचे प्रदर्शन केले. त्यामुळे भाजपाने ही यादी मागे घेत १५ उमेदवारांच्या नावांची दुसरी यादी काही वेळातच जाहीर केली.

भाजपाच्या केंद्रीय निवडणूक समितीच्या रविवारी झालेल्या बैठकीत या उमेदवारांच्या नावांवर शिक्कामोर्तब करण्यात आले होते. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या अध्यक्षतेत झालेल्या केंद्रीय निवडणूक समितीच्या बैठकीला पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, भाजपाचे राष्ट्रीय संघटन महासचिव बी. एल. संतोष, भाजपा महासचिव तरुण चुघ, राम माधव, जम्मूतील केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्रसिंह उपस्थित होते.

४४ उमेदवारांच्या पहिल्या यादीवरून गोंधळ झाल्यानंतर भाजपाने यातील ३० उमेदवारांची नावे रद्द केली. ज्या नावांवर कोणताही वाद नाही, अशा १४ नावांना हिरवी झेंडी दाखवण्यात आली. अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या कोकरनाग मतदारसंघातून चौधरी रोशन हुसने गुज्जर यांचे नाव जाहीर करण्यात आले. अशाप्रकारे १५ उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली.

भाजपाने आपल्या पहिल्या यादीत राज्यातील अनेक ज्येष्ठ भाजपा नेत्यांना उमेदवारी नाकारली होती. माजी उपमुख्यमंत्री आणि माजी प्रदेश अध्यक्ष डॉ. निर्मलसिंह यांनाही उमेदवारी नाकारली. अन्य एक माजी उपमुख्यमंत्री कविंद्र गुप्ता यांचेही नाव यादीत नव्हते. २०१४ च्या निवडणुकीत गुप्ता बिलावल मतदारसंघातून विजयी झाले होते. भाजपाने आपल्या पहिल्या यादीत वीर सराफ आणि अशोक भट या दोन काश्मिरी पंडितांना उमेदवारी दिली होती. केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्रसिंह यांचे बंधू देवेंद्र राणा यांनाही भाजपाने उमेदवारी दिली होती. राणा नॅशनल कॉन्फरन्समधून भाजपात आले आहेत.

नाराज कार्यकर्त्यांची जम्मूतील कार्यालयात घोषणाबाजी

वृत्तसंस्था,
नवी दिल्ली, २६ ऑगस्ट

पक्षाच्या निष्ठावान कार्यकर्त्यांना डावलून बाहेरून आलेल्यांना उमेदवारी दिल्याने जम्मू-काश्मीरमध्ये भाजपा कार्यकर्त्यांमधील असंतोषाचा आज स्फोट झाला. पॅराशूट उमेदवारांचा भाजपा कार्यकर्त्यांनी विरोध केला.

विधानसभेच्या तीन टप्प्यांत होणाऱ्या निवडणुकीसाठी भाजपाने ४४ उमेदवारांच्या नावांची पहिली यादी आज जाहीर केली. यात पहिल्या टप्प्यातील निवडणुकीचे १५, दुसऱ्या टप्प्यातील निवडणुकीचे १० आणि तिसऱ्या टप्प्यातील निवडणुकीच्या १९ उमेदवारांचा समावेश होता. भाजपाने जम्मू उत्तर मतदारसंघातून पक्षाचे ज्येष्ठ नेते ओमी खजुरिया यांना उमेदवारी नाकारली आणि त्यांच्या ऐवजी काँग्रेसमधून आलेले श्यामलाल शर्मा यांना उमेदवारी दिली. यामुळे खजुरिया यांचे समर्थक संतप्त झाले. त्यांनी जम्मूतील भाजपाच्या कार्यालयात धाव घेत जोरदार निदर्शने केली.

श्यामलाल शर्मा बाहेरचे उमेदवार आहे, जम्मू उत्तर मतदारसंघात त्यांचे नावही नाही. त्यामुळे त्यांना कशी उमेदवारी दिली, अशी विचारणा हे कार्यकर्ते करीत होते. खजुरिया यांना उमेदवारी मिळाली नाही तर, पक्षाचा राजीनामा देण्याचा इशारा या कार्यकर्त्यांनी दिला. कार्यकर्त्यांच्या तीव्र भावना लक्षात घेता प्रदेश अध्यक्ष रवींद्र रैना यांनी स्वत:ला आपल्या दालनात बंद करून घेतले.

महिला करू शकतील ऑनलाईन तक्रार

अजित पवार यांची माहिती

पुणे, २६ ऑगस्ट

छेडछाडीची तक्रार महिलांना ऑनलाईन करता यावी, याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या निर्देशावर महाराष्ट्र मंत्रिमंडळाने चर्चा केली तसेच या मुद्यावर वेगळा दृष्टिकोन अवलंबण्याचा निर्णय घेतला, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सोमवारी दिली.

रविवारी जळगाव येथे झालेल्या कार्यक्रमात पंतप्रधान मोदी यांनी महिलांविरोधातील

गुन्हे अक्षम्य आहेत आणि महिलांच्या सुरक्षेला प्राधान्य असल्याचे म्हटले होते. कोलकात्याच्या आरजी कार महाविद्यालयात प्रशिक्षणार्थी महिला डॉक्टरची बलात्कारानंतर झालेली हत्या आणि बदलापुरात दोन बालिकांवर झालेल्या अत्याचार प्रकरणी मोदी यांनी ही टिप्पणी केली होती.अशा प्रकारच्या तक्रारी ऑनलाईन करण्याची व्यवस्था करा, असा निर्देश नरेंद्र मोदी यांनी दिला आणि त्यावर अंमलबजावणी करण्याचा निर्णय आम्ही तत्काळ घेतला. अशा प्रकारची काही प्रकरणे समोर येत आहेत. अशा प्रकारचे गुन्हे रोखण्यासाठी वेगळा दृष्टिकोन अवलंबण्याचा निर्णय आम्ही घेतला. या मुद्यावर रविवारी मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चा करण्यात आली, असे अजित पवार म्हणाले.

पेटीएम संस्थापकांना कारणे दाखवा नोटीस

मुंबई : बाजार नियामक सिक्युरिटीज एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) ने पेटीएमचे संस्थापक विजय शेखर शर्मा आणि नोव्हेंबर २०२१ मध्ये आयपीओ ऑफर दरम्यान सहभागी असलेल्या बोर्ड सदस्यांना कारणे दाखवा नोटीस जारी केली आहे. ही नोटीस आयपीओ दरम्यान तथ्यांचे चुकीचे वर्णन केल्याच्या आरोपांशी संबंधित आहे.

सोलापूर : चाटी गल्ली येथील लक्ष्मीनारायण मंदिरात सोमवारी रात्री श्रीकृष्ण-रुक्मिणीला फुलांची सजावट करण्यात आली होती. त्यासाठी झेंडू व जास्वंदाच्या ४०० किलो फुलांचा वापर करण्यात आला होता. श्री बालक मंडळी कार्यक्रमानिमित्त राजस्थानी सत्संग परिवारातर्फे भजन गायक विठ्ठल दायमा ग्रुपने भजन सादर केले. यावेळी भजनात तल्लीन भक्तगण. छायाचित्र : केवल तिवारी.

बदलापूरच्या शाळेतील १५ दिवसांचे सीसीटीव्ही फुटेज गायब

शिक्षण मंत्री केसरकरांची धक्कादायक माहिती

मुंबई, २६ ऑगस्ट

बदलापूर येथे झालेल्या चिमुकल्यांवरील लैंगिक अत्याचार प्रकरणातील संबंधित शाळेतील १५ दिवसांचे सीसीटीव्ही रेकॉर्डिंग नष्ट झाले आहेत. सीसीटीव्ही गायब झाल्याची बाब शिक्षण विभागाच्या चौकशी समितीतून समोर आली असून, सदर बाब शाळेच्या पदाधिकाऱ्यांना माहिती असतानाही कुठलीही पावले उचलली नाही, अशी धक्कादायक माहिती शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी दिली.

येथील शाळेत घडलेल्या प्रकारासंदर्भात समिती नेमण्यात आली होती. अहवालातून समोर आलेल्या माहितीनुसार आम्ही यावर निर्णय घेतला. प्रत्येक शाळेत सीसीटीव्ही लावणे आवश्यक आहे. मात्र बदलापूर शाळेतील १५ दिवसाचे रेकॉर्डिंग गायब आहे, असे केसरकर यांनी पत्रपरिषदेत सांगितले. मुलींच्या कुटुंबीयांची आम्ही लवकरच भेट घेणार असून, त्यांच्या पदवीपर्यंतच्या शिक्षणाची जबाबदारी मी घेत आहे. अत्याचाराच्या घटनेतील मुलीला १० लाखांची मदत आणि जिच्यावर अत्याचाराचा प्रयत्न झाला, तिला तीन लाख मदत करणार आहोत. दोघींच्या शिक्षणाचा खर्चही आम्ही उचलू, अशी माहिती केसरकर यांनी दिली.

महत्त्वाचे

तुळजाभवानीला पाच तोळ्यांचे गंठण अर्पण

तुळजापूर : बारामती येथील रवींद्र क्षीरसागर या भाविकाने तुळजाभवानी मातेला पाच तोळ्यांचे सोन्याचे गंठण अर्पण केले आहे. तर तेलंगणातील निधीसिंग यांनी तुळजाभवानी मातेच्या चरणी एक किलोची चांदीची नऊ बिस्किटे अर्पण केली आहेत.

रवींद्र क्षीरसागर यांनी कुटुंबासह तुळजाभवानी मातेची कुलधर्म कुलाचार पूजा केली. यावेळी क्षीरसागर यांच्याकडून तुळजाभवानी मातेला ५२ ग्रॅम सोन्याचे गंठण (मणी व खड्यांसह) अर्पण करण्यात आले. मंदिर संस्थानच्या वतीने विश्वास परमेश्वर यांनी क्षीरसागर कुटुंबाचा तुळजाभवानी मातेची प्रतिमा भेट देऊन सत्कार केला. यावेळी जयराज रणदिवे यांच्यासह मंदिर संस्थानचे कर्मचारी उपस्थित होते. ■

लाल समुद्रात चार दिवसांपासून जळतंय जहाज

येमेन : लाल समुद्रात चार दिवसांपासून ग्रीक जहाजाला आग लागली आहे. येमेनच्या हुथी बंडखोरांनी गुरुवारी या जहाजावर हल्ला केला. यानंतर जहाजाला आग लागली, जी अद्याप विझलेली नाही. लाल समुद्रातील युरोपियन युनियन नौदलाच्या एस्पाईड्स मिशनने सोमवारी सोशल मीडिया पोस्टमध्ये ही माहिती दिली. एस्पाईड्स मिशन टीमने मुख्य डेकमधून धूर येत असल्याचा फोटो शेअर केला आहे. जहाजाच्या मुख्य डेकवर पाच ठिकाणी आग लागली आहे. याशिवाय जहाजाच्या वरच्या भागालाही आग लागली आहे. या जहाजावर दीड लाख टन कच्चे तेल आहे. जहाजाचे नुकसान झाल्यास तेलाची गळती होऊ शकते, ज्यामुळे पर्यावरणालाही धोका निर्माण होतो. सध्या जहाजातून तेल गळती झाल्याची माहिती नाही.

भिलवाडामध्ये धार्मिक कारणावरून तणाव

भिलवाडा : धार्मिक स्थळाबाहेर प्राण्यांचे अवशेष आढळल्याने भिलवाडा शहरातील वातावरण तापले आहे. गेल्या दोन दिवसांपासून लोक रस्त्यावर उतरत आहेत. सोमवारी जमावाने लाठ्या-काठ्या घेऊन बाजारपेठा बंद पाडल्या. बाजारपेठेतही दगडफेक करण्यात आली. यानंतर परशुराम सर्कल येथे लोक जमा झाले. येथून जमाव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सरकू लागला. लगेच पोलिस सक्रिय झाले आणि लाठीचार्ज जमावाला पांगवले. परशुराम सर्कल येथे निदर्शने सुरू आहेत. वातावरण तणावपूर्ण आहे. संपूर्ण परिसराचे छावणीत रूपांतर झाले आहे.

सुदानमध्ये मुसळधार पावसाने धरण कोसळले

कैरो : पूर्व सुदानमध्ये मुसळधार पावसामुळे एक धरण कोसळून डझनभर लोक बेपत्ता झाल्याची माहिती स्थानिक प्रसारमाध्यमांनी दिली. धरणात अडकलेल्या लोकांना मदत करण्यासाठी या भागात संसाधने तैनात करण्यात आली, असे एका निवेदनात म्हटले आहे. पाण्यात बुडून किमान चार जणांचा मृत्यू झाला. एका स्थानिक अधिकाऱ्याने सांगितले की, अनेक जण बेपत्ता असल्याची शक्यता आहे.

अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या तिघांना अटक

ठाणे : नवी मुंबई येथे अमली पदार्थ विरोधी कक्षाने तिघांना अटक केली. यात एका महिलेचा समावेश आहे. त्यांच्याकडून पोलिसांनी २० लाख रुपये किमतीचे १०० ग्रॅम हेरॉईन जप्त केले. मिळालेल्या माहितीनुसार, एनसीबीने तुर्भे येथील एका वस्तीत छापा टाकला आणि इत्तरूल इर्शाद शेख, आणि सन्नारूल इर्शाद शेख या दोन भावांना अटक केली. त्यांच्याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारावर एका महिलेला अटक करण्यात आली. ■

नाशिक जिल्ह्यात संततधार; गोदावरीला पूर

गोदाकाठावरील जनजीवन विस्कळीत ● १४ धरणांतून पाण्याचा विसर्ग ● नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा

◆ **नाशिक, २६ ऑगस्ट**

गेल्या तीन ते चार दिवसांपासून नाशिक शहरासह जिल्ह्यात पावसाची संततधार सुरू आहे. यामुळे जिल्ह्यातील नद्या दुथडी भरून वाहत आहेत. गंगापूर धरणातून विसर्ग सुरू असल्याने गोदावरीची पूरस्थिती कायम आहे. गोदावरीच्या पाणी पातळीत वाढ झाल्याने गोदाकाठावरील मंदिर आजही पाण्याखाली आहेत. तर गोदामाईने नारोशंकराला जलाभिषेक घातला आहे. सलग तीन दिवसांपासून पूर असल्याने गोदाकाठावरील जनजीवन विस्कळीत झाले आहे. नाशिक जिल्ह्यातील सर्वच ठिकाणी पाऊस असल्याने १४ धरणांतून पाण्याचा विसर्ग सुरू आहे. यामुळे नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

आज सकाळी गंगापूर धरणासह पालखेड, दारणा आणि नांदूरमध्यमेश्वर धरणातून विसर्ग सुरू करण्यात आला आहे. सध्या गंगापूर धरण ८९.८४ टक्के भरले असून, धरणातून सकाळी ६ वाजता ८ हजार ४२८ क्यूसेक्स वेगाने विसर्ग सुरू करण्यात आला होता. त्यानंतर सकाळी ९ वाजता हा विसर्ग १२०४ क्यूसेक्सने कमी करून एकूण ७ हजार २२४ क्यूसेक्सने सोडण्यात आले असून, पावसाचा जोर कायम असल्यास टप्प्याटप्प्याने एकूण विसर्ग वाढवण्यात येणार आहे.

या धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू असल्याने गोदाकाठावरील छोटी-मोठी मंदिरे पाण्याखाली गेली आहेत. तसेच, या सोडण्यात आलेल्या पाण्यामुळे नाशिक शहरात सलग तिसऱ्या दिवशीही पूर परिस्थिती कायम आहे. आज सकाळी दुतोंड्या मारुतीच्या मानेपर्यंत पाणी पोहचले होते. गोदावरी नदीला आलेल्या पुराने जनजीवन विस्कळीत झाल्याचे चित्र आहे. गोदा काठावरील भाजीपाला, पूजा साहित्य आणि इतर विक्रेत्यांचे हाल होताना दिसून येत आहे. ◀*(वृत्तसंस्था)*

नाशिक शहरात चार दिवसांपासून 'कोसळधार' कायम आहे. यामुळे गोदावरी नदी फुगली असून, श्रावण महिन्याच्या चौथ्या सोमवारी गोदामाईने नदीकिनारी असलेल्या नारोशंकराच्या मंदिराला स्पर्श केला. जणू महादेवाला अभिषेक करण्यासाठीच गोदावरीचे पाणी मंदिरापर्यंत गेले होते

त्र्यंबकेश्वरला भाविकांची गैरसोय

त्र्यंबकेश्वरसह ग्रामीण भागात मुसळधार पाऊस कोसळत आहे. त्यामुळे लोक अक्षरक्ष: हैराण झाले आहेत, तर त्र्यंबक शहरात रस्त्यांवर पाणीच पाणी साचल्याने शहराला पुराचे स्वरूप प्राप्त झाले आहे. आज चौथा श्रावणी सोमवार असल्याने त्रंबकेश्वरच्या दर्शनासाठी भाविकांची गैरसोय होत असल्याचे दिसून आले आहे. ■

१८ राज्ये, केंद्रशासित प्रदेशांचे मुख्य सचिव आज सुप्रीम कोर्टात

नवी दिल्ली, २६ ऑगस्ट

न्यायिक अधिकाऱ्यांसाठी निवृत्ती थकबाकी आणि इतर लाभांसाठी स्थापन करण्यात आलेल्या दुसऱ्या राष्ट्रीय न्यायिक वेतन आयोगाच्या (एसएनजेपीसी) शिफारसींची अंमलबजावणी न करणाऱ्या १८ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य सचिवांना सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी हजर राहण्याचा आदेश दिला आहे.

तामिळनाडू, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, पश्चिम बंगाल, छत्तीसगड, दिल्ली, नागालॅण्ड, मेघालय, हिमाचल प्रदेश, जम्मू-काश्मीर, लडाख, झारखंड, केरळ, बिहार, गोवा, हरयाणा आणि गोव्यातील मुख्य सचिव व्यक्तीशः मंगळवारी न्यायालयात उपस्थित राहणार आहेत.

ऑल इंडिया जजेस असोसिएशनने दाखल केलेली आणि तशाच इतर २२ याचिका सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्या. जे. बी. पार्डीवाला आणि न्या. मनोज मिश्रा यांच्या न्यायासनाने मंगळवारी सकाळी साडेदहा वाजता सुनावणीसाठी सूचीबद्ध केल्या असल्याचे न्यायालयाच्या संकेतस्थळावरून स्पष्ट झाले.

एसएनजेपीसीची अंमलबजावणी नाही

कोणतेही ठोस अनुपालन झाले नसल्याचे मी पाहू शकतो. या राज्यांच्या मुख्य सचिवांनी व्यक्तिशः न्यायालयत हजर राहावे, अन्यथा त्यांच्या विरोधात गैरजमानती वॉरंट काढला जाईल, असे निरीक्षण सरन्यायाधीशांनी २२ ऑगस्ट रोजी झालेल्या सुनावणीत नोंदवले होते.

एआयमुळे इन्फोसिसमधील कोणाचीही नोकरी जाणार नाही

सीईओने केला दावा

◆ **बंगळुरू, २६ ऑगस्ट**

आर्टिफिशियल इंटेलिजन्सचे (एआय) प्रस्थ जगभरात वाढत असल्याचे मान्य करीत इन्फोसिसने यामुळे आपल्या कंपनीत नोकर कपात होणार नसल्याचे म्हटले आहे.

एआय हे नव्या काळात एक वरदान ठरत असतानाच आयटी क्षेत्रातील अनेक नोकऱ्या यामुळे धोक्यात आल्या आहेत. अमेरिका आणि युरोपात अनेक कंपन्यांनी मोठ्या प्रमाणावर नोकर कपातीची घोषणा केली आहे. याचा थेट संबंध एआयशी जोडला जात आहे. एआयमुळे कर्मचाऱ्यांची गरज फारशी उरलेली नाही, अशी धारणा समोर आली आहे. त्या पृष्ठभूमीवर देशातील मोठी आयटी कंपनी इन्फोसिसचे सीईओ सलील पारेख म्हणाले की, कंपनी डेटा ॲनालिटिक्स आणि सैससह अनेक क्षेत्रात काम करणाऱ्या कंपन्यांना खरेदी करण्याचा विचार करत आहे. हे अधिग्रहण युरोप आणि अमेरिकेत होण्याची आहे. कर्मचारी कपातीसाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्सला दोष देणे योग्य नाही. एआयमुळे इन्फोसिसमध्ये कोणतीही कर्मचारी कपात होणार नाही. आम्ही नोकर भरती वाढवणार आहोत.

एआय हे नव्या काळातील प्रभावी कामासाठीचे माध्यम आणि साधन आहे. याचा वापर कितपत आणि कसा करायचा, हे सर्वस्वी आपल्या हाती आहे. त्याचा अतिवापर रोजगारावर परिणाम करीत असल्याचे चित्र आहे. मात्र, हा परिणाम आमच्या कंपनीत दिसणार नाही, याची आम्ही खबरदारी घेऊ, असेही पारेख म्हणाले. ◀*(वृत्तसंस्था)*

वाघाच्या हल्ल्यात शेतकऱ्याचा मृत्यू

◆ **सावली, २६ ऑगस्ट**

बैल चारण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्यावर वाघाने हल्ला करून ठार केले. ही घटना आज सोमवारी सावली वनपरिक्षेत्रातील व्याहाड खुर्द उपवन क्षेत्रातील सिरसी बिटातल्या कक्ष क्रमांक १९७ मध्ये घडली. आनंद वासेकर असे मृत शेतकऱ्याचे नाव असून तो डोनाळा येथील रहिवासी होता.



शेतकऱ्याने आपले स्वमालकीचे बैल चराईसाठी जंगल परिसरात नेले होते. दबा धरून बसलेल्या वाघाने त्याच्यावर हल्ला केला. ही बाब लगतच असलेल्या गुराख्याच्या लक्षात आली. त्याने आरडाओरड केली. पण, वाघाने शेतकऱ्याला दूरवर ओढत नेले.

ग्रामस्थ व वनाधिकाऱ्यांनी घटनास्थळ गाठले. जंगल परिसरात शोधमोहीम राबवली. अखेर शेतकऱ्याचा मृतदेह आढळला. पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी सावली ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला. मृताच्या कुटुंबीयांना तत्काळ २५ हजार रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली. यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी विनोद धुर्वे, उपवन परिक्षेत्र अधिकारी सूर्यवंशी, बीट वनरक्षक महादेव मुंडे, वनरक्षक सोनेकर, वनरक्षक खुळे व वन कर्मचारी उपस्थित होते. ◀*(तभा वृत्तसेवा)*

'मामा, आईला १५००; पण माझ्या सुरक्षेचं काय?'

शाळेच्या भिंतीवरील छायाचित्राची समाजमाध्यमावर धूम

◆ **कारंजा (घा.), २६ ऑगस्ट**

येथील शाळेच्या भिंतीवर रेखाटलेल्या छायाचित्राने सध्या समाजमाध्यमावर चांगलीच धूम ठोकली आहे. या छायाचित्रातून एका शिक्षकाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना संदेश दिला आहे.

राज्यात 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना सुरू केली. या योजनेतून 'लाडक्या बहिणीं'ना १५०० रुपये अर्थसाहाय्य त्यांच्या बँक खात्यात जमा होत आहे. यातच राज्यात मुली असुरक्षित असल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. बदलापूर येथे शाळेतच मुली असुरक्षित असल्याची घटना घडली. दोन अल्पवयीन मुलींवर अत्याचार झाला. याचे राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यांत पडसाद दिसून आले.

व्हायरल होत असलेले छायाचित्र

त्यामुळे घाडगे येथील कस्तुरबा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील एका शिक्षकाने शाळेच्या भिंतीवर चित्र रेखाटले. त्यातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना या छायाचित्रातून संदेश दिला जात आहे. 'मामा, आईला १५०० रुपये तर दिले; पण माझ्या सुरक्षेचं काय?' असा प्रश्न या चित्रातून विचारला जात आहे. ◀*(तभा वृत्तसेवा)*

आदित्य ठाकरेंनी पळ काढण्यापेक्षा उत्तर द्यावे

नितेश राणे यांचे आव्हान

दिशा सालियान मृत्यू प्रकरण

◆ **मुंबई, २६ ऑगस्ट**

दिशा सालियानच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणी आदित्य ठाकरे यांना छत्रपती संभाजीनगरमधील रामा हॉटेलमध्ये भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते जनतेच्या मनातील प्रश्न विचारण्यासाठी गेले असता आदित्य ठाकरे यांनी तेथून पळ न काढता उत्तर द्यायला हवे होते. तुमचे चारित्र्य स्वच्छ असते तर छातीठोकपणे उत्तर द्यायला हवे होते मात्र तुम्ही तसे न करता पळ का काढला? हॉटेल बाहेर येण्याची हिंमत का दाखवली नाही, असे सवाल भारतीय जनता पार्टीचे आमदार नितेश राणे यांनी सोमवारी उपस्थित केले.

भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी राणे म्हणाले की, उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, संजय राऊत हे अलिकडे महिला अत्याचारावर बोलत आहेत. मात्र, आदित्य ठाकरे, संजय राऊत यांच्यावर महिला अत्याचार प्रकरणी अनेक आरोप झाले आहेत. आदित्य ठाकरे यांना दिशा सालियान वरील सामूहिक बलात्कार, तिच्या खून प्रकरणी प्रश्न विचारण्यात काहीच चुकीचे नाही. पत्रकारांनी आदित्य यांना प्रश्न केला असता ते सांगतात की हा राजकीय विषय आहे पण दिशा, सुशांतसिंग राजपूत खून प्रकरण तसेच अल्पवयीन मुलांच्या छळाचा मुद्दा हा राजकीय विषय होऊच शकत नाही. आदित्य यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिशा सालियान खून प्रकरणी आपला संबंध नाही असे पुरावे द्यायला हवे होते. आदित्य यांनी ८ जूनच्या त्यांच्या लोकेशनचे पुरावे देत केले जाणारे सर्व आरोप खोटे असल्याचे सिद्ध करायला हवे होते. तुमचे निर्दोषत्व सिद्ध केले तर मी ठाकरे कुटुंबाची माफी मागायला तयार आहे असेही आव्हान आ. राणे यांनी दिले.

उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना दिशा प्रकरणी आरोप झालेल्या आदित्य यांचा राजीनामा का घेतला नाही. उबाठा गटाचे प्रवक्ते संजय राऊत यांच्यावर डॉ. स्वप्ना पाटकर यांनी पोलिसांकडे केलेल्या तक्रारीत गंभीर आरोप केले आहेत. या महिलेने संजय राऊत यांच्याविरुद्ध उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना तक्रार केली होती. मात्र, त्याची दखल घेतली गेली नाही, असेही आ. राणे म्हणाले. ◀*(तभा वृत्तसेवा)*

जन्माष्टमीचा महोत्सव सोमवारी देशभरातच मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कर्नाटकच्या चिकमंगळुरू येथील एक महिला आपल्या दुचाकीवर राधा आणि कृष्णाच्या वेशभूषेतील लहान मुलांना नेताना

मराठा आंदोलकांनी अडवला आदित्य ठाकरेंचा ताफा

पैठण : छत्रपती संभाजीनगर येथील आदित्य ठाकरे यांचा दौरा चांगलाच वादात सापडला आहे. भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी दिशा सालियान प्रकरणावरून आदित्य ठाकरे यांना घेरण्याचा प्रयत्न करत आंदोलन केले होते. मात्र, त्यात उबाठा विरुद्ध भाजपाचे कार्यकर्ते समोरासमोर आल्याने तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. आता आदित्य ठाकरे पैठण दौऱ्यावर असताना तिथे देखील त्यांना मराठा आंदोलकांच्या रोषाला सामोरे जावे लागले. आदित्य ठाकरे यांच्या रॅलीमध्ये एक मराठा लाख मराठा अशी घोषणाबाजी करण्यात आली. शिवसेनेचे नेते आमदार आदित्य ठाकरे सध्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. ■

पंतप्रधान मोदी यांची अल्बानिजशी चर्चा

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांचे ऑस्ट्रेलियन समकक्ष अँथनी अल्बानिज यांच्याशी चर्चा केली. यावेळी दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय संबधांचा आढावा घेतला. सोमवारी एक्सवरील एका पोस्टमध्ये मोदी म्हणाले, माझे मित्र अल्बानिज यांच्याशी बोलून मला आनंद झाला.

द्विपक्षीय संबधांमधील प्रगतीचा आढावा घेतला.नोव्हेंबर २०१७ मध्ये भारत, जापान, अमेरिका आणि ऑस्ट्रेलियाने संवेदनशील सागरी मार्गावर नियंत्रण ठेवण्यासाठी नवीन धोरण विकसित करण्यासाठी क्वाडच्या स्थापनेच्या प्रस्तावाला आकार दिला, असे मोदी यांनी म्हटले आहे.

मणिपुरात केवायकेएलच्या तीन बंडखोरांना अटक

इम्फाळ : खंडणी मागण्याच्या आरोपाखाली प्रतिबंधित कांग्लेइ यावोल कानबा लूप अर्थात् (केवायकेएल) संघटनेच्या तीन बंडखोरांना अटक करण्यात आली, अशी माहिती पोलिसांनी दिली. ही कारवाई पश्चिम इम्फाल जिल्ह्यातील उचेकॉन परिसरात शनिवारी करण्यात आली. ऑइनाम मिलन सिंह, युमनाम रणबीर सिंह आणि खैदाम धनबीर मैतेई, अशी या बंडखोरांची नावे आहेत. इम्फाळच्या परिसरात खंडणी वसुलीमध्ये ते गुंतले होते. पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून चार मोबाईल आणि चार चाकी वाहन जप्त केले आहे. ■

हत्येचा आरोपी अभिनेत्याला कारागृहात व्हीआयपी वागणूक

सात अधिकारी निलंबित

◆ **बंगळुरू, २६ ऑगस्ट**

आपल्या चाहत्याच्या हत्येप्रकरणी बंगळुरूच्या परप्पाना अग्रहारा मध्यवर्ती कारागृहात बंद असलेला कन्नड अभिनेता दर्शन थुगुडेपा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.

अलिकडेच, अभिनेत्याचा तुरुंगातून एक फोटो समोर आला आहे, ज्यामध्ये तो तुरुंगाच्या बागेत अगदी निवांतपणे इतर तीन लोकांसह बसून चहा आणि सिगारेटचा आनंद घेताना दिसत आहे. या आरोपींना तुरुंगात मिळणारी व्हीव्हीआयपी वागणूक या छायाचित्रातून समोर आली आहे.

ही दोन छायाचित्रे समोर आल्यानंतर कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी या प्रकरणी मोठा निर्णय घेतला आणि राज्याच्या डीजीपींना तातडीने दर्शनला दुसऱ्या तुरुंगात हलवण्याचा आदेश दिला. तसेच कारागृहाला भेट देऊन प्रकरणाचा संपूर्ण अहवाल सादर करावा. मुख्यमंत्र्यांच्या या आदेशानंतर डीजीपी मालिनी कृष्णमूर्ती यांनी तातडीने कारवाई करत सोमवारी कारागृहाला भेट दिली आणि परप्पाना अग्रहारा कारागृहातील सात जणांना निलंबित केले. ◀*(वृत्तसंस्था)*

शहजाद पूनावाला यांचा राहुल गांधींना सवाल

हा व्हायरल फोटो सोशल मीडियावर शेअर करताना भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते शहजाद पूनावाला यांनी काँग्रेस नेते राहुत गांधी यांना विचारले आहे की हे कर्नाटक काँग्रेसचे 'खटखट मॉडेल' आहे का? ■

आदिवासी पाड्यांचे आदर्श गावांमध्ये रूपांतर करावे

राज्यपाल राधाकृष्णन् यांचे प्रतिपादन

◆ **मुंबई, २६ ऑगस्ट**

आदिवासी बांधवांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांचा विकास साधण्यासाठी केंद्र व राज्य शासनामार्फत विविध योजना राबविल्या जातात. आदिवासी बांधवांच्या शेवटच्या घटकापर्यंत शासनाच्या विविध योजनांचा लाभ पोहोचविण्यासाठी विशेष प्रयत्न करावे. आदिवासी बांधवांना पायाभूत सुविधा आणि उत्तम सेवा देऊन आदिवासी पाड्यांचे आदर्श गावांमध्ये रूपांतर करण्यासाठी विशेष प्रयत्न करावे, असे प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन् यांनी केले.

आदिवासी जिल्ह्यात प्रायोगिक तत्त्वावर आदर्श आदिवासी गाव बनविणे आणि आदिवासी विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करणे या विषयाबाबत राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन् यांच्या अध्यक्षतेखाली आज राजभवन येथे बैठक झाली.

या बैठकीला आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित, आरोग्य विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, महसूल विभागाचे अप्पर मुख्य सचिव राजेश कुमार, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी यांच्यासह विविध विभागांचे सचिव, वरिष्ठ अधिकारी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन् म्हणाले, राज्यात आदर्श आदिवासी गाव ही कल्पना देशाच्या विकासात महत्त्वपूर्ण ठरेल. या गावांमध्ये रस्ते, शुद्ध पिण्याचे पाणी, पायाभूत सुविधा, वैद्यकीय सुविधा, दर्जेदार शिक्षण, शाश्वत कृषी विकास, व्यावसायिक प्रशिक्षण आणि उद्योजकतेला प्रोत्साहन द्यावे. ही आदर्श गावे ज्ञानाच्या देवाणघेवाणीला चालना देण्याबरोबरच आदिवासी बांधवांच्या सबलीकरणाबरोबरच आत्मविश्वास वाढवताना मानक म्हणून काम करतील.

आदिवासी विद्यार्थ्यांसाठी उत्तम शाळा सुरू करून दर्जेदार शिक्षण देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. या विद्यार्थ्यांसाठी 'केजी टू पीजी' पर्यंतचे उत्तम शिक्षण देण्याचा शासनाचा मानस आहे. प्रस्तावित आदिवासी विद्यापीठांमध्ये अधिकाधिक राखीव जागा देऊन आदिवासी विद्यार्थ्यांची स्वप्ने पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा, असे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन् यांनी सांगितले. ◀*(तभा वृत्तसेवा)*

संक्षिप्त वृत्त

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नितीन पाटील यांची आज राज्यसभेवर बिनविरोध निवड झाली. यावेळी त्यांनी विधानभवनात निवडणूक अधिकाऱ्यांकडून पत्र स्वीकारले. निवडीबद्दल पक्षाचे कोषाध्यक्ष आमदार शिवाजीराव गर्जे यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. यावेळी पक्षाचे सहकोषाध्यक्ष संजय बोरगे आदी उपस्थित होते.

मुंबई-गोवा मार्ग गणेशोत्सवापूर्वी सुरळीत करा; मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश

मुंबई, दि. २५ ऑगस्ट-

मुंबई -गोवा महामार्गाची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज पाहणी केली. रस्त्यावर जागोजागी पडलेले खड्डे आणि ते बुजवताना येणाऱ्या अडचणी जाणून काहीही करून गणेशोत्सवपूर्वी हा रस्ता नीट करून वाहतुकीसाठी सुरळीत करावा ,असे निर्देश त्यांनी संबंधित यंत्रणांना दिले आहेत. तसेच तातडीने या मार्गावरील खड्डे बुजवण्यासाठी रेपीड क्विक सेटिंग हार्डनर (एम -६०) चा वापर करून हे खड्डे बुजवता येथील का? याचाही आढावा घेतला. याबाबत सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या बैठकीवेळीच त्यांनी संबंधित यंत्रणांना हे रस्ते सुरळीत करण्याच्या सूचना दिलेल्या होत्या. या सूचनांची कितपत अंमलबजावणी झाली आहे याचाही आढावा ते या दौऱ्यात घेणार आहेत. यावेळी खासदार श्रीरंग बारणे,आमदार भरत गोगावले, आमदार महेंद्र थोरवे तसेच एनएचएआय, पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त कैलास शिंदे,रायगडचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, वाहतूक पोलिसांचे वरिष्ठ अधिकारी हेदेखील त्यांच्यासोबत उपस्थित आहेत.

सरकारकडून शिवाजी महाराजांच्या केवळ नावाचा वापर : जयंत पाटील

मुंबई, दि. २६ ऑगस्ट-

मालवण राजकोट किनारी उभारण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा कोसळल्याची बातमी अतिशय धक्कादायक आहे. यामुळे राज्यातील तमाम शिवप्रेमी दुखावले आहेत, सरकारकडून शिवाजी महाराजांच्या केवळ नावाचा वापर, त्यांचे आचार, विचाराबाबत देणेघेणे नाही ,अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी दिली . ते म्हणाले की , महाराजांचा पुतळा बनवताना काळजी घेतली गेली नाही. केवळ पंतप्रधान यांच्या हस्ते पुतळ्याचे अनावरण करायचे हेच सत्ताधाऱ्यांचे ध्येय होते. त्यामुळे कामाच्या दर्जाची, गुणवत्तेची काळजी घेतली गेली नाही. हे इव्हेंटजीवी सरकार आहे. त्यांना कामाच्या दर्जाचं घेणं देणं नाही. कमीशन घ्यायचे आणि कंत्राटे वाटायची एवढंच काम निष्ठेने सुरू आहे असा संताप त्यांनी व्यक्त केला. सरकारच्या एकंदरीत कारभारावर टीका करताना ते म्हणाले की, राज्यभर सुरू असलेली रस्त्याची कामे देखील सुमार दर्जाची आहेत. महाराजांचा पुतळा बनवताना देखील असाच घोटाळा केला असणार. त्यामुळेच तेथील भौगोलिक परिस्थितीत पुतळा उभा राहू शकला नाही. ही सर्वस्वी महाराष्ट्र सरकारची जबाबदारी आहे.

वीज कंत्राटी कामगारांचा नागपूर येथे मोचा, बेमुदत उपोषण

नागपूर, दि. २६ ऑगस्ट-

भारतीय मजदूर संघाशी संलग्न महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाच्या वतीने वेतनवाढ व हरियाना सरकारप्रमाणे वीज उद्योगात कंत्राटदार विरहित शाश्वत रोजगार मिळावा या व अन्य प्रमुख मागण्यासाठी शनिवार दि.२४ ऑगस्ट रोजी राज्यभरातून सुमारे ४ हजार वीज कंत्राटी कामगार एकत्र येऊन रेशीमबाग मैदानपासून ते ऊर्जामंत्री उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निवासस्थानापर्यंत पायी मोर्चा काढला. हा मोर्चा संविधान चौक येथे अडवण्यात आला. २६ कामगार प्रतिनिधी यांनी संघटनेचे अध्यक्ष निलेश खरात व सचिन मेंगाळे यांच्या नेतृत्वाखाली ऊर्जामंत्री यांचे विशेष कार्य अधिकारी सुनील मित्रा यांना निवेदन दिले. राज्याचे ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संघटनेसोबत सकारात्मक चर्चा करून कायमस्वरूपी तोडगा काढावा व जो पर्यंत ऊर्जामंत्री भेटून ठोस तोडगा काढत नाही तो पर्यंत कामगार घरी जाणार नाही या कामगारांनी संविधान चौकात बेमुदत आमरण उपोषण सुरू केले आहे.

सोलापूरच्या डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात ३१ ऑगस्टला रानभाजी महोत्सव

सोलापूर दि. २६ ऑगस्ट-

आरोग्यविषयक महत्त्व सर्वसामान्यांना होण्यासाठी, उत्पादक ते ग्राहक विक्री साखळी व्यवस्था बळकट करण्यासाठी कृषि विभाग व आत्मातर्फे ३१ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ९.३० वाजता डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह, सोलापूर येथे रानभाजी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आत्माचे प्रकल्प संचालक यांनी दिली. सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी त्यांचे शेतावरील रानभाज्या प्रदर्शन व विक्रीसाठी महोत्सवात आणाव्यात. तसेच सोलापूर शहर व नजीकचे नागरीक व ग्राहकांनी सदरच्या महोत्सवास भेट द्यावी तसेच रानभाज्यांची खरेदी करावी. तसेच आरोग्यदायी रानभाजी महोत्सवाचा शेतकऱ्यांनी व नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन कृषि व आत्मा विभागामार्फत करण्यात आले आहे. सदर महोत्सवाचे उदघाटन पालकमंत्री चंद्रकांत पाटील व जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद तसेच इतर मान्यवरांचे हस्ते करण्यात येणार आहे.

दिव्यांग प्रमाणपत्र शिबिरात
४ हजार ६१ लाभार्थ्यांची तपासणी

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची माहिती

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-

जिल्ह्यात दिव्यांग व्यक्ती अस्मिता अभियान अंतर्गत तपासणी व निदान विशेष मोहीम १९ ऑगस्ट पासून सुरू झालेली आहे. पंढरपूर व अक्कलकोट तालुकास्तरीय शिबिरे संपन्न झाली. या दोन्हीही शिबिरात ३ हजार २६० दिव्यांग लाभार्थ्यांची तपासणी करण्यात आली. २६ ऑगस्ट रोजी शिबिराच्या पाचव्या दिवशी बार्शी येथे ८०१ लाभार्थ्यांची असे पाच दिवसात ४ हजार ६१ लाभार्थ्यांनी या विशेष मोहिमेअंतर्गत तपासणी करून घेतलेली आहे. या अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र त्यांच्या पत्त्यावर टपालाद्वारे पाठवण्याची व्यवस्था प्रशासनाच्या वतीने करण्यात येत असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

जिल्ह्यात ही मोहीम २३ सप्टेंबर पर्यंत राबविण्यात येत आहे. या अंतर्गत प्रत्येक तालुक्यात दोन दिवस याप्रमाणे २२ शिबिराचे आयोजन करण्यात आलेले असून या शिबिरातून १५ हजार ६६६ दिव्यांग लाभार्थ्यांना दिव्यांगात्वाची तपासणी करून प्रमाणपत्र देण्याचे नियोजन आहे. पंढरपूर, अक्कलकोट या तालुक्यातील तीन हजार २०७ लाभार्थ्यांची तपासणी झालेली आहे. तर बार्शी येथे २६ व २७ ऑगस्ट रोजी ग्रामीण रुग्णालयात हे शिबिर घेतले जात आहे. प्रत्येक तालुक्यातील पात्र लाभार्थ्यांनी तपासणी करावी. सर्व संबंधित शासकीय यंत्रणा व स्वयंसेवी संस्थांनी या शिबिराच्या ठिकाणी दिव्यांग व्यक्तींना कोणत्याही अडचण होणार नाही याची खात्री करावी. तसेच शिबिराच्या ठिकाणी संबंधित तालुक्यातून दिव्यांग लाभार्थींची ने-आण करण्याची व्यवस्था अत्यंत चोख झाली पाहिजे यावर लक्ष ठेवावे. शिबिराच्या ठिकाणी दिव्यांग लाभार्थ्यांना सर्व आवश्यक सुविधा अत्यंत दर्जेदार मिळाव्यात यासाठी आरोग्य यंत्रणा यांनी काळजी घ्यावी अशा सूचना जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिल्या. शिबिरात आवश्यक सुविधा पुरवण्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून निधी देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

दिव्यांग शिबिराच्या ठिकाणी अन्य शासकीय योजनांची माहिती

शिबिराच्या ठिकाणी लाभार्थ्यांच्या दिव्यांगत्वाची तपासणी करण्याबरोबरच या ठिकाणी दिव्यांग व्यक्तीसाठी असलेल्या अन्य सर्व शासकीय योजनांची माहिती प्रत्येक दिव्यांग व्यक्तीला सर्व संबंधित विभागाने त्यांची यंत्रणा त्या ठिकाणी ठेवून अत्यंत व्यवस्थितपणे सम जावून सांगावी तसेच दिव्यांग व्यक्ती योजनांसाठी पात्र ठरत असतील तर त्यांना त्या योजनांचा लाभ मिळण्याबाबतचे अर्ज जागेवरच भरून घेण्याचे निर्देश जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिलेले आहेत. एक ही पात्र दिव्यांग लाभार्थी शासकीय योजना पासून वंचित राहणार नाही यासाठी सर्व शासकीय यंत्रणेने दक्षता घ्यावी, असेही त्यांनी निर्देशित केले.

२२ शिबिरातून १५ हजार ६६६ दिव्यांग लाभार्थ्यांची तपासणी होणार

जिल्ह्याच्या अकरा तालुक्यात प्रत्येकी दोन याप्रमाणे एकूण २२ शिबिराचे आयोजन करण्यात येत असून यासाठी १५ हजार ६६ दिव्यांग लाभार्थ्यांनी नोंदणी केलेली आहे. जिल्ह्यातील दिव्यांगांची संख्या १ लाख १५ हजार ७५५ इतकी असून यातील ६८% ग्रामीण भागातील तर शहरी भागातील ३२ टक्के दिव्यांग संख्या आहे. आशाताई आणि यंत्रणेतील तालुका स्तरावरील संबंधित घटकांसाठी २७ कार्यशाळा घेण्यात आले असून त्यातून ३७४२ प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आल्याची माहिती मित्राचे संचालक अभिजीत राऊत यांनी दिली.

शहरात आयटी कंपन्या, उद्योग न येण्यास महापालिकेची कर प्रणाली कारणीभूत

गिरीकर्णिका फाउंडेशनचा आरोप

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-

महानगरपालिकेचे कर संकलन आणि गणना प्रणाली अत्यंत जुनी, कालबाह्य, घटनाबाह्य तथा मनमानी पद्धतीची आहे. यामुळेच सोलापूर शहरात आयटी कंपन्या आणि विविध उद्योग येत नाहीत. महापालिकेचा असा कारभार नागरिक आणि व्यापाऱ्यांच्या मुळावर असल्याचा आरोप गिरीकर्णिका फाउंडेशनच्या वतीने करण्यात आला आहे.

सोलापूर शहरातील कर पद्धत कर संकलन आणि गणना प्रणाली संदर्भातील माहिती या संघटनेकडून माहितीच्या अधिकाराखाली सविस्तर मागविण्यात आली होती. त्या आधारे महापालिकेची ही प्रक्रिया हीच याला कारणीभूत असल्याचा आरोप संघटनेच्या वतीने केला आहे.

या प्रणालीमध्ये गणिताचे तर्कशास्त्र व इतर महापालिकेचे कायदे पाळले जात नसल्याने सोलापूर शहरातील नागरिकांना आणि व्यापाऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसत आहे. ३६५ दिवसांची पाणीपट्टी आणि प्रत्यक्षात ६० दिवस पाणीपुरवठा

या व इतर बाबींवरुन आय. टी. कंपन्या आणि मोठे उद्योगजक येथे गुंतवणूक करण्यासाठी धजावत नाहीत. या प्रणालीमुळे, सोलापूर शहरातील महापालिका कराच्या दरात इतर महानगरांपेक्षा खूपच तफावत दिसून येते. हे दर अत्यंत जास्त असल्याने, नवीन उद्योगधंदे सोलापूरमध्ये स्थापन होण्यास इच्छुक नसल्याचे संघटनेने म्हटले आहे.

सोलापूर महापालिकेने आपल्या कर प्रणालीची तातडीने पुनर्रचना करावी, अशी मागणी नागरिक आणि व्यापाऱ्यांकडून जोर धरत आहे. सोलापूर महापालिकेने महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाकडुन आवश्यक ती नियमावली तपासणी करुन सोलापूरच्या कर रचनेत बदल करुन घ्यावेत आणि सोलापूरकरांना या अनाकलनीय कर रचनेतुन सुटका करावी, अशी मागणीही गिरिकर्णिका फाऊंडेशनचे अध्यक्ष विजय जाधव यांनी केली आहे.

सोलापूर : शिवलिंगय्या स्वामी यांना सोलापूर शहर पोलीस उपनिरीक्षकपदी पदोन्नती मिळाल्याबद्दल सत्कार करताना शरणप्पा शाबादे, अशोक मंदोले, विजय चव्हाण, महेंद्र कुलकर्णी आणि शाम पवार.

वेदसेवक सन्मान सोहळा ४ सप्टेंबरला पुण्यात

सरसंघचालक मोहन भागवत आणि स्वामी गोविंद देवगिरी महाराज यांची उपस्थिती

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. २६ ऑगस्ट -

श्री सद्गुरू ग्रुप पुणे महाराष्ट्र आयोजित श्री रामजन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यास आयोध्या यांच्या अनुमतीने वेद अनुष्ठान आणि सेवा योजना प्रकल्प अंतर्गत वेधसेवक सन्मान सोहळा बुधवार ४ सप्टेंबर रोजी सायंकाळी ४.३० वा. बालगंधर्व रंगमंदिर शिवाजीनगर पुणे येथे होणार आहे.

दरम्यान या कार्यक्रमात वेदसेवक सन्मान सोहळा संकल्प ते सिद्धी यांचा प्रवास उलगडण्यात येणार आहे. या सोहळ्यास प्रमुख मार्गदर्शक म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत तर स्वामी गोविंद देवगिरी महाराज यांचे विशेष आशीर्वाद लाभणार आहेत. तसेच विशेष अतिथी म्हणून चंपत्राय बंसल, डॉ. हनुमंतराव गायकवाड, डॉ. अभिजीत पवार तर विशेष निमंत्रित म्हणून डॉ अनिल मिश्रा, गोपाल जी, फुलकांत मिश्रा, शशिकांत दास यांची उपस्थिती लाभणार आहे.

४ नोव्हेंबर २०२२ ते बुधवार दि. २३ फेब्रुवारी २०२४ अखंडित १६ महिने चारही वेदांचे अनुष्ठान प्रभु श्रीराम अयोध्या मंदिर पुनर्निर्माण निर्विघ्न होण्यासाठी ३६ सत्रात संपन्न झाले. महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यातून वैदिक/याज्ञिक यांनी प्रत्यक्ष अयोध्येत जाऊन वेद अनुष्ठान विनासंभावना संपन्न केले. तसेच सोमवार दि. २२ जानेवारी २०२४ प्रभु श्रीराम अयोध्या यांची प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात संस्थेच्या वतीने स्वयंसेवक म्हणून सहभागी झाले अशा २०० वैदिक/याज्ञिक यांचा ''वेदसेवक सन्मान सोहळा संपन्न होणार आहे. संस्थेच्या वतीने आयोजित केलेल्या या वेदसेवक सन्मान सोहळ्यात सहकारी बांधवांचा गौरव होणार आसून या सोहळ्यास उपस्थित रहावे, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष यशवंत कुलकर्णी यांनी केले आहे.

राज्य व्यापार बंद तात्पुरता स्थगित

बाजार समिती, जीएसटी व अन्य विषयांवर समिती गठीत

पुणे, दि. २६ ऑगस्ट-

महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समिती यांच्या तर्फे दि. २७ ऑगस्ट २०२४ रोजी पुकारलेला एक दिवसीय महाराष्ट्र व्यापार बंद तात्पुरता स्थगित करण्यात आल्याची माहिती कृती समितीतर्फे ललीत गांधी यांनी दिली. राज्यस्तरीय कृती समितीच्या बंदची व्याप्ती लक्षात घेऊन राज्यशासनातर्फे मा. उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली (मुंबई येथील सह्याद्री शासकीय अतीथीगृह येथे) उच्चस्तरीय बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये कौशल्यविकास मंत्री श्री. मंगलप्रभातजी लोढा, मा. आमदार श्रीमती माधुरीताई मिसाळ व पणन, वित्त सहकार-नगरविकास विभागाचे मुख्य सचिव, मा. पणन संचालक व विविध विभागातील अधिकारी वर्ग उपस्थित होते.

सुमारे दोन तास चाललेल्या या बैठकीमध्ये महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललीतजी गांधी यांनी प्रास्ताविक केले. कृती समितीचे समन्वयक राजेंद्र बाठिया व दि पूना मर्चेंटस् चेंबरे अध्यक्ष रायकुमार नहार यांनी बाजार समितीच्या विविध प्रश्नांची मांडणी केली. फॅमचे अध्यक्ष जितेंद्र शहा यांनी जी.एस.टीचे प्रश्न मांडले. तसेच मोहन गुरनानी, दिपेन अगरवाल व भिमजी भानुशाली यांनी चर्चेमध्ये भाग घेतला.

अत्यंत सकारात्मक चर्चा झाली. मा. देवेंद्रजी फडणवीस यांनी सर्व प्रश्न समजून घेतले व बाजार समिती विषयासाठी तसेच जी.एस.टी व अन्य विषयासाठी कृती समिती सदस्य व मुख्यसचिव व अन्य अधिकारी वर्गाची उच्चस्तरीय समिती गठित करण्यात आली. सदर समितीने ३० दिवसांमध्ये योग्य निर्णय घेण्याचे निर्देश मा. उपमुख्यमंत्री यांनी दिले आहेत.

दरम्यान या बैठकीपूर्वी राज्याचे मुख्यमंत्री नामदार एकनाथ शिंदे यांनी ललीत गांधी यांच्याशी दूरध्वनीवरुन चर्चा करुन व्यापाऱ्यांच्या प्रश्ना वर सरकार सकारात्मक असल्याची ग्वाही दिली व बंद मागे घ्यावा असे आवाहन केले.तसेच मा. माधुरीताई मिसाळ यांनी या बैठकीसाठी विशेष प्रयत्न केले. याबाबत कृती समितीने चर्चा करुन २७ तारखेचा एक दिवसीय राज्यव्यापी बंद तात्पुरता स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. सदर बैठकीमध्ये महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे उपाध्यक्ष रविंद्र माणगावे, फॅमचे सचिव प्रितेश शहा, ग्रोमाचे सचिव नितेश विरा, दि पूना मर्चेंटस् चेंबरचे माजी अध्यक्ष प्रवीण चोरबेले, अनिल भन्साळी उपस्थित होते. ग्रोमाचे अध्यक्ष भिमजी भानुशाली यांनी आभार मानले, अशी माहिती महाराष्ट्र राज्य व्यापारी कृती समितीचे समन्वयक राजेंद्र बाठिया यांनी दिली.

सरकारच्या भ्रष्ट कारभारामुळे

शिवाजी महाराजांचा पुतळा आठ महिन्यात कोसळला : वडेट्टीवार

मुंबई,दि. २६ ऑगस्ट-

शिवाजी महाराजांनी उभारलेले किल्ले आजही भक्कम आहेत. पण गेल्यावर्षी सिंधुदुर्गातील मालवण राजकोट किल्ल्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अनावरण झालेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळला. या सरकारने छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यात देखील पैसे खाल्ले यासारखे दुर्दैव नाही, अशा शब्दात विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारच्या भ्रष्ट कारभारावर आसूड ओढले आहेत.

ते म्हणाले की, आठ महिन्यात छत्रपतींच्या पुतळ्याची ही अवस्था झाली आहे. यासारखे दुर्दैव नाही. महाराजांच्या विचारांना प्रमाण मानून वाटचाल करणारे हे सरकार नाहीच, हे आता सिद्ध झाले आहे. राज्यातील महायुती सरकार हे महाविनाशी सरकार आहे. हे आम्ही का म्हणतोय हे आज महाराष्ट्रातील जनतेला दिसत आहे. या ठिकाणी पुन्हा एकदा दिमाखात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसवण्यात यावा, महाराजांची अवहेलना करणाऱ्या कंत्राटदाराला काळया यादीत टाकण्यात यावे, संबंधित कंत्राटदाराची सुरू असलेली सर्व कामे तातडीने काढून घ्यावीत, महाराजांची अवहेलना करणाऱ्यांना शिक्षा व्हावी, अशी मागणी केली.

वसंतरावांच्या निधनामुळे लोकाभिमुख नेतृत्व गमावले : मुख्यमंत्री

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी
मुंबई, दि. २६ ऑगस्ट :-

जनतेच्या आशा आकांक्षाशी समरस झालेले लोकाभिमुख असे नेतृत्व खासदार वसंत चव्हाण यांच्या निधनामुळे गमावले आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ज्येष्ठ नेते, नांदेडचे खासदार वसंत चव्हाण यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

शोकसंदेशात ते म्हणतात की, जनतेच्या आशा आकांक्षाशी समरस झालेले नेतृत्व म्हणून खासदार चव्हाण यांची ओळख कायम राहील. नायगावचे सरपंच, जिल्हापरिषद सदस्य, विधीमंडळातील दोन्ही सभागृहातील सदस्य तसेच लोकसभा सदस्य असा त्यांचा राजकीय आलेख राहीला आहे. घरातून मिळालेला समाजकारण, राजकारणाचा वारसा चालवताना त्यांनी नेहमीच लोकाभिमुख भूमिका घेऊन सहकार तसेच विविध क्षेत्रांत काम केले. नायगाव एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून त्यांनी शैक्षणिक क्षेत्रातही कार्य केले. त्यांच्या निधनामुळे चव्हाण कुटुंबियांवर आघात झाला आहे. ईश्वराने त्यांना हा आघात सहन करण्याची ताकद द्यावी अशी प्रार्थना करतो.

काँग्रेसच्या विचाराचा निष्ठावान पाईक हरपला : नाना पटोले

काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते, नांदेड लोकसभा मतदारसंघाचे खासदार वसंतराव चव्हाण यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दुःखद व धक्कादायक आहे. वसंतराव चव्हाण यांनी प्रतिकूल परस्थितीत एकनिष्ठ राहून काँग्रेस पक्षाचा विचार घरोघरी पोहोचवला. आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत त्यांनी काँग्रेस विचार सोडला नाही, त्यांच्या निधनाने अनुभवी लोकप्रतिनिधी व काँग्रेस विचारांचा एक निष्ठावान पाईक हरपला आहे, २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी नांदेड मतदारसंघातून विजय मिळवून राष्ट्रीय पातळीवर काम करण्यास सुरुवात केली होती. नांदेड जिल्ह्यातील पक्ष संघटना वाढीत त्यांचा मोठा वाटा होता. खा. वसंतराव चव्हाण मनमिळावू, प्रामाणिक व मितभाषी स्वभावाचे होते, त्यांच्या जाण्याने काँग्रेस पक्षाची मोठी हानी झाली आहे.

काँग्रेसचा लढवय्या नेता हरपला : विधिमंडळ नेते बाळासाहेब थोरात

गावचे सरपंच ते लोकसभेचे खासदार असा राजकीय प्रवास असणाऱ्या वसंतराव चव्हाण यांनी नांदेड जिल्ह्याच्या समाजकारण, सहकार, शिक्षण, कृषी, अशा विविध क्षेत्रात योगदान देताना सामान्य माणसाकरता आयुष्यभर संघर्ष केला. त्यांच्या निधनाने काँग्रेस पक्षातील जनसामान्यांचा आधारवड असलेला लढवय्या नेता हरपला आहे. चव्हाण यांनी सर्वांना सोबत घेत जिल्ह्याच्या विकासात मोठे योगदान दिले. पुरोगामी विचार आणि काँग्रेस पक्षाशी एकनिष्ठ राहताना त्यांनी अत्यंत अडचणीच्या काळामध्ये लोकसभा लढवली. नांदेड मधील मोठमोठे नेते काँग्रेस सोडून गेले तेव्हा मात्र सर्वसामान्य माणसाला बरोबर घेऊन खिंड लढवित मोठा विजय मिळवला.

मनमिळावू नेतृत्व काळाच्या पडद्याआड : महाराष्ट्राचे प्रभारी रमेश चेन्नीथला

आपल्या शेवटच्या श्वासापर्यंत काँग्रेस पक्षाशी एकनिष्ठ राहून जनसामान्यांच्या हितासाठी लढणारे नांदेड लोकसभेचे खा. वसंतराव चव्हाण यांच्या निधनाने एक अनुभवी व मनमिळावू नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे, मनमिळावू स्वभाव, प्रचंड लोकसंग्रह, जनसामान्यांच्या प्रश्नांची जाण आणि ते सोडवण्याची तळमळ यामुळे त्यांना कायम जनतेचा मोठा पाठिंबा मिळाला. लोकसभा निवडणुकीत मोठे नेते पक्ष सोडून गेले असता त्यांनी कार्यकर्त्यांच्या बळावर पक्ष संघटना मजबूत करून मोठा विजय मिळवला. त्यांच्या निधनामुळे काँग्रेस पक्षाची मोठी हानी झाली असून आपण सहकारी मित्र गमावला आहे.

अग्रलेख...

सबलीकरणाला सुरक्षेची साथ...

देशाच्या विविध प्रांतात गेल्या काही वर्षांत सातत्याने घडत असलेल्या अप्रिय घटनांमुळे एक बाब महत्त्वपूर्ण रीतीने अधोरेखित झाली आहे. ती म्हणजे, देशातील महिलांना केवळ आर्थिकदृष्ट्या सक्षम केल्याने महिला सबलीकरणाचा कार्यक्रम परिपूर्ण रीतीने यशस्वी होण्याकरिता पुरेसा नाही, तर महिलांची सुरक्षितता हा मुद्दा आर्थिक सक्षमीकरणाएवढाच महत्त्वाचा आहे. पश्चिम बंगालमधील कोलकाता येथे एका इस्पितळातील महिला डॉक्टरवर झालेला बलात्कार आणि त्यानंतर झालेली निर्घृण हत्या व पाठोपाठ महाराष्ट्रात मुंबईशेजारच्या बदलापूरमध्ये घडलेला बालिकांवरील अत्याचाराचा प्रसंग या देशाच्या दोन दिशांना लागोपाठ घडलेल्या दोन घटनांनी महिलांच्या सुरक्षिततेचा हाच मुद्दा ऐरणीवर आणला आहे. या काळात अन्यत्रही अशा काही अप्रिय घटना घडल्याने सामाजिक चिंतेत आणि सुरक्षिततेच्या शंकेतही भर पडली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सत्ताकाळात महिलांच्या सक्षमीकरणाचे असंख्य प्रयोग प्रभावीपणे राबविले जात आहेत, यात शंका नाही. महिलांच्या आर्थिक उन्नतीच्या अनेक योजना देशात आखल्या गेल्या आहेत आणि त्यांच्या नियोजनबद्ध अंमलबजावणीमुळे महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाचे नवे पर्व देश अनुभवत आहे. महिला सक्षमीकरणाच्या योजनांची फळे हा केवळ कागदोपत्रीचा सामाजिक विकास नाही, तर अनेक कुटुंबांचे जीवनमान या योजनांतून उंचावले असून, अनेक महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाची नवी क्षितिजे यातून विस्तारल्यामुळे महिलांचा आत्मविश्वास आता दुणावला आहे. रविवारी महाराष्ट्रात जळगाव येथे झालेल्या राष्ट्रीय स्तरावरील लखपती दीदी योजनेतील यशस्वी महिलांच्या सन्मान सोहळ्यातून देशाला खात्री पटली आहेच; पण केवळ आर्थिक उन्नती हा महिलांच्या सबलीकरणाचा मर्यादित उद्देश असणार नाही, तर महिलांच्या संपूर्ण सुरक्षिततेची वाढती गरज आणि सरकार व सुरक्षा यंत्रणांच्या जबाबदारीची जाणीव पंतप्रधानांनी बोलून दाखविली. या सोहळ्यात लखपती दीदींचा सत्कार होणे औचित्यपूर्ण होतेच; पण काही दिवसच अगोदर घडलेल्या अमानुष अत्याचाराच्या वेदनांची किनारही त्या सोहळ्यात जाणवली. पंतप्रधानांनी जातीने त्याची दखल घेऊन महिला सुरक्षिततेच्या मुद्यावर भर दिल्याने असुरक्षिततेच्या भावनेने भयग्रस्त झालेल्या समाजाला दिलाशाची एक किनार दिसू लागली आहे. यापुढे महिला सबलीकरणाच्या योजनांना महिलांच्या सुरक्षिततेच्या योजनांचे नवे कवच नक्कीच असेल आणि सुरक्षिततेच्या भावनेने आश्वस्त झालेल्या महिला आता अधिक सक्षमतेने पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून आत्मविश्वासाने देशाच्या विकास पर्वातील आपला सहभाग नोंदवतील, असा विश्वास या सोहळ्यातून रुजला आहे.

मोदी सरकारची लखपती दीदी योजना किंवा महाराष्ट्रातील महायुती सरकारची लाडकी बहीण योजना या केवळ महिलांचे आर्थिक उत्पन्न किंवा कमाई वाढविण्याच्या योजना नाहीत, तर भविष्यातील पिढ्यांच्या सशक्तीकरणाच्या योजना आहेत, असे पंतप्रधान मोदी यावेळी म्हणाले. महिलांचे सक्षमीकरण म्हणजे कुटुंबाचे सक्षमीकरण ही अनुभवसिद्ध आणि शाश्वत गोष्ट आहे. जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात पत्नी, माता, बहीण अशा अनेक रूपाने कुटुंब घडविण्याची क्षमता स्त्रीच्या अंगी असते, पण त्याचे फारसे मोल मानले जात नाही. महिलांचे सक्षमीकरण ही केवळ महिलांच्या क्षमतांना प्रोत्साहन देण्याची मोहीम नाही, तर या क्षमतांची जाणीव समाजमनात रुजविण्याची मोहीम आहे, हा त्यांच्या या विधानाचा मथितार्थ म्हणावा लागेल. महिलांच्या सक्षमीकरणासाठी त्यांच्यामध्ये आत्मविश्वास रुजविण्याची गरज असते. आत्मविश्वास गमावल्याने मानसिकदृष्ट्या कमकुवत झालेल्या कोणाच्याही अंगी धाडसी निर्णय घेण्याची क्षमता नसते. असा विश्वास रुजविण्याची क्षमता त्यांच्या आर्थिक आणि मानसिक विकासातून निर्माण होत असल्याने पिढ्या घडविण्याच्या जबाबदारीचा विश्वास महिलांच्या अंगी रुजविण्याचे कार्य सरकारी योजनांतून सुरू झाले आहे, असा पंतप्रधानांच्या त्या विधानाचा अर्थ आहे. भावी पिढ्या घडविण्याचे कार्य आत्मविश्वासाने करण्याची क्षमता महिलांच्या अंगी यावी हा या सक्षमीकरण योजनांचा हेतू असेल, तर केवळ आर्थिकदृष्ट्या सक्षम होणे पुरेसे नाही, तर त्यांना सामाजिक सुरक्षिततेची हमी दिली पाहिजे. महिलांच्या सुरक्षिततेस आव्हान देणाऱ्या प्रत्येक प्रवृत्तीविरुद्ध कठोर कारवाई झालीच पाहिजे आणि अशा गुन्ह्यातील कोणासही पाठीशी घातले जाऊ नये, असे आवाहन करून पंतप्रधान मोदी यांनी सुरक्षिततेची हमी दिली आहे. अशा घटनांमधील पीडित महिलांना तक्रार नोंदविण्यासाठी पोलिस ठाण्यात जाण्याचीही वेळ येणार नाही. घरबसल्या दाखल करता येणाऱ्या तक्रारीत कोणतेच फेरफार करण्याची संधी कोणासही मिळणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. भय, भूक आणि भ्रष्टाचार या आदर्श समाजव्यवस्थेसमोरील सर्वात मोठ्या समस्या आहेत. भारतासह जगातील कोणताच देश आज या समस्यांपासून संपूर्णपणे मुक्त नाही. असे म्हटले जाते की, कोणत्याही समस्या, संकटे किंवा आपत्तींचा सर्वाधिक फटका महिलांना आणि संरक्षणाकरिता अन्यांवर अवलंबून असलेल्या बालकांना बसतो. भय आणि भूक या समस्यांचा पहिला फटका महिलांनाच सोसावा लागत असतो. ही स्थिती जगभर सर्वत्र असल्याने, महिलांचे सबलीकरण, सक्षमीकरण ही काळाची गरज ओळखून मोदी सरकारने आखलेल्या लखपती दीदी योजनेस आता महिला सुरक्षेच्या हमीचे कवच लाभले आहे. महिलांवरील अत्याचार ही सामाजिक समस्या गेल्या काही महिन्यांत देशभर चिंतेची बाब बनली असताना, त्याला राजकारणाचे नकोसे कंगोरेही दिसू लागल्याने महिलांच्या समस्यांचे राजकारण होऊ लागले आहे. अशा काळात महिलांना समस्यांपासून मुक्ती देण्याच्या कोणत्याही प्रयत्नास राजकारणाचे अडथळे येऊ नयेत आणि समस्यामुक्तीचे सारे प्रयोग सामूहिकपणे व्हावेत ही समाजाची गरज व अपेक्षादेखील असते. प्रत्यक्षात मात्र समस्यांची सर्वाधिक झळ सोसणाऱ्या महिलांची त्याबाबतची प्रतीक्षा संपलेली नाही. राजकारणाच्या रगाड्यात महिला सुरक्षेचे अनेक मुद्दे बेदखल होत असल्याने अनेक राज्यांतील महिलांच्या वेगवेगळ्या समस्या ऐरणीवर येऊन त्यांची तड लागत नव्हती, हे वास्तव आहे. गेल्या अनेक वर्षांत महिला हिताच्या जेवढ्या योजना आखल्या आणि अंमलात आणल्या गेल्या, त्याहून अधिक योजना मोदी सरकारने गेल्या दहा वर्षांत आखल्या आणि त्याची अंमलबजावणी केली, ही पंतप्रधानांच्या आव्हानातील सत्यता रविवारच्या मेळाव्यातील लाखो लखपती दीदींच्या प्रातिनिधिक उपस्थितीतून देशाने अनुभवली आहे. गेल्या दहा वर्षांत देशातील १ कोटी ११ लाख महिला या योजनेतून आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्या आहेत. आर्थिक सक्षमतेतून मिळणारा आत्मविश्वास महिलांच्या कार्यक्षमतेसही पूरक ठरत असतो. कुटुंबाची जीवनशैली उंचावण्याच्या अर्थकारणातील सहभागामुळे आत्मविश्वास बळावतो आणि त्यातून पुढच्या पिढीला संस्कारक्षम बनविण्याच्या जबाबदारीच्या जाणिवा महिलांच्या अंगी दृढ होतात, असा अनुभव असतो. महिलांचा आत्मविश्वास हा त्यांच्या सक्षमतेचा मोठा आधार असतो. कोलकाता किंवा बदलापूरसारख्या दुर्दैवी घटनांतून आत्मविश्वासालाच आव्हान दिले गेल्याने भयाची भावना बळावलेल्या महिलांना दिलाशाची आणि सुरक्षिततेच्या हमीची नेमकी गरज असतानाच या मेळाव्याने मोठी भूमिका बजावली आहे. अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी केवळ कायदे करणे किंवा सरकारी व सुरक्षा यंत्रणांनी सजग राहणे पुरेसे नाही. त्यासाठी राजकीय मतभेदांची दरी दूर करून सामूहिकपणे समाजासोबत उभे राहणे गरजेचे असते. पंतप्रधानांनी या दुर्दैवी घटनांचा थेट उल्लेख न करताही, राज्यातील व देशातील राजकीय पक्षांना याची जाणीव करून दिली, हे योग्यच झाले. आता अशा सामाजिक समस्यांना सामोरे जाताना संभ्रम माजविण्याच्या राजकारणाला पूर्णविराम देऊन राजकीय पक्ष एकत्र येतील अशी समाजाची अपेक्षा आहे. कारण प्रश्न केवळ महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणापुरता मर्यादित नाही, तर सुरक्षिततेच्या आश्वस्ततेतून त्यांना मिळणाऱ्या आत्मविश्वासाचा, सुरक्षित भविष्याचा आणि क्षमता सिद्ध करून भावी पिढ्या घडविण्याची हिंमत जोपासण्याचा आहे. ■

आंतरराष्ट्रीय

वसंत गणेश काणे

हिंदू भिंत ढासळली?

आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभे राहण्याचे धोरण लष्कराच्या एका गटाने स्वीकारल्यामुळे बांगलादेशमध्ये नुकतेच हसीना शासन व्यवस्थेचे पतन झाले आहे. आजवर भारत आणि बांगलादेश यातील सख्य दक्षिण आशियातील भूराजकीय घडामोडीत महत्त्वाची भूमिका पार पाडीत होते. या दोन भौगोलिक क्षेत्रातील आजचे कृत्रिम भेद हळूहळू लयाला जातील आणि साम्य सबळ होत जाईल, असा समज दृढ होत चालला होता. पण भारताखालोखाल स्थिर आणि परिपक्व लोकशाही म्हणून ज्या देशाचा उल्लेख केला जायचा त्या बांगलादेशच्या पंतप्रधानांनाच विद्यार्थ्यांच्या देशांतर्गत उठावामुळे भारतात पळ काढावा लागला, ही एक प्रचंड मोठी घडामोड मानली जाते.

भारत आणि बांगलादेश यांच्या संबंधात एखाद्या मुद्यावरून वितंडवाद घडून यावा, यासाठी जगातील काही शक्ती तसेच स्थानिक विरोधी गट अधिर झाले होते. पण त्यांना आजवर लष्करातील कोणत्याही गटाची साथ मिळत नव्हती किंवा त्या लष्करी गटाला ते शक्य होत नसावे, असे दिसते. बांगलादेशाबाहेरील शक्तीत पहिल्या क्रमांकावर पाकिस्तान होते, हे सांगण्याची आवश्यकता नसावी. बांगलादेशात जे घडले आणि ज्यामुळे तुटावे एवढे तणाव निर्माण झाले त्याला बांगलादेशाच्या पंतप्रधान हसीना बऱ्याच अंशी नक्कीच जबाबदार आहेत. बांगलादेशात जे घडले त्यावरून त्या देशातील नेत्याची वैयक्तिक आस्था आणि दोन देशातील राजकीय जवळीक एकाच सार्वजनिक पटलावर कार्य करू शकणार नाहीत/शकत नाहीत, हे पुन्हा एकदा अनुभवाला आले आहे. पण बांगलादेशात जे घडले त्याचे वस्तुनिष्ठ विश्लेषण म्हणून या संपूर्ण घटनाक्रमाकडे पाहणे वेगळे आणि आपले दुष्ट आडाखे बरोबर ठरले, असे म्हणत बोंबा ठोकणे वेगळे! या निमित्ताने पाकमध्ये सुरू असलेला हर्षातिरेक हा बोंबा ठोकण्याच्या प्रकारात मोडतो म्हणून त्याची दखल घेणे आवश्यक ठरते.

बांगलादेशातील बंगाली मुसलमान आणि पंजाबमधील पंजाबी मुसलमान यातील हिंदू भिंत कोसळली, असे शीर्षक देऊन त्यांनी एक लबाड कथानक (फॉल्स नॅरेटिव्ह) या उठावाच्या निमित्ताने सुरू केले आहे. जी कोसळली ती हिंदू भिंत होती का, हा मुद्दा तपासून पाहण्याची आवश्यकता आहे.

लोक हे जाणून आहेत की, बांगलादेशातील विद्यार्थिजगतात हसीना सरकारच्या कोटा पद्धतीबाबत तीव्र असंतोष गेली काही वर्षे खदखदत होता. हा मुद्दा प्रगतीच्या संधींच्या न्यायोचित वाटपाशी संबंधित आहे. त्याला हिंदू हे विशेषण लागत नाही, लावता येणार नाही. बांगलादेशातील कोटा पद्धत निदान आजतरी संदर्भहीन झाली होती. या प्रकरणी हिंदू भिंत असा मुद्दा येतोच कुठे? काहीही झाले की हिंदूंविरुद्ध आरडाओरड सुरू करायची, हे एकमेव कुभांड असंतोष निर्मितीसाठी पुरेसे असते. हा नापाक मुद्दा बऱ्यापैकी साथ देतो, हे पाकी जाणून आहेत. हा एक कलमी कार्यक्रम सुरू करायचा की झाले. भारत आणि १७ कोटी बांगलादेशी यातील सुसंवाद हाणून पाडण्यासाठी, हे एकमेव धोरण पाक अवलंबित आहे. काही देशांची ही रणनीती (स्ट्रॅटजी) होती तर काहींचे उद्देश अधिक पाताळयंत्री स्वरूपाचे होते. हिंदू आणि मुस्लिम कधीही एका व्यावहारिक भूमीवर येऊच शकणार नाहीत, हे त्यांना दाखवायचे आहे/होते.

जगात पॅन-इस्लामिक चळवळ पूर्वीपासून सक्रिय असून तिने राष्ट्रांच्या मर्यादा केव्हाच ओलांडल्या आहेत. सर्व मुस्लिम देशांचे एक मुस्लिम राज्य (खिलापत) हे तिचे उद्दिष्ट आहे. इस्लाम धर्मीयांचे हे एकमेव आंतरराष्ट्रीय संघटन असणार आहे. पण या संकल्पनेला इस्लामी राष्ट्रांकडून मनापासून प्रतिसाद मिळताना दिसत नाही. अधूनमधून तोंडदेखला पाठिंबा मिळत असतो एवढेच. पाकिस्तान, मलेशिया, तुर्कस्तान असे कुकर्मी देश वगळले तर इतर अनेक मुस्लिम देशांना भारताशी स्नेहाचे संबंध हवे आहेत. ते देश आपली ही भूमिका लपवून ठेवीत नाहीत. गेली काही वर्षे पॅन-इस्लामिक चळवळ बांगलादेशावर विशेष लक्ष केंद्रित करून होती. पण तिला बांगलादेशात हवा तो आणि हवा तेवढा प्रतिसाद मिळत नव्हता. आता विद्यार्थ्यांच्या हसीनाविरोधी आंदोलनामुळे बरेच परकीय आणि काही स्थानिक अशा दोन्ही विरोधी घटकांच्या हाती कोलीत सापडले आहे. फारशी शक्ती न वापरता बांगलादेशात हिंदूंचे शिरकाण करायचे, त्या निमित्ताने भारताला रक्तबंबाळ करीत राहण्याचा सोपा आणि सुलभ मार्ग निश्चित करण्याच्या या कुटिल प्रयत्नांची दखल भारताने आणि बांगलादेशातील नेमस्त गटाने वेळीच घेतली, हे बरे झाले. पण यातून हिंदूंना सुरक्षेची हमी मिळण्याची शक्यता फारच कमी आहे. नव्या राजवटीचे सल्लागार नोबेल पारितोषिक विजेते महंमद युनूस हे नेमस्त वृत्तीचे आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्री असून ते स्वत: शेख हसीना, शेख खालिदा झिया आणि लष्कर या तिन्ही परस्परविरोधी गटांपासून सारखेच अंतर ठेवून आहेत. जनता त्यांना तारणहारही मानते. पण नुसते मोठे पद असून काय उपयोग? सोबत सत्ताही असावी लागते.

हसीना सरकार आणि भारत यातील सौहार्दामुळे पाकिस्तानला बांगलादेशात पाऊल ठेवता येत नव्हते; स्थानिक सहकार्यही म्हणावे तसे मिळत नव्हते. आता मात्र आपल्याला मुक्तद्वार मिळाल्याच्या उद्दामपणात पाकिस्तान वावरते आहे. पंजाबी पाकिस्तान्यांनी ५३ वर्षांपूर्वी बंगाली मुस्लिम महिलांवर अनन्वित अत्याचार केले. स्वतंत्र होताच बांगलादेशाने या अत्याचारातून जन्माला आलेल्या पोरक्यांच्या पोषणासाठी कोटा पद्धतीचे आरक्षण स्वीकारले होते. म्हणजे आजच्या आंदोलनासाठी खरे तर पाकिस्तानलाच जबाबदार धरावयास हवे आहे. ते राहिले बाजूला आणि आपल्या पाशवी कृत्यांमुळे जन्माला आलेल्या पोरक्यांना आजचे पाकिस्तानी बंधू म्हणून साद घालते आहे. वास्तवाला विकृतीत परिवर्तित करण्याचा हा अश्लाघ्य प्रयत्न आहे.

पाकिस्तानी वृत्तपत्र 'नेशन'मध्ये लिहिताना स्तंभ लेखिका ओमे आयमेन यांनी 'हिंदू भिंत ढासळली' या शीर्षकाला अनुसरून एक लेख १६ ऑगस्ट २०२४ ला लिहिला आहे. त्यात त्या लिहितात, गेल्या दशकात बांगलादेशी नेतृत्वावर हिंदुत्वाचे गारुड स्वार झाले होते. आज बांगलादेशी नेतृत्व मुक्त झाले आहे. मुस्लिमांमधील बंधुभाव पुन्हा अभेद्य आहे (प्रत्यक्षात अन्याय करणारे पंजाबी पाकिस्तानी दैत्य होते तर जन्माला आलेले पोरके हे बलात्काराचे अपरिहार्य फलित होते.)

आजच्या आंदोलनाचा प्रारंभ जुलै २०२४ मध्ये सुरू झाला होता, हे लक्षात येते. आंदोलनातला पहिला मुद्दा आरक्षण वाटा (कोटा) हा होता. न्यायालये हा गुंता सोडविण्यात यशस्वी होत चालली होती. पण विद्यार्थ्यांची उद्विग्नता सतत वाढतच जाईल, असे टूलकिट विकसित करण्यात आले होते. आजची तरुण पिढी या षडयंत्रात फसत गेली. तरुणाई ना राजनीतीकडे गांभीर्याने पाहते, ना तिचा मुत्सद्देगिरीशी फारसा संबंध असतो. बांगलादेशातील आजच्या तरुणाईने स्वातंत्र्य संग्राम अनुभवलेला नाही, स्वातंत्र्यप्राप्तीसाठी किती किंमत मोजावी लागली, याचीही तिला माहिती नाही. त्यामुळे आता काय होत चाललंय् हे बांगलादेशाच्या आजच्या पिढीला समजणार नाही. आणखी काही वर्षांनंतर कदाचित अनेकांचे डोळे उघडतीलही; पण त्यावेळी आक्रोश करीत कपाळावर हात मारून घेण्याखेरीज काहीही करता येणार नाही. ■

९४२२८०४४३०

वेध

नितीन शिरसाट

महिलांचा आत्मसन्मान विरोधकांची पोटदुखी

राज्यातील १ कोटी ३५ लाख महिला आतापर्यंत लाडकी बहीण योजनेच्या लाभासाठी पात्र ठरल्या. त्यापैकी १ कोटी ३ लाख महिलांच्या बँक खात्यात रक्कम जमा करण्यात आल्याची माहिती आहे. राज्य सरकारच्या बहुचर्चित लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून महिलांना लाभ मिळू लागला आहे. रक्षाबंधन सणाच्या अगोदरच महिलांच्या बँक खात्यात या योजनेच्या पहिल्या दोन हप्त्यांची रक्कम जमा झाली आहे. सरकारने १४ ऑगस्टपासून महिलांच्या बँक खात्यात दोन महिन्यांचे ३००० रुपये जमा करण्यास सुरुवात केली आहे. राज्यातील २१ ते ६५ वर्ष वयोगटातील विवाहित महिला, विधवा, घटस्फोटित तसेच निराधार महिलांना याचा फायदा मिळणार आहे. एका कुटुंबातील केवळ एक अविवाहित आणि एका कुटुंबातील केवळ दोन महिलांनाच या योजनेचा लाभ घेता येणार आहे. महाराष्ट्र सरकारच्या या योजनेतून पात्र महिलांना महिन्याला १५०० रुपये देण्यात येणार आहे. या योजनेसाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख ३१ ऑगस्ट असून, विविध ठिकाणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या योजनेसाठी प्रत्येक गावातील, शहरातील महिलांची गर्दी होत आहे. बँकेत तसेच आपले सरकार केंद्राच्या सेतू कार्यालयात महिलांना योजनेचे अर्ज भरल्यानंतर त्यांना जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर या तीन महिन्यांची एकत्रित रक्कम त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल. काही महिलांचे बँक खाते आधार क्रमांकाशी जोडले गेल्यानंतर त्यांच्या खात्यात रक्कम जमा होईल. तसेच, मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेच्या माध्यमातून वर्षाला तीन गॅस सिलेंडर मोफत देण्याचा निर्णय राज्य सरकाने घेतला आहे. भावालाही मदत करण्यासाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरू केली. केंद्र सरकारच्या लखपती दीदी या योजनेची सध्या देशभरात चर्चा होत आहे. या योजनेच्या माध्यमातून महिलांना पाच लाख रुपयांपर्यंतची मदत केली जाते.

सध्या राज्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची चांगलीच चर्चा होत आहे. या योजनेच्या माध्यमातून सरकारतर्फे महिलांना प्रतिमहिना १५०० रुपयांची मदत दिली जाणार आहे. अशाच प्रकारची योजना सर्वप्रथम मध्यप्रदेशमध्ये राबविण्यात आली होती. सध्या एकूण सात राज्यांत महिलांना आर्थिक स्वरूपात मदत करणाऱ्या अशाच प्रकारच्या योजना राबविल्या जात आहेत. एकीकडे लाडकी बहीण योजनेला महाराष्ट्रात लोकप्रियता मिळालेली असताना आता केंद्र सरकारची लखपती दीदी ही योजनादेखील चर्चेच्या केंद्रस्थानी आली आहे. केंद्र सरकारने आतापर्यंत अनेक योजना आणल्या आहेत. गेल्या काही वर्षांपासून महिला सशक्तीकरणावर सरकारचा विशेष भर आहे. महिलांची आर्थिक, सामाजिक प्रगती व्हावी यासाठी सरकारकडून प्रयत्न केले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून सरकारकडून 'लखपती दीदी' ही योजना राबविली जात आहे. उद्योग क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढावा हा उद्देश समोर ठेवून ही योजना चालू करण्यात आली. या योजनेच्या माध्यमातून सरकारतर्फे महिलांना पाच लाख रुपयांचे बिनव्याजी कर्ज दिले जाते. ही योजना महिला बचत गटाशी जोडल्या गेलेल्या महिलांना आर्थिक मदत करण्यासाठी सुरू करण्यात आलेली आहे. महिलांचे आर्थिक उत्पन्न वाढावे यासाठी प्रयत्न केले जातात. महिलांनी स्वयंरोजगाराकडे वळावे हासुद्धा या योजनेचा उद्देश आहे. या योजनेच्या मदतीने महिलांना कौशल्य विकासासाठी प्रशिक्षण देण्यात येते. त्यानंतर स्वत:चा उद्योग उभा करण्यासाठी या महिलांना एक लाख रुपयांपासून ते पाच लाख रुपयांपर्यंतचे बिनव्याजी कर्ज दिले जाते. एकूण तीन कोटी महिलांना या योजनेच्या माध्यमातून जोडण्याचा केंद्र सरकारचा उद्देश आहे. लोकसभा निवडणूक निकालानंतर महायुतीने ही योजना आणून विधानसभा निवडणुकीत महायुतीला फायदा होईल, असा विश्वास महायुतीच्या नेत्यांना वाटत आहे. त्यासाठी जास्तीत जास्त महिलांनी या योजनेचा लाभ घ्यावा यासाठी सर्व सरकारी यंत्रणा कामाला लावण्यात आली आहे. केंद्र व राज्य शासनाने महिला व सुशिक्षित बेरोजगार बचत गटांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी सुरू केलेल्या लाडकी बहीण, लखपती दीदी या योजना विरोधी पक्षाचे काँग्रेस, उबाठा तसेच शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांना केवळ विरोध करण्यासाठी त्यांच्या पोटात पोटशूळ उठला आहे. त्यांनी या योजनेला विरोध दर्शवून महिलांचा रोष पत्करला आहे. राज्य सरकारची लाडकी बहीण योजना स्त्री सशक्तीकरणासाठी महायुतीचे मोठे पाऊल आहे. ही योजना महायुती सरकारची महत्त्वाकांक्षी योजना समजली जाते. ■

९८८१७१७८२८

इतस्तत:

दत्तात्रेय आंबुलकर

रोजगारवाढीचे उद्देश आणि त्याची पूर्तता

लोकसभा निवडणूक निकालाच्या पृष्ठभूमीवर यावेळी सादर केलेल्या केंद्रीय अर्थसंकल्पात अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अर्थसंकल्पाद्वारे उद्योग-व्यवसाय व आर्थिक प्रगतीच्या जोडीलाच रोजगार संधी आणि त्याच्या वाढीवर विशेष भर दिला आहे. या रोजगारवाढीचा मुख्य भर हा औपचारिक उद्योग वा संघटित क्षेत्रातील रोजगारवाढीवर व आशादायी स्वरूपात देण्यात आला आहे. या संदर्भातील वस्तुस्थिती व त्यांचे संभाव्य लाभ या उभयतांचा पडताळा घेणे म्हणूनच महत्त्वाचे ठरते.

अर्थसंकल्पात केंद्र सरकारने जाहीर केलेल्या योजनेचा मुख्य भर हा रोजगार प्रोत्साहन निधी म्हणजेच 'एम्प्लॉयमेंट लिंक्ड इन्सेन्टिव्ह' या नव्या व महत्त्वाकांक्षी योजनेशी निगडित आहे. संघटित क्षेत्राशी मुख्यतः संबंधित असणाऱ्या या सध्याच्या वा प्रस्तावित योजनांची अंमलबजावणी करून त्यांचा लाभ संबंधित व्यवस्थापन व नव्याने रोजगार सुरू करणाऱ्यांना होण्यासाठी कर्मचारी भविष्य निधी योजनेचा मुख्यतः आधार घेण्यात आला असून या योजनांशी संबंधित मुख्य मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत.

प्रथम रोजगार संधी : यंदाच्या अर्थसंकल्पात नमूद केल्याप्रमाणे, संघटित क्षेत्रात प्रथमच रोजगार स्वीकारणाऱ्या नव्या उमेदवार-कर्मचाऱ्यांना त्यांचे वेतन दरमहा एक लाख रुपयांपर्यंत असल्यास त्यांना त्यांच्या एक महिन्याच्या पगाराएवढी देय असेल. यासाठी संबंधित आस्थापना कर्मचारी भविष्य निर्वाह निधी अंतर्गत नोंदणीकृत असायला हवी व संबंधित कर्मचारी भविष्य निर्वाह निधी योजनेचे सदस्य असायला हवेत. पात्रताधारक उमेदवारांना योजनेंतर्गत १५ हजार रुपयांची रक्कम तीन समान हप्त्यांमध्ये त्यांच्या खात्यात जमा केली जाईल. अर्थसंकल्पानंतर अर्थखात्याने जाहीर केलेल्या अंदाजानुसार, सुमारे दोन कोटी नव्याने रोजगार सुरू करणाऱ्या नव्या कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ होऊ शकेल.

उत्पादन क्षेत्रात रोजगारवाढीसाठी प्रोत्साहन योजना : नव्या रोजगार संधी मोठ्या प्रमाणात निर्माण व्हाव्यात, याला पाठबळ व प्रोत्साहन देण्यासाठी आपल्या उत्पादन व्यवसायाच्या वाढीसह व रोजगार निर्माणाला प्रोत्साहन देण्यासाठी ही योजना नव्याने सुरू करण्यात आली आहे. योजनेंतर्गत कर्मचारी व व्यवस्थापनाला त्यांच्याशी संबंधित कर्मचारी भविष्य निर्वाह निधी योजनेमध्ये देय असणाऱ्या रकमेएवढी राशी नव्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या नव्या नोकरीच्या सुरुवातीपासून चार वर्षांसाठी देय असेल. राशी संबंधितांच्या भविष्य निर्वाह खात्यामध्ये कंपनी व कर्मचारी यांच्यासाठी जमा केली जाईल. नव्या रोजगारांना प्रोत्साहन देणाऱ्या या योजनेचा लाभ सुमारे ३० लाख युवा उमेदवार-कर्मचाऱ्यांना मिळेल, अशी अपेक्षा आहे.

व्यवस्थापन-आस्थापनांचे सहकार्य : नव्या अर्थसंकल्पातील तरतुदींनुसार उद्योग-व्यवसायांतर्गत सर्वच क्षेत्रांच्या व मासिक एक लाख रु. पगार असणाऱ्यांना ही योजना लागू असेल. या योजनेनुसार, अशा पाच कर्मचाऱ्यांच्या कर्मचारी भविष्य निधी योजनेंतर्गत देय असणाऱ्या रकमेएवढी अथवा दरमहा २००० रुपयांपर्यंतची राशी दोन वर्षे कालावधीपर्यंत देय असेल. या योजनेनुसार पण व्यवस्थापनाला नवे कर्मचारी नेमून नव्याने नेमणूक करण्यासाठी नव्याने सहकार्य मिळेल. त्यामुळे कर्मचाऱ्यांना त्यांच्या मासिक पगार-उत्पन्नात अप्रत्यक्ष वाढ मिळेल. अर्थमंत्रालयाच्या अंदाजानुसार या नव्या योजनेमुळे कंपनी-व्यवस्थापनाला रोजगार निर्मितीसाठी सहकार्य मिळणार असून त्याचा लाभ सुमारे ५० लाख कर्मचाऱ्यांना होऊ शकतो.

इंटर्नशिप योजना : नव्या अर्थसंकल्पामध्ये प्रमुख ५०० कंपन्यांमध्ये इंटर्नशिप योजना राबविता येईल. त्यामुळे नव्याने पदवी वा पदव्युत्तर पात्रता होणाऱ्या विद्यार्थी-उमेदवारांना इंटर्नशिपच्या माध्यमातून सराव-प्रशिक्षणाचा प्रत्यक्ष लाभ होऊ शकेल. प्रशिक्षण कालावधीदरम्यान इंटर्नशिप करणाऱ्या प्रशिक्षणार्थी उमेदवारांना त्यांच्या उमेदवारीच्या काळात प्रशिक्षण भत्ता मिळेल. याशिवाय त्यांना कामाचा प्रत्यक्ष सराव-प्राथमिक अनुभव मिळून त्यांना कौशल्य विकासाचा फायदा निश्चितपणे मिळेल. त्याचवेळी उद्योग-आस्थापनांना त्यांच्या सध्याच्या वा प्रभावित कौशल्य गरजांनुसार व त्यांच्या पसंतीनुसार कौशल्यप्राप्त उमेदवारांची निवड करण्याचे दुहेरी फायदे होऊ शकतील. नव्याने रोजगार निर्मिती व रोजगारासाठी वरील योजना महत्त्वपूर्ण ठरणार आहेत. केंद्र सरकारने रोजगाराच्या संदर्भात काही ठोस धोरणात्मक भूमिका घेतल्याचे या अर्थसंकल्पाद्वारे प्रकर्षाने दिसून येते. यासंदर्भात प्रकर्षाने पुढे येणारा आणखीन एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, या दशकाअखेर देशात नव्याने दाखल होणाऱ्या सुशिक्षित विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनवून त्यांना रोजगार देण्याची पूर्तता करणे महत्त्वाचे ठरणार आहे. यासंदर्भातील लक्षात घेण्याजोगी बाब म्हणजे, वाढत्या शिक्षित वा पात्रताधारक तरुणांच्या संख्येच्या तुलनेत रोजगारक्षम युवकांच्या संख्येत वाढ झालेली नाही व होत नाही. उद्योग-व्यवसायांतर्फे हाच मुद्दा वारंवार मांडला जातो. उपलब्ध व पात्रताधारक विद्यार्थी यांचे समीकरण म्हणूनच जुळत नाही. त्यामुळेच नोकरी शोधणारे व शैक्षणिक पात्रता असणाऱ्या उमेदवारांची भरमार असते व दरवर्षी त्यामध्ये भरच पडली जाते. उद्योग-व्यवसायांची छोट्या-मोठ्या स्वरूपात वाढ होत असली, तरी त्यांना लागणाऱ्या योग्य व कौशल्यपूर्ण शैक्षणिक पात्रताधारक विद्यार्थी व कौशल्यप्राप्त विद्यार्थ्यांची संख्या व गुणवत्ता यांची तुलना करता असे आढळून येते की, सुमारे ५० वर्षांपूर्वी म्हणजेच ६० च्या दशकांत विविध महाविद्यालये वा विद्यापीठांतून उत्तीर्ण विद्यार्थ्यांना नोकरी, रोजगार सहजगत्या वा थोड्याफार प्रयत्नांसह मिळत असे. नंतर मात्र या पात्रताधारक विद्यार्थी व कौशल्यपूर्ण म्हणजेच रोजगारक्षम उमेदवार यांच्या संख्येत तफावत होत गेली व ती वाढीला पण लागली. १९९० नंतरच्या खुली अर्थव्यवस्था व प्राप्त तंत्रज्ञानासह सुरू झालेल्या उद्योग-विस्तारानंतर शिक्षण-कौशल्याच्या या तफावतीमध्ये वाढ होत गेली.

या साऱ्या पृष्ठभूमीवर लघुउद्योगांपासून मोठ्या वा प्रस्थापित उद्योगांपर्यंतच्या व्यावसायिकांना त्यांच्या उद्योगातून रोजगारवाढीला चालना देण्यासाठी आर्थिक मदतीसह प्रोत्साहनपर योजना सुरू करण्याच्या योजनेला चालना मिळाली. यासाठी औपचारिक स्वरूपातील योजना सर्वप्रथम व औपचारिक स्वरूपात कोरोना काळात

मनोरमा को ऑप. बँकेच्या सभासदांना १२ टक्के लाभांश

२८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

चेअरमन श्रीकांत मोरे यांची माहिती

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-

सोलापुरातील सर्वात अग्रेसर परिवार म्हणजे मनोरमा परिवार आहे. ग्राहकांना प्रामाणिक सेवा देण्याचा प्रयत्न करा. सन्मानाने कर्ज वसुली करा असे सांगत आजही मनोरमा बँकेने सलग सहा वर्षे 0टक्के एनपीए राखले आणि यंदाच्या वर्षी सभासदाना १२ टक्के लांभाश देणार असल्याचे चेअरमन श्रीकांत मोरे यांनी जाहीर केले.

मनोरमा को ऑप. बँकेची २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बेन्नूर नगर येथील मुख्य कार्यालयातील मनोरमा भवनात पार पडली. त्यावेळी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. व्यासपीठावर मनोरमा सखी मंचच्या अध्यक्षा शोभा मोरे, व्हा. चेअरमन संतोष सुरवसे, कार्याध्यक्षा अस्मिता गायकवाड, संचालक डॉ. सुमित मोरे, डॉ. मिताली मोरे, डॉ. ऋचा मोरे, सीए मैनुद्दिन नदाफ, प्राचार्य बब्रूवाहन रोंगे, डॉ. सत्यजित वाघचवरे, विकास सक्री, प्रशांत शहापूरकर, शुभांगी भोसले, गजेंद्र साळुंखे, पालक संचालक डॉ. विश्वास मोरे, कल्याण शिंदे, ऑडिटर ऋषिकेश शहा, मुख्य कार्यकारी अधिकारी शिल्पा कुलकर्णी-मोहिते आदी उपस्थित होते. प्रास्ताविकपर अहवालाचे क्रमवार वाचन सीईओ शिल्पा कुलकर्णी-मोहिते यांनी तर सूत्रसंचालन अजय मोरे यांनी व आभार प्रदर्शन व्हा. चेअरमन संतोष सुरवसे यांनी केले.

लवकरच तीन नवीन शाखांचा प्रस्ताव

यावेळी चेअरमन मोरे यांनी बँकेच्या अहवाल सालातील आर्थिक प्रगतीचा आलेख मांडला. बँकेचे वसूल भागभांडवल १४. २१ कोटी असून राखीव व इतर निधी १२.५४ कोटी आहे. ठेवी ५९५.८५ कोटी असून कर्जे ४0७.२५ कोटी आहे. एकूण गुंतवणूक १७९.६९ कोटी असून मिश्र व्यवसाय आजपर्यंत १00३.११ कोटी व नफा २ कोटी ९९ लाख रुपये झाल्याचे त्यांनी सांगितले. लवकरच तीन नवीन शाखांचा प्रस्ताव आरबीआयकडे दाखल केल्याचे त्यांनी सांगितले.

स्वाईन फ्ल्यू प्रादुर्भावासाठी डुकरांचा बंदोबस्त करा

महापालिका आरोग्य अधिकारी राखी माने यांनी दिले पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना पत्र

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. २६ ऑगस्ट -

शहरात स्वाईन फ्ल्यूचा १ रुग्ण आढळल्याने महापालिकेचे आरोग्य खाते सतर्क झाले आहे. डुक्करांमुळे (वराह) स्वाईन फ्ल्यू होत असल्याने या रोगाचा शहरात प्रादुर्भाव टाळण्यासाठी महापालिकेकडून आवश्यक त्या उपाययोजना होणार आहेत.

मोकाट डुक्करांचा बंदोबस्त करण्यासंदर्भात पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना पत्र दिले आहे, अशी माहिती महापालिका आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी दिली. सोलापूर शहरात मोकाट जनावरांची संख्या मोठी आहे. यामध्ये कुत्रे, गुरे-ढोरे, गाढव तसेच डुकरांचा समावेश आहे. या सर्वच जनावरांचा शहरवासीयांना मोठा उपद्रव होत आहे. शहरात डेंग्यू, मलेरियाचे रुग्ण सध्या आढळत आहेत. या पार्श्वभूमीवर नुकताच स्वाईन फ्ल्यूचा १ रुग्ण आढळला होता. त्याची दखल घेत महापालिकेच्या आरोग्य अधिकारी डॉ. माने यांनी पालिकेच्या पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना पत्र देऊन आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे सूचित केले आहे. काही वर्षांपूर्वी शहरात स्वाईन फ्ल्यूचे अनेक रुग्ण आढळले होते. त्यावेळी पालिकेने वराह पालकांवर निर्बंध आणले होते. वराह पालकांवर नियंत्रण नसल्याने समस्या उद्भवत आहेत. त्या पार्श्वभूमीवर आरोग्य अधिकाऱ्यांनी कार्यवाही सुरू केली आहे.

स्वाईन फ्ल्यू कशामुळे होतो व त्याची लक्षणे

स्वाईन फ्ल्यू श्वसननलिकेत होणारा संसर्ग आहे. इन्फ्लूएन्झा टाईप-ए च्या एच वन एन वन विषाणूमुळे हा आजार होतो. डुकरांमध्ये या विषाणूचा प्रादुर्भाव होतो. त्यामुळे डुकरांपासून माणसांना या रोगाचा प्रादुर्भाव होऊ शकतो. या रोगाचे विषाणू नाक, घसा आणि फुफ्फुसातील पेशींना संक्रमित करतो. शरीर दुखणे, थंडी वाजणे, खोकला, डोकेदुखी,घसा खवखवणे,ताप, थकवा, उलट्या आणि अतिसार या रोगाची लक्षणे आहेत.

या भागात आहे मोकाट डुकरांचा वावर

शहरात शास्त्रीनगर, गुरुनानक चौक, हद्दवाढ भाग , शेळगी,रविवार पेठ परिसरात मोकाट डुकरांचा वावर दिसून येतो. शास्त्रीनगर समोरील महापालिकेच्या कचरा डम्पिंग ग्राउंड मध्ये मोकाट डुकरांची प्रचंड संख्या दिसून येते. हे लक्षात घेता स्वाईन फ्ल्यूचा आजार फैलाव होऊ नये, याबाबत महापालिका आरोग्य विभागाकडून आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. दरम्यान, या संदर्भात आळा घालण्यासाठी महापालिकेच्या पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना पत्र देण्यात आले आहे.

माजी महापालिका आयुक्त चंद्रकांत गुडेवार शहर मध्यमधून भाजपकडून इच्छुक

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर घेतल्या अनेकांच्या गाठीभेटी

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. २६ ऑगस्ट -

सोलापूर महापालिकेचे तत्कालीन आयुक्त चंद्रकांत गुडेवार यांनी आगामी विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची तयारी सुरू केली आहे. त्याच पार्श्वभूमीवर त्यांनी आज सोलापूरात अनेक नेत्यांच्या गाठीभेटी घेतल्या आहेत. या भेटीदम्यान त्यांनी जनतेच्या अपेक्षा आणि भावना समजून घेत जनतेला नेमके काय अपेक्षित आहे, याची कारणमीमांसा जाणून घेतली आहे.

शहरातील एका हॉटेलमध्ये त्यांनी त्यांच्या जवळच्या अनेक नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांच्याशी सकारात्मक चर्चा केली. आगामी विधानसभा निवडणुकीत भाजप पक्षाकडून शहर मध्य विधानसभा मतदारसंघ जागेवर त्यांनी दावा केला आहे. त्यानुसार गुडेवार यांनी सावध पवित्रा घेत पाऊल उचलण्यास सुरुवात केली आहे. शहरातील सर्व बारीक खणाखूनाची माहिती त्यांच्या गाठीशी आहे. त्यांचा पुरेपूर फायदा त्यांना निवडणुकीत होईल असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

सुरळीत पाणीपुरवठासह रोजगार निर्मितीचे व्हिजन

सोलापूरचा आणि माझा गेल्या अनेक वर्षांपासूनचा जुना ऋणानुबंध आहे. आज जुन्या मित्रांना भेट देऊन चर्चा केली. तसेच विविध संस्थाना भेट दिली. सोलापूर शहरातील पाणी पुरवठा सुरळीत करणे, रोजगार निर्मिती करणे आणि विविध विकास कामांचे व्हिजन डोळ्यासमोर ठेवून अनेक योजना राबविण्याची तयारी सुरू केली आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत जर उमेदवारी मिळाली तर सोलापूरचा चेहरामोहरा बदलण्यासाठी प्रयत्न करणार आहे.

- चंद्रकांत गुडेवार, माजी सनदी अधिकारी.

दरम्यान सोलापूर शहरासाठी पाणीपुरवठा सुरुळीत करण्याचा आराखडा आखला आहे. आगामी काळात त्याद्वारे जनतेला दररोज पाणी पुरवठा केला जाऊ शकतो. पूर्वीचे नावाजलेले अभियंता होलानी यांनी यापूर्वी चाळीस वर्षांसाठीचा पाणीपुरवठा संबंधीचा आराखडा आखला होता. त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी प्रयत्नशील आहे. हा आराखडा आखला गेला तर प्रमुख जलवाहिनी तसेच इतर उपजलवाहिनीद्वारे शहरास पाणी पुरवठा सुरळीत करणे सुलभ होईल असे देखील त्यांनी यावेळी सांगितले. विधानसभा निवडणूक जाहीर झाल्यानंतर सोलापूर शहराच्या विकासाचे व्हिजन घेऊन निवडणुकीला सामोरे जाण्याची तयारी सुरू केल्याचे चित्र यावरून सद्या तरी दिसून येत आहे.

घरोघरी मुलांवर महिला सन्मानाचे संस्कार घडवा

बेटा पढाओ-बेटी बचाओचा संकल्प करा : खा. प्रणिती शिंदे यांचे आवाहन

श्रमिक पत्रकार संघातर्फे छायाचित्रकार, कॅमेरामन यांचा सन्मान

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-

महिला व मुलींचा सन्मान, आदर केला पाहिजे. ही शिकवण शाळांमध्ये दिली जात नाही मात्र घरोघरी आता मुलांवर महिलांचा सन्मान करण्याचे संस्कार घडविले पाहिजे. तरच महिलांवर अन्याय, अत्याचाराच्या घटना घडणार नाहीत असे आवाहन करतानाच छायाचित्रकार हे अविस्मरणीय क्षण टिपतात. ते तत्व आणि मूल्य पाळतात, असे प्रतिपादन खा. प्रणिती शिंदे यांनी केले.

सोलापूर श्रमिक पत्रकार संघ आणि सोलापूर जिल्हा वडार समाज खाण कामगार समाजसेवा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक छायाचित्र दिनानिमित्त माध्यमातील छायाचित्रकार आणि कॅमेरामन यांचा सत्कार खा. शिंदे यांच्या हस्तेस झाला. त्याप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हा लेबर फेडरेशनचे चेअरमन शंकर चौगुले, खाण संघटनेचे अध्यक्ष लक्ष्मण विटकर, श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, फोटोग्राफर असोसिएशनचे अध्यक्ष संदीप वाडेकर आदी उपस्थित होते.

खा. शिंदे पुढे म्हणाल्या, एक छायाचित्र पाहिले की सर्व काही समजते. एवढे प्रभावी छायाचित्र असते. अनेक अविस्मरणीय क्षण छायाचित्रकार टिपतात. छायाचित्राच्या माध्यमातून आत्मपरीक्षणही केले जाते. छायाचित्रामागे संघर्षाची कहाणी असते. छायाचित्रकारांची भूमिका आव्हानात्मक आणि संघर्षात्मक आहे. छायाचित्रकार हे आजच्या काळातही आपले तत्व आणि मूल्य जपतात.

पुरोगामी महाराष्ट्रात बदलापूर येथे बालिकेवर अत्याचाराची दुर्दैवी घटना घडली. महिला व मुलींचा सन्मान, आदर केला पाहिजे ही शिकवण शाळेत दिली जात नाही. प्रत्येक घरात आता महिला व मुलींचा सन्मान करण्याचे संस्कार मुलांवर घडविण्याची गरज आहे तरच यापुढे महिला अत्याचार व अन्यायाच्या घटना घडणार नाहीत. त्यासाठी आता ''बेटी पढाओ - बेटी बचाओ'' यापेक्षा ''बेटा पढाओ - बेटी बचाओ'' असा विचार रुजविला पाहिजे. तरच समाजात परिवर्तन घडेल, अशी अपेक्षा खा. प्रणिती शिंदे यांनी यावेळी व्यक्त केली.

पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे यांनी प्रास्ताविक केले. संघाचे माजी उपाध्यक्ष किरण बनसोडे यांनी सूत्रसंचालन केले चिटणीस आफताब शेख यांनी आभार मानले.

सोलापूर महानगरपालिका
उपसंचालक नगर रचना व बांधकाम परवानगी कार्यालय
'इंद्रभुवन', रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३००१
ई-मेल : adtpsolapur1@gmail.com दूरध्वनी ०२१७-२७३५२७३

जा.प.बा./नर/उसंनर/क्र.६०३ दि. २६/०८/२०२४

जाहीर नोटीस

मौजे शेळगी येथील गट नंबर १४२/२ या जागेतील १५.00 मी रुंदीच्या डी.पी रस्त्याने बाधित क्षेत्र-१000.00 चौ.मी क्षेत्र म.न.पा.चे ताब्यात घेवून त्यापोटी विकास हस्तांतरण हक्क (टी.डी.आर) मिळणेबाबत सदर जागेचे मालक अँड श्री. धानय्या गुरबसय्या चिवरी व इतर, सोलापूर यांचे दि.२१.0६.२0२३ ने प्रस्ताव सादर केलेले आहे.

सबब या जाहिर नोटीसीद्वारे सर्व तमाम नागरिकांना असे कळविणेत येते की, वर नमूद केलेल्या मिळकतीचे मालकी हक्क अथवा हितसंबंध असल्यास त्यांनी त्याबाबत तक्रार / हरकत हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून आठ दिवसाचे आंत खाली नमुद केलेल्या अधिका-यांचा पत्त्यावर पाठवाव्यात. असे न केल्यास सोलापूर महानगर पालिका, रितसर टि.डी. आर (हस्तांतरणीय विकास हक्क) देणेबाबत पुढील कार्यवाही करतील व त्यानंतर कोणाचाही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही. हि जाहिर नोटीस दिली.

दिनांक : २२/०८/२०२४

Signed by
Sheetal Basavaraj Teli Ugale
Date: 22/08/2024 12:25:02
आयुक्त
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

हरकत दाखल करणेचा पत्ता -
द्वारा मा. आयुक्त सोलापूरमहानगरपालिका करिता,
सहाय्यक संचालक, नगर रचना, सो.म.पा
इंद्रभूवन, आप्पासाहेब वारद पथ. रेल्वे लाईन सोलापूर.

जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः शहर सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर येथील तसेच आजूबाजूच्या परिसरातील लोकांना आमच्या अशिलानी दिलेल्या माहिती व कागदपत्रावरुन या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की.

डि।। व सब डि।। सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका ग.व.सु. हद्दीतील पेठ- शास्त्रीनगर नगर अ झोपडपट्टी या नांवाने ओळखल्या जाणाऱ्या नगरातील झोपडी घर नं.९७ यांसी म.न.पा. मिळकत क्र.१0११८0१८0५ असा असून सदर ठिकाणी लहान ५ खोल्या वीट, मातीने बांधलेले वरती पन्हाळी पत्रे, वासे घातलेले खोल्या आहेत.

सदरची मिळकत घरजागा आमचे अशिल श्रीमती शांताबाई विठ्ठल कलाल यांची सासू कै. गंगुबाई अणप्पा कलाल याचे नांवावर असून त्यांचे दि. १९/0८/१९९६ रोजी राहते घरी मृत्यु झालेला आहे व त्यांचे पती म्हणजे आमचे अशिलांचे सासरे अणप्पा शुभराव कलाल हे दि.१५/१२/१९८८ रोजीपासून आजपावेतो बेपत्ता आहेत. तसेच आमचे अशिलाचे पती म्हणजे मयत गंगुबाई अणप्पा कलाल यांचा मुलगा कै. विठ्ठल अणप्पा कलाल हे दि.२७/0४/२00२ रोजी मृत्यु झालेला आहे. सदरहू घर नं.९७ या मिळकतीची नोंद आजमितीस कै. गंगुबाई अणप्पा कलाल यांचे नांवाची सोलापूर महानगरपालिकेच्या ग.व.सु. विभागाचे कर आकारणी विभागास नोंद आहे.

सदर ठिकाणी लहान पाच खोल्या असलेली घरजागा असून सदर ठिकाणी आमचे अशिल हे त्यांचे पती व सासू-सासऱ्यांचे हयातीपासूनच सदरहू घरजागेवर आजपावेतो कुटुंबासह राहणेस आहेत. सदरहू घरजागेवरील आमचे अशिलांचे मयत सासू कै. गंगुबाई अणप्पा कलाल यांचे नांव कमी करुन श्रीमती शांताबाई विठ्ठल कलाल यांचे नांवाची सो.म.पा.चे कर आकारणी ग.व.सु. विभागाचे दप्तरी वारस नोंद होऊन त्यांचे नांवे कर पावती मिळावे याकरिता आमचे अशिल म.न.पा. कडे अर्ज दाखल करणार आहेत..

तरी सदरहू घरजागेवर आमचे अशिला व्यतिरिक्त इतर कोणाचाही कुठल्याही प्रकारचे हक्क व अधिकार असेल अथवा इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, लीज, करार, मदार, टाच, जप्ती, बोजा, पोटगी, बक्षिसपत्र, खरेदीखत अगर इतर हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसाचे आंत हक्काचे व अधिकाराचे लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्यावर लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचेही कसलेही हरकत व तक्रार न आल्यास ही घरजागा निर्वेध, निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल त्यांचे नांवाची वारस नोंद सो.म.पा. चे कर आकारणी विभाग, ग.व.सु. विभागाचे दप्तरी त्याचे नावाची वारस नोंद करून घेतील व त्यानंतर कोणाचेही व कसल्याही प्रकारचे तक्रार व हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली तारीख २६/0८/२0२४

सही/-
ढेकणे एस.एम.
ॲडव्होकेट
रा. १२६-अ वाणी गल्ली बाळे,
ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर
अशिलातर्फे ॲडव्होकेट

रमेश मेनकुदळे यांचे निधन

सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-

येथील रमेश राचप्पा मेनकुदळे (वय ६१वर्षे) यांचे सोमवार दिनांक २६ ऑगस्ट रोजी सकाळी अकस्मात निधन झाले. ते सिटी बस डेपो येथे मेकॅनिक म्हणून कामास होते. त्यांच्या पशचात पत्नी, एक मुलगा आणि सून असा परिवार आहे. त्यांच्यावर रूपाभवानी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले आहे.

CHANGE IN NAME

I have changed my name from **NARAKAR SURYAKANT VAMAN** TO, **NARKAR SURYAKANT VAMANRAO,** Hence for this Declaration in future Old name: - **NARAKAR SURYAKANT VAMAN,** New name: - **NARKAR SURYAKANT VAMANRAO.** ADDRESS: - Shrilaxmi niwas, Vidya Nagar, Murud Bk:, Latur, Murud, Maharashtra, 413510, India Mobile no.-8805537579, Aadhar No- 781466140614

खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः इर्ले, इर्लेवाडी, ता. बार्शी येथील व आसपासचे लोकांना जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन डि. व सब डि. सोलापूर ता. बार्शी पैकी मौजे इर्लेवाडी हद्दीतील शेतजमीन गट नं.२/२ याचे क्षेत्र 0हे. ८१ आर, आकार १रु.४७ पैसे येणेप्रमाणे चतुःसिमापूर्वक मिळकत आतिल तदंगभूत वस्तूसह व वहिवाटीच्या हक्कासह.

उपरोक्त वर्णन केलेली शेतजमीन ही शशिकला शरणप्पा नेळगे व संगिता शरणप्पा नेळगे यांना बार्शी येथील दिवाणी न्यायाधिश वरिष्टस्तर यांचे कोर्टातील स्पे. मु.नं.५५३/२०१५ अन्वये वाटपानुसार मालकी हक्कात मिळालेल्या मिळकती होत्या व आहेत. संगिता शरणप्पा नेळगे या अविवाहित असून त्या दिनांक १/३/२0२0 मयत आहेत. स्पे.मु.नं.५५३/२०१५ मधिल दाव्यामध्ये शरणप्पा नेळगे यांच्या कुटूंबामध्ये दाव्यातील मिळकतीचे वाटप झालेले होते. संगिता शरणप्पा नेळगे या मयत झाल्यामुळे त्यांच्या नावाची नोंद गट नं.२/२ च्या ७/१२ उताऱ्यावर कमी करणेसाठी किरण सिध्देश्वर नेळगे यांनी मे. गावकामगार तलाठी इर्लेवाडी यांचेकडे अर्ज दिलेला असून मयत संगिता शरणप्पा नेळगे यांचे नाव कमी करणेस कोणाची हरकत असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात हरकत खालील पत्यावर कळवावी अथवा मे. गावकामगार तलाठी इर्लेवाडी यांच्याकडे हरकत घ्यावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मयताची नोंद ७/१२ उताऱ्यावरुन कमी करण्यात येईल. ही जाहीर नोटीस दिली. ता. २३/0८/२0२४

सही/-
श्री. लक्ष्मीकांत प्रसिध्देश्वर झाडे
ॲडव्होकेट
२२0९/३८, सिध्देश्वर निवास,
गणेश नगर, माढा रोड,
वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर
अशिलातर्फे ॲडव्होकेट
मो. ९८५0६६७४९६

Reg.No.SUR/NSR/RSR(R)480/2001/DT\27/06/2001

उमासा चव्हाण ना. सह. पतसंस्था मर्या, सोलापूर
२६७/४६, रविवार पेठ, कुचन हायस्कूल रोड, सोलापूर फोन. २७४१५३१/३७

२३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नोटीस
(फक्त सभासदांकरिता)

उमासा चव्हाण नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर या संस्थेची २३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. 0१/0९/२0२४ रोजी सकाळी ८.३0 वा. चव्हाण मोटर्स., अक्कलकोट रोड, सोलापूर. या ठिकाणी बोलविणेत येत आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहुन सहकार्य करावे,
हि विनंती.

सोलापूर
दिनांक १४/0८/२0२४
शिक्का
सही/-
पी.एस. दुडम
व्यवस्थापक

टीप :
१) सभेपुढील येणारे विषय संस्थेच्या नोटीस बोर्डावर लावण्यात आले आहेत. कृपया याची नोंद घ्यावी.
२) कोरमच्या अभावी सभा तहकुब झाल्यास ती सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी एका तासानंतर घेण्यात येईल. अशा सभेस कोरमची आवश्यकता राहणार नाही.
३) दि.३१/0३/२0२४ अखेरच्या ताळेबंद, नफातोटा पत्रकासंबंधी काही माहिती, स्पष्टीकरण विचारावयाचे असल्यास त्यांनी दि. २८/0८/२0२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत पतसंस्थेच्या व्यवस्थापकाकडे लेखी कळवावे. त्यानंतर आलेल्या प्रश्नांचा विचार केला जाणार नाही.

अपर तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी मंद्रुप, ता. दक्षिण सोलापूर यांचे न्यायालयात
संकलन-जमीनबाब
दूरध्वनी क्र. (0२१७) २२५५५५१ Email- tahmandrup@gmail.com

जा.क्र. जमीनबाब/जन्म-मृत्यू दाखला/एस.आर.-६१/२0२४
मंद्रुप, दि. २६/0८/२0२४.

जाहीर प्रसिध्दीकरण

कु. पडनूरे स्नेहा मल्लिकार्जुन, - अर्जदार
वय-२६ वर्षे, धंदा-घरकाम,
रा. बसवनगर, ता.दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर.
विरूध्द
ग्रामसेवक, ग्रामपंचायत बसवनगर, - सामनेवाला
ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर.

ज्याअर्थी यातील अर्जदार कु. पडनूरे स्नेहा मल्लिकार्जुन, रा. बसवनगर, ता. दक्षिण सोलापूर येथील कायमचे रहिवासी आहेत. अर्जदार कु. पडनूरे स्नेहा मल्लिकार्जुन यांचा जन्म दि.२३/0८/१९९७ रोजी गाव- बसवनगर, ता. दक्षिण सोलापूर येथे झालेला आहे, असा जन्म दाखला मिळणेकामी जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम २0२३ चे कलम १३ (२) (३) अन्वये ग्रामपंचायत बसवनगर यांना आदेश होणेकामी इकडील न्यायालयात प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, अर्जदार कु. पडनूरे स्नेहा मल्लिकार्जुन यांचा जन्म दाखला मिळणेकामी कोणाची काही हरकत असल्यास अथवा सदर अर्जाचे पृष्ठयर्थ अथवा विरूध्द कोणाचे काही म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ दिवसांच्या आत स्वतः अथवा आपल्या विधिज्ञामार्फत हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाचीही काही हरकत अथवा म्हणणे न आल्यास कोणाचीही काहीही हरकत नाही, असे समजून अर्जाच्या चौकशीअंती कु. पडनूरे स्नेहा मल्लिकार्जुन यांच्या जन्म तारखेची नोंद होऊन तसा जन्म दाखला देण्याचा आदेश बसवनगर ग्रामपंचायतीस मे. कोर्टातर्फे देण्यात येईल. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती, तक्रारी अथवा म्हणणे विचारात घेतले जाणार नाही.

हे आज दि. २६/0८/२0२४ रोजी आमचे सहीने व कोर्टाच्या शिक्याने प्रसिध्दी केले असे.

शिक्का
सही/-
(सुजित नरहरे)
तालुका कार्यकारी दंडाधिकारी
तथा अपर तहसिलदार मंद्रुप,
ता. दक्षिण सोलापूर.

बैंक ऑफ़ बड़ौदा
Bank of Baroda

नवी पेठ, शाखा
पहिला मजला, डागेकर कॉम्प्लेक्स,
नवी पेठ, सोलापूर - ४१३००१

मागणी नोटीस U/S 13(2)
सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ चे कलम १३(२) अनुसार नोटीस

१. कर्जदाराचे, जामिनदार व कायदेशीर वारसदार यांचे नाव व पत्ता

अ. क्र.	शाखा / कर्ज़दार / जामिनदार / गहाणदारांची नावे आणि पत्ते	मागणी नोटीसीची तारीख / अनुत्पादक मालमत्तेची तारीख	मंजूर कर्ज रक्कम	खाते क्रमांक / खात्याचा प्रकार / व्याज दर	येणे रक्कम	स्थावर / जंगम मालमत्तेचा तपशील
१.	(कर्जदार) श्री. दिलीप रामलाल निंबाळकर रामलाल निंबाळकर यांचा मुलगा रा. झेड. पी. शाळा, ता. उत्तर सोलापूर पिन – ४१३२५५	0९/0८/२0२४ / 0८/0८/२0२४	रु. १४,७२,000/-	९८६२0६00000२३७६ गृह कर्ज ९.२५%	रु. १२,५१,0३0/- + व्याज + इतर खर्च	प्लॉट नं. ३६, सर्व्हे नं. ७/२, स्वातंत्र सैनिक रामचंद्र सुरवसे नगर, बाळे, उत्तर सोलापूर तालुका सोलापूर - ४१३२५५ चतु:सिमा पुढील प्रमाणे पुर्वेस - प्लॉट नं. ३५ पश्चिमेस - प्लॉट नं. ३७ उत्तरेस - सर्व्हे नं. ७/१ दक्षिणेस - रोड
			रु. २0,00,000/-	९८६२0६00000२३७५ गृह कर्ज ९.२५%	रु. १६,६0,५५0/- + व्याज + इतर खर्च	प्लॉट नं. ३५, सर्व्हे नं. ७/२, स्वातंत्र सैनिक रामचंद्र सुरवसे नगर, बाळे, उत्तर सोलापूर तालुका सोलापूर - ४१३२५५ एरिया - १४८ स्क्वे.मी., चतु:सिमा पुढील प्रमाणे पुर्वेस - प्लॉट नं. ३४ पश्चिमेस - प्लॉट नं. ३६ उत्तरेस - सर्व्हे नं. ७/१ दक्षिणेस - रोड
					एकुण येणे रक्कम रु. २९,११,५८0/- (रुपये एकोणतीस लाख अकरा हजार पाचशे ऐंशी रुपये) त्यावरील व्याज, दंडात्मक व्याज आणि प्रासंगिक खर्च व किंमत	

२) मुख्य कर्जदार (कर्जदार) याने / हिने / त्याच्या / त्यांच्या देणे रक्कमेची फरतफेड करण्यास कसूर केले असल्याने आम्ही यांचे / हिचे / त्याचे / त्यांचे खाते रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी जारी केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार निश्चित केले आहे. ३) आपणांस ही सूचना सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ नुसार जारी करण्यात आली आहे, कारण रजिस्टर्ड पोस्टाने आपणांस पाठविण्यात आलेली नोटीस पोहोच न होता परत आली, यानुसार आपणांस पुढीलप्रमाणे रक्कमेची व्याजासह भरणा करण्यास बजावण्यात येत आहे. ४) आपणांस देण्यात आलेली कर्जसुविधेची रक्कम वरीलप्रमाणे मालमत्ता / सिक्युरिटीजद्वारे सुरक्षित करण्यात आली आहे ५) आता या जाहीर सूचनेद्वारे आम्ही आपणांस या सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत येणे रक्कम, व्याज, भविष्यातील व्याज आणि प्रासंगिक खर्च आणि किंमत यांसह परत करण्याचा सल्ला देत आहोत. अन्यथा बँक सरफेसी ॲक्ट २००२ अनुसार कारवाई करतील. खाली सही करणार यांच्याकडे सदर मालमत्तांचा ताबा घेणे. त्यानंतर सदर मालमत्तांची विक्री करण्याचे अधिकार आहेत आणि ते सरफेसी ॲक्ट सेक्शन १३ अनुसार बँकेचे अधिकृत अधिकार आहेत.

दिनांक - 0९-0८-२0२४,
स्थळ - सोलापूर
(मजकूरात संधिग्ता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य धरा)
सही/-
अधिकृत अधिकारी
बँक ऑफ बडौदा

महत्त्वाचे

सॅफ फुटबॉल स्पर्धेत भारताचे आव्हान संपुष्टात

काठमांडू : येथे आयोजित दक्षिण आशियाई २० वर्षांखालील फुटबॉल स्पर्धेत उपांत्य फेरीत भारताचे आव्हान संपुष्टात आले. भारताने निर्धारित वेळेत बांगलादेशविरुद्ध १-१ गोलने बरोबरी साधली, परंतु त्यानंतर पेनॉल्टी शूट-आऊटमध्ये बांगलादेशने ४-३ अशा गोलफरकाने बाजी मारली व त्यांनी अंतिम फेरीत प्रवेश मिळविला. आता बुधवारी बांगलादेशचा अंतिम सामना यजमान नेपाळविरुद्ध होणार आहे. पर्यायी गोलरक्षक मोहम्मद आसिफने दोन महत्त्वपूर्ण पेनॉल्टी वाचवल्यामुळे गतविजेत्या भारतीय संघाच्या पदरी निराशा पडली. दोन्ही संघांनी प्रशंसनीय बचावात्मक खेळाचे प्रदर्शन केले, परंतु पेनॉल्टी शूटआऊटमध्ये भारताचा खेळ कमकुवत ठरला. असदुल इस्लाम साकिबने ३६व्या मिनिटाला बांगलादेशला आघाडी मिळवून दिली, तर कर्णधार रिकी मीतेई हाओबामने ७४व्या मिनिटाला गोल करून भारताला सामन्यात बरोबरी मिळवून दिली. सुरुवातीच्या टप्प्यात भारताने संयम आणि नियंत्रण दाखवून सामन्याची सुरुवात झाली. भारतीय संघाने आणखी एक गोल केला असता, तर संघावर ही वेळ आली नसती. ■

माजी फुटबॉल प्रशिक्षक स्वेन-गोरन एरिक्सन यांचे निधन

लंडन : स्वीडिश फुटबॉल संघाचे व्यवस्थापक व इंग्लंड संघाचे नेतृत्व करणारे पहिले विदेशी फुटबॉलपटू स्वेन-गोरान एरिक्सन यांचे निधन झाले. ते ७६ वर्षांचे होते. या वर्षाच्या सुरुवातीला ते स्वादुपिंडाच्या कर्करोगाने आजारी असल्याचे निदान झाले होते. एक जादुई प्रशिक्षक म्हणून लौकीक मिळविण्यापूर्वी तसेच इंग्लंड संघाचे नेतृत्व करण्यापूर्वी एरिक्सन यांनी स्वीडिश, पोर्तुगीज आणि इटालियन क्लबला १९८० आणि १९९० च्या दशकात व २००१ मध्ये मोठ्या स्पर्धेचे विजेतेपद जिंकून दिले होते. एरिक्सनने २००२ आणि २००६ विश्वचषकाच्या उपांत्यपूर्व फेरीत इंग्लंडचे नेतृत्व केले आणि २००४ युरोपियन चॅम्पियनशिपमध्ये डेव्हिड बेकहॅम, पॉल फ्रँक लॅम्पार्ड, वेन रुनी आणि स्टीव्हन जेरार्ड यांच्यासह खेळाडूंच्या सुवर्ण पिढीचे व्यवस्थापन केले.

पाकिस्तानचा एकमेव पॅराॲथ्लिट हैदर अली पॅरिसला रवाना

लाहोर : आगामी पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये सहभागी होणारा पाकिस्तानचा एकमेव पॅरा-ॲथ्लिट हैदर अली आपले प्रशिक्षक अकबर अली यांच्यासह फ्रान्सच्या राजधानीकडे रवाना झाला. या महिन्याच्या सुरुवातीला ऑलिम्पिकच्या यशस्वी समारोपानंतर २८ ऑगस्ट रोजी होणाऱ्या उद्घाटन समारंभात पॅरिस पॅरालिम्पिकची अधिकृत सुरुवात होईल. मूळचा गुजरानवाला येथील रहिवासी असलेला हैदर अली ६ सप्टेंबर रोजी थाळीफेक स्पर्धेच्या एफ३७ प्रकारात पाकिस्तानचे प्रतिनिधित्व करेल. हैदरचे हे पाचवे पॅरालिम्पिक असेल. त्याने टोकियो २०२० पॅरालिम्पिकमध्ये थाळीफेकेमध्ये ५५.२६ मीटर फेक करून सुवर्णपदक जिंकले. २००८ बीजिंग पॅरालिम्पिकमध्ये त्याने लांब उडीत रौप्यपदक आणि २०१६ च्या रिओ पॅरालिम्पिकमध्ये त्याच स्पर्धेत कांस्यपदक मिळवले. दुर्दैवाने, दुखापतीमुळे तो २०१२ च्या लंडन पॅरालिम्पिकमध्ये भाग घेऊ शकला नाही. तत्पूर्वी, पाकिस्तान क्रीडा मंडळाचे महासंचालक यासिर पिरजादा यांनी घोषणा केली की हैदर पुन्हा एकदा या वर्षीच्या पॅरालिम्पिकमध्ये पाकिस्तानचे प्रतिनिधित्व करेल आणि पदक जिंकण्याच्या त्याच्या क्षमतेवर विश्वास व्यक्त केला.

न्यू यॉर्कच्या हार्ड कोर्टवर कोण बाजी मारणार?

न्यू यॉर्क : वर्षातील शेवटची ग्रॅण्ड स्लॅम अमेरिकन ओपन टेनिस स्पर्धेला सोमवारपासून प्रारंभ झाला. परंतु या स्पर्धेत कोणता खेळाडू सर्वोत्तम कामगिरी करेल, याचा अंदाज टेनिस चाहत्यांना बांधता येत नाही. खुद्द खेळाडूंनाही खात्री नसते की काय अपेक्षित आहे. न्यू यॉर्कमध्ये नेहमीची अनिश्चितता असते. खेळाडूंनी पॅरिसमधील मातीपासून विम्बल्डनच्या गवतापर्यंत, नंतर पुन्हा मातीत व अमेरिकन ओपनच्या हार्ड कोर्टवर खेळताना वेगवेगळा अनुभव येतो. हे एक विचित्र वर्ष आहे, असे ब्रिटीश खेळाडू डॅन इव्हान्स म्हणाला. २०२३ अमेरिकन ओपन विजेती कोको गॉफ तीन ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये खेळली, पण प्रत्येक स्पर्धेत लवकर बाहेर पडली. त्यानंतर तिने टोरंटोमधील दुसरा सामना व सिनसिनाटीमधील पहिला सामना गमावला. कोर्ट बदलणे हा खेळाचा भाग आहे, परंतु यश केवळ शरीरावरच नाही, मानसिक बळावरसुद्धा अवलंबून आहे.या सर्व गोष्टींशी जवळवून घ्यावे लागते, असे टॉमी पॉल म्हणाला. ■

रोहन जेटली बीसीसीआयचे नवीन सचिव?

आयसीसीला लवकरच मिळणार नवीन अध्यक्ष

◆ **नवी दिल्ली, २६ ऑगस्ट**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या अध्यक्षपदाच्या शर्यतीत बीसीसीआयचे सचिव जय शाह यांचे नाव आघाडीवर असून त्यांचीच आयसीसीचे नवीन अध्यक्ष म्हणून वर्णी लागण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे बीसीसीआयच्या सचिवपदी भाजपाचे ज्येष्ठ नेते स्व. अरुण

जेटली यांचे सुपुत्र रोहन जेटली यांची नियुक्ती होण्याची शक्यता आहे. ते व दिल्ली व जिल्हा क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष राहिले आहेत.

आयससीच्या १६ पैकी १५ सदस्यांचा जय शाह यांना पाठिंबा असल्यामुळे ते आयसीसीच्या अध्यक्षपदी विराजमान होण्याची दाट शक्यता आहे, त्यामुळे जय शाह यांच्याकडे निर्णय घेण्यासाठी खूप कमी वेळ उरला आहे, कारण अधिकृत नामांकन दाखल करण्याची अंतिम मुदत २७ ऑगस्ट ही आहे. बीसीसीआयच्या सचिवपदासाठी रोहन जेटली यांचे नाव आघाडीवर आहे. अध्यक्ष रॉजर बिन्नी आणि इतर पदाधिकारी आपापल्या पदावर कायम राहतील. या सर्वांचा कार्यकाळ एक वर्षानंतर पूर्ण होणार आहे. जय शाह आयसीसीच्या अध्यक्षपदासाठी सोमवारी सायंकाळी अर्ज करू शकतात. त्यामुळे त्यांना बीसीसीआयचे सचिवपद सोडावे लागेल. दरम्यान, आयसीसीचे विद्यमान अध्यक्ष ग्रेग बार्कले यांचा कार्यकाळ ३० नोव्हेंबरला संपत आहे. त्यांच्या नेतृत्वात दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियम येथे विश्वचषकाचे पाच सामने खेळवले गेले. त्यांनीच दिल्ली प्रीमिअर लीगचे आयोजन केले, ज्यात ऋषभ पंतसारख्या नामांकित खेळाडूंनी सहभाग घेतला. ◀(वृत्तसंस्था)

प्रज्ञानंदने लिरेनला, गुकेशने मॅक्सिमला रोखले

सिंकफिल्ड चषक बुद्धिबळ

आपापल्या प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध खेळताना आर. प्रज्ञानंद व डी. गुकेश

◆ **सेंट लुईस, २६ ऑगस्ट**

येथे सुरु असलेल्या प्रतिष्ठेच्या सिंकफील्ड चषक बुद्धिबळ स्पर्धेच्या सहाव्या फेरीत भारतीय ग्रॅण्डमास्टर आर. प्रज्ञानंदने विद्यमान विश्वविजेत्या डिंग लिरेनला, तर विश्वविजेतेपदाचा आव्हानकर्ता डी. गुकेशने फ्रान्सच्या मॅक्सिम वॅचियर-लॅग्रेव्हला बरोबरीत रोखले. रशियाच्या इयान नेपोम्नियाचीला केवळ २५ चालींमध्ये अमेरिकेच्या फॅबियानो कारुआनाकडून धक्कादायक पराभव पत्करावा लागला.

हॉलंडचा अनिश गिरी आणि उझबेकिस्तानचा नोदिरबेक अब्दुसत्तोरोव्ह यांच्यादरम्यानचा सामना बरोबरीत सुटला. तसेच फ्रान्सचा अलिरेझा फिरोझा व स्थानिक स्टार वेल्सी सो यांच्यातील सामनाही अनिर्णीत राहिला.

आता स्पर्धेतील केवळ तीन फेऱ्या शिल्लक आहे. फ्रन्ससा अलिरेझा फिरोझा ४ गुणांसह आघाडीवर आहे. कारुआना फॅबियानो व वेस्ली सो प्रत्येकी ३.५ गुणांसह संयुक्तपणे दुसऱ्या स्थानावर आहेत. प्रज्ञानंद, गुकेश, मॅक्सिम वॅचियर-लॅग्रेव्ह व डिंग लिरेन प्रत्येकी तीन गुणांसह चौथ्या स्थानावर आहेत आणि नेपोम्नियाची आणि अब्दुसत्तोरोव्ह यांचे प्रत्येकी २.५ गुण आहेत. अनिश गिरी दोन गुणांसह शेवटच्या स्थानावर आहे. ◀(वृत्तसंस्था)

पॅरालिम्पिकपटूंच्या सुविधेसाठी स्वयम् सज्ज

भारतीय पॅरालिम्पिक समितीने केले स्वयम्चे कौतुक

◆ **नवी दिल्ली, २६ ऑगस्ट**

पॅरिसमध्ये आगामी २८ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर या कालावधीत होणाऱ्या पॅरालिम्पिकमध्ये भारतीय खेळाडू आपली सर्वोत्तम कामगिरी करण्यासाठी सज्ज होत असताना, त्यांना सर्वोत्तम पाठबळ देण्यासाठी भारतीय पॅरालिम्पिक समितीने (पीसीआय) आपली भूमिका चोख बजावली आहे. यात स्वयम् या संस्थेने क्रीडापटूंना निवासस्थानापासून विमानतळापर्यंत तसेच त्यांच्या प्रशिक्षणादरम्यान सुलभ वाहतुक व्यवस्था उपलब्ध करून दिली. यासाठी पीसीआयने स्वयम् संस्थेचे कौतुक केले आहे.

खेळाडूंना त्यांच्या व्हीलचेअरसह सामावून घेऊ शकतील अशा विशेष वाहनांची सुविधा स्वयम् संस्थेने उपलब्ध करून दिली. त्यामुळे खेळाडूंना सहजतेने स्पर्धास्थळी पोहोण्यात स्वयम्च्या वाहतूक व्यवस्थेने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

स्वयम्ने विशेष वाहने उपलब्ध करून देऊन महत्त्वाची भूमिका बजावली आहे. ही सुविधा प्रवेशयोग्यता वाढवते व प्रवासाची

सोय सुनिश्चित करते. स्वयम् सारखा ॲक्सेसिबिलिटी पार्टनर बोर्डात असल्याबद्दल मी पीसीआयचे आभार मानते,असे स्टार टेबल टेनिसपटू भाविना पटेल म्हणाली.

आम्हाला दिलेल्या विशेष वाहनांमुळे आमचा प्रवास लक्षणीयरीत्या सुलभ झाला, ज्यामुळे मला माझ्या प्रशिक्षणावर आणि तयारीवर अधिक लक्ष केंद्रित करता आले. त्यांनी माझ्या दैनंदिन दिनचर्येत खरा बदल घडवून आणला, असे ॲथ्लिट कसाना म्हणाली.

पीसीआयचे अध्यक्ष व सर्वाधिक पॅरालिम्पिक सुवर्णपदक विजेते देवेंद्र झाझरिया यांनी स्वयम्च्या प्रयत्नांचे कौतुक केले.

स्वयम्ने दिव्यांग लोकांच्या गरजा आणि कमी गतिशीलता यावर देशाला एक मजबूत संदेश दिला आहे. खेळाडूंना त्यांच्या स्पर्धांसाठी खूप प्रवास करावा लागतो. म्हणून, जर त्यांना अशा प्रकारची वाहतूक सुलभता दिली गेली तर ते त्यांना बळ देते आणि त्यांचा आत्मविश्वास वाढवते, असे झाझरिया म्हणाले.

दरम्यान, अभिषेक दुबे आणि महावीर रावत यांनी लिहिलेल्या आणि कोणार्क पब्लिशर्सने प्रकाशित केलेल्या 'ब्रेकिंग द बॅरियर्स' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. या पुस्तकात पॅरालिम्पिकमध्ये आतापर्यंत पदक जिंकणाऱ्या सर्व २६ भारतीय खेळाडूंची कहाणी आहे. ◀(वृत्तसंस्था)

शिखर धवनची आयपीएलमधूनही निवृत्ती

आता 'एलएलसी' लीगमध्ये खेळणार

◆ **नवी दिल्ली, २६ ऑगस्ट**

धडाकेबाज फलंदाज शिखर धवनने आपल्या क्रिकेट कारकिर्दीबाबत मोठा निर्णय घेतला आहे. आंतरराष्ट्रीय व देशांतर्गत क्रिकेटला रामराम ठोकल्यानंतर त्याने इंडियन प्रीमियर लीगलाही (आयपीएल) निरोप दिला आहे.

भारतीय क्रिकेट मंडळाच्या या टी-२० लीगमध्ये तो यापुढे दिसणार नाही. गेल्या मोसमापर्यंत तो पंजाब किंग्जचा कर्णधार खेळला, पण अलीकडेच इन्स्टाग्रामवर एक भावनिक व्हिडीओ शेअर करून त्याच्या कारकिर्दीचा मोठा निर्णय घेतला. मात्र, चाहत्यांसाठी एक आनंदाची बातमी आहे. आता शिखर धवन निवृत्त खेळाडूंच्या लीगमध्ये अर्थात लीजेंड्स लीग क्रिकेटमध्ये (एलएलसी) सहभागी झाला आहे. धवन आपल्या स्फोटक फलंदाजीसाठी ओळखला जातो, एलएलसीमध्ये सामील होणे हा त्याच्या आधीच गौरवशाली कारकिर्दीतील एक नवीन अध्याय आहे.

लेजेंड्स लीग क्रिकेटमध्ये सामील झाल्यानंतर शिखर धवन म्हणाला की, लीजेंड्स लीग क्रिकेटसह हा नवीन अध्याय सुरू करण्यापेक्षा चांगला निर्णय असू शकत नाही. माझे शरीर अजूनही खेळण्यास सक्षम आहे. मी मित्रांसह पुन्हा एकत्र येण्यासाठी आणि माझ्या चाहत्यांचे मनोरंजन करण्यास उत्सुक आहे.

लिजेंड्स लीग क्रिकेटचे सह-संस्थापक रमण रहेजा यांनी धवनचे लीगमध्ये स्वागत केले. शिखर धवन आमच्यासोबत सहभागी झाल्यामुळे आम्हाला आनंद झाला आहे. त्याचा अनुभव आणि प्रतिभा निःसंशयपणे स्पर्धेच्या उत्साहात भर घालेल आणि चाहत्यांचे मनोरंजन करेल. ◀(वृत्तसंस्था)

वेस्ट इंडीजने जिंकली टी-२० मालिका

दुसऱ्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेवर ३० धावांनी मात

◆ **तारौबा (त्रिनिदाद), २६ ऑगस्ट**

येथे खेळल्या गेलेल्या दुसऱ्या टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात वेस्ट इंडीजने दक्षिण आफ्रिकेवर ३० धावांनी मात करून तीन सामन्यांची टी-२० मालिका २-० ने जिंकली.

पहिला टी-२० सामना ७ गड्यांनी जिंकल्यानंतर वेस्ट इंडीजने दुसऱ्या टी-२० सामन्यात दक्षिण आफ्रिकेवर ३० धावांनी रोमहर्षक विजय नोंदविला. वेस्ट इंडीजने फटकावलेल्या ६ बाद १७९ धावांच्या प्रत्युत्तरात दक्षिण आफ्रिकेला मर्यादित षटकांत सर्वबाद १४९ धावांपर्यंतच मजल मारता आली.

वेस्ट इंडीजकडून शाय होपने ४१, कर्णधार रोवमन पॉवेलने ३५ धावांचे, तर शेर्फन रदरफोडने २९ धावांचे योगदान दिले. प्रत्युतर देताना दक्षिण आफ्रिकेकडून रिझा हेन्ड्रिक्सने सर्वाधिक ४४ धावांची खेळी केली, परंतु इतर फलंदाज वेस्ट इंडीजच्या प्रभावी गोलंदाजीसमोर टिकाव धरू शकले नाहीत. रोमारिओ शेफर्ड व शामर जोसेफने प्रत्येकी ३ बळी, अकील हुसेनने २ बळी, तर मॅथ्यू फोर्डे व गुडाकेश मोतीने प्रत्येकी १ बळी टिपला. मंगळवारी तारौबा येथे मालिकेचा समारोपीय टी-२० सामना होणार आहे. दक्षिण आफ्रिकेने वेस्ट इंडीजविरुद्धच्या दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत विजय मिळवला. ◀(वृत्तसंस्था)

पाकिस्तानसह बांगलादेश संघालाही दंड

◆ **रावळपिंडी, २६ ऑगस्ट**

बांगलादेशने येथे पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात पाकिस्तान क्रिकेट संघावर त्यांच्याच घरच्या मैदानावर १० गडी राखून विजय नोंदवला. या सामन्यानंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) आता पाकिस्तान आणि बांगलादेश या दोन्ही दोघांना संथ गतीने षटके टाकल्याबद्दल दंड ठोठावला आहे.

यामध्ये पाकिस्तानला मोठा धक्का बसला आहे, कारण आयसीसी जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेअंतर्गत त्यांचे ६ गुण कमी झाले आहेत. पाकिस्तान संघ गुणतालिकेत ८ व्या क्रमांकावर असून सर्व ९ संघांमध्ये पाकिस्तानचे सर्वात कमी १६ गुण आहेत. बांगलादेश संघाचेही ३ गुण वजा करण्यात आले आहे.

या सामन्यात पाकिस्तान संघाने बांगलादेशसमोर केवळ ३० धावांचे लक्ष्य ठेवले होते. बांगलादेशचा हा पाकिस्तानविरुद्धचा हा पहिला कसोटी विजय ठरला. ◀(वृत्तसंस्था)

ऑस्ट्रेलियातील रियानन इफलँड येथे महिलांच्या रेड बुल क्लिफ डायव्हिंग जागतिक मालिका स्पर्धेत अंतिम फेरीत डायव्हिंग करताना महिला स्पर्धक

▪ रणजी संभाव्य संघ सामना

महाराष्ट्र विरुद्ध विदर्भ दुसरा सराव सामना अनिर्णित

- **विदर्भाच्या पहिल्या डावात ८ बाद २३२ धावा**
- **यश राठोडचे दमदार अर्धशतक तर**
- **हितेश वाळुंजचे ४ बळी**

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-

येथील इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर सुरू असलेला महाराष्ट्र विरुद्ध विदर्भ रणजी संभाव्य संघातील दुसरा सराव साम ना आज अनिर्णीत अवस्थेत संपला. कालच्या २ बाद ५४ वरून विदर्भाने आपला डाव पुढे सुरू केला आणि नाबाद जोडीतील मंदार महाले यास आहे. धावसंख्येवर रजनीश गुरबानीने त्रिफळाचित केले.

हितेश वाळुंज

यश राठोड

त्यानंतर आलेला कर्णधार अक्षय वाडकरने यश राठोड सोबत १०४ धावांची भागीदारी केली व त्यात १४४ चेंडू मध्ये यशने ५० धावा पूर्ण केल्या. कर्णधार अक्षय अर्धशतकाच्या उंबरठ्यावर असताना त्याला फिरकी गोलंदाज हितेशने स्वतच्या गोलंदाजीवर टिपले. तत्पूर्वी हितेशनेच यश राठोडला ८० धावांवर माघारी धाडले. नंतर आलेला यश कदम (३२) शेवटपर्यंत नाबाद राहिला. सिद्धेश वाठला (११) सिद्धेश वीरने टिपले तर नचिकेत भुटे (१४) आणि पार्थ रेखाडे (0) यांना हितेशने लागोपाठ बाद करत सामन्यात ४ बळी मिळवले. तिसऱ्या दिवशी विदर्भाने ९२ षटके खेळत ८ बाद २३२ धावा केले तेंव्हा खेळ थांबविला गेला तेंव्हा हर्ष दुबे ४वर नाबाद राहिला. महाराष्ट्रकडून मुकेश चौधरी, रजनीश गुरबानी, रामकृष्ण घोष व सिद्धेश वीर यांनी प्रत्येकी एक बळी मिळविला.

सामन्यात बीसीसीआयचे पंच गणेश चरहाटे व अनिश सहस्त्रबुद्धे यांनी तर गुणलेखक म्हणून प्रसाद शावंतुलने काम पाहिले. शेवटच्या दिवशी जेवणाच्या नंतर थोड्यावेळाने खूप जोराचा पाऊस झाला तरी देखील सोलापूर जिल्हा क्रिकेट संघटनेचे संयुक्त सचिव चंद्रकांत रेंबरसु यांच्या मार्गदर्शनात तसेच मैदानावर देखभाल करणाऱ्या संघटनेचे विविध पदाधिकारी तसेच ग्राउंड्समन यांच्या प्रयासाने थोड्याच वेळात पुन्हा खेळ सुरू झाला. यापूर्वीचा पहिला सामना महाराष्ट्राने जिंकला होता.

(शब्दांकन : मिलींद गोरे)

रवींद्र चव्हाण, श्रीधर गायकवाड, नेताजी पवार यांना क्रीडाशिक्षक पुरस्कार प्रदान

सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-

स्पोर्ट्स असोसिएशन ऑफ इंडिया मान्यताप्राप्त शिवछत्रपती वर्कर्स स्पोर्ट्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्राच्या वतीने येथील तीन क्रीडाशिक्षकांना आदर्श क्रीडाशिक्षक महाराष्ट्र गौरव पुरस्काराने नाशिक येथे गौरविण्यात आले. रवींद्र चव्हाण (आयडियल इंग्लिश मीडियम स्कूल), नेताजी पवार (भारती विद्यापीठ विद्यालय व जुनिअर कॉलेज) व श्रीधर गायकवाड (सुयश गुरुकुल) याल क्रीडाशिक्षकांना आमदार सीमाताई हिरे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करून गौरवण्यात आले. याप्रसंगी शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त राजेंद्र निंबाळते, पोलीस उपनिरीक्षक गणेश न्याहाळदे, भाजपा महानगर प्रमुख प्रशांत जाधव, वर्कर्स स्पोर्ट्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे आयोजक उत्तम उघडे, नगरसेविका पुष्पा अवार्ड, नगरसेवक दिनकर पाटील आदी उपस्थित होते.

पुणे, नाशिक व यवतमाळ उपउपांत्य फेरीत

● राज्यस्तरीय पुरुष सॉफ्टबॉल स्पर्धा

सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-

सोलापूर मनपा जिल्हा सॉफ्टबॉल असोसिएशन व लोकमंगल कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने व महाराष्ट्र राज्य सॉफ्टबॉल असोसिएशन यांच्या मान्यतेने ३०व्या पुरुष गटाच्या सीनियर राज्य सॉफ्टबॉल अजिंक्यपद स्पर्धेत दुसऱ्या दिवशी पुणे मनपा, यवतमाळ, नासिक यांनी उपउपांत्य फेरीत प्रवेश केला.

या प्रसंगी महाराष्ट्र राज्य सॉफ्टबॉल संघटनेचे सहसचिव डॉ. सुरजसिंग येवतीकर, सहसचिव गोकुळ तांदळे, उपाध्यक्ष डी.डी. पाटील, सहसचिव प्रा.रमाकांत बनसोडे, विकास येवतीकर, आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक किशोर चौधरी, प्रसन्नजीत बनसोडे, पंचप्रमुख मुकुंल देशपांडे हे उपस्थित होते.

या स्पर्धेसाठी पंच म्हणून सुजय कल्पेकर (अहमदनगर), विकास वानखेडे, सुयोग कल्पेकर, अनुराग सुरतमे (अकोला), अरुण श्रीखंडे (जळगाव), गणेश बेटूदे, सचिन बोर्डे (छत्रपती संभाजीनगर), प्रवीण गडाख (अहमदनगर), मंगेश इंगोले, निखिल कडू (अमरावती) हे काम पाहत आहेत. या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सोलापूर मनपा जिल्हा संघटनेचे सचिव प्रा.संतोष खेंडे, संभाजी

कोकाटे, गंगाराम घोडके, मारुती घोडके, प्रशांत राणे, प्रशांत कदम, श्रीधर गायकवाड, प्रबुद्ध चिंचोलीकर, वसीम शेख, रवींद्र चव्हाण, संतोष पाटील, समर्थ आहेरवाडी परिश्रम घेत आहेत.

संक्षिप्त वृत्त

पंचायत समितीस्तरावर तक्रार निवारण दिन सुरू करा; ग्राहक पंचायतीची मागणी

पंढरपूर, दि. २६ ऑगस्ट-

सोलापूर जिल्ह्यात पंचायत समितीस्तरावरील तक्रार निवारण दिन सुरू करण्यात यावा अशी मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे केली असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी दिली. ग्रामपंचायत स्तरावर नागरिकांना अनेक समस्यांना, अडचणींना तोंड द्यावे लागते.त्या ठिकाणी न सुटणाऱ्या प्रश्नांची सोडवणूक पंचायत समितीस्तरावर व्हावी, तक्रार निवारण व्हावे म्हणून शासनाने तशी यंत्रणा निर्माण केलेली आहे. ग्रामीण विकास विभागाने परिपत्रक क्र. मविसे १०२०/प्रक्र ४१/२०२०आस्था-३दि ३ मार्च २०२० अन्वये प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी गटविकास अधिकारी यांनी पंचायत समितीस्तरावर सभेचे आयोजन करण्यात यावे व तक्रारींचे निवारण करण्यात यावे असे आदेश दिलेले आहेत तथापि याची अंम लबजावणी जिल्ह्यात कोठेही होत असल्याचे निदर्शनास येत नाही. त्यामुळे नागरिकांना थेट जिल्ह्याच्या ठिकाणी धाव घ्यावी लागते. ही बाब लक्षात आल्याने अखिल भारतीय ग्राहक पंचायतीने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पत्र व्यवहार केला त्यानुसार पंचायत समिती स्तरावरील तक्रार निवारण दिन घ्यावा असे आदेश त्यांनी दिलेले आहेत. या आदेशाची अंमलबजावणी गांभीर्याने होईल अशी अपेक्षा प्रांत कोषाध्यक्ष विनोद भरते,सदस्य सुभाष सरदेशमुख, जिल्हा संघटक दीपक इरकल, जिल्हा सचिव सुहास निकते, महिला विभाग प्रमुख माधुरी परदेशी, सदस्य अण्णा ऐतवाडकर, पांडुरंग अल्लापूरकर, तालुकाध्यक्ष विनय उपाध्ये, उपाध्यक्ष नंदकुमार देशपांडे, संघटक महेश भोसले, सचिव धनंजय पंधे यांनी व्यक्त केली आहे.

आमदार सचिन कल्याणशेट्टींच्या पुढाकारातून वळसंगला थ्री फेज फिडर

वळसंग, दि. २६ ऑगस्ट-

वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथे पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या प्रयत्नातून थ्री फेज फिडर मंजूर झाले. थ्रीज फेज फेडरअभावी आचेगाव रस्त्यावरील भागातील नागरिकांना अनियमितपणे म्हणजे रात्री किंवा दिवसा असा पाणीपुरवठा होत होता. थ्री फेज विद्युतपुरवठा कधी असतो, तेव्हा पाणीपुरवठा केला जात होता. यामुळे त्रास होत होता. ही अडचण लक्षात घेऊन आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी थ्री फेज फिडर मंजूर केले. यामुळे आता नियमित पाणीपुरवठा होण्यास मदत होणार आहे. माजी सरपंच श्रीशैल दुधगी व ग्राम पंचायत सदस्य जाई सिद्धाराम वाघमारे यांनी वेळोवेळी पाठपुरावा केला. या फेडरमुळे वळसंग गावातील राहिलेल्या भागांना सुद्धा दिवसा पाणीपुरवठा होणार आहे. संपूर्ण गावाला २४ तास थ्री फेज फिडर जिल्हा नियोजन समिती योजनेंतर्गत गुंडद विहीर (गुंडद भावी) यासाठी मंजुरी मिळाली आहे. गावातील नागरिकांची काळजी घेत आमदारांनी मंजुरी दिल्याबद्दल तसेच ग्रामपंचायतीचे सर्व पदाधिकारी सहकार्य केल्याचे सिद्धाराम वाघमारे यांनी सांगितले.

भावसार समाज महिला मंडळातर्फे विजयपुरात गोकुळाष्टमी साजरी

विजयपूर, दि. २६ ऑगस्ट-

भावसार क्षत्रिय समाज महिला मंडळाच्या वतीने सराफ बाजार येथील समाज भवनात गोकुळाष्टमी उत्साहात साजरी करण्यात आली. कृष्ण भजन, भगवान श्रीकृष्णाच्या पाळणा पूजन व नामकरण करण्यात आले. राधाच्या भूमिकेत भावना मयूर कर्णे, आराध्या अरविंद तेलकर, भार्गवी मयूर कर्णे, शुभ शुभम हिबारे, अनन्य नागेश बळमकर, रितेश राहुल सुलाखे यांनी सर्वांना मंत्रमुग्ध करीत वृंदावनाचे वातावरण निर्माण केले होते. महिला मंडळाच्या अध्यक्षा पद्माताई इजंतकर, सेक्रेटरी लता झिंगाडे, निर्मला सुलाखे, शैला महिंद्रकर, बिना नवले, नंदा पुकळे, राजश्री हिरासकर, लक्ष्मी तेलकर, रूपा हिबारे व इतर उपस्थित होते.

जिल्हाध्यक्षपदी महादेव जंबगी यांची निवड

सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-

असोसिएशन ऑफ स्मॉल अँड मीडियम न्युजपेपर एडिटर्स संघटनेच्या सोलापूर जिल्हाध्यक्षपदी महादेव रामा जंबगी यांची निवड करण्यात आली. राष्ट्रीय अध्यक्ष उत्तमराव वाघमोडे, सचिव ईश्वरसिंग सेंगर व कार्याध्यक्ष योगेश तुरेराव यांच्या हस्ते निवडीचे पत्र देण्यात आले. परळी वैजनाथ येथे झालेल्या राष्ट्रीय कार्यकारणीच्या बैठकीत ही निवड करण्यात आली. यावेळी राज्याध्यक्ष संतोष धरमकर, राष्ट्रीय संघटक अनिल शिराळकर, राज्य उपाध्यक्ष भगवान परळीकर, उपाध्यक्ष मोहन राठोड, विभागीय अध्यक्ष औदुंबर ढावरे, महिला अध्यक्ष डॉ. भारती मुरकुटे, नागेश कलाल, नागेश तुरेराव, रमाकांत साळुंखे, जिल्हा उपाध्यक्ष परमेश्वर आवताडे, अमित लब्बा आदी सदस्य उपस्थित होते.

खतरनाक खलनायक मराठीत दिसणार

सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-

चित्रपटामध्ये नायकाप्रमाणेच खलनायकालाही तितकेच महत्त्व आहे.आगामी 'फौजी' या मराठी चित्रपटात हिंदीतील शाहबाज खान आणि टिनू वर्मा या दोन सशक्त अभिनेत्यांची झलक आपल्याला खलनायकाच्या रुपात दिसणार आहे.हिंदी चित्रपटांचा पडदा गाजविल्यानंतर आता मराठी चित्रपटातही ते आपला खलनायकी अवतार दाखविण्यास सज्ज झाले आहेत.मातृपितृ फिल्म्स् प्रस्तुत घनशाम विष्णुपंत येडे निर्मित- लिखित-दिग्दर्शित 'फौजी' हा मराठी चित्रपट येत्या ३० ऑगस्टला चित्रपटगृहात दाखल होत आहे.'फ़ाइट मास्टर' म्हणून टिनू वर्मा यांची हिंदी चित्रपटसृष्टीत स्वतंत्र ओळख आहे.शाहबाज खान यांनी छोट्या आणि मोठ्या पडद्यावर अनेक लोकप्रिय खलनायकी भूमिका साकारल्या आहेत.

नदी काठावरील कुटुंबांचे स्थलांतर सुरु

● स्पीकरद्वारे नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना | धोक्याच्या परिसराची प्रशासनाकडून पाहणी

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि.२६ ऑगस्ट-

उजनी व वीर धरण पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणात पर्जन्यवृष्टी झाल्याने भीमा नदीमध्ये अंदाजे एक लाख वीस हजार क्युसेक पाणी सोडण्यात आलेले आहे. चंद्रभागा नदीपात्रात वाढणारा पाण्याचा विसर्ग लक्षात घेता नदीकडच्या लोकांनी सतर्क राहावे म्हणून स्पीकरद्वारे वारंवार सूचना देण्यात येत आहेत. धोका टाळण्यासाठी पंढरपुरातील नागरिकांचे स्थलांतर सुरु झाले आहे.

सोमवारी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद व प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार सचिन लंगुटे, उपमुख्याधिकारी ॲड. सुनिल वाळूजकर, आरोग्य अधिकारी शरद वाघमारे व नागनाथ तोडकर नगर अभियंता नेताजी पवार, पाणीपुरवठा अभियंता राजकुमार काळे यांनी व्यास नारायण झोपडपट्टी व अंबाबाई पटांगण झोपडपट्टी येथे समक्ष पाहणी करून पूर परिस्थिती पाहता नागरिकांनी त्वरित आपले कुटुंब सुरक्षित राहण्याच्या दृष्टीने त्वरित स्थलांतरित करावे अशी सूचना देण्यात आल्या. नदीपात्रालगतच्या व्यास नारायण झोपडपट्टी व अंबाबाई पटांगण झोपडपट्टी येथील २४ झोपडपट्टी धारकांना स्थलांतर करण्यासंबंधी नोटीस बजावण्यात आल्या आहेत व आज ७ कुटुंबांना स्थलांतरित करण्यात आले आहे. उर्वरित कुटुंबांना स्थलांतरित करण्याचे काम चालू आहे. या पूरग्रस्त झोपडपट्टीमधील अंदाजे ७५ कुटुंब राहू शकतील अशा रायगड दिंडी समाज मठ, उपजिल्हा रुग्णालयासमोर येथे त्यांची राहण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच लोकमान्य विद्यालय जुन्या कोर्टासमोर येथेही व्यवस्था करण्यात आलेली आहे. स्पीकरद्वारे सर्वांना पुराची वाढती पातळी लक्षात घेता नागरिकांनी स्थलांतरित व्हावे म्हणून वारंवार सूचना देण्यात येत आहेत.

▸ अधिकारीही सतर्क : प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याधिकारी डॉ. प्रशांत जाधव, तहसीलदार सचिन लंगुटे, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुनराव भोसले, उपमुख्याधिकारी ॲड. सुनील वाळूजकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके, माजी नगराध्यक्ष लक्ष्मणराव शिरसट, माजी नगरसेवक विक्रम शिरसट, आरोग्य अधिकारी शरद वाघमारे, नागनाथ तोडकर, विद्युत अभियंता राजकुमार सपाटे, अभिलाषा नेरे, ऋषिकेश अधटराव या ठिकाणी परिस्थितीचा अंदाज घेऊन काम पाहत आहेत.

▸ वाहनांची व्यवस्था : या ठिकाणी आपत्कालीन परिस्थिती उद्‌भवू नये म्हणून अग्निशमन वाहन, एक बोट ठेवण्यात आली आहे. तसेच ४ ट्रॅक्टर, १ ट्रकद्वारे नागरिकांचे सामान नेण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. तसेच नगर परिषदेची अधिकारी व कर्मचाऱ्यांची सर्व टीम त्या ठिकाणी कार्यरत आहे.

दक्षिणमधून विधानसभा लढविणार : अप्पासाहेब पाटील

● भाजपाची उमेदवारी मिळविण्यासाठी प्रयत्न

तभा वृत्तसेवा,
मंद्रुप, दि. २६ ऑगस्ट -

दक्षिण तालुक्यातील भूमि पुत्र म्हणून शेतकरी व जनतेच्या कल्याणासाठी दक्षिणची विधानसभा भाजपाकडून लढविणार असल्याचे बाजार समितीचे माजी संचालक अप्पासाहेब पाटील वडकबाळकर यांनी सांगितले.

पाटील म्हणाले की, २५ वर्षांपासून भाजपा कार्यकर्ता व पदाधिकारी म्हणून दक्षिण तालुक्यात पक्षवाढीसाठी कार्य केला आहे. प्रत्येक निवडणुकीत पक्षाच्या उमेदवाराचा प्रचार केला आहे. त्यामुळे दांडगा जनसंपर्क आहे. शेतकरी व जनतेचे प्रश्न सोडवून भाजपा गावागावात पोहोचविण्यासाठी प्रयत्न केला आहे. दक्षिणमधील सीना भीमा संघर्ष समितीच्या वतीने दोन्ही नद्यांमध्ये व कालव्यात पाणी सोडण्यासाठी अनेक वेळा रस्त्यावर उतरून आंदोलन केला आहे. डीसीसी बँक निवडणुकीसाठी सहकार क्षेत्रात अनेक सोसायट्या भाजपाच्या ताब्यात आणली आहेत. शिवाय तालुक्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी, वीज बिलमाफी व नुकसान भरपाई मिळवून दिला आहे. दहा वर्षांपासून बाजार समिती, जिल्हा परिषद व सोसायटीच्या माध्यमातून शेतकऱ्यांची सेवा केली आहे. शिवाय तालुक्यातील आरोग्य, शैक्षणिक व सामाजिक कार्यात अग्रेसर राहून प्रश्न सोडविला आहे. भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांच्या संपर्कात असून निष्ठावान कार्यकर्ता म्हणून भाजपाकडून विधानसभेची उमेदवारी मिळण्याची अपेक्षा आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे उमेदवारीची मागणी केली आहे. पक्षनेतृत्व तालुक्यातील पक्षावरील नाराजी टाळण्यासाठी नवीन चेहरा म्हणून विधानसभा उमेदवारीची संधी देण्याची अपेक्षा आहे. तालुक्यातील सोसायटी चेअरमन व सरपंच यांच्याकडून निवडणूक लढविण्याची मागणी होत असल्याने कार्यकर्त्यांना बळ देण्यासाठी भाजपाकडून विधानसभा लढविणार असल्याचे पाटील यांनी सांगितले.

▸ भूमिपुत्र म्हणून संधी द्या : पंधरा वर्षांपासून तालुक्यावर उपरा उमेदवार लादला जात आहे. त्यामुळे तालुक्यातील कार्यकर्त्यांमध्ये नाराजी आहे. तालुक्याच्या प्रश्नांची जाण असून भूमिपुत्र म्हणून विधानसभा लढविणार आहे. पंचवीस वर्षांपासून पक्षासाठी केलेल्या कामाची पोहोच म्हणून पक्षाने तालुक्याच्या विकासासाठी झटणाऱ्या निष्ठावान कार्यकर्त्याला संधी द्यावे.

▸ लोकसंवाद सुरू करणार : भूमिपुत्र म्हणून शेतकरी व जनतेशी प्रत्यक्ष संपर्क आहे. लोकप्रतिनिधीवर नाराज असणाऱ्या व कामे होत नसलेल्या कार्यकर्त्यांसाठी जुळे सोलापुरात कार्यालय सुरू करून दररोज लोकसंवादमधून जनतेचे प्रश्न निकाली काढणार आहे.

श्रावणमास प्रवचनमाला-२१

चिंतनाने चिंतनाचा नाश होतो

● डॉ. जयवंत बोधले महाराज ●

तभा वृत्तसेवा,
बार्शी, दि. २६ ऑगस्ट-

कृष्ण जन्माष्टमीच्या पूर्व संध्येला डॉ. श्रीगुरु जयवंत महाराज बोधले आपल्या अमोघ वाणीतून संत एकनाथ महाराजांचे चरित्र निरुपण करतात की, भक्तीस्वरुप झालेले नाथ महाराज भागवतामध्ये म्हणतात-

काया वाचा आणि मन।
दृढ आवरावे आपण।
तुटी न द्यावे अनुसंधान।
सदा सावधान निजरुपी।।
काया आणि वाचा यांना
आवरण्यासाठी 'मन'

आहे. त्या मनाला आपण आवरावे. म्हणजे आपण आपल्याला आवरावं , असे नाथांचे चिंतन आहे. मनाला आवरण्यासाठी सिध्दावस्था प्राप्त व्हावी लागते. असे डॉ. श्रीगुरु जयवंत महाराज मार्गदर्शन करतात.

'समाधान' हा शब्द तसा लौकिकातला नाही. कारण, लौकिकता ही अस्थिर आहे. आणि 'समाधान' हा चित्ताचा धर्म आहे. तसेच, मनाचा धर्म आहे. समाधान हे मनाचे स्वरुप आहे. मन हे मन म्हणून जिथं राहत नाही; ती अद्वैताची अवस्था असते. जिथं अद्वैत आहे, तिथं समाधान हे असतेच असे डॉ.श्रीगुरु जयवंत महाराजांनी सांगितले. चिंतनाने चिंतनाचा नाश होतो. भरकटत चाललेल्या मनाला आवर घालण्याचे मन चिंतन करीत असते. सर्व कार्य हाती ठेवण्याचे कार्य चिंतन करीत असते. सायुज्य नावाचा मोक्ष सुध्दा जिथं चिंतन चालू आहे, तिथे शोध घेत राहतो. म्हणून, चिंतन हे मनाचे चिंतन घालवते ; मनाला आवरते आणि मोक्षाकडे घेऊन जाते.

चिंतनै नासतसै चिंता।
चिंतनै सर्व कार्य जै हाता।
चिंतनै भौक्ष सायुज्यता।
घर शौधितसै।।

प्राणीमात्राला सुध्दा समाधान हे चिंतनातून मिळत असते. चिंतनाने आधिव्याधी तुटून जातात. म्हणजेच, मनुष्याच्या शारिरीक आणि मानसिक रोगावरचे 'चिंतन' हे औषधच आहे. इतका महिमा नाथराय सांगतात.

एकदा पैठणला एक ब्राह्मण आला. त्याच्या मुलीच्या लग्नासाठी त्याला दोनशे रुपयांची गरज होती. सुरुवातीलाच त्याने पैठणमधील कुचरवट्ट्यावर चारचौघांना विनंती केली. तेव्हा, त्या उपद्रवी माणसांनी त्या ब्राह्मणाच्या विवशतेचा फायदा घेऊन अट घातली. तू नाथांच्या वाड्यावर जाऊन नाथांना राग येईल असे कृत्य कर. म्हणजे आम्ही तूला २०० रुपये देतो. त्या ब्राह्मणाने नदी पात्रातील चिखलात उड्या मारुन चिखलाने माखलेल्या कपड्यासह नाथांकडे आला. नाथबाबा पांडुरंगाची पूजा करत होते ; तो त्यांच्या मांडीवरच जाऊन बसला. परंतु, नाथबाबा लडिवाळपणे मायेने ब्राह्मणाच्या डोक्यावरुन हात फिरवत म्हणतात, बरं झालं, हरिपंडीत मोठा झाल्याने किती दिवस झालं माझ्या मांडीवर बसला नाही. त्याला स्नानासाठी पाणी देवून कपडे दिले. त्या ब्राह्मणास गिरिजाबाईंना जेवू घालण्यास सांगितले. गिरिजाबाई ताट घेवून त्याच्यापुढे वाकून ठेवतात तेवढ्यात त्याने गिरिजाबाईंच्या पाठीवर उडी मारुन बसला. नाथबाबा हाक मारुन सांगतात, अगं, आपला हरिपंडीत पाठीवर बसलाय बघं..... पडेलं तो....! धर त्याला....!! शेवटी त्या ब्राह्मणाने नाथ महाराजांच्या पाया पडून सर्व हकीकत सांगितली. नाथबाबांनी त्याला २०० रुपये दिले. खरोखरीसच अद्भूत चरित्र आहे नाथ महाराजांचे....! म्हणूनच संत एकनाथ हे शांतीब्रह्म होत. पुढील चरित्र चिंतन उद्याच्या दिवशी होईल. प्रवचन श्रवण करण्यासाठी डोंबिवली येथील सद्गुरु बोधले महाराज परंपरेवर प्रेम करणारे ; महाराष्ट्रात प्रथमच इंग्रजी भाषेतून कीर्तनाचा प्रयोग ज्यांनी केला असे आदरणीय जयेश महाराज भाग्यवंत, गुरुबंधू प्रितेशदादा आले होते.

अल्पवयीन मुलीचा विनयभंग; दुकानदारासह एकावर गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा,
वैराग, दि. २६ ऑगस्ट-

चॉकलेट आणि पैशाचे आमिष दाखवून अकरा वर्षांच्या शाळकरी मुलीचा त्यांच्याच गावातील दुकानदार आणि त्याच्या मित्राने विनयभंग केल्याची घटना बार्शी तालुक्यातील एका गावामध्ये घडली आहे. याप्रकरणी वैराग पोलीस ठाण्यामध्ये दोघांच्या विरोधात बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियमानुसार आणि अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियमप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पीडित अल्पवयीन मुलीचे आई-वडील रोजंदारीसाठी दररोज घराबाहेर पडतात. त्यामुळे मुले घरामध्ये एकटीच असतात दरम्यान दुकानातील काही साहित्य लागले तर गावातच जवळ असणाऱ्या दुकानांमध्ये जाऊन खरेदी करतात. याच दुकानातील दुकानदार आणि त्याचा साथीदार यांनी पीडित मुलीस दुकानात येताच तिच्या हाताला धरून ज्यादा खाऊ,चॉकलेट आणि पैसे देत होते. ही बाब पीडित मुलीच्या आईच्या लक्षात आल्यानंतर तिने दुकानात जाऊन माझ्या मुलीचे नव्हे तर इतर कोणाच्याही मुलीस खाण्यापिण्याच्या वस्तू किंवा पैसे देऊ नका म्हणून सांगितले होते. दरम्यान २५ ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास मोल मोजरी करून आलेल्या आई समोर पीडित मुलगी रडत आली तिने याबाबतचे कारण विचारले असता पीडित मुलीने दोन रुपयांची चॉकलेट आणण्यासाठी दुकानात गेल्यानंतर दुकानदाराने डावा हात धरून थांबून घेतले आणि पैसे देऊ लागले.

यावेळी दुकानात बसलेले दुसरे संशयित आरोपी यांनी तुला काय पैसे लागतील ते मी देत जाईन तू दत्तमंदिराकडे येत जा असे म्हणत पाचशे रुपये दिले आणि गळ्यातील मण्यांची माळ धरून कुणालाही याबाबतचे सांगू नकोस म्हणून पीडितेस शपथ दिली. तुला काही कमी पडू देणार नाही. आयुष्यभर तुला सांभाळतो यापुढेही रविवारी सुट्टी असली की दुकानात येत जा असे म्हणून तिला लज्जा निर्माण होईल असे कृत्य केले. ही घटना पिढीतेनी आईस सांगितल्यानंतर आई-वडील दोघांनी विचार करून वैराग पोलीस ठाण्यामध्ये दोघांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. सदर तपास पोलीस उपविभागीय अधिकारी जालिंदर नालकुल ही करीत आहेत.



जनजागृती करण्याची मागणी

शहरासह ग्रामीण भागामध्ये अल्पवयीन मुली, तरुणी विकृत मनोवृत्तीच्या माणसांचे भक्ष्य बनत आहेत. ही वृत्ती ठेचून काढावी. मुली, तरुणी आणि महिलांमध्ये जनजागृती करण्यासाठी पोलिसांनी पुढाकार घ्यावा, अशी मागणी होत आहे.

आमिष पैशांच्या पावसाचे; घालवून बसला १३ लाख

● श्रीपूर सेक्शन डी. १९ मधील प्रकार; तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा,
श्रीपूर, दि. २६ ऑगस्ट-

आज खरे तर सोशल मीडीयामुळे समाज घडत असणाऱ्या चांगल्या वाईट घटनांबरोबर फसवणुकीच्या घटना त्वरित समजतात यातून पोलीस यंत्रणा व अन्य माध्यमातून सावधानता बाळगणेस सांगितली जाते, असे असतानाही दुनिया झुकती है झुकना वाला चाहिये या उक्तीप्रमाणे आमिषाला बळी पडणाऱ्यांची संख्या कमी नाही याचा प्रत्यय वेळोवेळी येतो. असाच प्रकार श्रीपूर सेक्शन डी. १९ येथे घडल्याचे पाहायला मिळाले. येथे वास्तव्यास असणाऱ्या सतीश कृष्णा मांडवे यांनी पैशाचा पाऊस पडण्याला भुलून आपली १३ लाखाची फसवणूक करून घेतली.

घोलपवाडी (ता. इंदापूर) येथील उत्तम लक्षण भागवत व त्याचे साथीदार काळू रोहीदास गाडे (रा. जांबूड), श्रीकृष्ण खुडे (रा. बोरगांव, ता. माळशिरस) तसेच दोन अनोळखी पुरुष व एक महिलांनी संगनमताने आम्ही हिमालयातील महाराजांच्या सहाय्याने पैशाचा पाऊस पाडतो यातून तुला कोट्यवधी रुपये मिळून जातील अशी भूल पाडून यासाठी काही विधी करावे लागतात. त्यासाठी वेळोवेळी पैशाची मागणी केली. त्याप्रमाणे पैशांचे घबाड मिळणार या उद्देशाने सतीश मांडवे यांनी सोने गहाण ठेवून, मित्रांकडून उसने पैसे घेऊन काळू रोहिदास गाडे, श्रीकृष्ण खुडे यांच्या साक्षीने उत्तम लक्ष्मण भागवत यास १२ लाख ९८ हजार रु. दिले. यानंतर प्रत्यक्ष पैसे देण्याची वेळ आल्यावर पूजा घालण्याच्या वेळी अघोरी कृत्य करावयास लावणे ते न जमल्यास पूजा वाया गेली. त्यामुळे हिमालयात एक महाराज आहेत, त्यांना बोलावावे लागेल, अशी बतावणी केली.

पोलिसांचा छापा पडण्याची व्यक्त केली भीती

पोलिसांची रेड पडण्याच्या मार्गावर आहे, आज पूजा होणार नाही, अशी कारणे सांगून पैशाचा पाऊस पाडण्यास टाळाटाळ केली. सरत्या शेवटी आपली फसवणूक होत असल्याचे निदर्शनास आल्यावर सतीश मांडवे यांनी वालचंदनगर पोलीस स्टेशन गाठले. त्याप्रमाणे उत्तम भागवत, काळू रोहिदास, श्रीकृष्ण खुडे व अन्य तिघे यांच्याविरुद्ध वालचंदनगर पोलीस ठाण्यात जादूटोणा प्रतिबंधक कायद्याने फसवणुकीचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

नेटवर्कमुळे पीक पाहणीच्या नोंदीपासून शेतकरी वंचित

● ऑफलाईन नोंदी कराव्यात शेतकऱ्यांतून मागणी; विविध योजनांच्या ऑनलाईन कामकाजासाठी एकच सर्व्हर

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि. २६ ऑगस्ट-

ई-पीक पाहणीच्या नोंदी करण्यास एक ऑगस्टपासून सुरुवात झाली आहे. मात्र मोबाईलवरून ॲपच्या माध्यमातून पीक पाहणी नोंदविताना शेतकऱ्यांना अनेक तांत्रिक अडचणी येत आहेत. ग्रामीण भागात अनेक ठिकाणी मोबाईल नेकवर्कची अडचण आहे. मोबाईलला नेटवर्क आले तर सर्व्हर चालत नाही, त्यामुळे भरलेली माहिती अपलोड होत नाही. एकेका नोंदणी साठी दोन तीन दिवस प्रयत्न करूनही माहिती अपलोड होत नाही. त्यामुळे ई-पीक पाहणी नोंदणीस प्रतिसाद मिळत नाही. परिणामी मुदतीत नोंदणी करण्याचे आव्हानच शेतकऱ्यांपुढे असल्याने ऑफलाईन नोंदी घ्याव्यात अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे.

नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास ई-पीक पाहणीची नोंद असताना नुकसान भरपाई अचूक व लवकर मिळण्यासाठी ही नोंद आवश्यक आहे. अनेक शेतकरी स्वतः आपल्या मोबाईलद्वारे पीक पाहणीच्या नोंदी करीत आहेत. परंतु ग्रामीण भागात इंटरनेटमुळे सर्व्हरमध्ये अडचणी येत असल्यामुळे अनेक शेतकरी नोंदी टाळत आहेत. पीक पेरणी अहवालाचा रिअल टाइम क्रॉप डाटा संकलित होण्याच्या दृष्टीने ई-पीक पाहणी महत्त्वाची आहे. पीक पेरणी अहवाल प्रक्रियेत शेतकऱ्यांच्या सक्रिय सहभागामुळे कृषी पतपुरवठा सुलभ होतो. पीकविमा आणि पीक पाहणीचे दावे निकाली काढण्याची प्रक्रिया सुलभ होते. पवर नोंद असल्यास शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यास कोणतीही अडचण येणार नाही. त्यामुळे खातेदारांनी दिलेल्या मुदतीत मोबाईल द्वारे पीक पाहणी करणे गरजेचे आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या विहित मुदतीत पीक पाहणीची नोंद होण्यासाठी ऑफलाईन नोंदी घेण्यात याव्यात अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे.

शेतकऱ्यांना थेट बांधावरून आपल्या शेतात लागवड केलेल्या पिकाची नोंद ॲप च्या माध्यम ातून करावी लागते शासनाच्या योजनां चा लाभ घेण्यासाठी ही नोंद आता बंधनकारक करण्यात आली आहे. गेल्या वर्षात ज्यांनी ही पीक पाहणी केली त्यांनाच नुकसानीचे अनुदान दिले गेले ज्यांनी तेव्हाही ती नोंद केली अशांचीच निवड केलेली यादी गावोगावी लावण्यात आली. ही पीक पाहाणी नसलेले शेतकरी त्यातून वगळण्यात आले होते. त्यामुळे शेतकऱ्यांना आता या पीक पाहणी नोंदीचे महत्त्व कळले आहे. त्यामुळे आता नोंदीसाठी शेतकरी पुढे आला आहे मात्र ही नोंद करणे आवश्यक आहे, यासाठी शेतकरी प्रयत्न करीत आहे. मात्र मोबाईल नेटवर्क नसल्याने अडचणी येत आहेत. ग्रामीण भागात नसलेले मोबाईल नेटवर्क, सर्व्हर डाऊन मोबाईल हाताळण्याची नसलेली क्षमता यामुळे शेतकरी वैतागून गेला आहे. याचा विचार प्रशासनाने करावा, अशी मागणी होत आहे.

▸ योजना अनेक; मात्र सर्व्हर एकच

केंद्र सरकारकडून विविध योजनांच्या ऑनलाईन कामकाजासाठी संपूर्ण राज्यात एकच सर्व्हर देण्यात आले आहे त्या वरून एकाच वेळी लाडकी बहीण महाडीबीटी सह अशा विविध योजनांचे काम चालू करण्यात आले त्यामुळे त्या सर्व्हर वर मोठ्या प्रमाणात लोड आला आहे त्यामुळे पीक पाहणी नोंद करताना शेतकऱ्यांना मोठी अडचणीचे होऊ लागले आहे.

▸ शेतात उभे राहूनही लोकेशन येईना

ई-पीक नोंदीसाठी शेतकरी अनेक दिवसांपासून प्रयत्नशील आहे. त्याची नोंदणी करताना शेतात उभे राहून लाईव्ह लोकेशन द्यावे लागते. शेतकरी त्याच्या शेतात उभा असूनही त्याला तुम्ही तुमच्या लोकेशनपासून दूर आहात असे सांगितले जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांतूनही आश्चर्य व्यक्त होत आहे. ही समस्या तातडीने दूर करावी अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे.

सोलापूर : दैनिक तरुण भारतच्या मुख्य संपादकपदी पदोन्नती झाल्याबद्दल प्रशांत माने यांना शुभेच्छा देताना महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळाचे अध्यक्ष तानाजीराव शिंदे व सहकारी.

बार्टीच्या ७६३ संशोधक विद्यार्थ्यांना १०० टक्के अधिछात्रवृती मंजूर

- विद्यार्थी नेते हर्षवर्धन दवने व पल्लवी गायकवाड यांच्या उपोषणास यश

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था(बार्टी) पुणे च्या बीएनआरएम-२०२२च्या ७६३ संशोधक विद्यार्थ्यांना राज्य मंत्रीमंडळात १०० टक्के आधिछात्रवृती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

विद्यार्थी नेते हर्षवर्धन दवने व पल्लवी गायकवाड यांनी ५ ऑगस्टपासुन राज्य शासनाने २५ जुलै २०२४ रोजी जाहीर केलेली ५० टक्के आधिछात्रवृतीच्या निर्णयाविरोधात बेमुदत आमरण उपोषण सुरु केले होते. तसेच ५०% आधिछात्रवृतीसाठी बार्टीमार्फत ७ ऑगस्ट २०२४ पासून सुरू होणाऱ्या कागदपत्रे पडताळणीवर बहिष्काराची हाक दिली होती. यास विद्यार्थ्यांनी साथ देत बहिष्कार यशस्वी केला. जोपर्यंत निर्णायक बैठकीचे पत्र लिखीत स्वरूपात येणार नाही तोपर्यंत उपोषण मागे घेणार नाही विद्यार्थ्यांच्या या भूमिकेला अखेर २५ रोजी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत उजाळा मिळाला असून बार्टी संशोधक विद्यार्थ्यांना संपूर्ण अधिछात्रवृत्ती मंजूर करण्यात आली आहे. विद्यार्थी नेते हर्षवर्धन दवणे व पल्लवी गायकवाड यांनी चालवलेल्या बेमुदत आमरण उपोषणाला यश प्राप्त झाले आहे.

चौथ्या श्रावणी सोमवारनिमित्त भाविकांनी सिद्धेश्वर मंदिर फुलले

- श्री सिध्देश्वर महाराजांचा जयघोषाने दुमदुमला मंदिर परिसर

तभा वृत्तसेवा
सोलापूर , दि. २६ ऑगस्ट -

एकदा भक्तलिंग हर बोला हर... श्री सिद्धेश्वर महाराज की जय जयघोषात मंदिर परिसर भक्तांनी अक्षरशः फुलून गेले होते. चौथ्या श्रावणी सोमवार निमित्त श्रींचे दर्शन घेण्यासाठी आबालवृद्ध भाविकांनी ग्रामदैवत श्रीसिद्धेश्वर मंदिरात पहाटेपासूनच भाविकांची मांदियाळी होती. यावेळी शिवयोग समाधीस आकर्षक अशी फुलांची सजावट करण्यात आली होती. त्यावर ओम नमः शिवाय लिहिण्यात आले होते. तसेच समाधीवर सौंदर्यपूर्ण मेघडंबरी साकारण्यात आली होती.

सनातन वैदिक हिंदू धर्मामध्ये पवित्र मानल्या जाणाऱ्या श्रावण महिन्यात भगवान शिवाची आराधना केली जाते. त्याच पार्श्वभूमीवर सोलापूर शहराचे ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर महाराज यांना शिवाचे प्रतिरूप मानले जाते. त्यामुळे भाविकांची या संपूर्ण महिन्यात श्रींचे दर्शन घेण्यासाठी मंदिरात गर्दी असते. विशेषत्वाने श्रावणी सोमवारी पहाटेपासूनच महिला भाविकांची मोठी मांदियाळी या ठिकाणी होत असते. चौथ्या श्रावण सोमवार निमित्त मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम आणि विधी संपन्न झाले. सकाळी साडेआठ वाजता श्रींची महाआरती संपन्न झाली. यावेळी मंदिर सभामंडपात श्री सिद्धरामेश्वरांचे रांगोळीच्या माध्यमातून आकर्षक प्रतिमा साकारण्यात आली होती. महिला आणि पुरुष अशा दर्शन रांगेतून भक्तांची मोठी मांदियाळी मंदिर सभागृहात दिसून आली.

ओम नमः शिवाय जप करणे कर्मप्राप्त

यंदा श्रावणामध्ये पाच श्रावणी सोमवार आले आहेत. चौथ्या श्रावणी सोमवारी शिवमुठ जवस महादेवाच्या पिंडीवर वहायची आहे. लाभप्राप्तीसाठी सदरचे शिवमुठ वाहून मुखी ओम नमः शिवाय जप करणे कर्मप्राप्त आहे. अनेक भक्तांचा देवाधिदेव महादेवांवर विश्वास आहे. त्यामुळे पवित्र श्रावण महिन्यात वर्तवैकल्य उपवास करून श्रींना प्रसन्न केले जाते.

- चिदानंद स्वामी, पुरोहित

नवचैतन्य, आत्मिक समाधान मिळते

दर श्रावणी सोमवारी सिद्धरामेश्वर महाराजांचे दर्शन घेण्यासाठी मंदिरात येत असतो. मंदिरात आल्याने एक नवचैतन्य आणि आत्मिक समाधान मिळते. गेल्या अनेक वर्षांपासून आम्ही पवित्र श्रावण सोमवार उपवास करतो आणि श्रींचे दर्शन घेऊन धन्य पावतो.

-धनश्री पट्टे, महिला भाविक

बदलापूर प्रकरणात पॉलिटिकल नराधम कोण?; प्रहारचा संतप्त सवाल

- बदलापूर आणि कोलकाता प्रकरणातील बलात्कान्यांना भर चौकात प्रतिकात्मक फाशी

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. २६ ऑगस्ट -

बदलापूर आणि कोलकाता प्रकणावरून देशभरात संतापाची लाट उसळली आहे. सोलापुरातील प्रहार जनशक्ती पक्षाने दोन्ही आरोपींच्या पुतळ्याला भर चौकात प्रतिकात्मक फाशी देत निषेध केला.

रविवारी सांयकाळी रंगभवन चौकात प्रतिकात्मक फाशी देत बदलापूर घटनेचा निषेध केला. प्रहार पक्षाचे शहर अध्यक्ष अजित कुलकर्णी यांनी बदलापूर मधील शाळेच्या संचालकांवर सडकून टीका केली. बदलापूर घटनेत पॉलिटिकल नराधम आहे, त्या पॉलिटिकल नराधमाला शिक्षा झाली पाहिजे अशी मागणी प्रहारच्या वतीने करण्यात आली. शाळेच्या संचालकाने पोलिसांवर दबाव आणून गुन्हा दाखल करण्यास दिरंगाई केली होती. संबंधित शाळा संचालकांवर देखील गुन्हा दाखल करावा अशी मागणी प्रहारच्यावतीने करण्यात आली. बदलापूर मधील शाळेत लैंगिक अत्याचार करणाऱ्या अक्षय शिंदें व कोलकाता येथील एका महिला डॉक्टरवर अत्याचार करून त्यांची हत्या करणाऱ्या घोष या दोन्ही आरोपींचा प्रतिकात्मक पुतळा तयार करून भर चौकात फाशी देण्यात आली.

तसेच वार्तांकन करणाऱ्या महिला पत्रकारास असभ्य भाषेत बोलणाऱ्या शिंदें गटाचे वामन म्हात्रेचा विरोध प्रहार पक्षाच्या वतीने करण्यात आला. यावेळी प्रहार संघटनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हालचिंचोळी येथील शेत तलावामध्ये १२ वर्षीय बालिकेचा मृत्यू

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. २६ ऑगस्ट -

वळसंग शिवारातील बसप्पा चांगटे यांच्या शेतातील तलावामध्ये १२ वर्षीय मुलीचा पाण्यात बुडून मृत्यू झाला.

ही घटना सोमवारी सकाळी उघडकीस आली. सोनाली रामचंद्र वाघमोडे (वय १२, रा. हालचिंचोळी, ता. अक्कलकोट) असे मृत झालेल्या बालिकेचे नाव आहे. सोमवारी सकाळी ९च्या सुमारास वळसंग शिवारातील शेती गट नं. ३५३ चे मालक बसप्पा रामचंद्र चांगटे यांच्या शेतातील शेत तलावातील पाण्यामध्ये सोनाली वाघमोडे ही बालिका बेशुध्दावस्थेत मिळून आली. त्यामुळे तिला उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तीचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉ. पूजा लवटे यांनी घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळाच्या उत्सव अध्यक्षपदी महिंद्रकर

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. २६ ऑगस्ट -

सार्वजनिक मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळाच्या उत्सव अध्यक्षपदी विनायक महिंद्रकर यांची निवड करण्यात आली.

मंडळाची सर्वसाधारण सभा शिवानुभव मंगल कार्यालय येथे पार पडली. अध्यक्षस्थानी ट्रस्टी अध्यक्ष बसवराज येरटे होते. या बैठकीत कार्यवाहपदी आकाश हारकुड व मल्लिनाथ सोलापुरे यांची निवड झाली. बैठकीस विश्वस्त सुनिल रसाळे, दास शेळके, नरसिंग मेंगजी, संजय शिंदे, श्रीशैल बनशेट्टी, नंदकुमार उपाध्ये, बसवराज येरटे, सोमनाथ मेंडके, मल्लिनाथ याळगी आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन विजय पुकाळे यांनी केले. गौरव जक्कापुरे यांनी आभार मानले.

अन्य पदाधिकारी याप्रमाणे : उपाध्यक्ष - विजयकुमार बिराजदार, महेश मेंगजी, किसन गर्जे, विरेश सक्करगी, चक्रपाणी गज्जम, विश्वनाथ गोयल, चिन्मय पाटील. कार्याध्यक्ष - सोमनाथ शरणार्थी. सहकार्यवाह - प्रविण कोनापूरे, अनिल शहापूरकर. कोषाध्यक्ष - शिवानंद सावळगी. कार्यालय प्रमुख - दिलीप पाटील. सहकार्यालयप्रमुख - आनंद तालीकोटी, संतोष खंडेराव. प्रसिद्धीप्रमुख - शिवानंद येरटे. सांस्कृतिक विभाग प्रमुख - रवींद्र आमणे, अशीष उपाध्ये. मिरवणूक प्रमुख - भारत गोटे, संतोष आकुडे, गिरीश शहाणे, गोवर्धन दायमा, विनायक घंटे. विशेष महिला प्रतिनिधी - श्रीमती सुमन मुदलियार, हेमा चिंचोळकर, कायदेशीर सल्लागार - मंगलाताई जोशी चिंचोळकर, बसवराज हिंगमिरे. प्रमुख सल्लागार - लता फुटाणे. हिशोब तपासणीस - जी. जी. बोरगांवकर

स्त्री शक्तीचे जागरण केल्यास समाज परिवर्तन निश्चित होणार

- राष्ट्रसेविका समितीच्या अखिल भारतीय सहकार्यवाहीका अलका इनामदार यांचे प्रतिपादन

मातृशक्ती पुरस्काराचे थाटात झाले वितरण

तभा वृत्तसेवा
सोलापूर , दि. २६ ऑगस्ट -

वेदकाळापासून भारतीय स्त्रिया सक्षम आणि साक्षर आहेत. परंतु गेल्या काही वर्षांमध्ये स्त्री शक्ती सुप्त झाली आहे. स्त्रीशक्तीचे पुन्हा एकदा जागरण झाल्यास समाज परिवर्तन निश्चित होईल, असा विश्वास राष्ट्रसेविका समितीच्या अखिल भारतीय सहकार्यवाहिका अलका इनामदार यांनी व्यक्त केला. श्री श्री श्री सद्गुरु बसवारूढ महास्वामीजी मठ ट्रस्टतर्फे देण्यात येणारा मातृशक्ती पुरस्कार इनामदार यांना प्रदान करण्यात आला. त्यावेळी त्या बोलत होत्या.

श्री श्री श्री सद्गुरु बसवारूढ महास्वामीजी मठात सोमवारी मठाधिपती श्री. ब्र. श्री. शिवपुत्र महास्वामीजी यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. याप्रसंगी व्यासपीठावर प. पू. जडेसिद्धेश्वर महास्वामीजी, सुधीर इनामदार, मातोश्री प्रांजलम्मा शिवपुत्र आप्पाजी, ज्येष्ठ समाजसेवक ब्रिजमोहन फोफलिया, मठाचे विश्वस्त सतीश कुलकर्णी उपस्थित होते. यावेळी नेपाळ येथील रुद्राक्षांची माळ, मानपत्र, मानाची शाल, पुष्पहार घालून अलका आणि सुधीर इनामदार यांचा सन्मान करण्यात आला.

इनामदार म्हणाल्या, जेव्हा जेव्हा समाज गलितगात्र झाला, तेव्हा स्त्रियांनी खंबीरपणे उभे राहून समाजाचे रक्षण केल्याची कित्येक उदाहरणे आहेत. आधुनिक काळात स्त्रियांनी बौद्धिक युद्धात सहभागी होण्याची गरज आहे. समाज परिवर्तनासाठी स्त्रियांनी पुढाकार घेतला तर समाजातील दुष्पवृत्तीचा नाश होऊ शकतो. हिंदुत्वाचा विजय जगभरात होण्यासाठी महिलांचे योगदान आवश्यक आहे. त्याकरिता राष्ट्रसेविका समिती कार्यरत आहे, असेही अलका इनामदार यांनी सांगितले. मठाचे विश्वस्त सतीश कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. सुवर्णा कल्याणशेट्टी यांनी सूत्रसंचालन तर गिरीश गोसकी यांनी आभार प्रदर्शन केले.

ब्रह्मवृंदांच्या वेदघोषात अतिरुद्र स्वाहाकारास प्रारंभ

- श्री श्री श्री सद्गुरु बसवारूढ महास्वामीजी मठ ट्रस्टचा उपक्रम
- कुंकूमार्चनात महिला भाविकांनी सहभागी होण्याचे केले आवाहन

तभा वृत्तसेवा
सोलापूर , दि. २६ ऑगस्ट -

ॐ नमस्ते रुद्र मन्यव उतो त इषवे नमः। नमस्ते अस्तु धन्वने बाहुभ्यामुत ते नमः असा मंत्रघोष करीत ब्रह्मवृंदांच्या वेदघोषात अतिरुद्र स्वाहाकारास सोमवारी विमानतळापाठीमागे असलेल्या कस्तुरबा नगरातील श्री श्री श्री सद्गुरु बसवारूढ महास्वामीजी मठात प्रारंभ झाला. पहिल्या दिवशी भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती.

सोमवारी सकाळी गोपूजन, ध्वजपूजन, मंगलमंत्र पठण, महागणपती पूजन, स्वस्तिपुण्याहवाचन, मातृका पूजन, नांदी श्राद्ध, ऋत्विग् वरण, प्रधान देवता स्थापन, अग्निमंथन, अग्निस्थापना, कुंड संस्कार, नवग्रह होमम् हे विधी करण्यात आले. यानंतर अतिरुद्र स्वाहाकारास आरंभ झाला. श्री श्री श्री सद्गुरु बसवारूढ महास्वामीजी मठाचे संस्थापक श्रो. ब्र. श्री. ईश्वरानंद महास्वामीजी यांच्या प्रमुख उपस्थितीत मठाधिपती श्रो. ब्र. श्री. शिवपुत्र महास्वामीजी यांच्यासह मुख्य यजमान ब्रिजमोहन फोफलिया, यजमान माजी महापौर किशोर देशपांडे, स्वागत समिती उपाध्यक्ष सोमनाथ वैद्य, मठाचे विश्वस्त उद्योजक सतीश कुलकर्णी, सुधीर इनामदार यांनी सहकुटुंब अतिरुद्र स्वाहाकार केला. भगवान श्री शंकर आणि श्री पार्वती देवीची मांडलेली पूजा, रुद्राची एकामागून एक होणारी आवर्तने, महिला भाविकांच्या हस्ते कुंकुमार्चन आणि दर्शनासाठी आलेल्या भाविकांची गर्दी यामुळे वातावरण भक्तीमय बनले होते. सायंकाळी शिवपुराण, प्रवचन, अष्टावधान सेवा, मंत्रपुष्प, महामंगलारती करण्यात आली. मंगळवारपासून रविवारपर्यंत दररोज सकाळी ७ ते दुपारी २ वाजेपर्यंत अतिरुद्र स्वाहाकार, सकाळी १० ते १२ कुंकूमार्चन तर दुपारी १२ वाजता दररोज भाविकांना महाप्रसादाचे वितरण करण्यात येणार आहे. भाविकांनी दररोज या कार्यक्रमासाठी उपस्थित रहावे, असे आवाहन श्री श्री श्री सद्गुरु बसवारूढ महास्वामीजी मठाचे संस्थापक श्रो. ब्र. श्री. ईश्वरानंद महास्वामीजी यांनी याप्रसंगी केले.

पिंपळ अन् शमीच्या लाकडापासून प्रज्वलित केला अग्नी

अतिरुद्र स्वाहाकारानिमित्त अग्निमंथन विधीद्वारे अग्निप्रज्वलित करण्यात आला. यावेळी अग्नी तयार करण्यासाठी काडेपेटीचा वापर न करता वेदकाळापासून चालत आलेल्या पिंपळ आणि शमीच्या लाकडापासून घुसळून अग्नी तयार करण्याच्या पद्धतीनुसार अग्नी प्रज्वलित करण्यात आला. भाविकांनी गर्दी केली होती.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003**.** ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

!! जाहीर सूचना !!

सोलापूर तरुण भारत जाहिराती तसेच सर्व विभागांसाठी ऑनलाईन रिसीट ॲप वापरण्यास सुरुवात केली आहे. ग्राहकांनी याचा लाभ घ्यावा, कोणतेही पैसे जमा करताना ऑनलाईन रिसीटची मागणी करावी. ऑनलाईन रिसीट शेअर करण्याची देखील सोय केली आहे. आमच्या प्रतिनिधीकडून याची माहिती घ्यावी. ऑनलाईन रिसीटची मागणी हक्काने करावी.

सहकार्याबद्दल धन्यवाद.

क्राईम वृत्त...

राठे बॉईज हॉस्टेलमधून दोन मोबाईलची चोरी

सोलापूर, दि. २६ ऑगस्ट -

शहरातील एकता नगर येथील राठे बॉईज हॉस्टेलमधून चोरट्याने विद्यार्थ्यांचे दोन मोबाईल चोरून नेले. याबाबत राकेश वासुदेव कामडी (वय २७, रा. राठे बॉईज हॉस्टेल, बी/९८/रामशिला एकता नगर, राघवेंद्र अपार्टमेंटसमोर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राकेश कामडी हे राठे बॉईज हॉस्टेलमध्ये राहतात. २५ ऑगस्ट रोजी रात्री अज्ञात चोरट्याने कामडी राहात असलेल्या रूमचा पुढे केलेला दरवाजा उघडून घरात प्रवेश करून कामडी यांचे २२ हजार रुपये किंमतीचे दोन मोबाईल चोरून नेले. हवालदार डोके पुढील तपास करीत आहेत.

दुकानासमोरील सीसीटीव्ही लंपास

सोलापूर, दि. २६ ऑगस्ट -

सोलापूर-विजयपूर रोडवरील सैफुल येथील डार्लिंग पान शॉप या दुकानासमोरील सीसीटीव्ही कॅमेरा व त्याचा पूर्ण सेट चोरट्याने चोरून नेला. याबाबत लखन तारासिंग जाधव (वय ३२, रा. प्रताप नगर तांडा, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २५ ऑगस्ट रोजी रात्रीच्यावेळी अज्ञात चोरट्याने सैफुल येथील शगुप्ता दाल चावल दुकानाजवळ असलेल्या लखन जाधव याच्या डार्लिंग पान शॉप दुकानासमोर लावलेले दोन सीसीटीव्ही कॅमेरे, सीसीटीव्ही डिव्हाईसचा पूर्ण सेट असा १० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरून नेला. हवालदार हार पुढील तपास करीत आहेत.

अज्ञात कारणावरुन तरूणाची गळफास घेऊन आत्महत्या

सोलापूर, दि. २६ ऑगस्ट -

अक्कलकोट रोडवरील साई नगर येथे अज्ञात कारणावरून तरूणाने गळफास घेऊन आत्महत्या केली. सुरेश लक्ष्मण राठोड (वय ३६, रा. प्लॉट नं. ३२४, साई नगर, सोलापूर) असे आत्महत्या केलेल्या तरूणाचे नाव आहे. २६ ऑगस्ट रोजी पावणे दोनच्या सुमारास मोशिन शकील शेख यांच्या घरात भाड्याने राहात असलेल्या घरी सुरेश राठोड यांनी लोखंडी ॲगलला असलेल्या पंख्यास साडीच्या सहाय्याने अज्ञात कारणावरून गळफास घेतला. त्यामुळे एमआयडीसी पोलिस ठाण्यातील हवालदार जी आर पवार यांनी राठोड यांस खाली उतरवून बेशुध्दावस्थेत उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. आकाश माने यांनी राठोड यांस उपचारापूर्वीच मृत झाल्याचे घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

घरगुती वादातून युवतीने केले विषारी औषध प्राशन

सोलापूर, दि. २६ ऑगस्ट -

घरगुती वादातून वैभवी शिवाजी कदम (वय १७, रा. वाघोली, ता. मोहोळ) या युवतीने विषारी किटकनाशक औषध प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. हा प्रकार रविवारी रात्री दहाच्या सुमारास घडला असून वैभवी हिस त्रास होऊ लागल्यावर मामा महेश जाधव यांनी तिला उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

भीमा नदीकाठाच्या गावांना सतर्कतेचा इशारा

यंदा उजनीतून ३८ टीएमसी पाणी सोडले

उजनीतून ६० हजार तर वीर धरणातून ७१ हजार क्युसेक्सने भीमा नदीत विसर्ग सुरु

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि. २६ ऑगस्ट-

भीमा खोऱ्यातील मुसळधार पावसामुळे पुन्हा एकदा दौंड विसर्गात मोठी वाढ झाली असून, दौंड येथून ५८ हजार ५८५ क्युसेक विसर्ग उजनी धरणात मिसळत असल्याने उजनीतून शनिवारी सायंकाळपासून ६० हजार क्युसेक विसर्ग भीमा नदीत वाढवण्यात आला आहे.

वीर धरणातून नीरा नदीमध्ये ७१ हजार क्युसेक विसर्ग सुरू आहे. पाऊस वाढल्याने उजनी धरणाची पाणीपातळी स्थिर ठेवण्यासाठी उजनीतून भीमा नदीत ३० हजार क्युसेक विसर्ग सोडण्यात येत होता.त्यात रात्री वाढ करण्यात आली होती. सायंकाळी ६ वाजता उजनी धरणाचीपाणी पातळी १०२.४५ टक्क्यावर स्थिर ठेवण्यात आली आहे. तर, ५४.८८ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा आहे. सध्या उजनी धरणात एकूण ११८.५४ टीएमसी पाणीसाठा आहे.

गेल्या तीन महिन्यांत उजनी धरणात १२७ टीएमसी पाणी आले आहे. तर उजनीतून भीमा नदीत ३८ टीएमसी पाणी सोडून देण्यात आले आहे. दि.९ जून पासून उजनी धरणाची पाणीपातळी वाढण्यास सुरुवात झाली होती. दौंड येथून सुरू असलेले विसर्ग गेल्या अडीच महिन्यांपासून सुरू आहे.सध्या दौंड येथून ६ हजार ३७४ क्युसेक आवक होत आहे. यात रविवारपासून आणखी वाढ करण्यात आली आहे. उजनी धरण परिसरात एकूण ३७७ मिमी पावसाची नोंद झाली आहे. उजनीतून सोडलेल्या पाण्यासाठी भीमा नदीला पूर देण्याची शक्यता आहे.

वीरमधून विसर्गात सातत्याने वाढ

वीर धरण १०० टक्के भरलेले असून पाणीपातळीमध्ये काही प्रमाणात वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. नीरा देवघर धरण पूर्ण क्षमतेने भरलेले आहे. तसेच भाटघर धरण, नीरा देवधर व गुंजवणी धरणातून सांडव्यावरून तसेच विद्युत गृहाद्वारे विसर्गात वाढ झाली आहे. त्यानुसार नीरा नदीमध्ये वीर धरणाच्या नीरा डाव्या कालव्यात ३५० क्युसेक विसर्ग, नीरा उजव्या कालव्यात १००० क्युसेक विसर्ग सुरू करण्यात आला आहे. वीर धरणाच्या सांडव्याद्वारे ६१९२३ क्युसेकवरून ६९९९९ क्युसेक म्हणजे नीरा नदीमध्ये एकूण ७१३४९ क्युसेक विसर्ग सोडण्यात आला आहे.

पंढरपूर तालुका पोलीस ठाण्याचे आवाहन

उजनी व वीर धरण क्षेत्रात पावसाचा जोर वाढला असल्याने उजनी व वीर धरणातून भीमा नदी पात्रात पाणी मोठ्या प्रमाणात सोडल्याने जुना दगडी पूल पाण्याखाली गेला असून इस्कॉन परिसरातील काही भाग पाण्याखाली गेला आहे. बॅरिगेट लावून वाहतूक बंद करण्यात आली आहे. नदीकाठच्या गावातील नागरिकांना बंधाऱ्यावरून पाणी वाहत असताना वाहतूक करणार नाही होडी चालवणार नाही. कपडे धुणार नाही याबाबत पोलीस प्रशासनाकडून नागरिकांना सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच बंधाऱ्यावर योग्य पोलीस बंदोबस्त नेमला आहे, अशी माहिती पंढरपूर तालुका पोलीस निरीक्षक टी. वाय. मुजावर यांनी दिली.

सहायक पोलिस निरीक्षकावर हल्ला करून पळून जाणाऱ्या तिघांना अटक

टेंभुर्णी पोलिसांची वरवडे टोल नाक्यावर कारवाई

सोलापूर, दि. २६ ऑगस्ट -

पुणे शहरात सहायक पोलिस निरीक्षक रत्नदिप गायकवाड यांच्यावर हत्याराने हल्ला करून गंभीर जखमी करून पळून जाणाऱ्या तिघांना सोलापूर ग्रामीणच्या टेंभुर्णी पोलिसांनी पकडून पुणे शहर पोलिसांच्या ताब्यात दिले. ही कारवाई सोमवारी सोलापूर-पुणे महामार्गावरील वरवडे टोळ नाक्यावर करण्यात आली.

राहुलसिंग रविंद्र सिंग भोंड (वय २०, रा. तुळजाभवानी वसाहत गाडीतळ, पुणे), निहालसिंग मुन्नुसिंग टाक (वय १९, रा. तुळजाभवानी वसाहत गाडीतळ, पुणे) आणि अमरसिंग जग्गरसिंग टाक (वय २३, रा. इराणी वस्ती गल्ली नंबर ३, पाटील इस्टेट, शिवाजी नगर, पुणे) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. या तिघांविरुध्द पुण्यातील वानवडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. २५ ऑगस्ट रोजी पुणे शहरात स. पोलिस निरीक्षक गायकवाड यांच्यावर धारदार शस्त्राने हल्ला करून तीन आरोपीं पळून गेले होते. याबाबत वानवडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांकडून आरोपींचा शोध घेण्यात येत होता. त्यावेळी या हल्ला प्रकरणातील आरोपी हे पुणे येथून खासगी वाहनाने सोलापूरकडे निघाले असल्याची माहिती पुणे शहर पोलिसांना मिळाली होती. त्यावेळी सोलापूर ग्रामीण पोलिसांनी तात्काळ सोलापूर-पुणे महामार्गावर नाकाबंदी सुरु करून खासगी वाहनांची तपासणी केली. सोमवारी पहाटे दोनच्या सुमारास वरवडे टोळ नाक्यावर टेंभुर्णी पोलिस ठाण्याकडील अधिकारी व कर्मचारी हे लक्झरी बसची तपासणी करीत असताना बसमध्ये पोलिस अधिकाऱ्यावर हल्ला करून पळून जाणारे तीन संशयित मिळून आले. या तिघांना टेंभुर्णी पोलिसांनी ताब्यात घेऊन पुणे शहर पोलिसांच्या स्वाधीन केले.

ही कारवाई पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर अधिक्षक प्रितम यावलकर, करमाळा उपविभागीय पोलिस अधिकारी अजित पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली टेंभुर्णी पोलिस ठाण्याचे निरीक्षक कुंदन गावडे, सहायक पोलिस निरीक्षक गिरीष जोश, पोलिस उपनिरीक्षक कुलदीप सोनटक्के, अजित मोरे आदींनी केली.

जिल्ह्यात एकही मंकी पॉक्सचे रुग्ण नाही : डॉ. नवले

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-

पुणे, अहिल्यानगर बॉर्डरवरील करमाळा तालुक्यात तापाचे रुग्ण आढळल्यावर जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले यांनी तात्काळ तेथे भेट देऊन खबरदारी घेतली आहे. जिल्ह्यात कोठेही मंकी पॉक्स'चे रुग्ण आढळलेले नाहीत, अशी माहिती त्यांनी दिली आहे.

करमाळा तालुक्यातील रिधोरे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या हद्दीत तापाचे रुग्ण आढळल्याची तक्रार आली होती. पुणे व अहिल्यानगर सीमेलगतचा हा भाग येत असल्याने दोन्हीकडच्या लोकांची ये-जा असते. त्यामुळे जिल्हा आरोग्य विभागाने याची तात्काळ दखल घेतली. डॉ. नवले यांनी रिधोरे प्राथमिक आरोग्य केंद्र परिसरात भेट देऊन रुग्णांची प्रत्यक्ष तपासणी केली. यावेळी तालुका वैद्यकीय अधिकारी काटकर उपस्थित होते. संबंधित रुग्णांना चिकुनगुनियाची लागण झाल्याचे दिसून आले. या रुग्णांमध्ये मंकी पॉक्सची कोणतीच लक्षणे नसल्याचा निर्वाळा त्यांनी दिला. करमाळा पंचायत समितीमध्ये बैठक घेऊन परिसरात खबरदारी घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. ज्या भागात तापाचे रुग्ण आढळून येत आहेत त्यांची रक्त तपासणी, रुग्णांच्या घराच्या परिसरात कीटकनाशक फवारणी तत्काळ करावी अशा सूचना त्यांनी दिल्या. जिल्ह्यात मंकी पॉक्सची लक्षणे असलेले रुग्ण नाहीत त्यामुळे नागरिकांनी निश्चिंत रहावे. असे आवाहन डॉ. नवले यांनी केले आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातून तीन वर्षाच्या बालकाचे अपहरण करणाऱ्यास अटक

सोलापूर ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. २६ ऑगस्ट -

साजणी (ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर) येथून तीन वर्षाच्या बालकाचे अपहरण करणाऱ्यास सोलापूर ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक करून बालकाची सुरक्षित सुटका केली.

संजय कुमार मलिक (वय ३४, रा. साजणी, ता, हातकणंगले, जि. कोल्हापूर, मुळ गाव रा. मधुपुडा, ओरिसा) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

याप्रकरणातील फिर्यादी व आरोपी संजय कुमार मलिक हे ओरिसा राज्यातील राहणारे असून ते नवमहाराष्ट्र सुत गिरणी कंपनी, हातकणंगणे (जि. कोल्हापूर) येथे सुत गिरणी कामगार म्हणून कामास आहेत. २५ ऑगस्ट रोजी साडेआठच्या सुमारास यातील फिर्यादीच्या तीन वर्षाच्या बालकास त्याच्या शेजारी राहणाऱ्या संजय कुमार मलिक याने कोठेतरी फिरविण्यासाठी घेऊन गेला होता. परंतु, तो बराच वेळ झाल्यानंतर संजय मलिक हा त्या बालकासह घरी परत आलाच नाही. त्यामुळे त्या बालकाच्या वडीलांनी संजय मलिक यास फोन केला असता थोड्या वेळात येतो असे सांगून तो उडवाउडवीची उत्तरे देऊ लागला. त्यामुळे संशय वाढत गेला व त्या बालकाच्या वडीलांनी हातकणंगले पोलिस ठाणे गाठून याबाबत फिर्याद दाखल केली.

या गुन्ह्याचा तपास करताना पोलिसांना संशयित संजय मलिका हा मुलासह सोलापूर येथून रेल्वेने ओरिसा येथे जाणार असल्याची माहिती मिळाली. त्यावरुन कोल्हापूर पोलिसांनी सोलापूर ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेशी संपर्क साधून याबाबत माहिती दिली. त्यावेळी स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी तात्काळ संशयित संजय मलिक व अपहरीत बालकाचा सोलापूर रेल्वे स्थानक व परिसरात शोध घेतला. त्यावेळी सोलापूर रेल्वे स्थानकाच्या परिसरात संशयित संजय मलिक व अपहरित बालक मिळून आले. पोलिसांनी दोघांनाही ताब्यात घेऊन पुढील कारवाईसाठी हातकणंगले पोलिसांच्या स्वाधीन केले.

ही कामगिरी पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर अधिक्षक प्रितम यावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक सुरेश निंबाळकर यांच्या नेतृत्वाखाली सहायक पोलिस निरीक्षक विजय शिंदे, सहायक फौजदार नारायण गोलेकर, हवालदार धनाजी गाडे, मोहन मनसावाले, सागर ढोरे-पाटील, महिला पोलिस दिपाली जाधव यांनी केली.

वैविध्यपूर्ण वेशभूषा परिधान केलेल्या गणपतींना मागणी

सात सप्टेंबरला आगमन; गणेश मूर्तींवर शेवटचा हात फिरवण्यात मूर्तिकार व्यस्त

पारंपारिक वेशभूषा साकारली

गणपती बाप्पांचे रूप अधिक देखणे आणि खुलून यावे यासाठी ड्रेसिंग केले जात आहे. भरजरी वस्त्र परिधान करून पारंपारिक वेशभूषा साकारली जात आहे. यासाठी भरजरी वस्त्र, वेलवेट कापड, हिरे, माणिक, मोती असे विविध सजावटीचे साहित्य मुंबईहून मागवले जात आहे. या साहित्यांच्या माध्यमातून गणपती सजवले जातात. यंदाच्या वर्षी आशा गणपतीची मागणी वाढलेली आहे.

- अंबादास दोरणाल, मूर्तिकार

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि.२६ ऑगस्ट-

सुखकर्ता दुखहर्ता वरदविनायकाचे आगमन दृष्टिक्षेपात आले आहे. अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या गणेशोत्सवासाठी गणेश भक्तांसह मूर्तीकारांमध्ये आतुरता लागली आहे. सात सप्टेंबर रोजी गणरायाचे आगमन होणार आहे. त्याच पार्श्वभूमीवर मूर्तिकार गणेश मूर्तींवर शेवटचा हात फिरवण्यात व्यस्त आहेत. आकर्षक रंगसंगती आणि कलाकृतीच्या माध्यमातून बाप्पाचे सुंदर आणि मनोहारी रूप मूर्तिकार साकारत आहेत.

गणेशोत्सवाच्या निमित्ताने शहरात विविध ठिकाणी गणपती स्टॉल्स उभारले जात आहेत. या स्टॉलच्या माध्यमातून गणपतीचे बुकिंग केले जात आहे. आपल्याला आवडेल अशी बाप्पाची सुरेख मूर्ती बुक करण्यासाठी गणेशभक्तांची स्टॉलकडे गर्दी वाढत आहे. यंदाचा गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यासाठी मूर्तिकारांसह गणेश भक्त सज्ज झाले आहेत. त्यानुसार नवीन ट्रेंड सध्या सुरू झाला आहे. नाविन्यपूर्ण आणि वैविध्यपूर्ण असे ड्रेपिंग केलेले गणपती गणेश भक्तांच्या पसंतीस उतरत आहेत. भरजरी वस्त्र, मुलायम पितांबर, डोक्यावर पगडी फेटा, असे वस्त्र परिधान केल्यानंतर सौंदर्यपूर्ण मुद्रेतील बप्पा आकर्षक दिसत आहेत. गेल्या काही वर्षांपासून हे नवीन ट्रेंड सुरू झाले आहे. विविध आकारातील आणि रूपातील गणपती बाप्पा भक्तांच्या भेटीला येत आहेत. श्रीकृष्ण, कोळी, महादेव, अशा विविध रूपातील गणपती बाप्पांना वस्त्र अलंकार परिधान केले जात आहेत. भक्तांच्या मागणीप्रमाणे गणपती बाप्पांची मूर्ती सजवली जात आहे.

दरात दहा ते वीस टक्के वाढ

शहरातील विविध स्टॉल्सला गणेश भक्तांची गणपती पाहण्यासाठी मोठी गर्दी दिसून येत आहे. यंदाच्या गणेशोत्सवात दरवाढ झाली असून विविध कच्च्या साहित्यांचे दर वाढल्याने गणपतीच्या दराम ध्ये देखील दहा ते वीस टक्के वाढ झाली असल्याचे सांगण्यात आले.

- श्रीकांत गायकवाड , ड्रेपिंग कलाकार

शहरातून तीन दुचाकी लंपास

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. २६ ऑगस्ट -

दुचाकी चोरीचे सत्र सुरूच असून, अज्ञात चोरट्यांनी शहरातून तीन वेगवेगळ्या ठिकाणाहून तीन दुचाकी चोरून नेल्याच्या घटना उघडकीस आल्या आहेत.

पहिली घटना ही जेलरोड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गीता नगर, न्यू पाच्छा पेठ येथील विलास व्यंकय्या चिंता (वय ४९, रा. गीता नगर) यांच्या राहत्या घरासमोर पार्क करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एमएच १३ एआर ७६१९ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. हि घटना २३ ऑगस्ट रोजी दुपारी तीन ते पाच वाजण्याच्या दरम्यान घडली. याप्रकरणी चिंता यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार कांबळे हे करीत आहेत.

तसेच दुसरी घटना ही जोडभावी पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील विद्यानगर शेळगी येथे घडली. वीरुपाक्षप्पा ईरप्पा कोरचगाव (वय ४८, रा. आदित्य नगर) यांची त्यांची दुचाकी क्रमांक एमएच १३ डीजे ४५३३ ही घरासमोर पार्क करून ठेवली असता २५ ऑगस्टच्या रात्री अज्ञात चोरट्याने ती चोरून नेली आहे. पुढील तपास पोलीस हवालदार शिवशरण हे करीत आहेत.

तर तिसरी घटना ही फौजदार चावडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील केगाव येथे घडली. नितीन वसंत इंगळे (वय ३०, रा. केगाव) यांनी त्यांची दुचाकी क्रमांक एमएच १३ सीएफ ८२६३ ही घरासमोर पार्क केली होती. त्यावेळी १० ऑगस्टच्या पहाटेच्या सुमारास अज्ञात चोरट्याने ती चोरून नेली आहे. इंगळे यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस नाईक भद्रशेट्टी हे करीत आहेत.

ज्ञानामृत आनंदलहरी - ८६९

अहो वांसरु देखिलियाचि साठी । धेनु खडबडोनि मोहें उठी ।
मग स्तनामुखाचिये भेटी । काय पान्हा न ये ।।

अर्जुनाची इच्छा आता विश्वारुप पाहाण्याची झाली आहे. भगवंतांचे एक वैशिष्ट असे आहे की, अर्जुन इच्छा व्यक्त करुन दाखविण्याच्या आगोदरच ते त्याची इच्छा ओळखून ती पुर्ण करतात. अर्जुनाने विश्वरुप पाहाण्याचे अद्याप बोलुन दाखविले नाही. आपल्या बाळाला भूक लागल्याचे माता आपोआप ओळखते, तसे भगवंत अर्जुनाची भूक ओळखण्यात परिपूर्ण आहेत. पण थोडासा आनंद घेण्यासाठी ते शांतपणे उभे आहेत. अर्जुन मनात विचार करतो आहे, की हे सर्व जगच म्हणजे सर्व जीवमात्र जर परमात्मा आहे, तर ते आपल्या डोळ्यांना पाहायला मिळेल का? आपण भगवंताला हे विश्वरुप दाखव असे कसे म्हणावे ? आत्तापर्यन्त कोणत्याही भक्तांनी भगवंताला विश्वरुप दाखवा असे म्हटले नाही, म्हणून आपण तरी कसे म्हणावे ? लक्ष्मी एवढा किंवा गरुडाएवढा मी जवळचा नसतांनाही मी असा प्रश्न भगवंतांना कसा करु ? असे प्रश्न अर्जुन मनात निर्माण करतो आहे.

आपण भगवंताला विश्वरुप दाखव म्हटलेच नाही व भगवंताने स्वत: होऊन विश्वरुप दाखविले नाही, तर आपली ही इच्छा तशीच राहून जाईल, असेही अर्जुनाला वाटले. म्हणून थोडेसे धाडस करुन अर्जुन बोलू लागला. त्याचे बोलणे इतक्या प्रेमाचे, माधुर्याचे, विनयाचे होते की, एकदोन वाक्ये बोलल्याबरोबर भगवंत विश्वरुप दाखवितील असे संजयाला वाटले. भगवंत अर्जुनाला विश्वरुप का दाखवितील हे सांगतांना माऊली म्हणतात, अहो वांसरु देखिलियाचि साठी । धेनु खडबडोनि मोहे उठी । मग स्तनामुखाचिये भेटी । काय पान्हा न ये ।।. अर्थात, आपल्या वासराला पाहिल्या बरोबर गाय लागलीच प्रेमाने गडबडीने उभी राहते, जेव्हा तिच्या स्तनाची व वासराच्या मुखाची गाठ पडते, तेव्हा तिला पान्हा घे असे म्हणण्याची गरज पडत नाही. स्तनामुखाची भेट होताच पान्हा आपोआप येऊ लागतो. तसे अर्जुन हा भगवंताचे वासरु आहे, भगवंतही अर्जुनासाठी गाय आहे. त्यामुळे विश्वरुपाची भेट आपोआप होईल असे माऊलींना वाटते. पांडवांचे नांव ऐकल्याबरोबर धावून जाणारा भगवंत अर्जुनाने विचारण्या अगोदर त्याची इच्छा पुर्ण करणार नाही काय ? असा प्रश्न माऊली करीत आहेत.

भगवान श्रीकृष्ण हे प्रेमाचे अवतार असल्याने व अर्जुन हा या प्रेमात घातलेले लडिवाळस्वरुपी मादक द्रव्य असतांना सुध्दा या दोघांचे वेगळेपण जाणवते हे सुध्दा खूप झाले. अर्जुनाच्या इच्छेपुढे भगवंत काही आढेवेढे न घेता, आपोआप विश्वरुप दाखवितील असे माऊली म्हणतात. आपण विश्वरुपाचा हा प्रसंग मायबोलीत, संतजनांच्या कृपेने सांगणार आहोत. तो प्रसंग सर्वांनी लक्षपुर्वक ऐकावा अशी विनंती माऊली करीत आहेत. सर्व जीवमात्रात अर्जुनाला फक्त एक ईश्वरच दिसावा अशी भगवंताची इच्छा ते विश्वरुप दाखवून पूर्ण करणार आहेत. अर्थात, दोघांच्याही इच्छा असल्याने प्रेमाच्या भरतीला मर्यादा राहणार नाही. हे सर्व केवळ दोघांच्या एकमेकावरील नि:सीम प्रेमामुळे घडत आहे. आपण असे नि:स्वार्थ प्रेम करायला शिकलो तर आपणालाही अर्जुनाप्रमाणे सर्व देही ईश्वराचे दर्शन होईल. या ओव्यांच्या सोबत राहून आपण विश्वरुपाचा आनंद घेऊ या. अर्जुनाप्रमाणे सर्व प्राणीमात्रात आपणही भगवंताला पाहू या.

जय जय राम कृष्ण हरी।

- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड
मो. ९४२२२१६४४८

सत्ताधाऱ्यांमुळे देशात वातावरण विकृत होत आहे

समाजानेच आता क्रांती घडविण्याची गरज

काँग्रेसच्या खा. प्रणिती शिंदे यांचा आरोप

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-

पुरोगामी महाराष्ट्रात मुली सुरक्षित नाहीत. देशात विकृत मानसिकता सत्ताधाऱ्यांमुळे निर्माण होत आहे. ती शोकांतिका आहे. प्रशासन व शासन महिलांना साथ देत नाही असा आरोप करत समाजानेच आता पुढाकार घेऊन क्रांती घडवली पाहिजे, अशी भूमिका काँग्रेसच्या खा. प्रणिती शिंदे यांनी मांडली.

सोलापूर श्रमिक पत्रकार संघात एका कार्यक्रमानिमित्त आल्या असताना पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी विविध विषयांवर आपली भूमिका स्पष्ट केली. ब्रिजभूषण सारख्यांना पाठीशी घातले जाते म्हणून महिला अत्याचाराच्या प्रमाणात वाढ होते. गुजरातमध्ये बलात्काऱ्यांचे सत्कार होतात आणि गुन्ह्यांची दखल घेतली जात नाही. ही गंभीर बाब आहे. आम्ही काहीही केलं तरी सत्ताधारी कारवाई करत नाहीत हे अन्याय करणाऱ्यांना माहीत आहे. अन्याय करणाऱ्यांना सत्ताधारी साथ देतात.समाज जर चार वर्षाच्या मुलीला सोडत नसेल तर आपण कुठे नरकात चाललो आहोत का? असा प्रश्न उपस्थित केला.

स्त्री जन्माच्या आपण स्वागत करतो साजरा करतो. पुढे जाऊन महिलांचा अपमान होतो. यातूनच कदाचित स्त्रीभ्रूणहत्या करण्याची मानसिकता होते का? म्हणूनच समाजात मुली नको अशी मानसिकता ठेवून आपण मागे चाललो आहोत का? राजमाता जिजाऊ, राजमाता अहिल्यादेवी, माता रमाई, क्रांतीज्योती सावित्री यांच्या महाराष्ट्रात आपण पुढे जात आहोत की मागे जात आहोत, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

वडील आणि पुरुष म्हणून आपल्याला आता आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. सत्ताधाऱ्यांचे जेव्हा समर्थन असते, तेव्हा आपण काहीही केले तर चालते. आपण जेलमध्ये जाणार नाही असा समज होतो. समाजातील मानसिकता अशी विकृत असेल तर घरच त्याला सुधारू शकते. खासदार म्हणून नाही तर एक बहीण म्हणून तुम्हाला विनंती करते मुलांसोबत एक तास भर बसा.महिलांचा सन्मान करायला त्यांना शिकवा. का म्हणून महिलांनी स्वसंरक्षणाचे धडे शिकावेत ? मुलांना जर शिकवले तर स्त्रियांना सेल्फ डिफेन्सची गरज नाही. कोणत्याही खासदार, आमदार तुमच्या घरी येऊन मुलांना शिकवू शकणार नाहीत, असे खा. प्रणिती शिंदे म्हणाल्या.

शरदचंद्र पवार राष्ट्रवादीची आज हंडी

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-

राज्यातील सध्याचे महायुतीचे सरकार अनेक प्रश्नावर अपयशी ठरले आहे असा आरोप करत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने महायुतीचे काळे कारनामे या विषयावर सोलापुरात मंगळवार दि. २७ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता सात रस्ता येथे अनोखी हंडी बांधण्यात येणार आहे, अशी माहिती प्रदेश उपाध्यक्ष यांनी पत्रकार परिषदेत दिली.

महिला लहान मुलं ज्येष्ठ नागरिक सारे जण असुरक्षित आहेत. शासनाने जाहीर केलेल्या अनेक योजना अस्तित्वातच आल्या नाहीत. राज्यापुढे कर्ज संकट , दुष्काळाकडे दुर्लक्ष, कर्जमाफीचा उडालेला फज्जा, बळीराजाच्या वाढलेल्या आत्महत्या, राज्यातील उद्योग शेजारच्या गुजरातमध्ये पळवून नेणे , आरक्षणाच्या नावाखाली राजकीय पोळी भाजण्याचा प्रकार, बेरोजगारीचे संकट, वाढती गुन्हेगारी, बालकांविरोधातील गुन्हेगारीत वाढ, माता-भगिनीं विरोधात अवमानात्मक वक्तव्य, महिलांवरील गुन्हेगारींचा उच्चांक, वाढता महिला अत्याचार ही माहिती जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी ही हंडी उभारण्यात येत असल्याचे एड. बेरिया यांनी स्पष्ट केले

भगवान श्रीकृष्णांने अन्याय अत्याचारांचा बिमोड केला तो दहीहंडीचा उत्सव मंगळवारी आहे. यानिमित्ताने महाजुलमी महायुती सरकारच्या विरोधात त्यांनी केलेल्या कारनाम्यानची हंडी सात रस्ता चौकात उभारण्यात येणार आहे. ही निषेधाची हंडी पाहण्यासाठी सोलापूरकरांनी आवर्जून यावे, असे आवाहन प्रवक्ते ऍड. यू.एन.बेरीया यांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेस भारत जाधव, सुनील इंगळे, प्रशांत बाबर, चंद्रकांत पवार, अल्लाबक्ष मणियार, अ.रजाक मकानदार, सूर्यकांत शेरखाने आदी उपस्थित होते.

फुरडे इन्फोटेक आयटी कंपनीचा सोलापुरात उद्या शुभारंभ

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-

बांधकाम क्षेत्रात गेल्या तीन दशकांमध्ये नाव कमावलेल्या फुरडे ग्रुपने आता आयटी क्षेत्रात पाऊल टाकले आहे. फुरडे इन्फोटेक प्रायव्हेट लिमिटेड या आयटी कंपनीचा शुभारंभ बुधवार दि. २८ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता दमाणी नगर नगर येथे करण्यात येणार आहे, अशी माहिती प्रमुख रोहन फुरडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून खा. प्रणिती शिंदे, माजी आ. दिलीप माने आणि लक्ष्मी हायड्रोलिक्सचे व्यवस्थापकीय संचालक शरद ठाकरे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कंपनीच्या माध्यमातून सुमारे ७० युवकांना रोजगार मिळणार आहे. या ठिकाणी बीपीओ, केपीओ स्वरूपात कामकाज चालणार आहे. पत्रकार परिषदेत सुनील फुरडे, रोहीत फुरडे, आनंद मार्डीकर, आसिफ बागवान, दिगंबर कोनापुरे आदी उपस्थित होते.

शरद बँकेचे २०० कोटी व्यवसायाचे उद्दिष्ट

संस्थापक मनोहर सपाटे; सभासदांना१० टक्के लाभांश वाटप

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २६ ऑगस्ट -

शहरातील नावाजलेल्या शरद बँकेने १०० कोटींचा व्यवसाय पूर्ण करून आगामी काळात दोनशे कोटींचा व्यवसाय करण्याचे ठेवलेले उद्दिष्ट बँकेच्या प्रगतीसाठी निश्चितपणे उपयुक्त ठरेल, असा विश्वास बँकेचे संस्थापक तथा माजी महापौर मनोहर सपाटे यांनी व्यक्त केला.

शरद नागरी सहकारी बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. त्यावेळी सपाटे बोलत होते. प्रास्ताविक बँकेचे अध्यक्ष प्रा. महेश माने यांनी केले तर अहवाल वाचन मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र आवताडे यांनी केले. यावेळी बँकेच्यावतीने सभासदांना १० टक्के लाभांश जाहीर करण्यात आला असून राखीपौर्णिमेचे औचित्य साधून त्याच्या वाटपासही सुरुवात करण्यात आली आहे.

तसेच यावेळी बँकेच्यावतीने तानाजी माने,मंजूषा पाटील, एकनाथ घाडगे,सुजाता जुगदार ,प्रदीप निर्मल, सुनीता साळुंके यांचा उल्लेखनीय कार्याबद्दल सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास माणिकप्रभू मुळे ,ज्ञानेश्वर सपाटे, निलेश उंब्रजकर अनिता माने, अनिल लोंढे, युन्नुस मुजावर, मुकुंद जाधव, निलेश चोरेभुरे ,वसंत विधाते, श्यामराव कुलकर्णी, दत्ता भोसले उपस्थित होते. सूत्रसंचालन स्वाती सपाटे यांनी केले तर आभार बँकेच्या उपाध्यक्षा महानंदा सोलापूरे यांनी मानले.

पद्मश्री सुमतीबाई स्कूलमध्ये विविध आंतरशालेय स्पर्धा

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-

श्राविका संस्थेचे विश्वस्त स्वर्गीय रतनचंद शहा यांच्या जयंतीचे औचित्य साधून विद्यार्थ्यांसाठी पद्मश्री सुमतीबाई स्कूलमध्ये विविध आंतरशालेय स्पर्धांचे आयोजन केले होते.

यात विविध वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या स्पर्धांमध्ये, पाचवी ते सातवीसाठी चित्रकला स्पर्धा, इयत्ता आठवी ते दहावीसाठी जनजागृती पर संदेश असलेले भीत्तीचित्र पोस्टर बनविणे, याशिवाय पाचवी ते दहावीसाठी स्पेल बी स्पर्धा, सुंदर हस्ताक्षर स्पर्धा यांचा समावेश होता. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देणे, त्यांच्या बौद्धिक पातळीत वाढ करणे, त्यांच्यात धाडस निर्माण करणे या उद्देशाने विविध स्पर्धांचे आयोजन दरवर्षी शाळेकडून करण्यात येत असते. स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे सचिव हर्षवर्धन शहा, मुख्य कार्यकारी अधिकारी देवई शहा, संस्थेच्या वरिष्ठ मार्गदर्शक दीप्ती रोमन यांच्या हस्ते स्वर्गीय रतनचंद शहा यांच्या प्रतिमेचे पूजन करून व दीपप्रज्वलन करण्यात आले. याप्रसंगी मुख्याध्यापिका स्वाती कांबळे व पर्यवेक्षक जयेश शिरढोणे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच स्पर्धेत भाग घेतलेल्या शाळांचे प्रतिनिधी उपस्थित होते. स्पर्धेसाठी ७५०पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी श्राविका संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी देवई शहा व मुख्याध्यापिका स्वाती कांबळे, स्पर्धा प्रमुख हारके आणि आळंगे यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

शक्ती कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी शिवसेना महिला आघाडीची स्वाक्षरी मोहीम

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-

उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या महिला व युवती आघाडीच्या वतीने सोमवारी जिल्हा परिषदेच्या उपोषण गेटसमोर निदर्शने करून स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेतून शक्ती कायद्याची अंमलबजावणी तातडीने करण्यात यावी, अशी मागणी या आंदोलनाद्वारे करण्यात आली.

शिवसेनेच्या उपनेत्या अस्मिता गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात युवती आघाडीच्या जिल्हाप्रमुख पूजा खंदारे, युवती आघाडी शहराच्या रेखा आडकी, सुनंदा माने, सुनिता थोरात, श्रीदेवी बगले, शशिकला चीवडशेट्टी, मंगल थोरात, जोहरा बेन रंगरेज, जयश्री पाटील, मीना सुरवसे, रमा सरवदे, सुनंदा माने, प्रियांका वाघमोडे आदी सहभागी झाल्या होत्या.

यावेळी माध्यमांशी बोलताना अस्मिता गायकवाड म्हणाल्या, उद्धव ठाकरे हे राज्याचे मुख्यमंत्री असताना त्यांनी शक्ती कायद्याला विधानसभेत एकमताने मंजुरी दिली होती पण त्याची अद्यापही अंमलबजावणी झालेली नाही. म्हणून या झोपलेल्या सरकारला जागे करण्यासाठी महिला आघाडीच्या वतीने स्वाक्षरी घेतली आहे.

विश्वकर्मा फौंडेशनच्या वतीने २२ सप्टेंबरला उद्योजक व्हा शिबीर

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-

विश्वकर्मा फौंडेशनच्या वतीने उद्योजक व्हा शिबिराचे आयोजन दिनांक २२ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते ५ यावेळेत सोलापूर येथे करण्यात आल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष संतोष गायकवाड यांनी दिली. शिबिरात मी उद्योजक होऊ शकतो का कोणते गुण उद्योजक होण्यासाठी लागतात ते कसे आत्मसात करावे उद्योग संधी कशी शोधावी या विषयाची मांडणी नागेश कोकरे करतील गारमेंट व्यवसाय संजय सरवदे इ गव्हर्नन्स व इ कॉमर्स इ मार्केटिंग अमित कामतकर, शेअर मार्केट व बँक रवी हलजगीकर, जीवन विमा लहू नरळे, आरोग्य विमा संतोष जाधव या व्यवसायात असलेल्या संधीची माहिती देतील शेती व शेतीला पूरक व्यवसाय जसे पशुपालन गाय शेळी मेंढी कोंबडी डॉ संतोष थिटे व ट्रेडिंग व एजन्सी या विषयात ओंकार कुलकर्णी अश्या ५० उद्योगाची माहित तज्ञ व्यक्तीकडून दिली जाणार आहे. बँक लोन कागदपत्रे व प्रोसेस या विषयात जनता बँकेचे जय कोकाटे शासकीय योजनांची याची माहिती विविध महामंडळाचे अधिकारी देणार आहेत. तरी जास्तीत जास्त युवक युवती महिला पुरुष यांनी या शिबिराचा लाभ घ्यावा चांगल्या नियोजनासाठी पूर्व नोंदणी आवश्यक असून ९४२२०६५८५७, ८०८०९३३२०२ या नंबरवर किवा भैय्या चौक गायकवाड बिल्डींग येथे संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष संतोष गायकवाड यांनी केले आहे

सुप्रभात

आजचा दिवस

वार : मंगळवार
दि. २७ ऑगस्ट २०२४
विक्रम संवत् २०८०,
शके - १९४६
संवत्सर - क्रोधी नाम
मास - श्रावण
कृ. नवमी (२५.३२)
ऋतु - शरद
नक्षत्र- रोहिणी (१५.३७)
योग - हर्षण (२०.३०)
करण - तैतिल (१३.५२)
सुर्योदय - ०६.२५
सूर्यास्त - १८.५५
दिनविशेष - गोपाळकाला
मंगलागौरी पूजन
....राहू काल....
रविवार : दु.४.३० ते ६.००
सोमवार : स. ७.३० ते ९.००
मंगळवार : दु. ३ ते ४.३०
बुधवार : दु. १२ ते १.३०
गुरुवार : दु. १.३० ते ३.००
शुक्रवार : स.१०.३० ते १२
शनिवार : स. ९ ते १०.३०

राशीभविष्य

मेष : व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही.

वृषभ : नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हम खास यश मिळेल. दांम्पत्य जीवन सुखी राहील. व्यवहारात सावधानी बाळगा.

मिथुन : जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत.

कर्क : आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे.

सिंह : संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले.

कन्या : लोकांशी संपर्क वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल.

तुळ : राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा. व्यापार फायदेशीर राहणार आहे.

वृश्चिक : उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पूर्ण होण्याचा योग आहे.

धनु : प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. विरोधकांपासून सावध रहा.

मकर : व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल.

कुंभ : सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. नौकरीमध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे. निष्कारण चिंता निर्माण होईल.

मीन : कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल. आर्थिक चिंता निर्माण होईल.

बालविवाह रोखण्यासाठी नागरिकांनी जागरूक रहावे : जिल्हाधिकारी

बालविवाह निर्मूलन जिल्हा कृती दल आराखड्यास मंजुरी

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-

बालविवाह निर्मूलन प्रकल्प अंतर्गत सर्व संबंधित शासकीय विभाग बालविवाह होऊ नयेत यासाठी प्रयत्न करत असतात. १८ वर्षे खालील मुलीचा व २१ वर्षे खालील मुलाचा विवाह करणे हा कायद्याने गुन्हा आहे. तसेच प्रत्येक मुलगा किंवा मुलगी यांना शिक्षण घेण्याचा तसेच सुखाने बालपण जगण्याचा पूर्ण अधिकार आहे. त्यामुळे जिल्ह्यात एकही बालविवाह होणार नाही यासाठी सर्व शासकीय यंत्रणा तसेच नागरिकांनीही जागरूक राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात बालविवाह निर्मूलन करण्याच्या हेतूने जिल्ह्यातील विभाग निहाय जिल्हा कृती आराखडा तयार करण्याबाबत दि. २३ रोजी आयोजित जिल्हा कृती दलाच्या बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद बोलत होते. यावेळी जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी रमेश काटकर, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अतुल वाघमारे , सहाय्यक आयुक्त कौशल्य विकास विभाग श्री.नलवडे, बाल कल्याण समिती अध्यक्ष समीर सय्यद, अर्चना मस्के, पोलीस अधीक्षक कार्यालय प्रणिती यादव, पोलीस उपनिरीक्षक सोलापूर ग्रामीण अजित कुमार, जिल्हा युवा अधिकारी नेहरू युवा केंद्र सोलापूर गोदावरी राठोड, शिक्षण विस्तार अधिकारी स्वाती स्वामी, जिल्हा समन्वयक चाईल्ड हेल्पलाईन आनंद ढेपे, बालविवाह निर्मुलन प्रकल्प प्रमुख विश्वेश्वर वाघमारे, वरिष्ठ प्रकल्प समन्वयक नंदू जाधव, सिद्धराम गायकवाड आदि उपस्थित होते.

महिला व बाल विकास विभागाच्या वतीने सादर करण्यात आलेला जिल्हा कृती आराखड्याला जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी मान्यता दिली तसेच या आराखड्याची जिल्ह्यात अत्यंत प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देश त्यांनी दिले. तसेच या आराखड्याचे अंमलबजावणी कशा पद्धतीने केली जात आहे यासाठी गुगलचे फॉर्म भरून त्याची माहिती प्रत्येक महिन्याला सादर करण्याबाबतही त्यांनी निर्देशित केले. प्रारंभी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी रमेश काटकर यांनी बैठकीची प्रस्तावना केली तसेच मागील इतिवृत्त वाचून दाखवले. तसेच एसबीसी-३ बालविवाह निर्मुलन प्रकल्प प्रमुख नंदू जाधव व वरिष्ठ प्रकल्प समन्वयक सिद्धराम गायकवाड यांनी बालविवाह निर्मुलन जिल्हा कृती राखडा विभागनिहाय सादरीकरण केले. सक्षम प्रकल्प अंतर्गत सुरु असलेले उपक्रम शालेय कार्यक्रम पालक विद्यार्थी सत्र तसेच सक्षम युवा शक्ती कार्यक्रम याबाबत माहिती दिली. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी बालविवाह निर्मुलनासाठी एस.बी.सी-३ मार्फत तयार करण्यात आलेल्या पोस्टरचे अनावरण केले. जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अतुल वाघमारे यांनी आभार मानले.

सम्यक आचरण हवे

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-

आपले आचरण सम्यक असावे. सम्यक आचरण असेल तर उत्तम फळ लाभते. आपले भाव श्रेष्ठ असतील तर सम्यकत्वाची प्राप्ती होते, असे प्रतिपादन प्रवचन प्रभाविका साध्वी प्राचीश्रीजी यांनी केले.

सर्व प्रकारचे सुख आपल्याला प्राप्त व्हावे अशी मनुष्याची प्रबल इच्छा असते .या सुखप्राप्तीचे मार्ग शोधण्याचा तो प्रयत्न करतो.काही व्यक्ती ऐश्वर्य संपन्न जीवन जगत असतात.परंतु हे ऐश्वर्य त्यांना कसे प्राप्त झाले ही माहिती घेण्याचा प्रयत्न करा. काय कारण असावे त्यामागे याचा शोध घेतल्यास लक्षात येईल की त्याचे कर्म या जन्मीचे अथवा पूर्वजन्मीचे. दानाची भावना श्रेष्ठ असेल तर फळ देखील तात्काळ मिळते. देणारा उदार मनाने देतो आणि घेणारा देखील संतुष्ट होतो. यामुळे एक उत्कृष्ट योग जुळून येतो आणि दानाचे फळ तात्काळ मिळते.अशा वेळेस देवता देखील स्वर्गातून पंचदिव्याची वृष्टी करत असतात. देवता प्रसन्न होऊन अहोदानमची घोषणा करतात. विवेक पूर्वक दान करा. सुपात्र दान केल्यामुळे जीव मोक्ष मार्गाला जाऊ शकतो.दान देताना भाव शुध्द आणि उत्तम असावेत.पर्युषण पर्व काळात पौषद करा. पौषद म्हणजे साधुसंत ज्याप्रमाणे जीवन जगतात त्याप्रमाणे जगणे होय.श्रावक श्राविकांनी महिन्यातून सहा पौषद करावेत असे शास्त्रात सांगितलेले आहे. परंतु आपण वर्षातून एकही करत नाही,असे नको. शारीरिक क्षमता असणाऱ्यांनी पौषद करावे. धर्मकार्यात आळस करू नका. येणाऱ्या संधीचा फायदा घ्या.

संक्षिप्त वृत्त

जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धेमध्ये बार्शीतील सुयश विद्यालयाच्या खेळाडूंचे घवघवीत यश

बार्शी, दि. २६ ऑगस्ट-

क्रीडा व युवक सेवा संचानालय महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गतजिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, सोलापूर जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धा २०२४-२५ वालचंद इंजिनिअरिंग कॉलेज सोलापूर, येथे दि. २५ ऑगस्ट रोजी संपन्न झाल्या. या स्पर्धेमध्ये जिल्ह्यातील नामांकित संघासोबत लढत देत सलग दुसऱ्या वर्षी आपले नाव जिल्ह्यामध्ये पहिल्या तीन मध्ये आम्हीच आहोत हे सिद्ध केले. फुटबॉल संघ याप्रमाणे- शंभूराजे डोईफोडे (कर्णधार), रुद्र राऊत, सात्विक वायचळ, अनय जाधव, शौर्य गवळी, शिवम पवार, आर्यन जाधवर, अरहान पटेल, पवन जगताप, सुमित माने, सोहम साखरे, आरहान खान, राजवर्धन काशीद, यशवर्धन कांबळे, केशव कुपाडे, चिन्मय जाधव, युवराज चौधरी. या विद्यार्थ्यांना प्रसाद नलवडे यांनी विशेष मार्गदर्शन केले. क्रीडाशिक्षक अतुल जाधव यांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. संघाने जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धेत तिसरा क्रमांक पटकावल्याबद्दल सुयश विद्यालयाचे संस्थापक शिवदास नलवडे, संस्थेच्या मार्गदर्शिका प्रतिभा नलवडे, मुख्याध्यापक सागर मंडलिक यांनी अभिनंदन केले.

वखारिया विद्यालयात सखी सावित्री समिती अंतर्गत विद्यार्थिनींना स्व: संरक्षणावर मार्गदर्शन

बार्शी, दि. २६ ऑगस्ट-

तालुक्यातील उपळे दुमाला-येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित वखारिया विद्यालयात राज्य शासनाच्या परिपत्रकानुसार मुख्याध्यापक दयानंद रेवडकर सर यांनी दि. २४ ऑगष्ट रोजी सखी सावित्री समिती उपक्रमांतर्गत कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आरोग्य सेविका श्रीमती नवले व माने मॅडम यांनी वाढत्या वयानुसार होणारे शारीरिक बदल, मासिक पाळी तसेच गुड टच बॅड टच या विषयी मार्गदर्शन केले. विद्यालयातील सहशिक्षिका तवले आणि डोईफोडे यांनी प्रथम मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी विद्यालयातील सर्व पाचवी ते दहावी च्या विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

सोजर प्रशालेत संस्कृत दिन उत्साहात

बार्शी, दि. २६ ऑगस्ट-

यशोदा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सोजर इंग्लिश स्कूल, माध्यमिक विभागाच्या शवतीने संस्कृत दिनानिमित्त विविध कार्यक्रम ांचे आयोजन करण्यात आले. संस्कृत विषयतज्ज्ञ शोभाताई रणशूर यांच्या हस्ते संस्कृत व्याकरणकर्ता महर्षि पाणिनि आणि आद्यकवि कालिदास यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. दहावीतील विद्यार्थी निखिल ढोरे आणि जियान शेख यांनी सूत्रसंचालन केले. सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी संस्कृत भाषेतून समूहगीते, देशभक्ती गीते, संस्कृत कवी-लेखक या विषयीची माहितीपर भाषणे, सुभाषिते त्याचबरोबर प्रसाद सहस्रबुद्धे लिखित आणि दिग्दर्शित शठं प्रति शाठ्यम ही विनोदी संस्कृत लघुनाटिका सादर केली. सचिन शिंदे यांनी विद्यार्थी कसा असावा याबद्दल संस्कृतमधून माहिती दिली. संस्कृत दिनाच्या निमित्ताने वस्तू प्रदर्शनाचेही आयोजन करण्यात आले होते. रणशूर यांनी संस्कृत गीताचे सादरीकरण केले. सूत्रसंचालन प्रसाद सहस्रबुद्धे यांनी केले. संगीत संयोजन तुषार गदगी यांनी केले. याप्रसंगी मुख्याध्यापक पोळे, मुख्याध्यापिका नेटके उपस्थित होते. आभार प्रगती लोमटे यांनी मानले.

कुर्डूवाडी येथील आदर्श पब्लिक स्कूलच्या दोन खेळाडूंची जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड

कुर्डूवाडी, दि. २६ ऑगस्ट-

२४ ऑगस्ट २०२४ रोजी टेंभुर्णी येथे झालेल्या शालेय तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत आदर्श पब्लिक स्कूल कुर्डूवाडी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला असता दोन विद्यार्थ्यांने स्पर्धेत नेत्रदीपक कामगिरी करत यश संपादन केले. यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांची पुढे होणाऱ्या शालेय जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धे साठी निवड झाली आहे. यश संपादन केलेल्यामध्ये १४ वर्ष वयोगट मुले रणवीर चोपडे ४१ किलो वजनी गटात प्रथम क्रमांक १४ वर्ष वयोगटातच मुलीमध्ये नयन उबाळे हीने - ६२ किलो वजनी गटात प्रथम क्रमांक मीळवला आहे. या विद्यार्थ्यांला क्रीडाशिक्षक अहमद मुलाणी,,डिसले सर यांचे अनमोल असे मार्गदर्शन लाभले या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक अमोल सुरवसे, प्रकल्प संचालिका पूजा सुरवसे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

विरोधक विकासकामांबाबत बोलत नाहीत

खा. धनंजय महाडिक : फेक नॅरेटिव्ह सेट करून लोकांच्या भावना दुखावण्याचे काम सुरु

तभा वृत्तसेवा,
बार्शी, दि. २६ ऑगस्ट-

केंद्र व राज्य सरकारच्या लोककल्याणकारी योजनांबद्दल विरोधकांकडून अपप्रचार केला जात आहे. जाती-जातीमध्ये तेढ निर्माण करायची, फ ेक नॅरेटिव्ह सेट करुन लोकांच्या भावना दुखावण्याचे काम विरोधक करत आहेत. त्याकडे लक्ष न देता आपल्याला विकासाशी देणे-घेणे असले पाहिजे, असे सांगत केंद्र व राज्य सरकारच्या लोककल्याणकारी योजना जनतेपर्यंत पोहोचविण्याची गरज आहे. युवकच ही जबाबदारी सक्षमपणे पार पाडू शकतात, असे मत राज्यसभेचे खासदार धनंजय महाडिक यांनी व्यक्त केले.

बार्शी भाजपाच्यावतीने ग्रामीण भागातील युवक संवाद मेळाव्याचे आयोजन माऊली लॉन्स येथे करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

खा. महाडिक म्हणाले, राहुल गांधी, उध्दव ठाकरे, नाना पटोले, वडेट्टीवार एखादया विकास कामाबाबत, प्रकल्पाबाबत बोलललेले तुम्ही ऐकले आहे का? फक्त द्वेष आणि भावना भडकावायचे काम ते करतात. शिंदे, फडणवीस, अजितदादा रोज नवीन योजना आणत आहेत. राज्याचा विकास झाला पाहिजे, या दृष्टीकोनातून ते काम करत आहेत. या विकास प्रक्रियेमध्ये बार्शी तालुकासुध्दा सहभागी झाला पाहिजे. आ. राजेंद्र राऊत म्हणाले, आरक्षणाचा मुद्दा हा आताचा नसून चाळीस वर्ष जुना आहे. कुठे गेले लोकसभा निवडणुकीत मते घेणारे? ओबीसीतून आरक्षण दयायला उध्दव ठाकरे, शरद पवार, नाना पटोले यांचा होकार आहे का? एवढे खासदार आता निवडून गेले? कुठे गेले? विधानसभेनंतर पण असेच होईल. मराठा समाजाचे आंदोलन विरोधक असेच गुंडाळून ठेवणार. कै. अण्णासाहेब पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी आत्म हत्या केली. त्यावेळी कोणाच्या हातात सत्ता होती? चार-चार वेळेस मुख्यमंत्री कोण होते? यांच्या हातातली सत्ता गेली की, मराठा आरक्षणाचा विषय पुढे येतो, असे सांगितले. राऊत पुढे म्हणाले, जरांगे दादांना सरकारने प्रत्येकवेळी मानसन्मान दिला. सरकारने कुणबीच्या नोंदी हुडकून काढल्या. कुठल्या सरकारच्या काळात निघाल्या सांगा? सरकारने मराठा सम ाजाला स्वतंत्र आरक्षण दिले. ओबीसी समाजबांधवांना मिळणाऱ्या सवलती म राठा समाजबांधवांना दिलेल्या आहेत. पण मुद्दामहून भाजपा व देवेंद्र फडणवीस यांना टार्गेट करण्याचे काम केले जातेय.

चार हजार कोटींचा बार्शीला निधी

आमदार राजेंद्र राऊत यांच्या प्रयत्नातून विविध योजनेंतर्गत बार्शी शहर व तालुक्याच्या विकासासाठी सुमारे ४ हजार कोटी रुपये मिळाल्याचे युवा नेते ॲड. रणवीर राऊत यांनी सांगितले.

विरोधकांना विकास बघवेना : आ. राऊत

बार्शीत झालेली विकासकामे विरोधकांना बघवत नसल्याने विष पेरले जात आहे. त्यामुळे युवकांनी गैरसमज करुन घेऊ नये, असे आवाहन आ. राऊत यांनी केले. विद्यमान सरकारच्या माध्यमातून बार्शी शहर व तालुक्यात भरीव विकासकामे झाल्याचे सांगून वर्षभरात जर ५० हजार एकर जमीन बागायत नाही झाली तर राजकारण सोडून देतो, अशी प्रतिज्ञा त्यांनी केली.

होम मिनिस्टर स्पर्धेत रिंकू देशमुखांना सोन्याची नथ, उमा घाडगे पैठणीच्या मानकरी

तभा वृत्तसेवा,
करकंब, दि. २६ ऑगस्ट-

अभिछाया प्रतिष्ठानच्यावतीने नागपंचमी फेस्टिवलच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या होम मिनिस्टर स्पर्धेत रिंकू देशमुख सोन्याची नथ, उमा घाडगे पैठणीच्या मानकरी ठरल्या तर श्रावणी ग्रुपने ग्रुप डान्स स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला.

नागपंचमी फेस्टिवल निमित्त ग्रुप डान्स,फनी गेम्स व इतरही स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धा करकंब येथील अमोल विद्यालय येथे पार पडल्या.विजेत्यांना स्नेहप्रभा शेळके, अरुणादेवी देशमुख, सुरेखा शेळके, शुभांगी शेळके, रुपाली स्वामी, सुनिता देशमुख, दिपाली बोचरे, सारिका शिरसट, दिपाली नरसाळे, ज्योती कवडे यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. या स्पर्धांमध्ये जवळपास १७० महिलाभगिनींनी सहभाग घेतला.निवेदन एन. पी. सर व सिनेअभिनेत्री चैताली क्षिरसागर यांनी केले.अशोक काळे, राजेंद्र कुंभार यांनी परिक्षक म्हणून काम पाहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपक उंबरदंड यांनी तर आभार प्रा.किसन सलगर यांनी मानले. होम मिनिस्टर प्रथम विजेत्या उमा घाडगे, उपविजेत्या रिंकू देशमुख, ग्रुप डान्स प्रथम क्रमांक, श्रावणी मंगळागौर ग्रुप, द्वितीय शाकंभरी ग्रुप तृतीय, लावण्या वास्ते, उत्तेजनार्थ समिक्षा तेली, फनीगेम्स प्रथम लतिका सोमण, द्वितीय शुभदा धतिंगे, तृतीय प्रितम मोरे, उत्तेजनार्थ प्रज्ञा ताटे, चिठ्ठ्यांमधून काढण्यात आलेल्या विजेत्या स्नेहा नरुटे, सुजाता व्यवहारे, अश्विनी शेटे.

सोलापूर सोशल फाउंडेशनतर्फे भंडीशेगाव येथे वृक्षारोपण

तभा वृत्तसेवा,
करकंब, दि. २६ ऑगस्ट-

भंडीशेगाव (ता. पंढरपूर) येथे सोलापूर सोशल फाउंडेशनच्यावतीने डॉ. अनिल कंडरे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

अध्यक्षस्थानी जिल्हा बँकेचे शाखा व्यवस्थापक समाधान मलपे होते. विविध निमित्त साधून भंडीशेगाव येथे सोलापूर सोशल फाउंडेशनच्यावतीने नेहमीच वृक्षारोपण करण्यात येत आहे, असे डॉ. हेडगेवार वाचनालयाचे अध्यक्ष महेंद्र येलपले यांनी सांगितले. पाच वर्षांत किमान २० हजार वृक्षांची लागवड केली आहे. वृक्षारोपणासाठी आ. सुभाष देशमुख, अजित कंडरे यांचे सहकार्य मिळत आहे. गणेश पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. मंगेश ननवरे, डॉ. अनिल कंडरे, संतोष ननवरे, सावता ननवरे, डॉ. श्रीधर येलमार, विलास येलमार, दत्तात्रय येलमार, राहुल पाटील,ज्ञानेश्वर गिड्डे,अनिल जाधव, अविनाश तकतोडे, चंद्रशेखर कोळवले, रामभाऊ येलमार यांच्यासह पदाधिकारी, मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राज्यात महिलांवर वाढते अत्याचार

पंढरपूर तालुका काँग्रेसकडून निषेध; विविध मागण्यांचे दिले निवेदन

तभा वृत्तसेवा,
करकंब, दि. २६ ऑगस्ट-

राज्यात दिवसेंदिवस म हिलांवर अत्याचार वाढत आहेत.बदलापूरसारख्या अनेक घटना राज्यात घडत आहेत. राज्यातील कायदा सुव्यवस्था ढासळली असून यास राज्यातील महायुती सरकारच जबाबदार आहे. या घटनांचा निषेध पंढरपूर तालुका काँग्रेस कमिटीकडून करण्यात आला.

सरकारचा निषेध नोंदवून काँग्रेसकडून अनेक मागण्या करण्यात आल्या. महाविकास आघडीकडून २४ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र बंद पुकारण्यात आला होता.परंतु उच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपामुळे हा बंद मागे घेण्यात आला. काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना उद्धव ठाकरे गटाकडून ठिकठिकाणी महायुती सरकारचा निषेध नोंदवण्यात येत आहे. पंढरपूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हनुमंत मोरे यांनी याबाबतचे निवेदन करकंब पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर कुंजीर यांना दिले.

बदलापूर, कोलकत्ता, कोल्हापूर, अकोला येथील बलात्कार व अत्याचार करणाऱ्या नराधमांना फाशीची शिक्षा सुनावण्यात यावी, पीडित व त्यांच्या कुटुंबीयांना संरक्षण देण्यात यावे सदरच्या शाळेची मान्यता रद्द करण्यात यावी, महिलांसाठी सुरक्षित बहिण योजना राबवून त्यासाठीची कार्यप्रणाली आखण्यात यावी, यासह विविध मागण्या करण्यात आल्या. याप्रसंगी मनोज गावंधरे, संजय थिटे, पिंटू लोंढे, अशोक अवताडे, नवनाथ घोडके, भैय्या जमदाडे, हनुमंत नाईकनवरे, महादेव गायकवाड यांच्यासह काँग्रेस पक्षाचे बहुसंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

> शाळा परिसर, शिक्षक स्टाफ, मुख्याध्यापक यांच्या कार्यालयात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात यावेत, राज्यातील बेपत्ता मुलींच्या शोधासाठी विशेष पथक नेमण्यात यावे, विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी सुरक्षा पथक नेमण्यात यावे.
>
> **- हणमंत मोरे,** तालुकाध्यक्ष, काँग्रेस कमिटी, पंढरपूर

पंकज पिसाळ यांची द्राक्ष बागायतदार संघाच्या संचालकपदी निवड

तभा वृत्तसेवा
बार्शी, दि. २६ ऑगस्ट-

तालुक्यातील पिंपळगाव (पान) येथील प्रगतशील बागायतदार तथा द्राक्ष उत्पादक पंकज प्रकाश पिसाळ यांची म हाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघ पुणे या संस्थेच्या संचालक पदी सोलापूर विभागातून सन २०२४ ते २०२७ या तीन वर्षांकरिता निवड झाली आहे.

संघाचे अध्यक्ष शिवाजीराव पवार यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी मंडळाच्या सभेमध्ये संचालक म्हणून पिसाळ यांची निवड करण्यात आली. द्राक्ष बागायतदारांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे निवडीनंतर पंकज पिसाळ यांनी सांगितले. या निवडीबद्दल पिसाळ यांचे अभिनंदन होत आहे.

हंजगी येथील प्राथमिक आश्रमशाळेत वृक्षारोपण

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २६ ऑगस्ट-

अक्कलकोट तालुक्यातील हंजगी येथील वाल्मिकी बालक प्राथमिक आश्रमशाळेत अक्कलकोट विधानसभा नवडणुकीसाठी इच्छुक असलेल्या महिला उमेदवार पूजा राहुल पाटील यांच्याकडून राधिका सिंदगी यांच्या प्रथम वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण आणि आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी भोजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

प्रास्ताविक मुख्याध्यापक यशवंत पाटील यांनी केले तर सूत्रसंचालन चौधरी यांनी केले. राहुल पाटील यांच्याकडून आभार मानण्यात आले. यावेळी पूजा पाटील, राहुल पाटील, चंद्रशेखर निमल, प्रशालेचे मुख्याध्यापक यशवंत पाटील, माजी सरपंच उमेश पाटील, माजी उपसरपंच मोहसीन मुल्ला, युवा नेता संतोष म्हमाणे, प्रगतशील शेतकरी म हादेव सिंदगी, दत्ता साठे, निंगणा व्हनमाने, सहशिक्षक बिराजदार, होसुरे, लोकारपुरे, स्वामी, हडपद, पाटील, बमगोंडा, सागर सिंदगी, सतीश सिंदगी, संतोष सिंदगी, रेणुका सिंदगी, सत्यमा सिंदगी, कल्पना सिंदगी, महानंदा सिंदगी, शांताबाई शिवदे, पार्वती सिंदगी, विजय शिवदे आदी मान्यवर उपस्थित होते.

गटातटाच्या राजकारणाला जनता कंटाळली

हिंगणीचे माजी सरपंच हनुमंत पाटील : ग्रामसंवाद मेळाव्यात खंत, प्रा. रामदास झोळ यांना पाठिंबा

तभा वृत्तसेवा,
करमाळा, दि. २६ ऑगस्ट-

करमाळा तालुका गटातटाच्या राजकारणाला कंटाळला असून सर्वसामान्य जनता, शेतकरी यांना न्याय देऊन विकासाचे नवे पर्व सुरू करण्यासाठी, तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी, प्रा.रामदास झोळ यांना हिंगणी गावाचा जाहीर पाठिंबा देत असल्याचे मत हिंगणी गावचे माजी सरपंच हनुमंत पाटील यांनी व्यक्त केले.

हिंगणी गावामध्ये प्रा. रामदास झोळ सर यांचा ग्रामस्थांच्यावतीने जन संवाद म ेळावा २१ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यामध्ये विविध गटाम धील कार्यकर्त्यांनी करमाळा तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रा. रामदास झोळ सर यांना पाठिंबा देऊन झोळ परिवारामध्ये प्रवेश केला आहे.यावेळी हिंगणी ग्राम स्थांच्या जनसंवाद दौऱ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात सत्काराला उत्तर देताना प्रा. रामदास झोळ सर म्हणाले की, करमाळा तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कटिबद्ध असून, एका सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातून आपण शैक्षणिक संकुलाची उभारणी करून विद्यार्थ्यांना न्याय देण्याचे काम केले आहे. करमाळा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या उसाला योग्य भाव मिळून देऊन त्यांच्या बिलासाठी आंदोलन करून न्याय मिळवून देण्याचे काम केले आहे. करमाळा तालुक्यातील विकासाच्या प्रश्नावर आपण येणारी विधानसभा निवडणूक लढवणार असून करमाळा तालुक्यातील वीज, रस्ते पाणी व आरोग्य याचबरोबर रोजगार निर्मिती करण्यासाठी एमआयडीसी च्या माध्यमातून विविध उद्योग आणून शिक्षणाची सोय करण्यासाठी मोठे शिक्षण संकुल उभा करणार आहे. त्यामुळे करमाळा तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी आपण मला मतदान रुपी आशीर्वाद देताल अशी म ला खात्री आहे . आपण टाकलेला विश्वास मी नक्कीच सार्थ करून असा विश्वास प्रा. रामदास झोळ सर यांनी व्यक्त केला आहे.

हिंगणी गावचे माजी सरपंच हनुमंत (तात्या पाटील यांचा व सर्व सम र्थकांना घेऊन प्रा. रामदास झोळ सर यांना विधानसभेसाठी पाठिंबा दिला आहे. यावेळेस स्वाभिमानी शेतकरी संघटना कार्याध्यक्ष (सोलापूर जिल्हा) रवी गोडगे तसेच गावातील गणेश बाबर (वस्ताद), अंगद बाबर यांनीही कार्यकर्त्यांना घेऊन पाठिंबा जाहीर केला आहे. या कार्यक्रमामध्ये जिल्हा परिषद शाळा समि ती व्यवस्थापन माजी अध्यक्ष प्रवीण बाबर, विविध कार्यकारी सोसायटी हिंगणी माजी संचालक तानाजी बाबर, दत्तात्रेय तावरे, रज्जाक शेख, नामदेव बाबर तसेच माजी सदस्य ग्रामपंचायत हिंगणी रज्जाक शेख, हरी रोकडे, रोहिदास डोकडे, परशुराम शिंदे, किसन बाबर, श्याम जाधव, ग्राम पंचायत सदस्य जयकुमार गलांडे व हिंगणी गावातील ग्रामस्थ हिरालाल गायकवाड, शब्बीर शेख, रफिक शेख, रज्जाक शेख, अक्षय मोरे, अक्षय तुपे, नवनाथ बाबर, अंकुश बाबर, अमोल बाबर, हरी रोकडे, ज्ञानदेव गायकवाड, गणेश बाबर, बापूसाहेब बाबर, रावसाहेब बाबर, सोमनाथ बाबर, रवींद्र बाबर, अशोक बाबर, योगेश बाबर, गणेश गायकवाड, जीवन गायकवाड, समाधान गुरव, शाहरुख इनामदार, रोहिदास रोकडे, सागर जाधव, आकाश बाबर, शिवाजी बाबर,अजय गुरव, रामचंद जाधव, नामदेव धनावडे, शिवाजी जाधव, गणेश सर्जे, बिभीषण धनावडे,अमोल पाटील, उमेश सर्जे, सूरज शेख, तौफिक शेख, अमर जाधव, राजेंद्र बाबर आणि सर्व कार्यकर्त्यांनी पाठिंबा दर्शिवला आहे. हलगीचा नाद करत मोठ्या जल्लोषात विकासप्रिय सुशिक्षित नेतृत्व असलेले प्रा. रामदास झोळ यांचे हिंगणी ग्रामस्थांच्या वतीने स्वागत करण्यात आले असून झोळ सर यांना गावातून जास्तीत जास्त मतदान देऊ अशी ग्वाही हिंगणी ग्रामस्थांनी दिली आहे.

सर्वत्र चांगला प्रतिसाद

या येणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने प्रा. रामदास झोळ त्यांच्या धर्म पत्नी मायाताई झोळ यांचे करमाळा तालुक्यातून उत्स्फूर्त स्वागत होत असून आता विकासासाठी जनतेने निवडणूक हातात घेतली आहे. हिंगणी ग्रामस्थांमधून मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद व पाठिंबा हीच खरी यशाची नांदी नक्कीच ठरणार आहे.

CMYK

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

प्रा. झोळ यांची वडाचीवाडी येथे कॉर्नर बैठक

तभा वृत्तसेवा,
करमाळा, दि. २६ ऑगस्ट-

करमाळा विधानसभा क्षेत्रातील वाघाचीवाडी या गावामध्ये दत्तकला शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. रामदास झोळ यांनी कॉर्नर बैठक घेतली. या भेटीदरम्यान तालुक्यात व्यावसायिक शिक्षणाच्या अडचणी,युवकांच्या रोजगाराच्या अडचणी, आरोग्यविषयक समस्या यावर चर्चा झाली.

यावेळी उपस्थित ग्रामस्थांनी प्रा. झोळ यांनी प्रा. झोळ फाउंडेशनच्या माध्यमातून करत असलेल्या सामाजिक कामाबद्दल समाधान व्यक्त करून त्या कामाला आणखीन गती देण्यासाठी, शेतकऱ्यांचा, युवकांचा आवाज विधानसभेत पोहचवण्यासाठी येणाऱ्या विधानसभा निवडणुकीमध्ये खंबीरपणे सरांच्या पाठीमागे उभे राहण्याचा निर्धार व्यक्त केला. यावेळी अध्यक्ष दत्ता वाघ, उपाध्यक्ष समाधान कापसे, समाधान वाघ, विकास बोबडे, भैय्या वाघ, अंकुश लोहकरे, दिलीप गुटाळ, भाऊ वाघ, नानासो हिरगुडे, साधू वाघ, दत्ता वाघ, तुकाराम अरबले, प्रमोद गाढवे, कल्याण महाराज वाघ, वैजीनाथ लोहकरे, लक्ष्मण वाघ आदींसह गावातील वडीलधारी मंडळी युवक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

संक्षिप्त वृत्त...

धर्मवीर आनंद दिघे यांच्या पुण्यतिथीनिमित्त नातेपते येथे शिवसेनेतर्फे अभिवादन

नातेपुते, दि. २६ ऑगस्ट-

शिवसेनेचे दिवंगत नेते धर्मवीर आनंद दिघे यांच्या पुण्यतिथीनिमित्त माळशिरस तालुका शिवसेना शिंदे गट यांच्या वतीने नातेपुते येथील मेन पेठेतील शिवसेना कार्यालयात आनंद दिघे यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले व नंतर ग्रामीण रुग्णालयात जाऊन जिल्हा नियोजनमधून काय देता येईल, याबाबत तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली. यावेळी शिवसेना माळशिरस तालुकाप्रमुख सतीश सपकाळ, दत्तामाई कचरे, तालुका उपाध्यक्ष संतोष गोरे, शहराध्यक्ष पै. निखिल पलंगे, विशाल लांडगे, मंगेश लांडगे, राजू वणवे, शेखर लांडगे, राहुल अडगळे, गणेश लांडगे, शिवम लांडगे, संजय दणाणे, संतोष कांबळे, अजित पाटील, सलमान काझी, सचिन दौलताडे, शंतनू पलंगे, शुभम लांडगे, अमित लांडगे आदी शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बदलापूर घटनेतील आरोपीवर तात्काळ कारवाई करण्याची राष्ट्रवादी महिला काँग्रेसची मागणी

पिलीव, दि. २६ ऑगस्ट-

बदलापूर येथील शाळेतील चिमुरड्या मुलीवर झालेल्या लैंगिक अत्यचाराच्या घटनेतील आरोपीला ताबडतोब अटक करुन फाशीची शिक्षा देण्यात यावी तसेच महाराष्ट्रात पुन्हा अशा प्रकारच्या घटना घडू नयेत म्हणून आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी महिला काँग्रेस अजित पवार गटाच्या पिलीव शहर प्रमुख पूनम भैस यांनी निवेदनाद्वारे पिलीव पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक यांच्याकडे केली आहे. हे निवेदन हवालदार अमित जाधव यांनी स्वीकारले. यावेळी पिलीव प्राथमिक आरोग्य केंद्रातील आशासेविका तसेच दामोदर लोखंडे, अतुल नष्टे, प्रमोद भैस, संजय पाटील, सुजित सातपुते, अनंता जामदार उपस्थित होते.

शेटफळ जिल्हा परिषद शाळेत दहीहंडी उत्सव

करमाळा, दि. २६ ऑगस्ट-

भारतीय सणांचे महत्त्व व उत्तम आरोग्यासाठी आहाराची माहिती विद्यार्थ्यांना देत शेटफळ (ता. करमाळा) येथील जिल्हा परिषद शाळेत दहीहंडी उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी कृष्ण व सवंगड्याचा वेश धारण करून शाळेसमोर उभा केलेली दहीहंडी कृष्णाची वेशभूषा केलेल्या पृथ्वीराज मस्के याने फोडल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला. मुख्याध्यापक सुनील गलांडे यांनी समतेची व एकात्मतेची शिकवण देणारा दहीहंडी उत्सव त्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले. यावेळी महेश दगडे यांनी हानिकारक असलेले, कित्येक दिवस पूर्वी तयार केलेले, वेगवेगळे रसायन वापरलेले आकर्षक पॅकिंगमधील फास्ट फूड खाण्याचे दुष्परिणाम विद्यार्थ्यांना सांगितले तर ग्रामीण भागातील सहज उपलब्ध असलेला रानमेवा, सुकामेवा, दही, दूध, तूप लोणी, याचे आहारातील महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. कार्यक्रमाला शिक्षक शिवाजी शिंदे, संजीवनी गलांडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष उपाध्यक्ष सदस्य व पालक व परिसरातील लोक बहुसंख्येने उपस्थित होते.

जेऊरच्या इरा पब्लिक स्कूलमध्ये दहीहंडी

करमाळा, दि. २६ ऑगस्ट-

जेऊर (ता. करमाळ) येथील इरा पब्लिक स्कूलमध्ये दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सुरुवातीला राधा कृष्णाची आरती करून दहीहंडीचा उत्सव सुरू करण्यात आला. कृष्ण जन्माष्टमीच्या कार्यक्रमांमध्ये काही विद्यार्थ्यांनी कृष्ण आणि राधा यांच्या भूमिका साकारल्या होत्या. यावेळी कृष्णाच्या वेशभूषेत शर्विल माने, राजवीर पोळ, शिव धुमाळ, श्लोक मत्रे, स्वरांश शेटे, श्लोक तोडकर हे विद्यार्थी आले होते तर राधेच्या भूमिकेत श्रुती मोरे, अंकिता आदलिंग, शिवानी फरतडे, मृण्मयी चव्हाण, अमरीता पाटील, संस्कृती वाघमोडे या विद्यार्थिनी आल्या होत्या. इतर विद्यार्थीही कृष्णाच्या सवंगड्यांमाणे तयार होऊन आले होते. कृष्णाच्या गाण्यावर मुलांनी डान्स केला. यावेळी मुलांना खाऊ वाटप करण्यात आले. यावेळी संस्थेचे सचिव सुनिल अवसरे उपस्थित होते.

पंढरीत १५ दिवसांत दुसऱ्यांदा पूर

पंढरपूरसह ४६ गावांना हाय अलर्ट जारी; चंद्रभागा नदीच्या पाणी पातळीत मोठी वाढ

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर,दि.२६ ऑगस्ट-

उजनी आणि वीर धरणातून मोठ्या प्रमाणावर केलेल्या पाण्याच्या विसर्गामुळे सध्या पंढरपूरला पुराची परिस्थिती निमर्ाण झाली आहे. त्यामुळे पंढरपूर आणि परिसरातील ४६ गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. धरणातून सोडलेल्या पाण्यामुळे येथील चंद्रभागा नदीच्या पाणी पातळीत मोठी वाढ झाली आहे. आणखी पाण्याचा विसर्ग वाढण्याची शक्यता असल्यामुळे गेल्या पंधरा दिवसांमध्ये दुसऱ्यांदा पंढरपूरवर पुराची टांगती तलवार निर्माण झाली आहे. त्यामुळे कोणताही धोका निर्माण होऊ नये म्हणून जिल्हा तसेच स्थानिक प्रशासनाकडून पंढरपूर शहर आणि तालुक्यातील भीमा नदीकाठच्या गावांमधील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

प्रशासन पूर स्थितीवर नियंत्रण ठेवून

येथील प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगोटे यांच्या बरोबरच येथील उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जून भोसले हे पूरसदृश्य परिस्थितीवर नियंत्रण ठेवून आहेत. गेल्या पंधरा दिवसात दुसऱ्यांदा पंढरपुरात पुराची स्थिती निर्माण झाली असून येथील नदीकाठच्या व्यासनारायण तसेच अंबिकानगर वसाहती मधील नागरिकांचे सुध्दा वेळ पडली तर केव्हाही पुन्हा स्थलांतर करण्यासाठी येथील पालिका प्रशासन देखील सज्ज असल्याची माहिती उपमुख्याधिकारी सुनील वाळुजकर यांनी दिली.

सध्या उजनी धरण ओव्हरफॅक झाले असून धरणा मध्ये सुमारे १०७ टीएमसी एवढा पाणी साठा आहे. अशा परिस्थितीमध्ये उजनीच्या वरील धरणातून सध्या उजनी धरणांमध्ये जवळपास एक लाख क्युसेक्सने पाणी येत आहे. त्यामुळे उजनी धरणातून सध्या ७० हजार क्युसेक्स एवढ्या विसर्गाने पाणी भीमा नदी मध्ये सोडले जात आहे. दरम्यान अजूनही या पाण्याचा विसर्ग वाढविण्यात येणार असून तो साधारणपणे एक लाख क्युसेक्स इतका वाढविला जाणार आहे. त्याच पद्धतीने वीर धरणात मध्ये जो पाणीसाठा आहे. त्याचीही परिस्थिती थोडीफार अशीच आहे. वीर धरणामधून देखील ७० हजार क्युसेक्स विसर्गाने पाणी नीरा नदीमध्ये सोडण्यात येत आहे.

दरम्यान वीर आणि उजनी ही दोन्ही धरणे ओव्हरफॅक आहेत. त्यामुळे पंढरपूर आणि परिसरातल्या जवळपास ४६ गावांना पुन्हा एकदा पुराचा धोका निर्माण झालेला आहे. उजनी आणि वीर धरणातून हा जो पाण्याचा विसर्ग होत आहे. त्यामध्ये उजनी धरणातून थेट भीमा नदीमध्ये पाणी सोडले जाते तर वीर धरणातून नीरा नदीमध्ये पाण्याचा विसर्ग केला जातो. नीरा नदीमध्ये सोडलेले पाणी हे पुढे नीरानरसिंहपूर येथून भीमा नदीमध्ये मिसळले जाते. कारण नीरानरसिंहपूर येथे भीमा आणि नीरा नदीचा संगम झालेला आहे. त्यामुळे नीरानरसिंहपूर येथून भीमा आणि नीरेचे म्हणजेच उजनी आणि वीर धरणातून सोडलेले पाणी हे थेट पंढरपूरला येत असते. त्यामुळे पंढरपुरात भीमा नदीच्या पाणी पातळीमध्ये मोठी वाढ झालेली दिसत आहे. त्यामुळे पंधरा दिवसांमध्ये पुन्हा एकदा पंढरपूरवर पुराची टांगती तलवार निर्माण झाली आहे.

चंद्रभागेतील मंदिरांना पाण्याचा वेढा

उजनी आणि वीर धरणातून सोडलेल्या पाण्यामुळे येथील भीमा नदीच्या अर्थात चंद्रभागेच्या वाळवंटातील पुंडलिक मंदिरासह आजूबाजूच्या अनेक छोट्या, मोठ्या मंदिरांना पुराच्या पाण्याने वेढा दिलेला आहे. पंढरपुरातील ब्रिटिशकालीन जुना दगडीपूल हा रविवारीच पाण्याखाली गेलेला आहे. त्यामुळे चंद्रभागेच्या वाळवंटातील प्रत्येक घाटांवर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आलेला आहे. कोणतीही धोका होऊ नये म्हणून वर्दळीच्या अनेक घाटांना बॅरेकेडिंग लावण्यात आले असून चंद्रभागा नदीकडे जाणारे रस्ते बंद करण्यात आले आहेत. कोणत्याही भाविकांना चंद्रभागा नदीकडे सोडले जात नाही.

अंबड येथे पृथ्वीराज पाटील यांचा गाव भेट दौरा

तभा वृत्तसेवा,
करमाळा, दि. २६ ऑगस्ट-

अंबड (ता. माढा) येथे जेऊरचे सरपंच पृथ्वीराज पाटील यांनी गावभेट दौरा केला. त्यावेळी अंबड गावच्या वतीने भैय्यासाहेब यांचा सन्मान करण्यात आला.

भैय्यासाहेब म्हणाले की, अंबड गावातील युवक हे नेहमीच आदरणीय नारायणआबा पाटील यांच्या पाठीशी उभे राहिले आहेत. २०१९ ला अगदी थोडक्या मताधिक्याने आपला पराभव जरी झाला असला तरी आपण खचून न जाता येणाऱ्या काळात आपल्या सर्वांच्या सहकार्याने पुन्हा आबांना आमदार करायचं आहे. आपल्या गावातील विकासकामांबाबत मी नेहमीच तुमच्याबरोबर असून ज्या पण काही गावच्या समस्या असतील त्या आपण सर्वांनी मिळून सोडवू. येणाऱ्या निवडणुकीत देशाचे नेते शरद पवार यांच्या नेतृत्त्वाखाली आपले सर्वांचे नेते नारायणआबा पाटील यांना आमदार करून आपल्या गावच्या सर्वांगिण विकासकामांसाठी मी तुम्हाला सर्वांना बरोबर घेऊन सदैव कामांसाठी तत्पर राहील. या कार्यक्रमासाठी मारुती गाडे, दीपक गाडे, विक्रम सरवदे, संजय दळवी, अमित गाडे, पवनराजे पाटील, विशाल पाटील, म्हैसगावचे अतुल पाटील तसेच गावातील युवक ग्रामस्थ उपस्थित होते.

मेथवडे गावात एसटी सेवा सुरु

सांगोला, दि. २६ ऑगस्ट-

तालुक्यातील मेथवडे या गावी डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या प्रयत्नांने एसटी सेवा सुरु करण्यात आली अशी माहिती शेकापचे प्रसिध्दी प्रमुख चंद्रकांत सरतापे यांनी दिली.

मेथवडे, मांजरी, पिरजादे वस्ती, माळी वस्ती येथील नागरिक, विद्यार्थ्यांना सांगोला येथे जाण्या-येण्यासाठी कुठलीही एसटी बससेवा नसल्याने गैरसोय होत होती. डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी आगार प्रमुखांना सदर गैरसोय निदर्शनास आणून दिली. सकाळी ६ वा. व दुपारी १२-३० वा. सुरु केली आहे. यानिमित्त एसटी चालक व वाहक यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मेथवडे येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बार्शी : गोकुळाष्टमी व श्रावण सोमवारनिमित्त श्री भगवंताला करण्यात आलेल्या पूजेचे छायाचित्र. ही पूजा राकेश बडवे यांनी सजवली.

सांगोला : शहरातील महादेव गल्ली येथील महादेव मंदिरात श्रावणी सोमवार व जन्माष्टमीनिमित्त भाताने लिंपलेली श्री कृष्ण अवतार महापूजा.

पानगाव येथे विविध विकासकामांचे उद्घाटन

तभा वृत्तसेवा,
बार्शी, दि. २६ ऑगस्ट-

तालुक्यातील पानगाव येथे आमदार राजेंद्र राऊत यांच्या हस्ते धाकटा मंदिर ते स्मशानभूमीपर्यंत रस्ता करणे यासाठी १० लाख,पानगाव ते काळेगाव रस्त्यासाठी ३० लाख,स्वच्छ पाणीपुरवठा करण्यासाठी नवीन आर ओ प्लॅन्टसाठी ४ लाख रुपये मंजूर कामाचे उद्घाटन करण्यात आले. तसेच पानगाव गावासाठी निधी मंजूर केल्याबद्दल गावकऱ्यांच्यावतीने आ. राजेंद्र राऊत यांचा कृतज्ञता सोहळ्यातून सत्कार करण्यात आला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या माध्यमातून बार्शी तालुक्यातील विविध विकास कामे करण्यासाठी प्रयत्नशील असून गावातील भांडण तंट्यामुळे गावचा विकास थांबत असून त्यामुळे गावांच्या विकासाला खीळ बसत आहे. गावातील सर्वांनी भांडण तंटे विसरुन विकासासाठी एकत्र यावे, असे झाले तरच गावचा विकास होईल असे राजाभाऊंनी सांगितले. यावेळी माजी नगरसेवक विलास रेणके, केशव घोगरे, बाबासाहेब मोरे, सरपंच दयानंद गाडे, उपसरपंच कुमार काळे, नंदकाका देशमुख, बबन पाटील, बाबासाहेब कापसे, तानाजी गाडे, सदानंद गाडे, आप्पा गाडे, दीपक खंदारे, अंकुश मोरे, दत्तात्रय मोरे तसेच पानगाव येथील ग्रामस्थ उपस्थित होते.

बार्शीच्या सचिन नलावडेच्या क्लिकचा देशपातळीवर गौरव

तभा वृत्तसेवा,
बार्शी, दि. २६ ऑगस्ट-

फोटोग्राफी क्षेत्रात सातत्याने नवनवे प्रयोग करत फोटोग्राफी क्षेत्रात आपला ठसा उमटविणाऱ्या बार्शी येथील सचिन प्रताप नलावडे यांना सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या उत्तर प्रदेशातील टीएनबी या एनजीओ संस्थेने उत्कृष्ट फोटोग्राफीसाठीचा देश पातळीवरील पहिला पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे. एका मजुराचे आयुष्य, ही यावर्षीसाठीची फोटोग्राफीसाठीची संकल्पना होती.

गेली आठ वर्षांपासून सातत्याने फोटोग्राफी क्षेत्रात सचिन नलावडे यांनी अत्यंत कल्पकतेचा उपयोग करत फोटोग्राफीला वेगळा आयाम देण्याचे काम केले आहे. उत्तर प्रदेशातील टीएनबी ही सामाजिक क्षेत्रात देशभरात कार्यरत असलेल्या संस्थेने फोटोग्राफीसाठीची देशपातळीवरील स्पर्धा आयोजित केली होती. संपूर्ण देशभरातून अनेक नामांकित फोटोग्राफरनी यात आपला सहभाग नोंदविला होता. कष्टकरी आणि मजुरांचे आयुष्य कसे असते, हा या स्पर्धेसाठीचा विषय होता. सचिन नलावडे यांनी उसतोड कामगारांचे आयुष्य कॅमेऱ्यात टिपले होते. ही छायाचित्रे या स्पर्धेसाठी निवडण्यात आले. या स्पर्धेचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला असून देशपातळीवर या छायाचित्रांना सर्वोत्कृष्ट म्हणून निवडण्यात आले आणि सचिन नलावडे यांनी या स्पर्धेत देशपातळीवर पहिला क्रमांक पटकाविला. यापूर्वी त्यांनी केलेल्या डॉक्युमेंटरी परेदशात झालेल्या फिल्म फेस्टीवलमध्ये दाखविण्यात आल्या आहेत. अलिकडे एआय तंत्रज्ञानाचा वापर करुन त्यांनी तयार केलेली अनेक छायाचित्रे चर्चेचा विषय ठरली आहेत.

भाळवणी जि. प. गटात दीपकआबांच्या दौऱ्याचे स्वागत

अडीअडचणी घेतल्या जाणून; नागरिकांना समस्या सोडविण्याचा दिला शब्द

तभा वृत्तसेवा,
सांगोला, दि. २६ ऑगस्ट-

सांगोला विधानसभा मतदारसंघातील भाळवणी जि.प.गटात राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष दीपकआबा साळुंखे-पाटील यांच्या गावभेट आणि जनसंवाद दौऱ्याचे उत्साहात स्वागत करण्यात आले.

पंढरपूर तालुक्यातील व सांगोला विधानसभा मतदारसंघातील भाळवणी जि.प.गटातील भंडीशेगाव या गावातील भैरवनाथ मंदिर परिसर,वेताळवाडी, गणेश मंदिर परिसर, आझाद चौक परिसर, बुद्ध विहार १ आणि २ परिसर,

अण्णाभाऊ साठे नगर, डोंबारी वस्ती परिसर, शाहूनगर परिसर, कोळ्यांचा मळा परिसर, माने वस्ती, चव्हाण वस्ती, माळुंगकर वस्ती, कवडेवस्ती, सुरवसेवस्ती, उपरी रोड परिसर, चौगुले वस्ती तसेच शेळवे गावातील देवीचे मंदिर, वकील वस्ती, दंडवस्ती, खंडोबा मंदिर परिसर, बंडाचा मळा परिसर, दादाचा मळा परिसर, बरडवस्ती, खोराडी परिसरातील व खेड भाळवणी गावातील पवारवस्ती, जुना अकलूज रस्ता परिसर, रेणुकानगर, शिवाजीनगर, जिजाऊनगर, संभाजीनगर व मारुती मंदिर परिसरातील हजारो नागरिकांना माजी आ. दीपकआबा साळुखे-पाटील यांनी प्रत्यक्ष भेटून त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या व त्यांच्याशी दिलखुलास संवाद साधून परिसरातील नागरिकांच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला.

प्रत्येक घटकांशी संवाद

माजी आ. दीपकआबा साळुंखे-पाटील हे प्रत्येक गावातील वाड्यावर जाऊन समाजातील प्रत्येक घटकाशी संवाद साधत आहेत. भाळवणी जि. प. गटाच्या राजकीय इतिहासात प्रथमच एखाद्या नेत्यांनी जनतेशी इतक्या आपुलकीने संवाद साधला आहे.

CMYK

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

तेर येथे सखी सावित्री समितीची बैठक संपन्न

तभा वृत्तसेवा
तेर, दि.२६ ऑगस्ट -

धाराशिव तालुक्यातील तेर येथील जिल्हा परिषद कन्या प्राथमिक शाळेत पोलीस पाटील फातिमा मिनियार यांच्या प्रमुख उपस्थितीत सखी सावित्री समिती व माता पालक गटाची बैठक घेण्यात आली.

ज्योती गाढवे यांनी सखी सावित्री समितीने सक्षमपणे कार्य करुन मुलींना सुरक्षितता देणे आवश्यक आहे असे प्रास्ताविकातून सांगितले. शालेय शिक्षणाबरोबरच मुलींची सुरक्षितता त्यासाठी शासनाने कार्यान्वित केलेल्या योजनांची माहिती पल्लवी पवार यांनी दिली. मुलींच्या सुरक्षिततेसाठी शाळेत असलेल्या विविध उपाययोजना निर्भया पेटी, शाळा परिसर व वर्ग खोल्या येथे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. बॅड टच, गुड टच याचे प्रात्यक्षिक प्रतिभा जोगदंड यांनी दाखवून माहिती दिली. समाज, पालक म्हणून ही जबाबदारी आपण ही घेऊन मुलींना सुरक्षित वातावरणात वाढविणे गरजेचे आहे याबाबत उपस्थित महिलांनी चर्चा केली.

यावेळी शाळेतील विद्यार्थीनी, भाग्यश्री भक्ते, शालू वतारी, सरोजा वाघमारे, अश्विनी कोल्हे, रुपाली कांबळे यांची उपस्थिती होती.

आदिवासी पारधी समाजातील लाभार्थ्यांना घरकूल योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न : जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंम्बासे

धाराशिव येथे शबरी शहरी घरकूल योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना घरकूल लोकार्पण...

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२६ ऑगस्ट -

आदिवासी पारधी समाजातील कुटुंबाना शबरी घरकुल योजनेतून घरकुल उभारण्यासाठी जागा उपलब्ध व्हावी याकरिता मंत्रालय स्तरावर पाठपुरावा करुन जास्तीत जास्त लाभार्थ्यांना लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंम्बासे यांनी केले.

शबरी घरकुल योजनेअंतर्गत सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात आदिवासी समाजाकरिता मंजूर झालेल्या हक्काच्या घरकुलांचे लोकार्पण सोमवार, दि.२६ ऑगस्ट रोजी पापनास नगर धाराशिव येथे जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंम्बासे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. धाराशिव जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष तर एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प सोलापूरचे प्रकल्प अधिकारी धनंजय झाकर्डे, आदिवासी पारधी महासंघाचे प्रदेश कार्याध्यक्ष सुनील काळे, शासकीय माध्यमिक आश्रम शाळेचे मुख्याध्यापक बाळासाहेब कोंढारे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना जिल्हाधिकारी डॉ. ओंम्बासे म्हणाले की, बहुतांश पारधी समाज हा गायरान जमिनीवर वास्तव्य करत आहे. यापूर्वी या जमिनी नियमानुकूल करुन वैयक्तिक मालकी देण्यात येत होती. परंतु सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर कोणतीही शासकीय जमिनी वैयक्तिक लाभार्थ्यास देणे बंद झाले. तरीही शासनाच्या पंडित दीनदयाळ उपाध्याय योजनेअंतर्गत गावालगत असलेली शेतकर्याची जमीन शासनाला विक्री करण्याची तयारी असल्यास ती जमीन खरेदी करुन त्यावर घरकुल बांधता येतील. जमीन उपलब्ध नसल्यास एकरी ३० लाखापर्यंत जमीन खरेदी करण्याची शासनाची तयारी आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील पारधी समाजापर्यंत देखील ही योजना पोहचवता येईल, असेही त्यांनी सांगितले. पारधी समाजाने आपल्या मुलांना शिक्षण दिले पाहिजे. उपजीविकेसाठी कोणतेही साधन नसल्यामुळे शिक्षणाच्या माध्यमातून नोकरीमध्ये जाऊन आर्थिक सक्षम होण्यासाठी चांगला पर्याय असल्याचेही ते म्हणाले.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प सोलापूरचे प्रकल्प अधिकारी धनंजय झाकर्डे म्हणाले, शबरी घरकुल योजनेच्या मंजुरी व शासन आदेश निघण्यासाठी आदिवासी पारधी महासंघाचे प्रदेश कार्याध्यक्ष सुनील काळे यांनी सतत पाठपुरावा केला. त्यात यश मिळून डॉ. विजयकुमार गावित यांनी शासन अध्यादेश काढला. सगळीकडे घरकुल योजनेचा लक्ष्यांक असताना धाराशिवला ३८९ पैकी ४४ घरकुलांना मंजुरी मिळाली. त्याकरिता ३६ लाख मिळाले आहेत. उर्वरित निधीसाठी मंत्रालय स्तरावर पाठपुरावा सुरु असून तो निधी लवकर मिळेल, असे ते म्हणाले. जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंम्बासे हे या कामात लक्ष घालून कामाला गती देत असल्याबद्दल त्यांनी जिल्हाधिकार्यांचे कौतुक केले. सध्या मंजूर असलेल्या ४४ पैकी पूर्ण झालेल्या एका घराचे आज प्रातिनिधीक स्वरुपात लोकार्पण झाले असून २० घरकुलांचे काम प्रगतिपथावर आहे. उर्वरित घरकुलांसाठी देखील दिवाळीपूर्वी निधी उपलब्ध होईल, असेही त्यांनी सांगितले.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकार डॉ. मैनाक घोष यांनी आदिवासी पारधी समाजातील नागरिकांना शासनाच्या विविध योजनाचा लाभ मिळवून देण्यासाठी जिल्हा परिषदेअंतर्गत सर्व विभागातर्फे सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल असे सांगितले.

प्रास्ताविकात आदिवासी पारधी महासंघाचे प्रदेश कार्याध्यक्ष सुनील काळे म्हणाले, धाराशिव येथील सर्वे क्र. ४२६ मधील गायरान जमिनीवर गेल्या दोन पिढ्यापासून पारधी समाज वास्तव्य करत आहे. परंतु त्यांना हक्काचे घरकुल अद्याप मिळालेले नव्हते. त्यासाठी शासनाकडे सतत पाठपुरावा करुन शबरी घरकुल योजनेअंतर्गत आदिवासी पारधी समाजाला घरकुलांचा लाभ मिळविण्यात यश आले. धाराशिव येथील लाभार्थ्यांसाठी ३८९ घरकुलांचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आलेला असून त्यापैकी ४४ घरकुलांना मंजुरी मिळालेली आहे. उर्वरित घरकुलांसाठी शासनाकडे पाठपुरावा सुरु असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रारंभी प्रातिनिधीक स्वरुपात सुरेश काळे या लाभार्थ्याच्या घरकुलाचे लोकार्पण करुन उर्वरित लाभार्थ्यांना जिल्हाधिकार्यांनी सदिच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन दौलत निपाणीकर यांनी केले. आभार सुनील काळे यांनी मानले. कार्यक्रमास पारधी वस्तीमधील घरकुल योजनेचे लाभार्थी, महिला, पुरुष नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

▶▶संक्षिप्त वृत्त...

श्रीकृष्ण प्री-प्रायमरी स्कूलमध्ये राधाकृष्ण वेशभूषा स्पर्धा संपन्न

गुंजोटी, दि.२६ ऑगस्ट -

येथील श्रीकृष्ण प्री-प्रायमरी स्कूलमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमी व गोपाळ काल्याच्या निमित्ताने उत्कृष्ट राधाकृष्ण वेशभूषा स्पर्धेचे आयोजन शनिवारी (ता.२४) करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्रि प्रायमरी विभाग प्रमुख श्रद्धा जाधव, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक दत्तात्रय गायकवाड होते. प्रशालेचे मुख्याध्यापक संजय कदम, उपमुख्याध्यापक अजय गायकवाड, सुनीता खमीतकर, बालाजी पाटील, प्रसाद शाईवाले, अनिता यादव यांची प्रमुख उपस्थिती होती. आपल्या दैनंदिन जीवनात अध्यात्माचेही स्थान महत्त्वाचे असते हा मानस ठेवून शाळेने हा उपक्रम राबविला. यावेळी उत्कृष्ट वेशभूषेतील राधा व कृष्णा यांची निवड करण्यात आली. उत्कृष्ट कृष्णा म्हणून दुष्यंत बिराजदार, श्रीयांश बेळमकर, अर्णव लोखंडे तर उत्कृष्ट राधा म्हणून धनश्री रेड्डी, अनन्या चव्हाण, क्षितिजा खमीतकर यांची निवड करण्यात आली. या स्पर्धेत नर्सरी ते यूकेजी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. अंजली जगताप यांनी सूत्रसंचालन केले तर अश्विनी चौगुले यांनी आभार मानले.

संतोष चव्हाण यांचा सत्कार

जळकोट, दि.२६ ऑगस्ट -

आलियाबाद (जळकोट) येथील राजर्षी शाहू कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष चव्हाण यांची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद धाराशिव यांच्या अध्यक्षतेखालील संत सेवालाल महाराज लमान-बंजारा तांडा समृद्धी योजनेच्या जिल्हास्तरीय समितीवर अशासकीय सदस्यपदी नियुक्ती झाल्याबद्दल जळकोट येथील समर्थ क्लासेसच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी रामशेट्टी पाटील, विनायक राठोड, लक्ष्मीकांत पाटील, विजय पिसे, अविनाश किलजे, कुलस्वामिनी आश्रमशाळा व कनिष्ठ महाविद्यालयाचे शिक्षक, प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते.

तुगांव शाळेत गोकुळाष्टमी उत्साहात संपन्न

जळकोट, दि.२६ ऑगस्ट -

येथून जवळच असलेल्या तुगाव शाळेमध्ये गोकुळाष्टमी साजरी करण्यात आली. पारंपरिक वेशभूषेत विद्यार्थी शाळेत आले होते. दहीहंडी फोडून, प्रसाद वाटप करत हा दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. जिल्हा प्राथमिक शाळा येथे जन्माष्टमी आणि दही हंडी मोठ्या आनंदात आणि उत्साहाने साजरी करण्यात आली. यावेळी विद्यार्थी आणि विद्यार्थींनी राधा आणि कृष्णाची वस्त्रे परिधान केली होती. शाळेच्या मैदानात दही-हंडी बांधण्यात आली. जन्माष्टमी गाण्यांच्या तालावर विद्यार्थ्यांनि नृत्य केले. यावेळी प्रज्ञान मुसळे, रुद्रा गायकवाड हे कृष्ण रूपात विशेष आकर्षक दिसत होते. तर राधेच्या रुपात कुमारी इगवे, आरती माने हे विद्यार्थी सर्वांना आकर्षीत करत होत्या. या कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक बाळासाहेब शिंदे, शिक्षक सतिश माने, चव्हाण, शिंदे यांनी प्रयत्न केले.

जळकोटमधील विविध मान्यवरांचा पुरस्कार देऊन सन्मान

जळकोट, दि.२६ ऑगस्ट -

तुळजापूर तालुक्यातील जळकोट गावातील गाव विकासाच्या योगदानात आपापल्या क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या हिऱ्यांचा विविध पुरस्कार देऊन सरपंच गजेंद्र पाटील यांच्या संकल्पनेतून मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. या पुरस्कारमध्ये जळकोट भूषण पुरस्कार मनोज कदम, उत्कृष्ठ व्यावसायिक पुरस्कार हणमंत जाधव, प्रगतशील शेतकरी संजय यादगौडा, उत्कृष्ट व्यावसायिक नागेश पाटील, उत्कृष्ट प्रयोगशील पुरस्कार तुकाराम सोनटक्के, उत्कृष्ट व्यापारी पुरस्कार संजय विश्वनाथ हुलसुरे, महिला उद्योजक पुरस्कार रूपाली सुरवसे, सौजन्यशील शेतकरी पुरस्कार भिमण्णा साखरे, उत्तम व्यावसायिक पुरस्कार प्रदीप अंगुले, एक्सलंट पुरस्कार लक्ष्मीकांत पाटील, गुणवंतांचा सत्कार संध्याराणी अंगुले, स्वीटी अंगुले, सानिका दरेकर, निकिता किलजे, भोसले संस्कार, मोरे संजीवनी, अंगुले वैशाली, प्रणवी सावंत, स्वप्निल मोजगे, प्राप्ती कागे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

धनंजय सावंत यांनी केली मुख्यमंत्री सभास्थळाची पहाणी

तभा वृत्तसेवा
परंडा, दि.२६ ऑगस्ट -

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे परंडा येथे, मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानाच्या जिल्हा स्तरीय शासकीय योजना लाभ प्रदान समारंभासाठी परंडा येथे दि.२९ ऑगष्ट रोजी येत आहेत. या कार्यक्रमासाठी यशस्वी नियोजन गेली तिन दिवसांपासून सुरू आहे. हा कार्यक्रम कोटला मैदानाशेजारील मैदानावर होणार आहे. या मैदानावर कार्यक्रमाची जय्यत तयारी सुरू आहे. दि.२६ रोजी जि.प. माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत यांनी सभा स्थळची पहाणी करून कामाचा आढावा घेतला.

या नियोजनासाठी मोठी यंत्रणा कामाला लागली असुन साफसफाई, मैदान चोपणेचे काम सुरू असुन स्टेज व मंडपाचे काम हाती घेण्यात येत आहे.

यावेळी सभा स्थळाची पाहणी करताना धनंजय सावंत काकासाहेब साळुंखे, संजयकुमार बनसोडे, रत्नकांत शिंदे, एसडीओ पाटील, प्रभारी तहसीलदार पांडुरंग माढेकर, अंगद शिंदे उपअभियंता बांधकाम विभाग व कर्मचारी उपस्थित होते.

मारुती महाराज काला महोत्सवास आ. ज्ञानराज चौगुले यांची उपस्थिती

तभा वृत्तसेवा
लोहारा, दि.२६ ऑगस्ट -

लोहारा तालुक्यातील भातागळी येथील शंभो महादेव देवस्थान मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व सदगुरू मारुती महाराज काला महोत्सवास रविवारी दि.२५ ऑगस्ट रोजी सुरुवात झाली असून पहिल्या दिवशी आ. ज्ञानराज चौगुले यांनी भेट देऊन ग्रामदैवत श्री महादेवाची आरती करून मनोभावे दर्शन घेतले.

हा सप्ताह सोहळा कै.श्री. संत मारुती महाराज कानेगावकर यांनी सुरू केला असल्याने यास या परिसरात मोठे महत्त्व आहे. सप्ताह सोहळा दि.२५ ऑगस्ट ते दि.३१ ऑगस्ट दरम्यान आयोजन करण्यात आले असून पाहिल्या दिवशी हभप गोपाळ आण्णा महाराज वासकर यांची रात्री किर्तन सेवा संपन्न झाली. तर हभप प्रल्हाद महाराज सरडे, हभप मामा महाराज काजळे, हभप किशोर महाराज, हभप रामभाऊ गायकवाड महाराज, हभप ज्ञानेश्वर महाराज यांची किर्तन सेवा संपन्न होणार आहे. गावातून ग्रंथ दिंडी मिरवणूक काढण्यात येणार आहे.

हिंदू समाजावरील अत्याचाराविरोधात हिंदू समाजाचा धाराशिवात आज मोर्चा

सकल हिंदू समाजातील नागरिकांना उपस्थित रहाण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२६ ऑगस्ट -

भारता शेजारील बांगलादेशात काही दिवसापूर्वी निर्माण झालेल्या अस्थिरतेमध्ये अनेक हिंदू कुटुंबांना अन्याय अत्याचाराला बळी पडावे लागले त्यातून अनेक निष्पाप लोकांच्या हत्या झाल्या अनेकांची घरे उध्वस्त झाली संसार उघड्यावर आले. या बांगलादेशी हिंदूंच्या बाबतीत भारतातील हिंदूंमध्ये निर्माण झालेला असंतोष व्यक्त करण्यासाठी सकल हिंदू समाजाच्या वतीने २८ ऑगस्ट रोजी धाराशिव शहरात हिंदू रौद्र मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती संयोजन समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत देण्यात आली.

सकल हिंदू समाजाचे प्रतिनिधी ॲड. विक्रम साळुंखे यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत पुढे असे सांगितले की हिंदू समाजाच्या या भीषण परिस्थितीबद्दल भारतीयांच्या मनात असलेला असंतोष संघटित करून त्याला रस्त्यावर उतरवण्याचे आवाहन हिंदू समाजाच्या वतीने मोर्चाच्या रूपाने करण्यात आले आहे.

धाराशिव शहरात २८ ऑगस्ट रोजी बुधवारी सकाळी दहा वाजता राजमाता जिजाऊ यांचा आशीर्वाद घेऊन त्यांच्या चौकातून या मोर्चाला सुरुवात होणार असून धाराशिव शहरातील प्रमुख मार्गावरून हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर नेण्यात येणार आहे. जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात येणार असून या निवेदनाद्वारे बांगलादेशातील हिंदूंचे पुनर्वसन करावे आणि हिंदूवरील अत्याचाराला बळी पडलेल्या नागरिकांच्या पाठीशी भारत सरकारने उभे राहावे यासाठी दबाव आणावा या हेतूने या मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

या मोर्चात धाराशिव शहर आणि परिसरातील हिंदू बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

विधानसभा निवडणुकी संदर्भात भाजपाची आढावा बैठक संपन्न

तभा वृत्तसेवा
लोहारा, दि.२६ ऑगस्ट -

भाजपाच्या वतीने लोहारा तालुक्यातील पदाधिकारी, बुथप्रमुख, शक्तिकेंद्र प्रमुख, कार्यकर्त्यांची आढावा बैठक लोहारा शहरात दि.२५ ऑगस्ट रोजी विधानसभा निरीक्षक लोहारा तालुका विनोद गपाट यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

यावेळी भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य गुलचंद व्यवहारे, उमरगा-लोहारा विधानसभा निवडणूक प्रमुख राहुल पाटील, भाजपा तालुका तालुकाध्यक्ष शिवशंकर हत्तरगे, अदि उपस्थित होते. यावेळी भाजपाच्या कार्यकर्त्यांनी आपल्या अडचणी व समस्या बैठकित मांडल्या.

कार्यकर्त्यांनी एका दिलाने काम करुन आपल्या पक्षाचे ध्येय धोरण व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेले विकासात्मक कामे लोकापर्यंत जावुन सांगावे व महायुती सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना राबविली आहे. महिलांच्या बँक खात्यावर रक्कम पडण्यास सुरुवात झाली आहे.

या योजनेबाबत जनजागृती करुन पक्ष संघटना वाढवावी, असे आवाहान विधानसभा निरीक्षक लोहारा तालुका विनोद गपाट यांनी केले. यावेळी उमरगा-लोहारा विधानसभा निवडणूक प्रमुख राहुल पाटील यांनी सविस्तार मार्गदर्शन केले.

यावेळी जिल्हा कोषाध्यक्ष नेताजी शिंदे, भाजपा तालुका सरचिटणीस इकबाल मुल्ला, तालुका सरचिटणीस दगडु तिगाडे, विष्णु लोहार, तालुका उपाध्यक्ष प्रविण चव्हाण, संपत देवकर, दिलीप पवार, अनिल ओवांडकर, बालाजी चव्हाण, वामन डावरे, बालाजी चव्हाण, बालाजी चव्हाण, बाबा सुंबेकर, प्रमोद पोतदार, मल्लीनाथ फावडे, दत्ता कडबाने, कल्याण ढगे, सुयशकुमार दंडगुले, संजय कदम, निखेश बचाटे, रविकांत भोंडवे, परमेस्वर माशाळकर, परमेस्वर कदम यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुंबई महानगरपालिकेने काढलेल्या जाहिरातील जाचक अटी रद्द करा : आ. कैलास पाटील

तभा वृत्तसेवा
येरमाळा, दि.२६ ऑगस्ट-

मुंबई महानगरपालिकाने १४ ऑगस्ट रोजी सरळसेवा भरती अंतर्गत काढलेल्या १८४६ सहाय्यक कार्यकारी जाहिरातीत ठेवलेल्या जाचक अटी रद्द करण्यात यावे. यासाठी धाराशिव कळंब विधानसभा आमदार कैलास पाटील यांनी निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

महानगर पालिका सरळ सेवा भरतीच्या जाहिरातीत जाचक अटीमुळे राज्यातील लाखो इच्छुक विद्यार्थी हवालदिल झाले आहेत.गत वर्षापासून आपल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जाहिरातीच्या प्रतीक्षेत होते. जाहिरात प्रसिद्ध होणार हे कळताच लाखो विद्यार्थी फॉर्म भरण्यासाठी इच्छुक होते पण त्यांच्या आनंदाला आपल्या जाचक अटीने पूर्णविराम दिले असल्याचे दिसून आले. तरी त्या जाचक अटी रद्द करून नवीन शुद्धीपत्रक काढून सुशिक्षित बेरोजगार विद्यार्थ्यांना दिलासा द्यावा अशा प्रकारची विनंती राज्याचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, मुंबई मनपा आयुक्त यांना धाराशिव कळंब विधासभेचे आमदार कैलास पाटील यांनी दिले आहे.

दिलेल्या पत्रातील विषयास अनुसरून, ता.२० ऑगस्ट २०२४ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकतर्फे कार्यकारी सहाय्यक या पदांसाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे.

सदर जाहिरातीत नमूद केलेल्या अटींमध्ये पहिल्या प्रयत्नात पदवी उत्तीर्ण असणे ही जाचक अट घातली आहे. या कारणास्तव महाराष्ट्रातील २ ते ३ लाख मुला-मुलींना परीक्षेचा अर्ज ही भरता येणार नाही व त्यांच्यासाठी ही अट अन्यायकारक आहे. सध्या महाराष्ट्रातील बेरोजगारीचा भयावह प्रश्न पाहता आपण कृपया या अटीच्या पुनरावलोकनासाठी योग्य ती कारवाई करावी व या अटीत बदल करावा. जेणेकरून अधिकाधिक योग्य आणि सक्षम उमेदवारांना या पदासाठी संधी मिळेल आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षमतेत सुधारणा होईल, असे या निवेदनात नमूद केले आहे.

या सोबत जाचक अटीमुळे ज्यांना अर्ज करता येणार नाही अशा उमेदवारांच्या अडीचशेच्या वर सह्यांचे पत्र जोडले आहे.

लैंगीक अत्याचार प्रकरणी गुन्हा दाखल

धाराशिव, दि.२६ ऑगस्ट -

एक १५ वर्षीय मुलगी ही दि.२४ ऑगस्ट रोजी आपल्या राहत्या घरी असताना गावातील पाच तरुणांनी तिस त्यांचे घरात बोलावून घेवून तीच्यावर लैंगीक अत्याचार करुन चाकूने मारहाण करुन गंभीर जखमी केले. यानंतर त्या तरुणांनी तु जर कोणास काही सांगितले तर तुला व तुझ्या कुटूंबाला जिवे ठार मारीन अशी धमकी दिली. अशा मजकुराच्या पिडीतेने दि.२५ ऑगस्ट रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन गुन्हा नोंदवला आहे.

संक्षिप्त वृत्त...

नवोदय विद्यालयात श्रीकृष्ण जयंती साजरी

धाराशिव, दि.२६ ऑगस्ट -

पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालय येथे दि.२६ रोजी श्रीकृष्ण जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सर्वप्रथम विद्यालयाचे प्राचार्य के.वाय.इंगळे यांच्या हस्ते श्रीकृष्ण प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावरती वरिष्ठ अध्यापक एस.डी.खोब्रागडे, बी.एम.गवले, एच.जी.जाधव यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमास शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षक उपस्थित होते. इयत्ता सहावीतील कृष्णा मोरे या विद्यार्थ्याने श्रीकृष्णांच्या जीवनातील काही प्रसंग सांगून सर्वांना आश्चर्य चकीत केले. बी.एम.गवले यांनी कृष्ण लीलाचे वर्णन करत महाभारतातील अनेक प्रसंग त्यांनी विद्यार्थ्यांच्या समोर मांडून एक आदर्श व्यक्तिमत्व श्रीकृष्णाचे कसे होते हे सांगितले. शेवटी विद्यालयाचे प्राचार्य के. वाय.इंगळे यांनी श्रीकृष्णाचे व्यक्तिमत्व कसे अष्टपैलू होते हे सांगून त्यांच्या जीवनात सत्य, प्रेम, करुणा, भक्ती, लीला हे गुण कसे भरलेले होते सांगून सर्वांनी मनामध्ये भक्तीची, आदराची, मानवतेची, स्नेहाची भावना ठेवून आनंदाने जीवन जगण्याचा प्रयत्न करावा, असे सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हरी जाधव यांनी केले.

श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या निमित्ताने कार्यक्रमात शिवांश गंगणे यास प्रथम पारितोषिक

तुळजापूर, दि.२६ ऑगस्ट -

तुळजापूर संस्कार भारतीच्या वतीने आयोजित केलेल्या कृष्ण रूप सज्जा या कार्यक्रमांमध्ये शिवांश गंगणे याला प्रथम पारितोषिक मिळाले द्वितीय आरोही सातपुते, तृतीय क्रमांक श्रीयान काळदाते उत्तेजनार्थ सृष्टी सातपुते व हर्षद सूळ या विद्यार्थ्यांना देवगिरी प्रांत लोककला विभाग प्रमुख डॉ.सतीश महामुनी यांच्या हस्ते प्रमाणपत्र व शालेय साहित्य देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी द वर्ल्ड स्कूलचे शिक्षक एकता व्यास, गीता रसाळ अनिता पांडागळे यांची उपस्थिती होती. द वर्ल्ड स्कूलमधील या विद्यार्थ्यांनी बक्षीस वितरण झाल्यानंतर प्रशालेमध्ये दहीहंडी फोडली.

नेत्रदान ही कौटुंबिक प्रथा होणे आवश्यक

वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ.शिल्पा डोमकुंडवार यांचे प्रतिपादन

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२६ ऑगस्ट-

नेत्रदानाकडे सर्वांनी सकारात्मक दृष्टीने पाहणे गरजेचे असून त्याची सुरवात ही स्वत:पासून करावी. तसेच नेत्रदानबाबतचा वैज्ञानिक दृष्टीकोन समजुन घेऊन प्रत्येक कुटुंबाच्या ज्या प्रथा परंपरा असतात त्याप्रमाणे मरणोत्तर नेत्रदान ही सुध्दा कौटुंबिक प्रथा बनली पाहिजे, असे प्रतिपादन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ.शिल्पा डोमकुंडवार यांनी केले.

आज दि.२६ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय अंधत्व व दृष्टीक्षिणता नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत दि.२५ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर या दरम्यान साजऱ्या होणाऱ्या ३९ या राष्ट्रीय नेत्रदान पंधरवडा कार्यक्रमाच्या उदघाटनावेळी त्या बोलत होत्या.



यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.एन.एस.धर्माधिकारी, वैद्यकीय अधिक्षक डॉ.तानाजी लाकाळ, नेत्र शल्यचिकित्सक डॉ.महेश पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ.डोमकुंडवार पुढे म्हणाल्या, एखादया व्यक्तीला डोळयाची गरज किती आहे हे एखादया अंध व्यक्तीला विचारावे कारण कोणत्याही कारणामुळे अंधत्व आले तर आयुष्य जगण्यात किती अडचणी येऊ शकतात. हे त्यालाच कळते. नेत्रदान, अवयवदान एक चळवळ समजुन प्रत्येकाना यामध्ये सहभाग वाढविणे गरजेचे असल्याचेही त्या यावेळी म्हणाल्या.

या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात नेत्रशल्यचिकित्सक डॉ.महेश पाटील यांनी राष्ट्रीय मैदान पंधरवडा साजरा करण्याचा उददेश या माहिती दिली व सदरील कालावधी विविध उपक्रमाचे आयोजन करुन नैदानबाबत जनजागृती करिता करण्यात येणार असल्याबाबत सांगितले.

कार्यक्रमाच्या सुरवातीला डॉ.ज्योति कानडे यांनी मरणोत्तर नेत्रदान बाबत उपस्थित सर्वांना माहिती देऊन यामध्ये नेत्रदान म्हणजे काय, नेत्रदान कोण करून शकतो. नेत्रदानाची आवश्यकता व महत्व दानाबददल असलेले गैरसमज तसेच नेत्रदान कोण करू शक्त नाही याबाबत सविस्तर माहिती दिली.

यावेळी शासकिय वैद्यकिय महाविद्यालयाचे सहाय्यक प्रा.डॉ. अनुजा कंदले, डॉ.पवन महाजन, डॉ.दिशा आडोळे, नेत्रविभागाचे प्रमुख नेत्रशल्यचिकित्सक डॉ.मुस्तफा पल्ला, डॉ. महेश पाटील, डॉ.ज्योति कानडे, अधिसेविका सुमित्रा गोरे, नेत्रचिकित्सा अधिकारी बाळासाहेब घाडगे, रामराजे बिडवे, निलेश कुरील, श्रीकांत कल्याणी, उमेश गोरे, नेत्रविभागाचे वॉर्ड इन्चार्ज वहीदा शेख इतर तसेच नेत्रविभागातील सर्व अधिपरिचारिका व वर्ग -४ कर्मचारी व रुग्णालयातील सर्व नर्सिंग स्टाफ अधिकारी, कर्मचारी यांची प्रमुख होती. सदरील कार्यक्रम यशस्वीते करिता नेत्रविभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन आभार प्रदर्शन डॉ.महेश पाटील यांनी केले

चांद्रयान मोहिम यशस्वीतेचा वर्धापन दिनानिमित्त वृक्षारोपण, स्वच्छता अभियान

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२६ ऑगस्ट-

गवळी गल्लीतील श्री बाल हनुमान गणेश मंडळाच्या वतीने चांद्रयान यशस्वीतेला एक वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त वर्धापन दिन साजरा करण्यात आला.

या निमित्ताने हातलादेवी डोंगरावर मंदिराचे रस्ते व पूर्ण प्रांगण मंडळाच्या लहानापासून थोरापर्यंत कार्यकर्त्यांनी स्वछता करण्यात आली. याचवेळी सिताफळ, कडुलिंब, चिंच इत्यादी रोपांची वृक्षारोपणाने करण्यात आली.

शिवछत्रपती पुरस्कर्ते व बीड एस.टी.महामंडळातील, जिल्हा परिवहन अधिकारी राजकुमार दिवटे यांच्या शुभहस्ते स्वच्छता, वृक्षारोपणाचा शुभारंभ करण्यात आला.

युवराज हुच्चे, मनोज अंजीखाने, आकाश महामुने, रंजीत बुरुंग, कुंदन गवळी, हातलादेवी मंदिरामध्ये श्री गणपतीची आरती व श्री देवी दुर्गामाता आरती संपन्न होऊन, सर्व मुला-मुलींनी झाडूने स्वच्छता, प्लास्टिक बाटल्या, पिशव्या विविध प्रकारचे खाद्य पदार्थ खाऊन टाकलेल्या टाकाऊ वस्तु पसरलेल्या होत्या.

तो जमा करून कचराकुंडीमध्ये टाकण्यात आला. यामुळे स्वच्छतेचे महत्व पर्यावरण रक्षणाचे महत्त्व व नैसर्गिक संपत्तीचे रक्षण करणे हे माणसाच्या हातामध्ये आहे, यामुळे संसर्गजन्य रोग व साथीचे रोग प्रमाण कमी होते. हे पर्यटन स्थळ धाराशिव मध्ये झालेले आहे.

भक्ती भावाने, नैसर्गिक रमणीय, तरुणाई व्यायामासाठी खुललेली, सुट्टीदिवशी अत्यंत मोठी रेलचेल दिसून आली. याच दरम्यान द्रोपदी व विनय या गायक जोडपं आपल्या स्वतःच्या आवाजामध्ये विविध गीत स्पीकर व माईक यांच्या साह्याने संगीतमय वातावरणाची निर्मिती करून भक्ती हातला देवीच्या चरणी अर्पण करण्यात आली.

विविध गीत संगीत यावर तरुणाई फिरकले व संगीतमय वातावरणाची या निसर्गाच्या सानिध्यात एक आगळीवेगळी लय निर्माण केली. कार्यकर्त्यांनी उस्फूर्तपणे प्रतिसाद टाळ्याच्या गजराने व संगीताच्या ठेका, ताल धरला होता. याचप्रमाणे जैन लेणी व धारासुरमर्दिनी येथेही स्वच्छता, वृक्षारोपण राबविले जाणार. नळदुर्गचा किल्ला व रामलिंग येथील नैसर्गिक अभया रानात आनंद घेऊन ऐतिहासिक पौराणिक, धार्मिक, ज्ञान या भेटीतून मंडळाचे कार्यकर्ते घेत आहेत.

या सर्व मंडळाच्या लहान थोरकार्यकर्त्यांनी विविध व्यायामाच्या साहित्याचाव बालकाने घसरगुंडी पासून मनमुराद आनंद घेतला. अंगत-पंगत भेळ खाऊन सामुदायिक भोजनाचा आनंद व आस्वाद घेतला. इतर आलेल्या पर्यटकाने सहभाग नोंदवून मंडळाच्या कार्यास प्रोत्साहन दिले.

सर्व कार्यक्रम यशस्वीतेसाठी दुर्गेश दिवटे, सागर पाळणे, वैभव अंजीखाने, इ.परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भालचंद्र हुच्चे संयोजक यांनी व आभार प्रा.गजानन गवळी यांनी मानले.

आधार सामाजिक संस्थेचा धाराशिव येथे पुरस्कार देऊन सन्मान

तभा वृत्तसेवा
परंडा, दि.२६ ऑगस्ट -

परंडा शहरातील विविध उपक्रम राबविणारी आधार सामाजिक संस्था जी महिलांना आधार महिला गृह उद्योगाच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध करुन देणे, संस्थेच्या वतीने अनाथ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पुरविणे, महिलांच्या आरोग्यासाठी आरोग्य शिबीरे घेणे, तसेच निराधार वृद्ध आजी/आजोबांसाठी आपला आधार वृद्धाश्रम चालविणे आदी समाजकार्यासाठी ऑल जर्नालिस्ट अँड फ्रेंड्स सर्कल रत्नागिरी या देशव्यापी पत्रकार मित्र संघटनेतर्फे आधार सामाजिक संस्थेला दलितमित्र रमाकांत आत्रे सामाजिक कार्य पुरस्कार मिळाला. जेष्ठ पत्रकार कमलाकर कुलकर्णी, केंद्रीय अध्यक्ष गणेश कोळी, संस्थापक अध्यक्ष यासिन पटेल, जेष्ठ पत्रकार व साहित्यिक तु. दा. गंगावणे यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना संस्थेचे अध्यक्ष झुल्फीकार काझी व कार्यकर्त्या उर्मिला गरड यांनी स्वीकारले.

लासरा बॅरेजसचे भुसंपादन आंदोलन, पंधरा दिवसांसाठी स्थगित

तभा वृत्तसेवा
कळंब, दि.२६ ऑगस्ट-

लासरा बॅरेजसचे भुसंपादन त्वरित करून पाणी साठा करावा यासाठी सौदणा लासरा आवाड शिरपुरा गावातील शेतकऱ्यांनी अर्धनग्न डुबकी मारो आंदोलनाचा इशारा दिला होता. त्यानंतर जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंबासे यांनी तात्काळ बैठक घेऊन सौदणा अंबा येथील थेट खरेदीचे दर निश्चित केले. व उर्वरित गावांचे अवारड करण्याची प्रक्रिया तात्काळ करण्याचे आदेश दिले. त्यानंतर प्रशासनाने कार्यवाही ची प्रक्रिया सुरू केली. याबाबत आमदार कैलास घाडगे पाटील यांनी जिल्हाधिकारी यांना पत्र देऊन तात्काळ कार्यवाही करण्याचे सुचविले होते. सर्व प्रक्रिया पूर्ण करून पाणी साठा करण्यासाठी प्रशासनाने पंधरा दिवसाची मूदत मागितली आहे. त्यामुळे शेतकर्यांनी पंधरा दिवसाची मुदत मान्य केली आहे. परंतु पंधरा दिवसांत जर प्रक्रिया पूर्ण करून पाणी साठा केला नाही तर परत बेमुदत अर्धनग्न डुबकी मारो आंदोलन करण्याचा इशारा लेखी दिला आहे.

एक कॉल, बांधावर चहा पोहंच; एक महीन्यात दिड लाख रुपये चहाची विक्री

तभा वृत्तसेवा
तेर, दि.२६ ऑगस्ट -

धाराशिव तालुक्यातील तेर येथे एक कॉल, बांधावर चहा पोहंच, एक महीन्यात दिड लाख रुपयांची विक्री चहा विक्रेता करीत आहे. तेर येथील होतकरु तरूण चहा विक्रेता महादेव माळी हा व्यवसाय करीत आहे.

धाराशिव तालुक्यातील तेर येथील महादेव नाना माळी हे विस वर्षांपासून चहा तयार करून चहा विक्रीचा व्यवसाय करतात.

प्रचंड मेहनतीने त्यांनी हा व्यवसाय वाढविला आहे. त्यांची दोन मुले प्रदिप माळी व संदीप माळी त्यांना या व्यवसायात भरीव मदत करतात.

चहा तयार करून तेर येथे ग्राहक मागेल त्या ठिकाणी टीव्हीएस वाहानावरून महादेव माळी व त्यांची दोन्ही मुले चहा पोहंच करतात. विशेष म्हणजे कुठल्याही ठिकाणी चहा मागवा प्रति कप पाचच रूपये भाव असल्याने तत्परता व चिकाटीमुळे प्रतिदिन एक हजार कप चहा विक्री होतो.

प्रतिदिन एक हजार चहा विक्रीचे पाच हजार रुपये प्रतिदिन मिळतात तर महीन्याला दिड लाख रुपये मिळतात.त्यामध्ये पंचेविस हजार रुपये सर्व खर्च वजा जाता सव्वा लाख रुपये उत्पन्न मिळाले.प्रचंड मेहनत व व्यवसाय करण्याची चिकाटी यामुळे तेर व परिसरात चहा विक्रेता महादेव माळी प्रसिद्ध आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना : आमच्याही खात्यावर पैसे पाठवा पात्र महिलांची मागणी

तभा वृत्तसेवा
नळदुर्ग, दि.२६ ऑगस्ट-

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे पैसे पात्र महिलांच्या खात्यावर जमा झाले आहेत. मात्र अजुनही कांही पात्र महिलांच्या खात्यावर पैसे जमा झाले नाहीत. त्यामुळे लाडक्या बहिणीच्या चेहऱ्यावर कुठे खुशी तर कुठे गम दिसुन येत आहे. त्यामुळे सरकारने सर्व पात्र महिलांच्या खात्यावर तात्काळ पैसे पाठविणे गरजेचे आहे.

राज्यातील महायुतीच्या सरकारने राज्यातील २१ ते ६५ वयोगटातील महिलांसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु केली आहे या योजनेअंतर्गत पात्र महिलेला सरकार दर महिन्याला १ हजार ५०० रुपये देणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांच्यासह संपुर्ण मंत्रीमंडळाने ही योजना सुरु करून राज्यातील महिलांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. या योजनेमुळे सर्व सामान्य महिलांची आर्थिक उन्नती होणार आहे. विरोधक कितीही या योजनेला नावे ठेवत असले तरी या योजनेचा फायदा महायुती सरकारला येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत होणार हे निश्चित आहे. कारण या योजनेवर राज्यातील महिला खुश आहेत.

गेल्या सात दिवसांपासुन मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेतील पात्र महिला लभार्थ्यांच्या खात्यावर दोन महिन्याचे एकुण ३ हजार रुपये जमा होण्यास सुरुवात झाली आहे त्यामुळे ज्यांच्या खात्यावर ही रक्कम जमा झाली आहे.

त्या महिला आज कमालीच्या आनंदी दिसत आहेत. खात्यावर पैसे जमा खाल्याचा मोबाईलवर मैसेज आल्यानंतर ते पैसे काढण्यासाठी महिलांची बँका तसेच पोष्ट ऑफिसमध्ये गर्दी दिसुन येत आहे. पैसे काढण्यासाठी महिलांची झुंबड उडत आहे. ज्या गरीब पात्र महिला आहेत त्यांना या पैशाचे मोल वाटतं आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे पैसे ज्या पात्र महिला लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा झाले आहेत त्या महिला आज कमालीच्या आनंदात दिसत आहेत मात्र या योजनेसाठी पात्र ठरलेल्या कांही महिलांच्या खात्यावर अजुनही पैसे जमा झाले नाहीत.

या महिला दररोज बँकेत खात्यावर पैसे जमा झाले का हे पाहण्यासाठी फेऱ्या मारत आहेत. मात्र अद्यापही या महिलांच्या खात्यावर पैसे जमा झाले नाहीत. त्यामुळे अशा महिलांच्या आनंदावर विरजन पडले आहे.

ज्या महिलांचे एकाच दिवशी या योजनेचे फॉर्म भरले आहे त्यातीलच कांही महिलांच्या खात्यावर आजही पैसे जमा झाले नाहीत. त्यामुळे या योजनेसाठी पात्र ठरलेल्या लाडक्या बहीण्याच्या चेहऱ्यावर कुठे ख़ुशी तर कुठे गम दिसुन येत आहे.

सर्व पात्र महिलांच्या खात्यावर एकदाच पैसे जमा होणे अपेक्षित असताना कांही महिलांच्या खात्यावर पैसे जमा होतात आणि कांहीच्या नाही यामुळे गोंधळाची स्थिती निर्माण झाली आहे.

याचा फटका महायुती सरकारला बसण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे प्रशासनाने तात्काळ सर्व उर्वरीत पात्र महिलांच्या खात्यावर पैसे जमा होण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. महायुती सरकारची महिला संदर्भातील मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही योजना अतिशय चांगली आहे.

केवळ प्रशासनाच्या चुकांमुळे ही योजना बदनाम होऊ नये याची दक्षता प्रशासनाने घेणे गरजेचे आहे नळदुर्ग शहरातील आजही या योजनेसाठी पात्र ठरलेल्या अनेक महिलांच्या खात्यावर ३ हजार रुपये जमा झाले नाहीत.

पात्र असुनही महिलांच्या खात्यावर मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेचे पैसे का जमा झाले नाहीत याची धाराशिवचे जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंबासे यांनी चौकशी करावी अशी मागणी होत आहे.

आरळी बुद्रूक येथील खेळाडूंची जिल्हास्तरीय कुस्तीसाठी निवड

तभा वृत्तसेवा
इटकळ, दि.२६ ऑगस्ट -

तुळजापूर तालुक्यातील तालुका पावसाळी क्रीडा स्पर्धा सन २०२४-२५ अंतर्गत आखाडा मुदगुलेश्वर सिंदफळ येथे तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धा पार पडल्या.

येथील स्पर्धेत जिल्हा परिषद शाळा आरळी बुद्रुक मधील खेळाडूंनी वेगवेगळ्या वजन गटात प्रथम, द्वितीय क्रमांक मिळवले व जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली त्याबद्दल त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

प्रथम द्वितीय क्रमांक संपादन करून घवघवीत यश संपादन केले.

प्रतीक पारवे ४५ किलो वजन गट पहिला क्रमांक, कार्तिक भोसले ४८ किलो वजन गट पहिला क्रमांक, समर्थ वडवे ५१ किलो वजन गट पहिला क्रमांक, शाहूराजे शिंदे ७१ किलो वजन गट पहिला क्रमांक, चैतन्य आप्पासाहेब जगताप ८० किलो वजन गट पहिला क्रमांक, समर्थ विश्वनाथ शिंदे ४८ किलो वजन गट दुसरा क्रमांक मिळवला आहे. वरील सर्व विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक प्रकाश स्वामी व मुख्याध्यापक गौतम राठोड, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मकरंद बामणकर, उपाध्यक्ष किरण गायकवाड, कुस्ती प्रशिक्षक महाराष्ट्र चॅम्पीयन अजित भोसले, गावातील श्रीमंत कुस्ती आखाड्याचे संजय पारवे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक चव्हाण, उळेकर, साखरे, कुलकर्णी, घेवारे, जावळे, शिंदे, जाधव, कानडे, आगासे, कांबळे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

संस्कारभारती, प्लाईंग किडस् इंग्लिश स्कूलच्या वतीने श्रीकृष्णरुप सज्जा स्पर्धा

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२६ ऑगस्ट-

श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या निमित्ताने जिल्हा संस्कारभारती समिती व प्लाईंग किडस् इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीकृष्णरूप सज्जा स्पर्धा संपन्न झाली.

शाळेतील विद्यार्थ्यांनी श्रीकृष्णाच्या गीतावर समुह नृत्य सादर केले. दहिहांडी फोडण्यात आली. त्यानंतर स्पर्धेस सुरुवात झाली नर्सरी ते ५ वी पर्यंतच्या एकूण ६० स्पर्धेकांनी सहभाग नोंदविला संस्कार भारतीच्या पदाधिकाऱ्यांनी परिक्षणातून नर्सरी प्रथम अर्जुन आदित्य पाटील, द्वितीय रघुवीर सचिन पेठे, तृतीय समजीत जाधव, युकेजी प्रथम राजवीर राहूल लंगडे, द्वितीय मल्हार विवेक मुंडे, तृतीय ओम परमेश्वर राठोड इ.१ ली प्रथम द्वितीयअभिमन्यु व्हटकर, तृतीय कार्तिक सुरवसे, सिध्दी पेठे इ.२ री अभय पवार, राजवीर धाबेकर, विनायक घोणे, इ. ३ री अनुजा कांबळे, सिद्धी संकपाळ, गितीका पवार इ. ४ थी आर्यन गायकवाड, समीहा तांबोळी, धनश्री कांबळे इ.५ वी संध्या पेठे, प्रणया पेंदे यांना देवगिरी प्रांत चित्रकला विधाप्रमुख शेषनाथ वाघ, संस्कार भारती जिल्हाध्यक्ष श्यामसुंदर भन्साळी, शहराध्यक्ष शरद वडगावकर, जिल्हा संगीतप्रमुख सुरेश वाघमारे, प्राचार्य चंद्रमणी चर्तुवेदी, सदस्य अनिल मालखरे यांचे बक्षीस प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. बासरी वादन केल्याबद्दल गणेश यादुराव माळी यास ही गोरविण्यात आले. स्पर्धा यशस्वीतेसाठी जिल्हा कार्याध्यक्ष अनिल ढगे, जिल्हा सचिव प्रभाकर चोराखळीकर, धनंजय कुलकर्णी आदि मान्यवर सदस्य, प्रशालेचे कलाध्यापक जगदीश सुतार यांच्यासह शिक्षक-शिक्षिकेत्तर कर्मचारी वृंदांनी परिश्रम घेतले.

डॉक्टर आणि केमिस्ट असोशिएशनचा वर्गणीच्या तगाद्यातुन सुटका करण्यासाठी अनोखा फंडा, वर्गणीऐवजी आरोग्य शिबीर घेण्याचा उत्सव मंडळांना सल्ला

तभा वृत्तसेवा
येरमाळा, दि.२६ ऑगस्ट-

येथील डॉक्टर आणि केमिस्ट आसोशिएशन यांच्या वतीने महापुरुषांच्या जयंती, गणेशोत्सव मंडळांच्या वर्गणीच्या तगाद्यातून सुटका व्हावी यासाठी वर्गणी ऐवजी उत्सव मंडळांना उपक्रम म्हणुन आरोग्य शिबिर घेण्याचे डॉक्टर, केमिस्ट असोशिएशनच्या झालेल्या बैठकीत ठरले असून गावतील कुठलीही जयंती असेल त्या प्रसंगी देनगी देण्याऐवजी त्या ठिकाणी डॉक्टर,केमिस्ट असोशिएशनच्या वतीने आरोग्य शिबीर घेण्याचे सर्वानुमते ठरले आहे. या शिबिरात डॉक्टरांकडून, मोफत तपासनी तर केमिस्ट असोशिएशनच्या वतीने मोफत औषधे देण्यात येतील.

असे दोन्ही असोशिएशनच्या वतीने एक मताने ठरले आहे.तरी संबधीत मडंळानी असोशिएशन अध्यक्ष यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन या बैठकीत संयोजकच्या वतीने करण्यात आले. तरी गरजुना याचा लाभ होईल आरोग्य शिबिर मंडळांनी ठरवलेल्या वेळी घेण्यात येईल तसे असोशिएशनच्या

जाहीर कळविण्यात येईल.

येरमाळा येथून प्रथमच देणगीऐवजी आरोग्य शिबिर हा फंडा प्रथमच नव्याने होत असल्याने दोन्ही आसोसिएशनचा उपक्रम कौतुकास्पद

असुन आरोग्य शिबिर घेतल्याने गोर गरीबांची सेवा तर होईल शिवाय महापुरुषाची जयंती खऱ्या अर्थाने साजरी केल्याचे समाधान मिळेल, असे यावेळी डॉ.संदीप तांबारे यांनी सांगितले असले तरी महापुरुष जयंती, गणेशोत्सव आयोजकांना या बैठकीत निमंत्रित करुन विश्वासात न घेता डॉक्टर, केमिस्ट असोशियएशनचा वर्गणी ऐवजी आरोग्य शिबिराचा फंडा कितपत यशस्वी होईल हे औत्सुक्याचे ठरणार आहे.

यावेळी डॉक्टर असोशिएशनचे अध्यक्ष डॉ.राजकुमार घुगे, उपाध्यक्ष डॉ.दैवशाला भगत, सचिव डॉ.अमित मुंढे, खजिनदार डॉ.पल्लवी तांबारे, डॉ.सचिन पवार, डॉ. सचिन बांगर, डॉ.मंजूश्री बारसकर, तर केमिस्ट असोशिएशनचे सदस्य, जाफर शेख, गोविंद मुंढे, अण्णासाहेब माढ़ेकर, अजेंद्र शामकूळे, कश्मीर शेख, सूरज वनवे, किरण पौळ, रघुनाथ बारकुल, नयन मुंढे, रोहित वाघमारे, राजेश ताम्हाने आदि उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

नांदेड जिल्ह्याच्या राजकारणातील 'वसंत' कोमेजला

तभा वृत्तसेवा
नांदेड,२६ ऑगस्ट -

नांदेडच्या राजकारणापासुन दिल्लीपर्यंत पाहचलेला खासदार वसंत चव्हाण यांचा राजकिय प्रवास आज थांबला. नांदेड जिल्ह्यातील राजकारणात जवळपास अर्धशतक गाजविणारे व्यक्तीमत्व आज काळाच्या पडद्याआड गेल्याने नांदेड जिल्ह्यावर शोककळा पसरली आहे. खासदार वसंत चव्हाण यांच्या निधनाची बातमी कळताच त्यांच्यावर प्रेम करण्याऱ्यांनी आज नायगावमध्ये मोठी गर्दी केली. तर नायगाव परीसरात आज कडकडीत बंद पाळण्यात आला.

सन १९७८ ते २०२४ या ४६ वर्षांच्या कार्यकाळात खासदार वसंत चव्हाण यांनी अनेक सामाजीक, धार्मिक कार्ये केले. याच बरोबर नायगाव मतदारसंघात भरीव असे कार्य करुन एज्युकेशन सोसायटी नायगावला मराठवाड्यातील एक अग्रगण्य संस्था म्हुणुन नावारुपाला आणले. नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत महायुतीच्या उमदवारांना चागलीच टक्कर देत मताधिक्क्याने नांदेड लोकसभेवर विजय मिळवला. नांदेड लोकसभेत 'वसंत' फुलाला असतानाच काळाने झडप घालत आज हा 'वसंत' कोमेजुन टाकला. शांत आणि संयमी नेतृत्व म्हणून त्यांची राज्यभरात ओळख असलेल्या खासदार वसंत चव्हाण यांच्या निधनामुळे केवळ नांदेडच नव्हे तर महाराष्ट्राला धक्का बसला आहे. विविध पक्षातील नेतेमंडळी शोक व्यक्त करीत आहेत.

खासदार वसंत चव्हाण यांच्या निधनाने काँग्रेसच्या राजकारणात पोकळी निर्माण झाली आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्यासह राज्यातील काँग्रेस नेत्यांनीही वसंत चव्हाण यांना आदरांजली वाहिली आहे. काँग्रेस विचारांचा सच्चा पाईक असणाऱ्या शांत आणि संयमी नेतृत्वाला जड अंत:करणाने श्रद्धांजली, अशा शब्दांत विविध पक्षातील नेत्यांनी आदरांजली वाहिली.

लढवय्या नेता गमावला

काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते, नांदेड लोकसभेचे खासदार वसंतराव चव्हाण यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दु:खद आहे. काँग्रेस पक्षाने एक लढवय्या नेता आणि आपण एक सहकारी गमावला आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत काँग्रेस पक्षाशी एकनिष्ठ राहून त्यांनी नांदेड जिल्ह्यात काँग्रेस विचार टिकवून ठेवला. त्यांना माझी भावपूर्ण श्रद्धांजली. आम्ही सर्वजण चव्हाण कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहोत.

बाळासाहेब थोरात

.....

खासदार वसंत चव्हाण यांच्या निधनाने पक्षाची मोठी हाणी

नांदेड लोकसभा मतदारसंघाचे खासदार वसंतरावजी चव्हाण यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दु:खद आहे. काँग्रेस विचारांशी एकनिष्ठ राहून त्यांनी कठीण काळात काँग्रेस पक्षाला साथ दिली आणि नांदेड जिल्ह्यात पक्ष संघटना टिकवून ठेवली होती. काँग्रेस पक्ष हेच आपले कुटुंब आहे या भावनेने ते आयुष्यभर काँग्रेस पक्षाशी एकनिष्ठ राहिले. काँग्रेस विचारांचा सच्चा पाईक असणाऱ्या वसंत चव्हाण यांच्या निधनाने पक्षाची मोठी हानी झाली आहे. वसंतरावजी चव्हाण यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. या कठीण प्रसंगी चव्हाण कुटुंबाच्या आणि मित्र परिवाराच्या दु:खात सहभागी आहोत.

विजय वडेट्टीवार

.....

निधनाची वार्ता अत्यंत धक्कादायक

काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते, नांदेड लोकसभा मतदारसंघाचे खासदार वसंत चव्हाण यांच्या निधनाची वार्ता अत्यंत धक्कादायक आहे. प्रतिकूल परस्थितीत देखील त्यांनी काँग्रेस पक्षाशी सदैव एकनिष्ठ राहून काँग्रेस पक्षाचा विचार घरोघरी पोहोचवला. वसंत चव्हाण यांना जड अंतःकरणाने श्रद्धांजली अर्पण करतो. चव्हाण कुटुंबियांवर कोसळलेल्या या दु:खात संपूर्ण काँग्रेस पक्ष त्यांच्या सोबत आहे.

नाना पटोले

.....

अनुभवी नेतृत्व काळाच्या पडद्याआड

ज्येष्ठ नेते व नांदेडचे खासदार वसंतराव चव्हाण यांच्या निधनाचे वृत्त अतिशय धक्कादायक आहे. वैद्यकीय उपचारांना प्रतिसाद देऊन आज ना उद्या ते बरे होतील, अशी अपेक्षा होती. मात्र, आज पहाटे काळाने त्यांच्यावर दुर्दैवी घाला घातला. खा. वसंतराव चव्हाण व आमचे दोन पिढ्यांचे संबंध होते. आमच्या वडिलांनी एकत्र काम केले, आम्ही सुद्धा राजकारण व सहकार क्षेत्रात अनेक वर्ष सोबत राहिलो. नांदेडचे खासदार म्हणून त्यांना प्रथमच केंद्रीय स्तरावर काम करण्याची संधी लाभली होती. मात्र, त्यांच्या निधनाने ग्रामीण भागाची नाडी उत्तमपणे जाणणारे एक संयमी, विनम्र व अनुभवी नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. खा. वसंतराव चव्हाण यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

खा. अशोक चव्हाण

.....

वसंत चव्हाणांचे जाणं नि:शब्द करणारे

राजकारण बाजूला ठेऊन काही नाते संबध जोपासलेही पाहिजे. रविवारी कालच मी त्यांना भेटायला हैदराबादला गेलो आणि सकाळी वसंतराव गेले ही बातमी समजली. अत्यंत वेदना झाल्या. चिखलीकर परिवार व चव्हाण परिवार नाते संबंधात आम्ही गुंतलेले आहोतच. परंतु १९९२ पासून दोघेही राजकारणात मित्र म्हणून वावरलो. १९९२ पूर्वी आम्ही दोघेही सरपंच होतो. १९९२ ला जि.प. सदस्य तेही झाले आणि मीही झालो आणि तेव्हापासून आमच्या मैत्रीचा सहवास सुरू झाला. २००४ मध्ये मी विधानसभेवर तर वसंतरावजी विधान परिषदेवर होतो. दोघेही अतिशय मनमोकळेपणाने आणि प्रामाणिकपणे जिल्ह्याच्या विकासाच्या संदर्भात काम करत होतो. जि.प. मधील मैत्री पुढे आमदारकी मध्येही बहरली. आम्ही जिल्हा मध्यवर्ती बँकेत सुद्धा एकत्रित काम केलं. विचाराची प्रगल्भता, दिलदारपणा हे त्यांचे गुण भावणारे होते. चव्हाण कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे, अशा शब्दात माजी खा. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी श्रध्दांजली अर्पण केली.

माजी खा. प्रताप पा. चिखलीकर

.....

धक्कादायक, वेदनादायी अन् दु:खद

अनुभवी खा. वसंतराव चव्हाण यांच्यावर उपचार सुरू असतानाच आज पहाटे ५.३० वाजता हैदराबाद येथील किम्स हॉस्पिटलमध्ये त्यांनी अखेरचा श्वास घेतला. आम्हा सर्वांसाठीच हे अत्यंत धक्कादायक असे वृत्त आहे. जिल्ह्यातील राजकारणातील अनुभवी व्यक्तिमत्त्वाचे हे असे अचानक निघून जाणे हे खरं वाटत नाही. यासमयी आमचे पवार कुटुंबीय व भाजप परिवार प्रा. रवींद्र चव्हाण, चव्हाण परिवार व नातेवाईकांच्या दु:खात सहभागी आहोत, अशा शब्दात आ. राजेश पवार यांनी श्रध्दांजली अर्पण केली.

आ. राजेश पवार

.....

परिश्रमी लोकनेतृत्व काळाने हिरावून नेले!

राजकारण विरहित कौटुंबिक सबंध जोपासत सर्वच पक्षातील कार्यकर्ते, पदाधिकारी यांना कायम आपुलकीच्या जिव्हाळ्याने विचारपूस करणारे लोकप्रिय लोकनेते खा. वसंतराव चव्हाण यांच्या दु:खद निधनाने जनसमर्पित विकासासाठी सदैव कार्यतत्पर असणारे परिश्रमी लोकनेतृत्व काळाने हिरावून नेल्याची सदगदीत भावना नायगांव पंचायत समितीचे माजी सभापती श्रावण पाटील भिलवंडे यांनी आपल्या शोकसंदेशात व्यक्त केली.

श्रावण भिलवंडे

.....

खा.वसंतराव चव्हाण यांच्या निधनाने सर्व समाजाची हानी

सामाजिक,शैक्षणिक ,सहकार राजकीय अशा क्षेत्रात उत्तम कार्य करणारे आणि सर्व समाजाला सोबत घेऊन चालणारे नेते म्हणून खा .वसंतराव चव्हाण यांनी आपली ओळख निर्माण केली होती ते सुसंस्कृत नेते म्हणून परिचित होते.त्यांच्या निधनाने सर्व समाजाची हानी झाली आहे

बापुराव गजभारे

संक्षिप्त वृत्त

शिवसेनेच्या नायगाव विधानसभा प्रमुख पदी शिवाजी पन्नासे

नायगाव-नायगाव तालुक्यातील गडगा येथील शिवाजी नागोराव पन्नासे यांची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाच्या शिवसेनेच्या नायगाव विधानसभा प्रमुख पदी निवड करण्यात आली आहे. शिवसेना पक्ष सचिव संजय मोरे व जिल्हा प्रमुख गंगाधर बडुरे यांच्या प्रमुख उपस्थितीत नियुक्ती पत्र देऊन सत्कार करण्यात आला. शिवाजी नागोराव पन्नासे हे गेल्या अनेक वर्षापासून सामाजिक क्षेत्राच्या माध्यमातून अनेक लोकोपयोगी उपक्रम राबविले आहेत. त्यांच्या उत्साह,कामाची पद्धत व विधानसभा मतदारसंघात दांडगा जनसंपर्क आहे . पन्नासे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा मुख्यमंत्री पदाची शपथविधी होताना गडगा येथे असंख्य कार्यकर्ते सोबत घेऊन फटाक्यांची आतषबाजी करून पेढे वाटप करुन पाठिंबा देणारे नांदेड जिल्ह्यातील पहिले पदाधिकारी होते.शिवसेना पक्ष वाढीसाठी कमी वेळात दोन हजार सदस्य नोंदणी करून खासदार हेमंत पाटील व आमदार बालाजी कल्याणकर यांच्या सोबत मुंबईला जाऊन मुख्यमंत्री एकनाथ जी शिंदे साहेब यांना प्रत्यक्ष भेटून त्यांना सुपुर्द केले. त्यांच्या कामांचा उत्साह पाहून वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेच ठाकरे यांच्या आशीर्वादाने व शिवसेना मुख्य नेते तथा महाराष्ट्र राज्यांचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार व शिवसेना पक्ष सचिव संजय मोरे व जिल्हा प्रमुख गंगाधर बडुरे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवाजी नागोराव पन्नासे यांची शिवसेना पक्षाच्या नायगाव विधानसभा प्रमुख पदी नियुक्ती पत्र देऊन मुंबई येथील शिवसेना मध्यवर्ती कार्यालयात सत्कार करण्यात आला आहे. शिवाजी नागोराव पन्नासे यांची शिवसेना पक्षाच्या नायगाव विधानसभा प्रमुख पदी निवड झाल्याबद्दल शिवसेना मराठवाडा संपर्क प्रमुख आनंदराव जाधव, शिवसेना उपनेते तथा माजी खासदार हेमंत पाटील,मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव बालाजीराव पाटील खतगावकर, आमदार बालाजी कल्याणकर, नायगाव विधानसभा संपर्क प्रमुख संजय काळे, जिल्हाप्रमुख गंगाधर बडुरे, युवा सेना जिल्हाप्रमुख ओमप्रकाश धुप्पेकर,सहसंपर्कप्रमुख आकाश रेड्डी,उमरी तालुका प्रमुख सुभाष पेरेवार, नायगाव तालुका प्रमुख श्यामसुंदर कवळे, नायगाव शहरप्रमुख रणजित कल्याण, भानुदास पाटील कोलंबीकर, प्रभाकर इंगोले, माणिक जाधव, माधवराव माळगे, संजय गोईनवाड, सुभाष जाधव, लक्ष्मणराव जाधव,संजय नावंदे,माधव ईटकापल्ले,माधव जाधव, गजानन विभुते, ओमकार आमलापुरे, संतोष ईबितदार सह अनेकांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

नांदेड जिल्हा होमगार्ड नोंदणीस ३० ऑगस्टपासून सुरवात

नांदेड -नांदेड जिल्हा होमगार्ड मधील रिक्त असलेला अनुशेष पुर्ण करण्यासाठी होमगार्ड नोंदणीचे आयोजन ३० ऑगस्ट २०२४ पासून पोलीस मुख्यालय, नांदेड येथे केले आहे. सुधारित वेळापत्रकाबाबत सविस्तर माहिती https://maharashtracdhg.gov.in/mahahg/login1.php या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, अशी माहिती जिल्हा समादेशक होमगार्ड तथा अपर पोलीस अधिक्षक सुरज गुरव यांनी दिली आहे. तसेच १४ ऑगस्ट २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यत https://maharashtracdhg.gov.in/mahahg/login1.php या संगणक प्रणालीमध्ये नोंदणी अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी पुढीलप्रमाणे दिलेल्या अर्ज क्रमांकानुसार शैक्षणिक कागदपत्रे व आवश्यक प्रमाणपत्र पडताळणी व शारीरिक क्षमता चाचणीसाठी पोलीस मुख्यालय नांदेड येथे नमूद दिनांकास उपस्थित राहावे. पुरुष उमेदवारांनी पुढील आवेदन क्रमांकाप्रमाणे उपस्थित राहावे. ३० ऑगस्ट रोजी आवेदन क्रमांक १ ते १५००, ३१ ऑगस्ट रोजी १५०१ ते ४५००, १ सप्टेंबर रोजी ४५०१ ते ७५००, २ सप्टेंबर रोजी ७५०१ ते १०५००, ३ सप्टेंबर रोजी १०५०१ ते १३५००, ४ सप्टेंबर रोजी १३५०१ ते १६५००, ५ सप्टेंबर रोजी १६५०१ ते १७४९५ या आवेदन क्रमांकाप्रमाणे उपस्थित राहावे. ५ सप्टेंबर रोजी आवेदन क्रमांक १ ते १७४९५ सर्व महिला उमेदवारांनी उपस्थित राहावे. उमेदवारांनी दिलेल्या तारखेप्रमाणे पोलीस मुख्यालय वजीराबाद नांदेड येथे सर्व आवश्यक मुळ शैक्षणिक प्रमाणपत्र व मुळ आवेदन तसेच सर्व स्वसाक्षांकित छायांकित प्रती तसेच २ पासपोर्ट आकाराचे फोटोसह सकाळी ६ वाजता हजर राहावे, असे जिल्हा समादेशक होमगार्ड कार्यालयाने प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

अमन कुंडगीर यांच्या प्रयत्नाला यश; किनवट ते शेगाव बस सुरू

तभा वृत्तसेवा
किनवट,२६ ऑगस्ट -

प्रवाशांच्या गैरसोयी लक्षात घेता प्रवाशांच्या सोयीसाठी लांब पल्ल्याच्या बसगाड्या सुरू करण्यात याव्यात या मागणीचे निवेदन धनगर समाज संघर्ष समिती, महाराष्ट्र राज्यचे युवक प्रदेशाध्यक्ष अमन कुंडगीर यांनी पद्मश्री डॉ.विकास महात्मे व किनवट माहूर चे आमदार भीमराव केराम तसेच किनवट बस आगार प्रमुखांना देण्यात आले होते. या निवेदनाची दखल घेऊन किनवट बस आगाराने किनवट ते शेगाव बससेवा सुरू केली आहे. यामुळे शेगावकडे प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी समाधान व्यक्त केले आहे.

किनवट तालुक्यातील जनतेला धार्मिक स्थळाला भेट देण्यासाठी मोठ्या अडचणीला सामोरे जावे लागत होते. त्यामुळे प्रवाशांची अत्यंत गैरसोय होत होती. किनवट ते शेगाव बस सुरू झाल्याने अनेक धार्मिक स्थळाला भेट देणाऱ्या प्रवाशांची गैरसोय दूर झाली आहे. धनगर समाज संघर्ष समिती, महाराष्ट्र राज्यचे युवक प्रदेशाध्यक्ष अमन कुंडगीर यांनी पद्मश्री डॉ.विकास महात्मे व आमदार भीमराव केराम यांना लेखी निवेदन देवून याबाबत पाठपुरावा करण्यासाठी त्यांना निवेदनाद्वारे कळविले होते. याची तात्काळ दखल घेवून डॉ.विकास महात्मे यांनी आगाराच्या वरिष्ठांना कळवून लांब पल्ल्याच्या गाड्या सुरू करण्याच्या सूचना दिल्या. तसेच किनवट वरुन नांदेड साठी सायंकाळ च्या वेळेत एक किनवट नांदेड अशी बस चालू करण्याची मागणी केली आहे.सायंकाळ ची अदिलाबाद पुर्णा ही रेल्वेगाडी गेल्या नंतर कोणते ही साधन नांदेड येथे जाण्यासाठी उपलब्ध नाही.ती पण लवकर चालू करू अशी ग्वाही किनवट बस आगार प्रमुखांनी दिली आहे. किनवट ते शेगाव ही लांब पल्ल्याची बस सेवा सुरू झाल्याने अमन कुंडगीर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री गिरीष महाजन, डॉ.विकास महात्मे व आमदार भीमराव केराम यांचे आभार व्यक्त केले आहे.

आ. राजेश पवारांनी काढली दीक्षाभूमीची सहल

तभा वृत्तसेवा
नायगाव,२६ ऑगस्ट -

नायगाव विधानसभेचे आ. राजेश पवार यांनी मतदार संघातील पाचशे पेक्षा अधिक नागरिकांना सोमठाना येथून नागपूर येथे मोफत दीक्षा भूमी तिर्थयात्रा दर्शन सहल जवळपास पन्नास खाजगी बसने रवाना करण्यात आली.

दि. २५ ऑगस्ट २०२४ रविवारी नायगाव तालुक्यातील सोमठाना येथून नागपूर येथे मोफत दर्शन यात्रेसाठी खासगी ट्रॅव्हल्स गाडीने पाचशेच्या वर बौद्ध समाजातील महिला, पुरुषांना आ. राजेश पवार यांच्या पुढाकारातून तीर्थ यात्रे साठी पाठविण्यात आले.

ही सहल रवाना करताना स्वतः आ. राजेश पवार, जि.प. सदसया पुनमताई पवार, माजी प्राचार्य मनोहर पवार, डॉ. कागडे, बालाजीराव मदेवाड, परमेश्वर कदम, बाबासाहेब हंबर्डे, श्रीहरी देशमुख, दत्ता पाटील ढगे, प्रविण बियाणी, आदींनी हिरवी झेंडी दाखवली.

या खासगी बसने सहल रवाना करताना नायगांव तालुक्यातील यात्रेकरू नागरिकांना आरोग्य सुविधा, सुरक्षा, चहा , नाष्टा, जेवण , पुरवले जाणार असल्याचे आमदार राजेश पवार यांनी यावेळी सांगितले.

प्रत्येकांनी आयुष्यात येऊन एकवेळ तरी नागपूर येथील दिक्षा भुमी पहावे व दर्शन घ्यावे असे स्वप्न पाहणाऱ्या महीला , पुरुष, व्यक्तींना नायगाव विधानसभेचे आमदार राजेश पवार, पुनमताई पवार यांनी साकार केल्यामुळे बौद्ध समाजातील भाविकांनी आमदार राजेश पवार व पुनमताई पवार यांचे आभार मानले.

यावेळी नागेश पाटील कहाळेकर, श्याम पाटील कवळे, उत्तमराव देवरे, संदीप पाटील शिंदे, चक्रधर पाटील कदम, बापूराव वाघमारे, शिवाजी लांडगे, सुरेश भद्रे, शेषराव डुमणे, यशवंत सोनपारखे, यासह भाजपाचे हजारो पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीयांच्या पाठीशी भोई फाउंडेशन खंबीरपणे उभा राहील: डॉ. मिलिंद भोई

तभा वृत्तसेवा
अर्धापूर,२६ ऑगस्ट -

आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी पुण्यजागर प्रकल्प सुरू केला आहे .या प्रकल्पाच्या माध्यमातून शेतकरी कुटुंबाला आत्मनिर्भर करण्यासाठी प्रयत्न केला जात आहे.आत्महात्याग्रस्त शेतकरी कुटुंबीयांच्या पाठीशी भोई फाउंडेशन खंबीरपणे उभा राहिल.समाजाच्या सहकार्याने हा उपक्रम सुरू असुन हा शिक्षणाचा जगन्नाथाचा रथ समाजाच्या सहकाऱ्यांने ओढला जात आहे असे प्रतिपादन भोई फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ मिलिंद भोई यांनी रविवारी (ता २५). केले.

पुण्यातील भोई फाउंडेशनच्या वतीने नांदेड जिल्ह्यातील आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारले आहे. गेल्या आठ वर्षांपासून पुण्यजागर प्रकल्प सुरू आहे.पुण्यजागर परिवार व तालुका पत्रकार संघाच्या वतीने नांदेड शहरातील मुक्तेश्वर आश्रामात रक्षाबंधनाचा सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्याला अर्धापूर तालुक्यातील कोंढा, अर्धापूर, मालेगाव,धामदरी,दिग्रस,

येळेगाव आदी गावातील आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबातील सदस्य उपस्थित होते .

यावेळी गोविंद गुरु,नांदेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संजय देशमुख लहानकर, भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष ॲड किशोर देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष इंजिनिअर विश्वांभर पवार, प्रा डॉ बालाजी कोमपलवार, डॉ रघुनाथ शेटे , माजी जिल्हा परिषद सदस्य रामराम भालेराव,आवघुत कदम, विलास साबळे,बाळु पाटील धुमाळ, हेमंत गोसावी पल्लवी वाघ गितांजली देगावकर डॉ उज्वला पुरंदरे, सुधाकर टाक हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक पुण्यजागर प्रकल्पाचे जिल्हा समन्वयक लक्ष्मीकांत मुळे यांनी करून प्रकल्पा मार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली.तर आभार नागोराव भांगे यांनी यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गुणवंत विरकर, दत्ता टोकलवाड, निळकंठ मदने यांनी पुढाकार घेतला.यावेळी नामदेव बट्टेवाड, रामचंद्र वनलवाड, बालाजी डुबुकवाड, शिरीष टोकलवाड, व्यंकटी नागलवाड आदी उपस्थित होते.

पुयजागर प्रकल्पाला सहकार्य करू

आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना आधार देण्यासाठी भोई फाउंडेशनचा स्तुत्य उपक्रम आहे.शेतकरी कुटुंबांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न केला जाईल.पुण्यजागर प्रकल्पाला सहकार्य करण्याची ग्वाही संजय देशमुख लहानकर,ॲड किशोर देशमुख, इंजिनिअर विश्वांभर पवार यांनी दिली .

महात्मा फुले महाविद्यालयात करियर मार्गदर्शनी

मुखेड-येथील महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाच्या करियर कट्टा विभाग व मराठी विज्ञान परिषद व जिल्हा परिषद , नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय करियर मार्गदर्शन व समुपदेशन कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती .

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.बी. अडकिणे आणि प्रमुख मार्गदर्शक ग्रामीण तंत्रनिकेतन महाविद्यालय , नांदेडचे उपप्राचार्य डॉ. ओमप्रकाश दरक व प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.एस.बी.बळवंते हे उपस्थित होते . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. संतोष शेंबाळे तर आभार प्रदर्शन प्रा.डॉ. शिवसर्जन टाले व पाहुण्यांचा परिचय प्रा.भालचंद्र गांजरे यांनी करून दिले .

सोनखेड येथे श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त विविध कार्यक्रम

तभा वृत्तसेवा
सोनखेड,२६ ऑगस्ट -

जगद्गुरू संत श्री तुकाराम महाराज यांच्या पावन नगरीत दरवर्षी प्रमाणे याही वर्षी श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. २६ ऑगस्ट रोजी सोमवारी संध्याकाळच्या सत्रात ७ ते ९ या वेळेत महाअभिषेक ९ ते १० नरोत्तम दास (प्रभुजी) यांच्या सुश्राव्य वाणीतून कृष्ण कथेच्या माध्यमातून भगवान श्रीकृष्ण गोपाळाच्या विविध लिलावर प्रकाश टाकल्या जाईल. तर १० ते ११, श्री कृष्ण यांना १५६ भोगदर्शन श्री कृष्णा समोर ठेवण्यात येईल आणि रात्री ११ ते १२ नाम संकीर्तन व महाआरती होईल तर मध्यरात्री द्वारकाधीश श्रीकृष्ण जन्म झाल्यानंतर १५६ भोगाचा नैवेद्य प्रथमतः देवाला दाखविल्या जाईल नंतर लगेच भक्तांना उपवासाचा महाप्रसाद देण्यात येणार आहे.

२७ ऑगस्ट रोजी मंगळवारी सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प.चंद्रकांत महाराज लाठकर यांच्या सुमधूर वाणीतून किर्तन सोहळा पार पडेल व किर्तन संपल्यानंतर लगेच महाप्रसादाचे आयोजन बाजार मैदान सोनखेड येथे करण्यात आले आहे. तरी या श्रीकृष्ण कन्हैयाच्या जन्माष्टमीच्या निमित्ताने आयोजित केलेल्या या आध्यात्मिक कार्यक्रमाचा व महाप्रसादाचा पंचक्रोशीतील भावी भक्तांनी सहकुटुंब लाभ घ्यावा असे आवाहन आयोजन समितीचे यजमान बालाजी उद्धवराव मोरे, सुहास बालाजीराव मोरे, विलास बालाजीराव मोरे प्रकाश बालाजीराव मोरे, श्री प्रभु कैलास बालाजीराव मोरे व समस्त गावकरी मंडळी सोनखेडच्या वतीने करण्यात आले आहे. दरवर्षी आठ ते दहा हजार भाविक या महाप्रसादाचा लाभ घेत असतात व सर्व संत तुकोबाराय नगरी श्री कृष्ण भक्ती मध्ये रममान होते.

नायगाव मतदार संघात उमरी परी हॉस्पीटलतर्फे गरोदर मातासाठी मोफत रक्त तपासणी

तभा वृत्तसेवा
उमरी,२६ ऑगस्ट -

कै. बापूसाहेब देशमुख गोरठेकर यांच्या जंयती ते पुण्यतिथी या पंधरवाड्यात नायगाव मतदार संघात उमरी परी हॉस्पीटल यांनी गरोदर माता यांना रक्त तपासणी मोफत इतर सोनोग्राफी ५० टक्के टक्के सुट देवून अभियान राबविण्यात आला आहे.

या अभियानाला कै . माजी आमदार बापूसाहेब गोरठेकर यांच्या जन्म दिवस ९ ऑगस्ट आणि २५ ऑगस्ट पुण्यतिथी दिन आहे . त्या अनुषंगाने बापूसाहेब गोरठेकर ह्यात असतांना गेल्या अनेक वर्षापासून डॉ माधव विभूते यांनी हा पंधरवाड्यात गरोदर मातासाठी रक्त तपासी मोफत , म्ब्युलन्स ये - जा करण्यासाठी मोफत इतर चाचण्यात ५० % सुट दिली आहे रक्त तपासणी मतदार संघातील उमरी, धर्माबाद, नायगाव तालुक्यात हे अभियान राबविण्यात आले आहे . आता ते अभियान ९ ऑगस्ट रोजी सुरू उमरी पंचायत समिती व कृषी उत्पन्न सभापती शिरीष गोरठेकर , जिल्हा मध्यवर्ती बँक संचालक कैलास गोरठेकर , कृषीरत्न पुरस्कार प्राप्त सुभाष

देशमुख गोरठेकर यांच्या शुभ हस्ते धर्माबाद येताळा येथून सुरुवात झाली आणि उमरी तालुक्यात बितनाळ - ते धानोरा बु येथे दि २५ ऑगस्ट २०२४ शेवट घेण्यात आले पण यावेळी पुन्हा एकदा डॉ .माधव विभूते हे स्त्री रोग , भुल तज्ञ असल्याने त्यांनी संकल्प करून मतदार संघातील उर्वरित गावात ही पंधरवाड्यात हे अभियान कमी पडत अल्याने गोरठेकर घराण्यासाठी कांही पण करणारे डॉ माधव विभूते यांनी पुन्हा १५ दिवस वाढवले आहेत म्हणजे हे अभियान ९ ऑगस्ट ते ९ सप्टेंबर २०२४ पर्यंत वाढ करून ठेवले आहे . डॉ विभूते यांनी या शिबीरातील तम्माम गरोदर माता यांनी रक्त तपासणीची शिबीराचे कार्ड घेवून उमरी परी हॉस्टीपल येथे येवून इतर चाचण्या ५० टक्के मध्ये सुट देणार आहे. त्या अनुषंगाने बितनाळ येथे गरोदर माताचे शिबीर घेण्यात आले. या शिबीराचे उद्घाटन कै बापूसाहेब देशमुख यांचे सुपुत्र कैलास देशमुख गोरठेकर यांनी केले. प्रमुख मार्गदर्शन डॉ माधव विभूते यांनी केले तर यावेळी गावातील पत्रकार नागेश बट्टेवाड , बालाजी सांवत , शिवकांत गोरठेकर , राजू मनूरकर ,उपसरपंच प्र देविदास आक्कवाड , कृषी उ बा संचालक प्र गणेश आन्नेमवाड , सुदाम पलेलवाड , चेअरमन भुंजग पा जाधव , पहेलवान गोविंद बन्केवाड , नागनाथ घुमलवाड ,बंडू सुर्यवंशी बितनाळ आदी नागरीक व गरोदर माता उपस्थित होते.

CMYK

लातूर
दिनांक

लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केल

अण्णा भाऊ साठे हेच बाबासाहेबांच्या विचारांचे वारसदार : डॉ. गायकवाड

तभा वृत्तसेवा,
शिरुर अनंतपाळ, दि. २६ ऑगस्ट-

अण्णाभाऊंनी 'फकीरा' ही कादंबरी बाबासाहेबांच्या झुंजार लेखणीला अर्पण केले व बाबासाहेबांच्या धम्म परिवर्तनाचा संदेश बुद्धाची शपथ या कथेतून दिल्यामुळे खऱ्या अर्थाने अण्णाभाऊ साठे हे डॉ बाबासाहेबांच्या चळवळीचे व विचाराचे वारसदार होते, असे प्रतिपादन प्रा. डॉ. मारोती गायकवाड यांनी साकोळ येथे अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समितीच्या वतीने आयोजित व्याख्यानात समाज बांधवाना मार्गदर्शन करताना म्हणाले .

अध्यक्षस्थानी उपसरपंच राजकुमार पाटील होते. यावेळी नवनाथ डोंगरे आर. डी. जोगदंड यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. सूत्रसंचालन दत्ता शिंदे यांनी केले तर आभार प्र प्रशांत शिंदे यांनी मानले. या कार्यक्रमास बबन पाटोळे, कमलाकर शिंदे,संजय शिंदे, सचिन कांबळे,सतीश मादळे उपस्थित होते.

संक्षिप्त वृत्त

'सभ्य गृहस्थहो' नाटकाचे सादरीकरण

लातूर, दि. २६ ऑगस्ट-

नाट्यस्पंदन प्रतिष्ठाण लातुरच्या वतीने वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टर मंडळींचा सहभाग असलेल्या सभ्य गृहस्थहो नामक विनोदी दोन अंकी नाटकाचे स्वर्गीय दगडोजीराव देशमुख स्मृती भवन या ठिकाणी आयोजन करण्यात आले होते. सभ्य ग्राहस्थहो या नाटिकेचा शुभारंभ माजी मंत्री, आमदार अमित देशमुख, खासदार डॉ. शिवाजी काळगे आणि मान्यवरांच्या हस्ते नटराज पूजन करून करण्यात आला. राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख आणि उपस्थित सर्व मान्यवर, नाट्य रसिकांनी सदरील नाटकाचा मनमुराद आनंद घेतला. सभ्य ग्राहस्थहो या नाटिकेचे लेखन -जयवंत दळवी, दिग्दर्शक-डॉ. चंद्रकांत शिरोळे, सह दिग्दर्शक -डॉ.अभय ढगे आणि डॉ. मुकुंद भिसे, नेपथ्य - दत्तात्रय राऊत आणि डॉ. वेंकट येलाले, प्रकाश योजना-संजय आयचीत,संगीत - डॉ. अभय ढगे आणि दयानंद सरपाळे, रंगभूषा-भारत थोरात, प्रसिद्धी- डॉ. अनघा राजपूत आणि डॉ. वैशाली टेकाळे, रंगमंच व्यवस्था-गणेश पवार, नंदकुमार वाकडे, संदीप सहाणे तर या मधील कलाकार म्हणून डॉ. वेंकट येलाले, डॉ. मंजुषा कुलकर्णी, डॉ. भागवत शेळके, डॉ.शीतल टिके, डॉ.संजय मुंडकर, डॉ.शिल्पा दडगे, डॉ. अशोक आरदवाड, डॉ. अभिजित येलाले, डॉ. मुकुंद भिसे, डॉ.विनया बनशेळकिकर, डॉ. संदीप सहाणे, डॉ. अभय ढगे या वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवरांनी सादरीकरण केले ज्याचा रसिकांनी मनमुराद आनंद लुटला. दरम्यान यावेळी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते नाट्यस्पंदन प्रतिष्ठाण कडून खासदार डॉ. शिवाजी काळगे यांना मानपत्र देऊन तसेच प्रतिष्ठाणचे मानद सदस्यत्व देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी डॉ.चंद्रकांत शिरोळे, काँग्रेस जिल्हाध्यक्ष श्रीशैल उटगे, शहराध्यक्ष ॲड. किरण जाधव, ॲड. समद पटेल, सचिन बंडापल्ले, लक्ष्मण कांबळे, कैलास कांबळे, डॉ. ब्रिजमोहन झंवर, डॉ. अमित उटीकर उपस्थित होते.

आ. अमित देशमुख यांनी बाभळगाव निवासस्थानी घेतल्या नागरिकांच्या भेटी

लातूर, दि. २६ ऑगस्ट-

राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी रविवार दि. २५ ऑगस्ट रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्था पदाधिकाऱ्यांसह नागरिकांच्या भेटी घेऊन त्यांच्या अडीअडचणी समजून घेऊन निवेदनाचा व निमंत्रणाचा स्वीकार करून संबंधितांना पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सूचना केल्या. यावेळी लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, विलास को-ऑपरेटिव बँकेचे व्हा. चेअरमन समद पटेल, उदगीर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष कल्याण पाटील, उदगीर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिवाजीराव हुडे, नरसिंग गोमारे पद्माकर उगीले, शिवाजी मुळे, भटक्या विमुक्त संघटनेचे प्रदेशाध्यक्ष प्रा. सुधीर अनवले राम स्वामी, बंडू किसवे, गोविंद हनवटे, राजू पाटील, सुशांत धोत्रे, लातूर एनएसयूआय जिल्हाध्यक्ष रामराजे तानाजी काळे, भानुदास बिरादार, पप्पू देशमुख, श्रीपती जांभळदरे, सचिन जांभळदरे, समाधान जांभळदरे, बसवराज जांभळदरे, दत्ता देवकते, इंद्रजीत पाटील, अल्ताफ तांबोळी, अभिजीत देशमुख, कोंडीबाराव पाटील, गोविंद गायकवाड, दादाराव ढगे, लक्ष्मण बोराडे, रमेश चव्हाण, गोपाळ सरवदे, मारुती झाकणे, मनोहर गायकवाड, काका भगाडे, फरीद शहा, संभा गायकवाड, शंमु मुल्ला उपस्थित होते.

सच्चे विकासभिमुख खासदार हरवले : देशमुख

लातूर, दि. २६ ऑगस्ट-

नांदेड चे नवनिर्वाचित लोकप्रिय खासदार वसंतराव चव्हाण यांच्या अचानक निधनाने काँग्रेस पक्षाचे नुकसान झाले असून वसंतराव चव्हाण हे दोन वेळा माझ्यासोबत विधान परिषदेचे आमदार म्हणून अतिशय चांगल कार्य केले २० वर्ष नायगावचे सरपंच जिल्हा परीषद सदस्य म्हणून काम करत असताना लोकांचें प्रश्न सोडविण्यासाठी सतत कार्य करायचे काही दिवसापूर्वी नुकतेच ते नांदेड येथून लोकसभेवर काँग्रेसकडून निवडून आले होते मात्र त्यांच्या अचानक जाण्याने काँग्रेसचे नुकसान तर झाले आहे त्यांच्या माध्यमातून नांदेड व परिसरातील विकासकामाला सूरवात करण्या अगोदरच नियतीने त्यांना आपल्यातून घेवून गेले सकाळी जेव्हा हि दुःखद बातमी कळाली विश्वास बसेना त्यांच्या दुःखात देशमुख परिवार सहभागी आहे. दिवंगत खासदार वसंतराव चव्हाण हे यापूर्वी दोन वेळा आमदार असताना सभागृहात ज्वलंत समस्या मांडायचे विकासाची कामे करण्यासाठी पाठपुरावा करून लोकांशी संवाद ठेवायचे एखादा विषय मार्गी लावण्यासाठी ते पाठपुरावा करायचे एक स्वच्छ विकास भुमिख अभ्यासू खासदार म्हणून त्यांची ओळख झाली होती त्यांच्या अचानक जाण्याने काँग्रेसचे फार मोठे नुकसान झाले आहे ते कधीही भरून निघणार नाही त्यांच्या दुःखात दिलीपराव देशमुख परिवार सहभागी आहे.

महामार्गासाठी खरोळाफाटा येथे आंदोलन

तभा वृत्तसेवा,
रेणापूर, दि. २६ ऑगस्ट-

रेणापूर तालुक्यातील खरोळाफाटा येथे पानगाव व परीसरातील ग्रामस्थांच्या वतीने दिनांक १५ ऑगष्ट रोजी पासून खरोळा फाटा ते पानगाव पर्यंतचा रखडलेल्या राष्ट्रीय महामार्गाच्या कामाला सुरुवात करावी या मागणीसह इतर मागण्यासाठी उपोषण सुरु आसून या आंदोलनाची प्रशासन दखल घेत नसल्यामुळे रविवारी १० व्या दिवशी जागर घालत, प्रतिकात्मक प्रशासक आंदोलन स्थळी बसवून सामुहीक मुंडण आंदोलन केले.

रेणापूर तालुक्यातील खरोळा फाटा येथे खरोळा फाटा ते पानगाव राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरू करावे या मागणीसाठी १५ ऑगस्ट पासून पानगाव व परिसरातील ग्राम स्थांच्या वतीने उपोषण सुरू आहे या आंदोलनाचा रविवारी दहावा दिवस असतानाही याकडे मात्र प्रशासनाचे लक्ष वेधले नसल्यामुळे अखेर आंदोलक आक्रमक होत आंदोलन स्थळी प्रतिकात्मक प्रशासक बसवून त्याच्यासमोर जागर घालत संबळ वाजवत गाणे म्हणत जागे करण्याचे काम आंदोलन करत होते.

हा राष्ट्रीय महामार्ग लातूरकडून खरोळाफाटा ईथपर्यत पुर्ण झाला तर परळी कडून पानगाव येथील बागझरी वळणापर्यत हा रस्ता पुर्ण झाला आहे केवळ खरोळाफाटा ते पानगाव पर्यंतचा हा १४ किमी रस्ता गेल्या सहा वर्षापासून रखडला आहे. या रस्त्याची अत्यंत दैनिय अवस्था झाली आहे. १४ किमीचा हा खराब झालेला रस्ता पार करण्यासाठी एक ते दिड तास लागत आहे. या दुरावस्था झालेल्या रस्त्याने अनेकांचे बळी घेतले. रुग्णाला दवाखान्यात नेण्यासाठी कोणतेच वाहन या रस्त्याने वेळेवर दवाखान्यात पोहचत नाही. आशा अनेक समस्यांना नागरीकांना तोंड द्यावे लागत आहे. प्रशासनाने या गोष्टीकडे लक्ष नाही दिले तर आंदोलन आणखी त्रि व स्वरूपात करण्यात येणार असल्याचे सुकेश भंडारे यांनी सांगितले.

५३ शेतकऱ्यांची रस्ता होण्यास सहमती

रेणापूर तालुक्यातील भंडारवाडी चुकारवाडी पाथरवाडी गोविंद नगर फावडेवाडी भंडारवाडी नरवटवाडी मुरढव आदी सह अनेक गावातील ग्रामस्थ तसेच ग्रामपंचायतचे ठराव देऊन या आंदोलनाला लेखी पाठिंबा दिला हा रस्ता तात्काळ सुरू करावा म्हणून पन्नगेश्वर साखर कारखान्यापासून ते खरोळा फाट्यापर्यंत रस्त्याच्या बाजूला असलेल्या ५३ शेतकऱ्यांनी शंभर रुपयांच्या बॉण्ड पेपर वरती आम च्या जमिनीतून रस्ता नेण्यास काही हरकत नाहीत अशा प्रकारचे शपथपत्र देऊन रस्ता होण्यास सहमती दर्शवली.

महाविकास आघाडीच्या खोट्या प्रचाराला जनता फसणार नाही : गणेश हाके

तभा वृत्तसेवा,
अहमदपूर, दि. २६ ऑगस्ट-

लोकसभा निवडणुकीत मोदी सरकार घटना बदलणार असा खोटा प्रचार करून लोकांची मते मिळवली परंतु विधानसभेला महाविकास आघाडीच्या खोट्या प्रचाराला जनता फसणार नाही असा विश्वास भारतीय जनता पार्टीचे प्रदेश प्रवक्ते गणेश हाके यांनी आज अहमदपूर येथे झालेल्या पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

अहमदपूर व चाकुर तालुक्यात आजपासून भा ज प चे वतीने जनसंवाद यात्रा आयोजित करण्यात आली आहे. या यात्रे संदर्भात सदरील पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली. सहा दिवस अहमदपूर व सहा दिवस चाकुर तालुक्यात हि यात्रा फिरणार आहे. अहमदपूर शहरातील गणेश मंदिरा पासून हि यात्रा निघणार आहे.

महाविकास आघाडीने भाजपचा विश्वासघात करून राज्यात सरकार आणले होते. ३३ महिन्याच्या काळात भाजप युतीच्या जलयुक्त शिवार, मराठवाड्यासाठी ची वाटर ग्रंड योजना, नद्या जोड प्रकल्प यासारख्या जनतेच्या कल्याणकारी योजनांना स्थगिती दिली. जनतेच्या हिताची एकही नवीन योजना सुरू केली नाही. कोवीड काळात भ्रष्टाचार करून प्रेताच्या टाळुवरचे लोणी खाल्ले विकासाबद्दल सांगण्यासारखे त्यांच्याजवळ काही नव्हते म्हणून फेक नरेटीव्ह अपप्रचाराचा आधार घ्यावा लागला. लोक एकदा फसतात वारंवार जनतेला खोटं बोलून फसवता येत नाही. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत जनता त्यांना त्यांची जागा दाखऊन दिल्याशिवाय राहणार नाही असे हाके म्हणाले.

भाजपमहायुती सरकारने गेल्या अडीच वर्षात जनते साठी ज्या विविध कल्याणकारी योजना आणल्या त्याची माहिती या वेळी देण्यात आली व त्याचसाठी हि जनसंवाद यात्रा आयोजित करण्यात आली आहे. भाजप लातूर जिल्हा अध्यक्ष दिलीपराव देशमुख यांनी आपल्या भावना या ठिकाणी अतिशय परखड शब्दात सांगितल्या. त्यामुळे पत्रकार परिषदेचा रंग बदलून येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत काय होईल याची झलक दिसून आली.

या पत्रकार परिषदेस जिल्हा सरचिटणीस ॲड भारत चामे, अहमदपूर तालुका अध्यक्ष प्रताप पाटील, जिल्हा उपाध्यक्ष गोविंद गिरी, महिला मोर्चा अध्यक्ष जयश्री केंद्रे, जमालपुरे, माजी अध्यक्ष हणमंत देवकत्ते, माणिक नरवटे, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष रामानंद मुंढे, ज्ञानोबा बडगिरे,आनंद गुंडरे, सुशांत गुनाले, संतोष कोटलवर उपस्थित होते.

'महात्मा बसवेश्वर' मध्ये जेईई, नीट संदर्भ ग्रंथ वितरण समारंभ

तभा वृत्तसेवा,
लातूर, दि. २६ ऑगस्ट-

महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचालित महात्मा बसवेश्वर विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाच्यावतीने अकरावी विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांकरिता जेईई, नीट, एमएचटी-सीईटी या परीक्षा करिता आवश्यक असणाऱ्या संदर्भ ग्रंथाचा वितरण समारंभ श्री महात्मा बसेश्वर शिक्षण संस्थचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर यांच्या शुभहस्ते नुकताच संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई हे होते तर विचारमंचावर उपप्राचार्य प्रा. संजय पवार, जेईई, नीट, एमएचटी-सीईटी समन्वयक प्रा. वनिता पाटील, बोर्ड समन्वयक डॉ. गुणवंत बिरादार, प्रा. संगमेश्वर पानगावे, प्रा. सतीश माळी, प्रा. गोविंद पांढरे, प्रा. नारायण गोरे, प्रा. केशव सूर्यवंशी, प्रा. नितीन वाणी, प्रा. यज्ञेश जनगावे आदींची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी बोलताना संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर म्हणाले की, विद्यार्थ्यांनी नियमित व सतात्यापूर्ण पद्धतीने अभ्यास केला पाहिजे. आपणास आवश्यक तया सोईसुविधा पुरविण्याचा प्रयत्न महाविद्यालयामार्फत केला जाईल. आपल्या उज्वल यशामुळे आपल्या आई-वडिलांच व् महाविद्यालायचा नाव लौकिक होईल. तसेच अभ्यासात सातत्य व परिश्रम ही यशाची आहे, असे मत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रा. वनिता पाटील, आभार प्रा. यज्ञेश जनगावे यांनी मानले.

साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे स्मारकाचे भूमिपूजन

तभा वृत्तसेवा,
उदगीर, दि. २६ ऑगस्ट-

चिरागनगरमध्ये अण्णाभाऊ साठेंचे स्मारक उभारणार आहे. पुण्याला लहुजी साळवे यांचे स्मारक उभारत आहोत. बार्टीच्या तत्वावर अर्टीची स्थापना झाली असून यामुळे मातंग समाजातील तरुण मुलांना याचा फायदा होईल. भविष्यात उदगीर शहरात अण्णाभाऊ साठेंचा पुर्णाकृती पुतळा उभारुन पुतळ्या शेजारी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठेंच्या नावाने म्युझियम, स्मारक व अभ्यासिकेसाठी १५ कोटी मंजूर करण्यात आले होते. त्याचे भूमीपूजन क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे नातु सचिन साठे, राहुल केंद्रे, बन्सिलाल कांबळे, रामचंद्र तिरुके, प्राचार्य डॉ.राजकुमार मस्के, प्रा.डॉ. अंबादास सकट, राज क्षीरसागर, नंदकुमार गवारे, समीर शेख, बसवराज बागबंदे, देविदास कांबळे, बापूराव राठोड, बालाजी भोसले, सय्यद जानीमियाँ, शशिकांत बनसोडे, मनोज चिखले, वसंत पाटील, संग्राम हासुळे पाटील, सुनिल केंद्रे, सुदर्शन माने, अर्जुन आगलावे, नजीर हाशमी, विजय निटुरे, रामराव बिरादार,शिवशंकर धुप्पे, मनोज पुदाले, उत्तरा कलबुर्गे, विजय निटुरे, दिपाली औटे,

ॲड.वर्षा कांबळे, हुसना बानो, बालाजी गवारे, समद शेख, इमरोज हाशमी, बाळासाहेब मरलापल्ले, गणेश गायकवाड, नवनाथ गायकवाड, अमोल निडवदे, इब्राहिम पटेल, प्रकाश राठोड, बाबुराव अंबेगावे, अरविंद शिंदे, धिरज कसबे, स्वप्निल जाधव, प्रभावती कांबळे, प्रा.बिभीषण मद्देवाड, प्रल्हाद येवरीकर, राम कांबळे, रुपेंद्र चव्हाण, रवींद्र बेंद्रे, जोंधळे, बालाजी रणदिवे, किरण सूर्यवंशी, वीरलाल कांबळे,देवीलाल कांबळे, प्रथमेश देवानाळे, बाबासाहेब सुर्यवंशी, बालाजी कांबळे आदी उपस्थित होते. सूत्रसंचलन प्रा.शिवाजीराव देवनाळे, आभार प्रथमेश देवनाळे यांनी मानले.

डॉ. अरविंद भातांब्रे यांच्या रक्षाबंधन कार्यक्रमासाठी महिलांची प्रचंड गर्दी

तभा वृत्तसेवा,
निलंगा, दि. २६ ऑगस्ट-

भावा- बहिणीचे अतुट नाते जपण्यासाठी धागा मायेचा, वीण विश्वासाची. या नात्याने डॉ अरविंद भातांब्रे यांच्या तर्फे निलंगा येथे रविवार दि. २५ ऑगस्ट रोजी रक्षाबंधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास उपस्थित असलेल्या हजारो महिला भगिनींनी डॉ अरविंद भातांब्रे यांना राखी बांधून त्यांच्या पुढील कार्यास शुभेच्छा व शुभाशीर्वाद दिले.

या कार्यक्रमासाठी औसा येथील नाथ संस्थानचे शर्मिला गुरुबाबा महाराज औसेकर, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या संयोजिका प्रज्ञा वाघमारे, प्रदेश उपाध्यक्ष विद्या पाटील, लातूर शहर जिल्हाध्यक्ष माजी महापौर

स्मिता खानापुरे, माजी जि.प. सभापती कुशावर्ताताई बेळ्ळे, अपर्णा अरविंद भातांब्रे, रतनबाई विरभद्र भातांब्रे, विरभद्र भातांब्रे, शहर अध्यक्ष-अजित नाईकवाडे, डॉ. अरविंद भातांब्रे आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. ओवाळणी म्हणून सर्व महिलांना साडी भेट दिली.

यावेळी डॉ. भातांब्रे म्हणाले, आपल्या बहिणीच्या रक्षणासाठी मी सदैव तत्पर आहे. अडचणीच्या वेळी आपल्या सर्वांच्या पाठीशी हा भाऊ खंबीरपणे उभा आहे. जेथे कमी, तेथे मी असा विश्वास उपस्थित बहिणींना दिला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सोनू डगवाले, महेश देशमुख, प्रमोद मरुरे, अरुण पाटील यांनी परिश्रम घेतले. चक्रधर शेळके यांनी मानले.

महिला सक्षम झाल्या तरच भारत महासत्ता बनेल : आ. निलंगेकर

तभा वृत्तसेवा,
निलंगा, दि. २६ ऑगस्ट-

केंद्र आणि राज्य शासन महिलांना सक्षम करण्यासाठी ऐतिहासिक व धोरणात्मक निर्णय घेत आहेत. महिला बचत गटाच्या माध्यमातून उद्योग व्यवसायाला चालना मिळावी म्हणून आर्थिक मदत देत असून भविष्यात महिलांना केंद्रस्थानी ठेवून आर्थिक तरतुदीची बँकाना आदेश दिले आहेत. महिला सक्षम झाल्यातरच देश महासत्ता बनेल, असे आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यानी जन सन्मान पदयात्रे दरम्यान अंबुलगा बु येथील जाहीर सभेत प्रतिपादन केले आहे.

यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष सुभाष म्हेत्रे, संजय दोरवे,दगडू सोळुंके, चेअरमन

अरविंद चव्हाण, जेष्ठ स्वातंत्र्य सेनानी विठ्ठलराव होरे, शेखर मिरगाळे, माधव पाटील, दिलीप मिरगाळे, विजयकुमार शिंदे, लालू शेख, दशरथ गोडगे, शिवाजी होरे, नरसिंग म्हेत्रे, शिवाजी सूर्यवंशी, विलास पाटील, नामदेव हल्लाळे, शिवकरण होरे उपस्थित होते.

पुढे बोलताना निलंगेकर म्हणाले, निलंगा मतदार संघात आतापर्यंत १ लाख महिलांचे मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेचे अर्ज आले आहेत.त्यात प्रत्यक्ष ६५ हजार महिलांना लाभ मिळाला आहे.यापुढील टप्प्यात उर्वरीत महिलांना शंभर टक्के लाभ मिळणार आहे. देशातील शंभर टक्के महिलांना आर्थिक सक्षम केल्यावरच देश महासत्ता होणार आहे. हाच हेतू डोळ्यासमोर ठेवून केंद्र व राज्य सरकार काम करत आहे.असे त्यानी शेवटी सांगितले.

हलगरा येथून निघालेल्या या जन सन्मान यात्रेच्या तिसऱ्या दिवशी अंबुलगा बु येथे मोठी भव्य जाहीर सभा झाली गावात प्रवेश होताच भजन ढोल ताशा व फटक्यांच्या आतीषबाजीत आ.निलंगेकर यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी गावातील शिवनंदा मिरगाळे, संगीता आंबेगावे, सुनिता मिरगाळे, बबीता कांबळे, शिवनंदा कांबळे, दैवशाला होरे, धोंडाबाई बिरादार, विदेशा गायकवाड संगीता बिराजदार, अनिता थोटे, प्रेमा गुंडूरे आदी महिलांनी आ. संभाजीराव पाटील-निलंगेकर यांचे राखी बांधून औक्षण केले. प्रास्तविक प्रेमिला शिंदे यानी तर सूत्रसंचालन चंद्रशेखर मिरगाळे यांनी केले व आभार संदीप पाटील यानी मानले.

डी. बी. महाविद्यालयाचे जीपॅट, विद्यापीठ परीक्षेत यश

चाकूर, दि. २५ ऑगस्ट-

चाकूर तालुक्यातील महाळग्रा येथील दिनेश बेंबडे कॉलेज ऑफ फार्मसी मधील बी.फार्मसी शाखेचा निकाल ९४ टक्के तसेच जीपॅट या राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत दिनेश बेंबडे फार्मसी महाविद्यालयातील वैष्णवी राजकुमार शेटे आणि जगदीश मल्लिकार्जुन स्वामी या विद्यार्थ्यांनी पात्रता संपादन केली आहे. बी.फार्मसी अभ्यासक्रमासाठी एकूण ११३ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते,त्यापैकी १०६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

त्यामध्ये गुणानुक्रमे पवार शिवराज सुधाकर व मोरे राज अजय यांनी प्रथम क्रमांक पटकावला आहे. टेळे रविना ज्ञानदेव यांनी द्वितीय क्रमांक मिळवला आहे.तसेच तृतीय क्रमांक नाईकनवरे वैभव वैजनाथ,चौंडे अभिषेक विजयकुमार,देशमुख मानसी हणमंत यांनी मिळवला आहे. विद्यार्थ्यांनी संपादन केलेल्या यशाबद्दल राधेय चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष दिनेश बेंबडे, सचिव प्रणिता बेंबडे,कार्याध्यक्ष विवेक बेंबडे प्राचार्य डॉ. जयदीप यादव,प्राचार्य डॉ.श्रीकांत ढगे, प्रशासकीय अधिकारी प्रा.श्रीहरी वेदपाठक तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.